।। शीलं परं भूषणम् ।।

श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचलित

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

नॅक 'अ' मूल्यांकन

# देशभूषण

२०२५



# श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर

## पदाधिकारी



**मा. के. बी. आवाडे**
अध्यक्ष



**मा. ॲड. के. ए. कापसे**
चेअरमन



**मा. व्ही. एस. दानीगोंड**
उपाध्यक्ष



**मा. डी. के. सांगावकर**
व्हा. चेअरमन (६ एप्रिल, २०२५ पर्यंत)



**मा. जी. बी. रोटे**
खजिनदार



**मा. एम. बी. गरगटे**
कार्यवाह

॥ शीलं परं भूषणम् ॥

श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचलित

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

(कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, बी.व्होक व पदव्युत्तर विभाग)

**नॅक 'अ' मानांकन**

## बी. एम. रोटे कनिष्ठ महाविद्यालय

(कला, वाणिज्य व विज्ञान)

# देशभूषण

## २०२४-२५


७ ई, वैशाली परिसर, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर - ४१६ ००३

दूरध्वनी : (०२३१) २६५१८३०

फॅक्स : (०२३१) २६८०११२

ई-मेल : mahavircollege@yahoo.com

वेबसाईट : www.mahavircollege.com




## मुखपृष्ठ संकल्पना

साठ हजार वर्षांपूर्वी मानवी संस्कृतीमध्ये भाषेचा इतिहास सुरू होतो. मानवी विचारांच्या अदान-प्रदानासाठी मौखिक संप्रेषणाशिवाय तो गुहा चित्रांमध्ये चित्र लिपी द्वारे संप्रेषित केला गेला. मानवाने शोध लावलेल्या लिपीशास्त्रातला हा पहिला प्रयत्न होता. या लिप्यांना प्रतिबिंबित करण्याची प्रयत्न मानवाने शिल्प, काष्ट आणि ताम्र-पाषाणावर केला. आपल्या भाषेच्या सांकेतिक खुणा करण्यास सुरुवात केली. या सांकेतिक खुणा म्हणजे त्याची लिपीच होती. या संकेत लिपीपासून भाषांचा उगम आणि विस्तार झाला. जगभरामध्ये अनेक भाषा वेगवेगळ्या शैलीने लिपीबद्ध झाल्या. त्या लिपीशैलीचा इतिहास आणि मानवी संस्कृतीचा इतिहास हा समांतरपणे विस्तारित गेला आहे. भारतामध्येही अनेक भाषा बोलल्या जात होत्या. या भाषांच्या अविष्करणासाठी काही लिप्या विकसित झाल्या. त्यापैकी सर्वात प्राचीन ब्राह्मी आणि खरोष्टी या लिप्या होत्या. ब्राह्मी आणि खरोष्टीनंतर देवनागरी, द्रविडी आणि प्रादेशिक लिप्यांचा विस्तार झाला. या देवनागरी आणि द्रविडी त्यांच्या संयोगातून महाराष्ट्री प्राकृत भाषेसाठी लिपी स्वीकारली गेली. हा हजारो वर्षांचा लिप्यांचा इतिहास आणि महाराष्ट्री प्राकृत ते मराठी असा लिपीचा इतिहास अर्थातच मराठी भाषेचा इतिहास, मराठी भाषा अभिजात असण्याचा इतिहास या मुखपृष्ठातील चित्रातून प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न चित्रकार मिलिंद यादव यांनी केला आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला याकरिता या वर्षीचा हा देशभूषण वार्षिक अंक आम्ही समर्पित करत आहोत.

## प्रकटीकरण

**नियतकालिक 'देशभूषण'**

| | |
|---|---|
| प्रकाशन कालावधी | : वार्षिक |
| स्वामित्व | : महावीर महाविद्यालय, कोल्हापूर |
| प्रकाशक | : प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील |
| कार्यकारी संपादक | : डॉ. प्रकाश कांबळे |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ७ ई, वैशाली परिसर, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर - ४१६००३ |
| • मुद्रक | : भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर - ४१६ ००१ फोन : ०२३१-२६५४३२९ |
| • मुखपृष्ठ संकल्पना | : श्री. मिलिंद यादव |
| सजावट व रंगीत पाने | : भारती मुद्रणालय, कोल्हापूर |

- या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक आणि संपादक सहमत असतीलच, असे नाही.
- केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित.

।। शीलं परं भूषणम् ।।

# श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर

## संस्था कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| **मा. के. बी. आवाडे** | अध्यक्ष |
| **मा. व्ही. एस. दानीगोंड** | उपाध्यक्ष |

## कार्यकारी समिती सन २०२४-२०२५ ते २०२८-२०२९

**मा. ॲड. के. ए. कापसे**, चेअरमन
**मा. डी. के. सांगावकर**, व्हा. चेअरमन (६ एप्रिल, २०२५ पर्यंत)
**मा. जी. बी. रोटे** (मातोश्री रु. म. रोटे ट्रस्ट प्रतिनिधी), खजिनदार
**मा. एम. बी. गरगटे**, सेक्रेटरी
**मा. डॉ. पी. आर. शहा**, सदस्य
**मा. ॲड. व्ही. व्ही. पाटील**, सदस्य
**मा. आर. बी. देशपांडे**, सदस्य
**मा. डॉ. सौ. सुषमा जी. रोटे**, सदस्य
**मा. एम. डी. वर्धमाने**, सदस्य
**मा. ए. ए. अथणे**, सदस्य
**मा. डी. एस. लडगे**, सदस्य
**मा. पी. आर. पाटील**, सदस्य
**मा. ॲड. ए. के. कापसे**, सदस्य
**मा. एस. एस. हेरवाडे**, सदस्य (२ जानेवारी, २०२५ पर्यंत)
**मा. एन. एम. देसाई**, सदस्य
**मा. ॲड. पी. आर. पाटील**, निमंत्रित
**मा. आर. आर. पाटील (अक्कोळकर)**, निमंत्रित
**मा. डॉ. यु. बी. पाटील**, निमंत्रित (प्र. प्राचार्या, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर)
**मा. आर. ए. गाट**, निमंत्रित (मुख्याध्यापक, देशभूषण हायस्कूल, कोल्हापूर)
**मा. बी. सी. वस्त्रद**, निमंत्रित (मुख्याध्यापक, दादासाहेब मगदूम हायस्कूल, कोल्हापूर)

॥ शीलं परं भूषणम् ॥

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

## नियामक मंडळ (Governing Body)

### सन २०२४-२५ ते २०२८-२९

**ॲड. कुंतीनाथ कापसे**, चेअरमन
**श्री. मोहन गरगटे**, संस्था प्रतिनिधी
**श्री. रावसाहेब देशपांडे**, संस्था प्रतिनिधी
**डॉ. सुषमा रोटे**, संस्था प्रतिनिधी
**ॲड. अभिजित कापसे**, संस्था प्रतिनिधी
**प्रा. (डॉ.) गोमटेश्वर पाटील**, प्राध्यापक प्रतिनिधी
**प्रा. (डॉ.) कल्पना गंगातीरकर**, प्राध्यापक प्रतिनिधी
**डॉ. हणमंत देशपांडे**, शिक्षणतज्ज्ञ
**मा. सह. संचालक, उच्च शिक्षण**, कोल्हापूर विभाग, शासन प्रतिनिधी
**प्रा. (डॉ.) वर्षा मैंदर्गी**, शिवाजी विद्यापीठ प्रतिनिधी

**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**, सदस्य सचिव

---

## विद्या परिषद (Academic Council)

### सन २०२४-२५ ते २०२६-२७

**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**, चेअरमन, समाजशास्त्र अभ्यास मंडळ
**डॉ. शिरीष शितोळे**, चेअरमन, मानसशास्त्र अभ्यास मंडळ
**प्रा. डॉ. कल्पना गंगातीरकर**, चेअरमन, इंग्रजी अभ्यास मंडळ
**डॉ. प्रकाश कांबळे**, चेअरमन, हिंदी अभ्यास मंडळ
**प्रा. (डॉ.) गोपाळ गावडे**, चेअरमन, मराठी अभ्यास मंडळ
**डॉ. महादेव शिंदे**, चेअरमन, इतिहास अभ्यास मंडळ
**प्रा. (डॉ.) अरूण पाटील**, चेअरमन, भूगोल अभ्यास मंडळ
**डॉ. रोहित पाटील**, चेअरमन, शा.शिक्षण अभ्यास मंडळ
**डॉ. सुजाता पाटील**, चेअरमन, अर्थशास्त्र अभ्यास मंडळ
**डॉ. श्रीकांत बच्चे**, चेअरमन, वाणिज्य अभ्यास मंडळ
**प्रा. डॉ. श्रद्धा पाटील**, चेअरमन, शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळ
**प्रा. डॉ. रविंद्र मिरजकर**, चेअरमन, बी.व्होक अभ्यास मंडळ
**प्रा. ओमकार मगदूम**, चेअरमन, भौतिकशास्त्र अभ्यास मंडळ
**श्रीमती रीणा पाटील**, चेअरमन, रसायनशास्त्र अभ्यास मंडळ
**प्रा. स्वप्निल पाटील**, चेअरमन, सूक्ष्मजीवनशास्त्र अभ्यास मंडळ
**श्रीमती रीमा मेस्त्री**, चेअरमन, संगणकशास्त्र अभ्यास मंडळ
**डॉ. मेघा मोळे**, चेअरमन, वनस्पतिशास्त्र अभ्यास मंडळ
**श्रीमती स्वप्नाली जगदाळे**, चेअरमन, प्राणिशास्त्र अभ्यास मंडळ
**श्रीमती ऐश्वर्या मकानदार**,
चेअरमन, गणित व संख्याशास्त्र अभ्यास मंडळ
**डॉ. प्रदिप गायकवाड**, प्राध्यापक प्रतिनिधी
**डॉ. सुरेश संकपाळ**, प्राध्यापक प्रतिनिधी
**डॉ. शैलजा मंडले**, प्राध्यापक प्रतिनिधी
**प्रा. एकनाथ कमलाकर**, प्राध्यापक प्रतिनिधी
**ॲड. दीपक जोशी**, नियामक मंडळ नियुक्त प्रतिनिधी
**श्री. भरत जाधव**, नियामक मंडळ नियुक्त प्रतिनिधी
**डॉ. टी. व्ही. जी. शर्मा**, नियामक मंडळ नियुक्त प्रतिनिधी
**प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे**, नियामक मंडळ नियुक्त प्रतिनिधी
**प्रा. (डॉ.) प्रतिमा पवार**, शिवाजी विद्यापीठ प्रतिनिधी
**प्रा. (डॉ.) शंकर हंगीरगेकर**, शिवाजी विद्यापीठ प्रतिनिधी
**प्रा. (डॉ.) औदुंबर सरवदे**, शिवाजी विद्यापीठ प्रतिनिधी
**प्रा. हेमंत पाटील**, सचिव

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

## महाविद्यालय विकास समिती २०२२-२०२३ ते २०२४-२५

**मा.ॲड.के.ए.कापसे**, पदसिद्ध अध्यक्ष

**मा.एम.बी.गरगटे**, व्यवस्थापनाचे कार्यवाह

**प्रा. (डॉ.) बी. ए. नाईक**, सदस्य-प्राध्यापक प्रतिनिधी

**डॉ. एस. व्ही. बच्चे**, सदस्य-प्राध्यापक प्रतिनिधी

**प्रा. डॉ. एस. के. पाटील**, सदस्य-प्राध्यापक प्रतिनिधी

**श्री. अमरदीप नाईक**, सदस्य-अध्यापकेतर कर्मचारी प्रतिनिधी

**श्री. के. डी. पाटील**, सदस्य-शिक्षणशास्त्र-माजी विद्यार्थी

**श्रीमती ए. व्ही. दानीगोंड**, सदस्य-उद्योग-मनोरमा इन्फोसोल्युशन्स

**डॉ. युवराज पवार**, सदस्य-श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन-संशोधन

**श्री. पी. डी. देशपांडे**, सदस्य-हेल्पर्स ऑफ द हॅण्डीकॅप्ड् - समाजसेवा

**डॉ. संजय ओमासे**, सदस्य-अंतर्गत गुणवत्ता हमी समिती

**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**, सदस्य-सचिव

## वित्त समिती २०२४-२५ ते २०२५-२६

**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**, अध्यक्ष

**श्री. गुणवंत रोटे**, नियामक मंडळ नियुक्त प्रतिनिधी

**डॉ. श्रीकांत बच्चे**, प्राध्यापक प्रतिनिधी

**श्री. विवेक मोरबाळे**, सदस्य सचिव

# बी.एम.रोटे ज्युनिअर कॉलेज

## शालेय समिती २०२४-२५

**श्री. एम. बी. गरगटे**, चेअरमन

**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**, सचिव

**श्री. डी. एस. लडगे**, सदस्य

**श्री. एम. डी. वर्धमाने**, सदस्य

**श्री. आर. बी. देशपांडे**, सदस्य

**श्री. जी. बी. रोटे**, सदस्य

**श्री. पी. आर. पाटील**, सदस्य

**डॉ. सौ. सुषमा जी. रोटे**, निमंत्रित

**डॉ. शैलेंद्र सडोलीकर**, शिक्षक प्रतिनिधी

**श्री. विलास तातळे**, शिक्षकेत्तर प्रतिनिधी

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
## देशभूषण - २०२५

### संपादक मंडळ

**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**, अध्यक्ष
**डॉ. प्रकाश कांबळे**, कार्यकारी संपादक
**प्रा. (डॉ.) गोमटेश्वर पाटील**, सहसंपादक
**प्रा. (डॉ.) गोपाळ गावडे**, समन्वयक-मराठी विभाग
**श्री. सुरेश मसुटे**, सदस्य
**श्रीमती श्वेता परुळेकर**, सदस्य
**डॉ. राजेंद्र रोटे**, समन्वयक-हिंदी विभाग
**श्रीमती शशिकला सरगर**, सदस्य
**श्रीमती सोनल वाळवेकर**, सदस्य
**श्री. हेमंत पाटील**, समन्वयक-इंग्रजी विभाग
**डॉ. प्रदीप गायकवाड**, सदस्य
**श्री. प्रकाश चव्हाण**, सदस्य
**श्री. जावेद मेस्त्री**, सदस्य
**डॉ. सुरेश संकपाळ**, समन्वयक-पदव्युत्तर विभाग
**श्री. स्वप्निल पाटील**, विज्ञान विभाग
**डॉ. अंकुश गोंडगे**, कला दालन

### विद्यार्थी संपादक मंडळ

**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**, अध्यक्ष
**डॉ. प्रकाश कांबळे**, कार्यकारी संपादक
**प्रा. (डॉ.) गोमटेश्वर पाटील**, सहसंपादक
**हर्षवर्धन बेडेकर**, बी.ए.-३, प्रमुख, विद्यार्थी संपादक
**प्रतीक पाटील**, एम.ए.-२
**साक्षी पाऊसकर**, बी.ए.बी.एड्.-२
**श्वेता गावडे**, बी.एस्सी.-३
**आदित्य रणदिवे**, १२ वी

|| शीलं परं भूषणम् ||

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

### प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील

## प्राध्यापक वृंद

### कला व वाणिज्य

प्रा. (डॉ.) गोमटेश्वर सातगोंडा पाटील
डॉ. शिरीष काशिनाथ शितोळे
डॉ. शरद राजाराम गायकवाड
डॉ. प्रकाश विष्णू कांबळे
डॉ. प्रदीप बाबासो गायकवाड
डॉ. सुरेश परशराम संकपाळ
डॉ. सुजाता जितेंद्र पाटील
डॉ. अश्विनी अभय कोटणीस-पटेल
डॉ. अंकुश मच्छिंद्रराव गोंडगे
प्रा. रविदास शंकर पाडवी
प्रा. संध्या शिवाजीराव जाधव
डॉ. श्रीकांत वसंत बच्चे
डॉ. शशिकांत शिवगोंडा पाटील
डॉ. संजय शिवाजी ओमासे
डॉ. रोहीत विजय पाटील
प्रा. उमेश रमेश वांगदरे
प्रा. प्रकाश धनपाल चव्हाण

### बी.ए.बी.एड. (एकात्मिक)

डॉ. महादेव मारुती शिंदे (समन्वयक)
प्रा. (डॉ.) गोपाळ ओमाणा गावडे
प्रा. (डॉ.) अरुण आण्णासाहेब पाटील
प्रा. (डॉ.) रवींद्र भानुदास मिरजकर
प्रा. (डॉ.) कल्पना गिरीष गंगातीरकर
प्रा. (डॉ.) श्रद्धा शिवाजीराव पाटील
डॉ. राजेंद्र पांडुरंग रोटे (सेवानिवृत्त)
प्रा. जयवंत मारुती दळवी
डॉ. शंकर आण्णा धनवडे
प्रा. हेमंत महादेव पाटील
डॉ. शैलजा श्रीरंग मंडले
डॉ. अंकुश रामचंद्र बनसोडे
डॉ. शशिकांत श्रीधर अन्नदाते
प्रा. अजितकुमार नेमिनाथ चौगुले
प्रा. एकनाथ आण्णासो कमलाकर

### बी. व्होक. विभाग

डॉ. संदीप अर्जुन नलवडे
(विशेष प्रशासकीय अधिकारी)
प्रा. विनय विजय बिरंजे
प्रा. काजल संभाजी भोसले
प्रा. दीपक अनंत चौगले
प्रा. सूरज बाबुराव शिंदे
प्रा. अमिन शाहिद सदलगे
प्रा. उत्कर्ष सुभाषचंद्र पाटणकर
प्रा. नम्रता मोहन शिंगे
प्रा. श्रृती राजेंद्र गिजवणेकर
प्रा. प्रतीराज सतिश मोरे

### विज्ञान विभाग

श्री. स्वप्नील पाटील (समन्वयक)
डॉ. भैरु शिंदे
डॉ. विद्येश जाधव
श्रीमती आशियाना मकानदार
श्रीमती आसमा नदाफ
श्रीमती प्रिया जाधव
श्रीमती रिमा मेस्त्री
श्रीमती प्रणिता पाटील
श्रीमती पुष्पांजली दौडमणी
डॉ. मेघा मोळे
श्रीमती रीना पाटील
श्रीमती ऐश्वर्या पाटील
श्रीमती निकीता कांबळे
श्रीमती प्रमेया जाधव
श्रीमती निकिता जाधव
श्रीमती अंजोर जाधव
श्रीमती निर्मल साखरपे
श्री. ओंकार मगदूम
श्रीमती मधुरा भोसले
श्रीमती ऋतुजा पाटील
श्रीमती हर्षदा पाटील
श्री. अजित पोवार
श्रीमती गायत्री चव्हाण
श्रीमती प्रियांका क्षीरसागर
श्रीमती स्वप्नाली जगदाळे
डॉ. विद्या कांरडे
श्रीमती रश्मी राऊत
श्री. अमर पाटील
श्रीमती सायली कळंत्रे

# बी. एम. रोटे कनिष्ठ महाविद्यालय

## प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील

## प्राध्यापक वृंद

### कला व वाणिज्य

श्री. राजेंद्र ए. हिरकुडे (पर्यवेक्षक)
श्रीमती शशिकला टी. सरगर
श्री. आदिनाथ आर. चौगुले
डॉ. शैलेंद्र एम. सडोलीकर
श्री. जावेद बी. मेस्त्री
डॉ. संदीप ए. नलवडे
श्री. विरकुमार व्ही. उपाध्ये
डॉ. माधुरी पी. रसाळ
श्री. सुनील टी. चौगुले
श्री. सचिन एल. बराटे
श्री. रामदास जी. तुरुके
श्री. स्वप्निल बी. खोत
श्रीमती श्वेता एस. परुळेकर
श्री. अमोल एस. मोरे
श्री. रुपेश ए. हळदकर

### विज्ञान विभाग

श्री. राहुल ए. आडके (समन्वयक)
श्रीमती माधवी ए. मोरे
डॉ. दमयंती एस. जत्राटे
श्रीमती रेखा ए नाईक
श्रीमती प्रियांका ए. जाधव
श्रीमती माया एस. कलागते
श्री. एकनाथ आर. ढेरे
श्री. विकास व्ही. चौगुले
श्री. सनी बी. भिवटे
श्रीमती सुनीता जे. पाटील
श्री. गौरव पी. मनपाडळेकर
श्री. अभिषेक पी. भालेकर
श्री. योगेश के. पाटील
श्रीमती तृप्ती ए. वरपे
श्री. सुरेश ए. मसुटे
श्री. स्वप्नील बी. खोत
श्री. भैरु एन. शिंदे
श्रीमती सोनल एस. वाळवेकर
श्रीमती सायली देशमुख
श्रीमती नेहा आर. वायचळ
श्रीमती गिरीजा बी. चेंडके

## प्रशासकीय सेवक

### अनुदानित

श्री. अमरदिप व्ही. नाईक
(रजिस्ट्रार)
श्री. विजयकुमार जी. झुरळे
(कार्यालयीन अधीक्षक)
श्री. विवेक आर. मोरबाळे
(वरिष्ठ लिपिक)
श्री. श्रीकांत एस. डवरी
श्री. विलास ए. तातळे
श्री. राजीव एस. पाटील
(सहा. ग्रंथपाल)
श्री. अरुण बी. खोत
श्री. रामचंद्र के. माने

**चतुर्थ श्रेणी सेवक**

श्री. सुनील डी. आयरे
(ग्रंथालय परिचर)
श्री. मुकुंद बी. सावंत
(ग्रंथालय परिचर)
श्री. दीपक एन. कापसे
(ग्रंथालय परिचर)
श्री. अर्जुन आर. पाटील
श्री. शिवाजी डी. बनसोडे
श्री. तुकाराम आर. चांदणे
श्री. दादासो व्ही. पाटील
श्री. धनाजी टी. पोवार
श्री. विशाल एम. पाटील

### विनाअनुदानित

श्रीमती सुरेखा सी. पत्रावळी
श्री. राजाराम बी. जाधव
श्री. राजाराम व्ही. पाटील
श्री. पियुष रत्नाकर मेळवंकी
श्री. आशिष सुरेश पोवार
श्री. आशितोष सुरेश पोवार
श्री. लक्ष्मण भिवा बचाटे
श्री. विनायक रघुनात दळवी
श्री. आदित्य संजय पाटील
श्री. विनोद विलास जाधव

**चतुर्थ श्रेणी सेवक**

श्री. हरी एस. थोरबोले
श्री. नवनाथ डी. कोरवी
श्री. अरविंद एस. तिबिले
श्री. लक्ष्मण एम. पाटील
श्री. ऋषिकेश आर. पाटील
श्री. गणपती ए. धनगर
श्री. शरद हिंदुराव बंगडे
श्री. विजय संभाजी जगदाळे
श्री. गगन दिलीप पाटील

# प्राचार्यांचे मनोगत

## उत्साहाचे आणि आनंद द्विगुणित करणारे वर्ष

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची सांगता होत आहे. या वर्षामध्ये क्रीडा, सांस्कृतिक, राट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना अशा विविध क्षेत्रातील उपक्रमांच्या माध्यमातून महाविद्यालयाची गुणवत्ता विशेष उंचीवर नेण्यात महाविद्यालयातील सर्वच घटक म्हणजे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे योगदान महत्वाचे ठरले आहे. महाविद्यलायातील प्राध्यापक व विद्यार्थी मिळून ४ भारतीय आणि १ आंतरराष्ट्रीय दर्जाचे पेटंट मिळाले आहे. बी.व्होक विभागातील ॲटोमोबाईल विभागामार्फत ॲटोमिनीया हा एक लक्षवेधी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामध्ये विविध कंपन्याच्या टू व्हीलर व फोर व्हीलर गाडयांचे प्रदर्शन महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित करण्यात आले होते. याला शहरातूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महाविद्यालयाचा क्रीडा विभाग अतिशय समृध्द आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध क्रीडा प्रकारांमध्ये महाविद्यालयाची मान उंचावेल अशी कामगिरी या विभागाने केली आहे. सॉप्टबॉल व क्रिकेट या प्रकारात महाविद्यालयातील मुलींचा व मुलांचा संघ विजेता ठरला आहे. सांस्कृतिक क्षेत्रातही राष्ट्रीय पातळीवर महाविद्यालयातील चेतन पोवार याने विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. क्रीडा क्षेत्रातील अतिशय मानाचा समजला जाणारा शिवछत्रपती पुरस्कार आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थीनी कु. ऐश्वर्या रमेश पुरी हिला जाहीर झाला ही देखील विशेष आनंदाची बाब आहे. राष्ट्रीय सेवा योजनेत आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिध्द केली आहे. राष्ट्रीय छात्रसेनेचा विद्यार्थी श्री. समर्थ पाटील याची प्रजासत्ताक दिनाच्या संचालनासाठी निवड झाली ही महाविद्यालयासाठी विशेष अभिमानाची गोष्ट आहे. या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाची शैक्षणिक आणि प्रशासकीय गुणवत्ता तपासण्यासाठी शिवाजी विद्यापीठाची तज्ञ प्राध्यापकांची एक समिती भेट देण्यासाठी आली होती. त्यामध्ये महाविद्यालयाने उत्कृष्ट (Excellent) दर्जा प्राप्त केला ही विशेष अभिमानाची गोष्ट आहे.

अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत दोन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात सर्वच दिव्यांग विद्यार्थ्यांनी हिरिरीने भाग घेवून आपली क्रीडा क्षेत्रातील चुणूक दाखविली. सर्वच क्षेत्रातील उत्साहवर्धक व समाधानकारक कामगिरी आणि महाविद्यालयाला प्राप्त झालेला 'उत्कृष्टता' हा दर्जा या कामगिरीमुळे हे शैक्षणिक वर्ष उत्साहाचे अति आनंद द्विगुणीत करणारे ठरले आहे. अर्थातच अशा सर्व उपक्रमांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करणारे आमच्या संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे, संस्थेचे सचिव श्री. मोहन गरगटे, खजिनदार श्री. गुणवंत रोटे, संचालिका डॉ. सौ. सुषमा रोटे, ॲड. अभिजीत कापसे, श्री. नरेंद्र देसाई व सर्व सन्माननीय संचालक मंडळ यांच्यामुळेच हे शैक्षणिक वर्ष आनंदाचे, उत्साहाचे आणि समाधानाचे गेले. याबद्दल सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचे मन:पूर्वक आभार !

धन्यवाद !

**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**

# संपादकीय

नमस्कार......

महाविद्यालयाचे 'देशभूषण २०२५' वार्षिकांक आपल्या हाती सुपूर्द करताना आम्हाला आनंद होत आहे. हा अंक म्हणजे विद्यार्थ्यांच्या लेखन अभिव्यक्तीचा अविष्कार होय. महाविद्यालयाचा सर्वांगीण लेखाजोखा, महाविद्यालयाचा भौतिक व गुणात्मक विकास, गुणवान विद्यार्थी व प्राध्यापकांचे यश, त्यास व्यवस्थापनाकडून मिळालेली कौतुकाची थाप तसेच संस्था व महाविद्यालयाच्या भविष्यकालीन योजनांचा वेध घेणारा हा वार्षिक अंक महाविद्यालयाच्या कार्याचा आरसा आहे.

महाविद्यालयाचे देशभूषण हे नियतकालिक नव साहित्यिकांसाठी शब्दांच्या, चित्रांच्या माध्यमातून व्यक्त होण्याचे हक्काचे ठिकाण. पण दुर्दैवाने आजची पिढी मोठ्या प्रमाणावर लिहिताना आणि वाचताना दिसते ती समाजमाध्यमावरचं. सामाजमाध्यमांची उपयुक्तता नाकारता येणार नाही, पण साहित्य म्हणून त्याच्या मर्यादा आहेत. आजचा नव साहित्यिक आपला भोवताल, आपल्या समस्या, त्यांचा व्यक्ती व समाज मनावर होणारा चांगला, वाईट परिणाम, त्यावरील उपाय यांची आपल्या परीने उकल करताना दिसतो. तो स्थानिक ते जागतिक स्तरावरील महत्वाच्या घटनावर गंभीर, चिंतनीय व कलात्मक प्रतिक्रिया देताना दिसतो. ही बाब अत्यंत सकारात्मक तसेच आशादायक म्हणावी लागेल. तो कथा, कविता, समीक्षा, ललित, वैचारिक, प्रवासवर्णन, मुलाखत, व्यक्तीचित्र, माहितीपर, संशोधनात्मक लेखन प्रकारांच्या माध्यमातून आपली निरीक्षणे अत्यंत प्रामाणिकपणे नोंदवतो. आपल्याला विचार करायला प्रवृत्त करतो. समाजाचे वास्तव मांडतो. या साहित्यात तीव्र गतीने बदलणारा एकविसावा समाज व संस्कृती, मुल्यांची होणारी हेळसांड, वाढती जातीय व धार्मिक कट्टरता, जगभर सुरु असलेली युद्धे व त्या माध्यमातून गरीब देशांचा व लोकांचा सुरु असलेला नरसंहार, पर्यावरण बदलाचे मानवी जीवनावर होणारे भयावह परिणाम, वाढत्या भाषिक अस्मिता व भाषांवर होणारी अतिक्रमणे, नव्या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून कौशल्याधारित शिक्षण घेवून नोकरीच्या शोधात फिरणारी उच्च शिक्षित पिढी आपल्या इच्छा-आकांक्षासह भेटते. वाचक म्हणून आपण या नव साहित्यिकांच्या साहित्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. या सोबतच त्यांच्या लिखाणातून व्यक्त झालेले मैत्रीचे भावबंध, प्रेमाचे गुंफलेले धागे, अनुभवांचे लालित्य आपणास सुखावून जाते.

या सर्व साहित्याबरोबरच आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे संशोधन, विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा, एन.सी.सी., एन.एस.एस. आणि सर्वच क्षेत्रांत संपादित केलेले यशही या अंकातून प्रतिबिंबित होते. विद्यार्थ्यांचे हे यश शिक्षक, पालक, संस्थाचालकांना प्रोत्साहित करते.

यावर्षीचा अंक वाचनीय व्हावा यासाठी संपादक मंडळाने खूप प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नासाठी नेहमीच संस्था महाविद्यालयाचे घटक प्रेरणा देत असतात. संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसेसाहेब, सचिव मा. मोहन गरगटे, जेष्ठ संचालिका डॉ. सौ. सुषमा रोटे, ॲड. अभिजित कापसे व सर्व पदाधिकाऱ्यांनी या अंकास शुभेच्छा देऊन प्रेरणा दिल्या आहेत. महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, प्रभारी प्राचार्या डॉ. उषा पाटील, सह- संपादक प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी या अंकावर सातत्याने लक्ष ठेवून अंक निर्दोष व दर्जेदार व्हावा यासाठी मार्गदर्शन केले. सर्व विभागीय संपादक यांच्या सहकार्याने आम्ही हा अंक तुमच्या हाती देऊ शकलो. अंकाचे मुद्रक भारती प्रेसचे मालक निहाल व तनुजा शिपूरकर तसेच त्यांचा कर्मचारी वर्ग यांनी हा अंक आत्मीयतेने मुद्रित केला. अंकाचे मुखपृष्ठ साकारणारे श्री. मिलिंद यादव या सर्वांचे आभार मानून हा अंक आपल्या हाती देत आहोत.

**संपादक : डॉ. प्रकाश कांबळे**

**सहसंपादक : प्रा. (डॉ.) गोमटेश्वर पाटील**

# अभिनंदन



संस्थेच्या ज्येष्ठ संचालिका व जैन विद्या शोध संस्थान, कोल्हापूरच्या निदेशिका

**डॉ. सौ. सुषमा गुणवंत रोटे**

यांची पुणे येथील विश्वकर्मा विद्यापीठाच्या संस्कृत आणि
प्राकृत विभागात संशोधन मार्गदर्शक म्हणून निवड.



संस्थेचे संचालक **मान. ॲड. अभिजित कापसे** साहेब यांची
**Bombay Cases Reporter**
या कायदेविषक जर्नलच्या संपादक मंडळावर सदस्य म्हणून निवड.

# भावपूर्ण श्रद्धांजली...



श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष व कोल्हापुरातील प्रसिद्ध अभियंता, क्लासिकल चित्रकार, रसिक फोटोग्राफर मा. डी. के. सांगावकर यांचे दि. ०६ एप्रिल, २०२५ रोजी दुःखद निधन झाले.

**मा. डी. के. सांगावकर**

श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक, मराठी जैन साहित्याचे अभ्यासक, महाराष्ट्र जैन साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष, मराठी भाषा व व्याकरणाचे अभ्यासक, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व ऋषितुल्य व्यक्तिमत्व प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांचे २ जानेवारी, २०२५ रोजी दुःखद निधन झाले.



**प्राचार्य श्रीधर एस. हेरवाडे**

तसेच या शैक्षणिक वर्षात निधन झालेल्या सर्व सामाजिक क्षेत्रातील समाजधुरीण, वैज्ञानिक, खेळाडू, जवाण, नैसर्गिक अपत्तीला बळी पडलेले नागरिक आणि आमचे ज्ञात, अज्ञात, हितचिंतक या सर्वांबद्दल देशभूषण नियतकालिक सह वेदना प्रकट करीत आहे.

।। शीलं परं भूषणम् ।।

श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचलित

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

नॅक 'अ' मूल्यांकन



**प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे**
सेवानिवृत्त (३१ डिसेंबर, २०२४)



**प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील**
(१ जानेवारी, २०२५ पासून)



**प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील**
अधिष्ठाता



**डॉ. महादेव शिंदे**
परीक्षा नियंत्रक
समन्वयक, B.A.B.Ed.



**डॉ. संजय ओमासे**
समन्वयक, IQAC



**प्रा. डॉ. रविंद्र मिरजकर**
समन्वयक, स्वायत्त कक्ष
समन्वयक, बी.व्होक



**प्रा. स्वप्निल पाटील**
समन्वयक, विज्ञान विभाग वरिष्ठ



**प्रा. राहूल आडके**
समन्वयक, विज्ञान विभाग कनिष्ठ



**कॅप्टन उमेश वांगदरे**
स्टाफ सेक्रेटरी, कला व वाणिज्य



**श्री. राजेंद्र हिरकुडे**
पर्यवेक्षक, ज्युनि.कॉलेज



**डॉ. रोहित पाटील**
क्रीडा संचालक



**प्रा. जयवंत दळवी**
केंद्र संयोजक, YCMOU

# संपादक मंडळ



**डॉ. प्रकाश कांबळे**
संपादक



**प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील**
सहसंपादक



**प्रा. डॉ. गोपाळ गावडे**
समन्वयक, मराठी विभाग



**डॉ. राजेंद्र रोटे**
समन्वयक, हिंदी विभाग



**प्रा. हेमंत पाटील**
समन्वयक, इंग्रजी विभाग



**डॉ. सुरेश संकपाळ**
समन्वयक, पदव्युत्तर विभाग



**डॉ. अंकुश गोंडगे**
समन्वयक, कला विभाग



**हर्षवर्धन बेडेकर**
विद्यार्थी संपादक

# प्राध्यापक व विद्यार्थी पुरस्कार



**प्रा. डॉ. रविंद्र मिरजकर**
प्राध्यापक पदोन्नती



**प्रा. डॉ. कल्पना गंगातीरकर**
प्राध्यापक पदोन्नती



**प्रा. डॉ. श्रद्धा पाटील**
प्राध्यापक पदोन्नती



**डॉ. शरद गायकवाड**
लोकशाहीर आण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार, शि.वि.आजी माजी विद्यार्थी संघाचा आदर्श कर्मचारी पुरस्कार व भोर येथील १०व्या फुले, शाहू, आंबेकर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड



**डॉ. श्रीकांत बच्चे**
शिवाजी विद्यापीठाची वाणिज्य विषयातील पीएच.डी.



**प्रा. स्वप्निल पाटील**



**प्रा. स्वप्नाली जगदाळे**

A Paitent for a Method for generating Vermicompost from biomedical waste



**डॉ. रोहित पाटील**
सॉफ्टबॉल व बेसबॉल खेळासाठी पिचिंगची अचुकता मोजणाऱ्या युनिटच्या डिझाईन चे पेटंट



**डॉ. शशिकांत अन्नदाते**
आदिवासी संस्कृती या पुस्तकाला दक्षिण महाराष्ट्र साहित्यसभेचा विशेष पुरस्कार



**डॉ. अंकुश बनसोडे**
महात्मा जोतिराव फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



**प्रा. डॉ. गोपाळ गावडे**
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या १४व्या आधिवेशनाच्या अध्यक्षपदी निवड



**प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील**
श्रमिक शक्ती फौंडेशन कोल्हापूर आयोजित युवा ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड



**प्रा. डॉ. अरुण पाटील**
महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने करीअर कट्टा जिल्हा समन्वयक म्हणून उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान



**कॅप्टन डॉ. सुजाता पाटील**
डी.जी.एन.सी.सी. नवी दिल्ली यांच्याकडून कॅप्टनपदी निवड



**ऐश्वर्या रमेश पुरी**
महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार



**विनायक माणिक यादव**
आले पेरणी मशिनच्या डिझाईनसाठी पेटंट



**श्रीपाद सुनिल पाटील**
Prestigious National Scholarship of Rs. 1.5 Lakh for Post Graduate Studies



**प्राची महादेव माने**
डी.जी.एन.सी.सी. नवी दिल्ली यांचेकडून रु. १० हजार ची शिष्यवृत्ती

प्रज्ञावंत विद्यार्थी

## दादोबा लडगे ट्रस्ट पुरस्कृत गुणवंत विद्यार्थी पुरस्कार

## शिवाजी विद्यापीठ परीक्षेतील महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थी

# गुणवंत विद्यार्थी



**नांदवडेकर वैष्णवी राजेंद्र**
बी.ए. भाग १



**पाटील श्रीनिधी बसवराज**
बी.ए.भाग २



**देसाई अनुराधा सुरेश**
बी.ए.भाग ३



**भोसले प्राजक्ता प्रमोद**
बी. कॉम. भाग १



**जयसिंघानी कीर्ती शामलाल**
बी. कॉम. भाग २



**आहुजा सुमन नरेश**
बी.कॉम. भाग ३



**शेख तनाज राजू**
बी.एस्सी. भाग १



**पाटील सोनाली गणपती**
बी.एस्सी. भाग २



**सुतार मयुरी सुभाष**
बी.एस्सी. भाग ३



**पाटील सानिका सुनिल**
बी. व्होक. ॲग्री भाग १



**कांबळे प्राजक्ता युवराज**
बी.व्होक. ॲग्री भाग २



**धुरे वैष्णवी किरण**
बी. व्होक. ॲग्री भाग ३



**महमद सुफिया आदनान शेख**
बी.व्होक. ॲटोमोबाईल भाग १



**पाटील राहुल महादेव**
बी.व्होक. ॲटोमोबाईल भाग २



**चौगले शिवतेज दत्तात्रय**
बी. व्होक. ॲटोमोबाईल भाग ३



**चव्हाण अविराज माणिक**
बी.व्होक. केमिकल टेक्नॉलॉजी भाग ३



**चोपडे आकांक्षा संदीप**
बी व्होक. प्रिंटींग ॲन्ड पब्लिशिंग भाग १



**पाटील गीता संजय**
बी. व्होक. प्रिंटींग ॲन्ड पब्लिशिंग भाग २



**मल्हारा देवांग ललित**
बी.व्होक. प्रिंटींग ॲन्ड पब्लिशिंग भाग ३



**लोंढे शुभद सचिन**
बी.ए.बी.एड. भाग ३

दादोबा लडगे ट्रस्ट पुरस्कृत गुणवंत विद्यार्थी पुरस्कार

शिवाजी विद्यापीठ परीक्षेतील महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थी

प्रज्ञावंत विद्यार्थी

# गुणवंत विद्यार्थी



काशिद दीक्षा दत्तात्रय
बी.ए.बी.एड. भाग २



पुरेकर तनुश्री सुहास
बी.ए.बी.एड. भाग १



सुतार कृतिका रमेश
एम.एस्सी. भाग १



विनायक माणिक यादव
एम.ए. भाग १ मानसशास्त्र



विभुते रसिका राजेंद्र
एम.ए. भाग २ मानसशास्त्र



गुणे दिशा आशिष
एम.ए.भाग १ इंग्रजी



पाटील अक्षता राजाराम
एम.ए. भाग २ इंग्रजी



कळके शिवानी विलास
समाजशास्त्र विभागात सर्वप्रथम

## बी. एम. रोटे कनिष्ठ महाविद्यालय



घोसरवाडे पौर्णिमा अजित
११ वी कला



रणदिवे आदित्य सदाशिव
११ वी वाणिज्य



शिर्के युवराज रामकृष्ण
११ वी विज्ञान



काशिद अक्षता रमेश
१२ वी कला



पोवार प्रतिक्षा जयवंत
१२ वी वाणिज्य



कोंडेकर स्वरूप सत्यम
१२ वी विज्ञान

आदर्श विद्यार्थी

महाविद्यालयाचे भूषण

## स्वातंत्र्यसैनिक कै. भूपाल सुखदेव पांगिरे पुरस्कृत 'देशभूषण' पुरस्कार

# आदर्श विद्यार्थी


पोर्णिमा अजित घोसरवाडे
१२ वी कला


सानिका बाळकृष्ण धोंड
१२ वी वाणिज्य


समर्थ महादेव माळी
१२ वी विज्ञान


सारा अश्फाक नायकवडी
बी.ए. ३


किर्तन रविंद्र मिरजकर
बी. कॉम ३


भक्ती अशोक तोराळकर
बी. कॉम. ३


वैष्णवी बजरंग लाड
एम.एस्सी. ३


हर्ष अरविंद श्रीवास्तव
बी.ए.बी.एड. ४


सुशांत रमेश हंडे
बी.व्होक ३


हर्षद दिपक घाडगे
बी. व्होक ३


राज रणजित पाटील
एम.ए. २

## एन.एस.एस


प्रज्ञेय भिकाजी कांबळे
१२ वी कला


कोमल राजू पोवार
बी.ए.बी.एड. ४


राजलक्ष्मी रमेश शिंदे
बी.ए.भाग ३

## एन. सी. सी.


सायली मारुती ढोकरे
बी.कॉम. ३


अंकुश आनंद गाडी
बी.ए. १


समर्थ कृष्णात पाटील
बी.एस्सी. १

## सांस्कृतिक विभाग


जोया समीर तुर्की
१२ वी कला


चैतन्य तुकाराम पोवार
बी.ए.बी.एड. ३

## उत्कृष्ठ खेळाडू


मंथन मोहन जाधव
१२ वी कला


सानिका तानाजी भाट
बी.कॉम. ३

## कमवा व शिका योजना


आदित्य सदाशिव रणदिवे
१२ वी कला


शुभम कुलभूषण साळवे
बी.ए.बी.एड. ४



१५ ऑगस्ट स्वातंत्र दिनी ध्वजारोहण करताना संस्थेचे संचालक मा. पी. आर. पाटीलसो,
चेअरमन ॲड. के. ए. कापसे,
सचिव मा. मोहन गरगटे व मान्यवर



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करताना संस्थेचे सचिव मा. मोहन गरगटे साहेब व मान्यवर




संस्थेच्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण करताना चेअरमन ॲड. के. ए. कापसे, प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील, मुख्याध्यापक श्री. बसवराज वस्त्रद व मान्यवर



१५ ऑगस्ट स्वातंत्र दिनी आयोजित ध्वजारोहण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे मा.प्रदीप पाटील यांचे स्वागत करताना संस्थेचे चेअरमन, ॲड. के. ए. कापसे,
सचिव, मा.मोहन गरगटे, डॉ. सुषमा रोटे व मान्यवर




२६ जानेवारी, प्रजासत्ताक दिवस समारोहप्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव मा. मोहन गरगटे व मान्यवर

## अग्रणी कार्यशाळा



हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'यू ट्यूब रोजगार की संभावनाओं का खुला द्वार' कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. उषा पाटील, डॉ. राजेंद्र रोटे व मान्यवर




वाणिज्य विभाग आयोजित 'शाश्वत विकासातील वाणिज्य ची भूमिका' कार्यशाळेस मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. ए. एम. गुरव, मा. मोहन गरगटे, डॉ. उषा पाटील व मान्यवर




अर्थशास्त्र विभाग आयोजित 'विकसित भारत २०४७ युवकांपुढील आव्हाने' कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ.व्ही.एम. पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे व मान्यवर




इंग्रजी विभागाच्या वतीने आयोजित Creative Writing कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ.अरुंधती पवार, प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील, प्रा. डॉ. कल्पना गंगातीरकर व मान्यवर

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण




कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मा. विजय पवार, मा. नितीश कुमार, प्राचार्य आर. पी. लोखंडे, प्रा. डॉ. अरुण पाटील व एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी



कार्यशाळेच्या समारोप समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे संचालक मा. अभिजित कापसे साहेब व मान्यवर



कार्यशाळेत प्रात्यक्षिक करताना विद्यार्थी



आपत्ती व्यवस्थान कार्यशाळेस उपस्थित NDRF चे जवान, प्राध्यापक आणि विद्यार्थी




मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे
प्रा.डॉ.अनिल गवळी, प्रा. डॉ. उषा पाटील, प्रा.डॉ. गोपाळ गावडे व मान्यवर




साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक कृष्णात खोत यांचा सत्कार करताना
प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, डॉ. गोपाळ गावडे, डॉ. महादेव शिंदे व मान्यवर



मराठी विभागाच्या वतीने आयोजित कवी संमेलनात कविता सादर करताना
कवी पाटलोबा पाटील व इतर मान्यवर



मराठी भाषेला अभिजात भाषा दर्जा मिळाल्या बद्दल छायचित्र,
पोस्टर प्रदर्शन प्रसंगी दै. सकाळ चे संपादक श्रीराम पवार व मान्यवर



शलाका भित्तीपत्रिकेचे उद्घाटन करताना हिंदी राजभाषा अधिकारी
दिवाकर शर्मा, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे व मान्यवर



हिंदी सप्ताह निमित्त आयोजित विविध स्पर्धांच्या पारितोषिक
वितरण करताना मा. दिवाकर शर्मा, मा. तुषार क्षीरसागर,
प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे व मान्यवर



केंद्रीय हिंदी संस्थान, हैदराबाद येथे आयोजित हिंदी नवलेखक
शिबिरात उपस्थित महाविद्यालयाचे विद्यार्थी



विशाखापट्टणम येथे आयोजित हिंदी नवलेखक
शिबिरात उपस्थित महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी



Prin. Uttam Patil addressing the students



Library Visit The New College Kolhapur



Prof (Dr) Ravindra Tashildar inaugurating ELA



समाजशास्त्र विभागद्वारे आयोजित 'स्त्रीविषयक समाजिक समस्या' या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी संस्थेचे संचालक मा. दिलीप लाडगे साहेब, प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील व मान्यवर



भारतीय न्याय संहिता जनजागृती अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. विजय गुजगेश्वर प्र.प्राचार्य डॉ. उषा पाटील व मान्यवर




सावली केअर सेंटर, कोल्हापूर येथे व्हॅलेंटाईन डे निमित्त समाजशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित संगीतसंध्या या कार्यक्रमास उपस्थित वृद्धजन.



अर्थशास्त्र विभाग अभ्यास मंडळ उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.संतोष कुमार यादव, चंद्रकांत जाधव, डॉ. सुजात पाटील व मान्यवर



स्टार्ट–अप–डे निमित्त आयोजित पोस्टर प्रदर्शनाचे परिक्षण करताना मा. रिषभ हितेश ओसवाल, डॉ. सुजाता पाटील, प्रा. अजितकुमार चौगुले

# मराठी विभाग



बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा
– श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

विभागीय संपादक
**प्रा. डॉ. गोपाळ गावडे**

# अनुक्रमणिका


| अ.नं. | लेखाचे नाव | प्रकार | विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | अभिजात मराठीचा शोध | संशोधनात्मक | सीमा महावीर चौगुले |
| २ | 'संत्या कुली':मराठीतील आगळं वेगळं आत्मकथन | समीक्षा | साक्षी संजय पाऊसकर |
| ३ | ब्राह्मी लिपी–भारताचा एक प्राचीन ठेवा | माहितीपर लेख | राणा राजेंद्र पाटील |
| ४ | कवितेच्या गावा | प्रवासवर्णन | निर्मला केशव भोसले |
| ५ | मी मुलगी बोलते...! | वैचारिक लेख | राजलक्ष्मी रमेश शिंदे |
| ६ | विकसित भारत @ २०४७ युवकांची भूमिका | वैचारिक लेख | प्राची सुनील पडवळ<br>गौरी गणपती कदम |
| ७ | महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षण विषयक कार्य | माहितीपर लेख | आदित्य हेमंत धनवडे |
| ८ | शाश्वत पर्यावरण : काळाची गरज | माहितीपर लेख | वैष्णवी राजेंद्र नांदवडेकर |
| ९ | छत्रपती शाहू महाराज : द्रष्टा राजा | व्यक्तीरेखा | वैष्णवी राजेंद्र नांदवडेकर |
| १० | नारी शक्ती जागी हो ! | एकांकिका | प्रतीक्षा तानाजी पाटील |
| ११ | प्रेम | ललित लेख | रिया शिंदे |
| १२ | म्या रखमा वसंती धनगर... | आत्मवृत्त | साक्षी नामदेव ढोकरे |
| १३ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील क्रांतिकारकांचे योगदान | माहितीपर लेख | श्वेता धोंडिबा गावडे |
| १४ | महावीर कॉलेज : एक जीवन अनुभव | आत्मकथनात्मक | सीमा महावीर चौगुले |
| १५ | सहल...एक आनंदानुभव | प्रवासवर्णन | सीमा महावीर चौगुले |


## पद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १ | आजचा तरुण | वैष्णवी चव्हाण |
| २ | आक्रोश | ऋषिकेश सुनिल जांबोणी |
| ३ | भावना मनातल्या... | रिया शिंदे |
| ४ | लेखन.... म्हणजे काय? | सीमा चौगुले |
| ५ | पोरगी पळाली... | प्रतीक प्रमोद पाटील |
| ६ | जगता आलं पाहिजे... | सानिया मोहन कांबळे |
| ७ | तू.... | वैष्णवी चव्हाण |
| ८ | एक दिवस | प्रतिराज |
| ९ | आई ! | तनुजा ढेरे |
| १० | मी पाहिलेले एक स्वप्न | तनुजा ढेरे |
| ११ | मी विद्यार्थी | धैर्यशील नांगरे पाटील |
| १२ | सोबती रे... | तनुजा ढेरे |

संशोधनात्मक

# अभिजात मराठीचा शोध



सीमा महावीर चौगुले
बी.ए.भाग ३

प्राकृत आणि मराठीसह नुकताच केंद्र शासनाकडून काही भाषांना अभिजात दर्जा देण्यात आला. यापूर्वी तमिळ, कन्नड, उडिया, संस्कृत या भाषांना अभिजात दर्जा मिळाला आहे. अलीकडेच केंद्र शासनाने प्राकृत आणि मराठी या दोन्हीही भाषानां अभिजात दर्जा दिला. त्या दोन्ही भाषांमध्ये एक सलगता शोधल्यास मराठीचे अभिजातपण आपणास अपोआपच दिसून येऊ लागते. प्राकृत आणि मराठी या दोन्ही भाषा भारतातल्या प्रवाही भाषा म्हणून नोंदवल्या पाहिजेत. संस्कृत कूपजल है, भाषा बहता नीर असे कबीराने एका दोह्यात म्हटले आहे. म्हणूनच प्राकृत ते मराठी या प्रवाहामध्ये हजारो वर्षांचे सलगता आपण लक्षात घेतल्यास प्राकृत आणि मराठी यांच्या प्राचीनतेचा, सलगतेचा, भाषिक आणि वाङ् मनपरंपरेच्या अखंडतेचा विचार आपोआप होऊ शकतो. अभिजात दर्जासाठीचे जे चार निकष आहेत, त्यामध्ये

१. भाषेची प्राचीनता तिची मौलिकता आणि सलगता.

२. वाङ्मयीन आणि भाषिक परंपरेचे स्वयंभूषण.

३. प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांच्यातील अखंडता

४. त्या भाषेतील साहित्याची प्राचीनता

हे निकष मांडले गेले आहेत. संस्कृतला सरोवर म्हटले असले तरी, तिचे संगोपन एका विशिष्ट समूह-संस्कृतीने सातत्याने केले आहे. भारतातील सर्वच प्राकृत भाषांचे संगोपन त्याहीपेक्षा व्यापक पातळीवर, व्यापक समूहानी, व्यापक प्रदेशात प्राकृत भाषा जतन केल्या आहेत. या भाषा काळाबरोबर बदलत आल्या आहेत. असे असले तरी तिला इथल्या भूमी, प्रकृती आणि परंपरेशी सुसंगत राहून त्यात साहित्य संस्कृती व परंपरा जपत ठेवण्याचे कार्य इथल्या अनेक समूह परंपरांनी केले आहे. अशीच एक जपलेली प्रवाहित ठेवलेली प्राचीन भाषा म्हणजे महाराष्ट्री प्राकृत भाषा होय. कि जी आजच्या मराठीचे पूर्वरूप आहे, ती जननी आहे.

पंजाब, गुजरात, महाराष्ट्र या भागात महाराष्ट्री प्राकृत आणि तिची परंपरा अपभ्रंश काळापर्यंत दाखवल्या आहेत.मराठीच्या अभिजातपणाचे संदर्भ शोधताना तिला महाराष्ट्री प्राकृतशी जोडावे लागते. महाराष्ट्री प्राकृतचा विकास हा इ.स. पूर्व पहिल्या दुसऱ्या शतकापासून सुरू होतो, असे अभिजात भाषेच्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले होते. इ.स.पूर्व २२० वर्षापूर्वीचा जुन्नर नाणेघाट जवळचा ब्राह्मी लिपीतला शिलालेख हा महाराष्ट्री प्राकृतचा जुना पुरावा मानला गेला आहे. पुढे याच काळातील पुणे येथील जैन गुहांमधील णमोकार मंत्राचा प्राकृत भाषेतला पुरावा व त्यानंतर गाथासप्तशती या हालराजाच्या लोकधाटीतील साहित्याचा पुरावा मराठीचे पूर्वरूप म्हणून मानला जातो. महाराष्ट्र प्रदेशाचे साम्राज्य, हाल राजाची कीर्ती, त्या काळातील लोकसाहित्य आणि लोकमानस या गाथामध्ये सप्तशतीमध्ये येते. या गाथा ७०० असल्याने त्याना सप्तशती असे म्हटले जाते. त्यानंतर तिसऱ्या शतकातील प्रवरसेनचा सेतूबंध, याच शतकातील विमलसुरी यांचा पउमचरिउ, ४ थ्या-५ व्या शतकातील वाक्पतीराज यांचे गौडवहो, ७ व्या शतकातील योगिंदुदेव यांचा जोयसार (योगसार), परमप्पयासू (परमात्माप्रकाश) हे ग्रंथ, ८ व्या शतकातील कोउहल यांचा लिलावइ, उद्योतनसूरी



यांचा कुवलयमाला इथेपर्यंत महाराष्ट्री प्राकृतमधल्या काही मुख्य ग्रंथांचा उल्लेख पहायला मिळतो.

९ व्या १० व्या शतकामध्ये महाराष्ट्री प्राकृतचे महाराष्ट्री अपभ्रंशरूप निर्माण होताना दिसते. या महाराष्ट्री अपभ्रंश भाषेमध्ये हरीभद्रसूरी यांचे धूर्ताख्यान, जयवल्लभ यांचे वज्जालग हे मुक्तक काव्य, पुष्पदंत यांचे जसहरचरिउ, णायकुमारचरिउ ही चरित्रकाव्ये, कवी धनपाल यांचे भविसय्यतकहा ही विविध काव्ये ९ व्या, १० व्या शतकातील महाराष्ट्री अपभ्रंश भाषेत पाहायला मिळतात. ११ व्या शतकातील रामसिंह यांचे पाहुडदोहा हे मुक्तक काव्य, गुणचंद्र यांचे १२ व्या शतकातील महावीरचरित्र आणि जिनेश्वरसूरी यांचे गाहारयणकोस हे मुक्तककाव्य याच काळात लिहिली गेली आहेत. हेमचंद्रांनी लिहिलेले प्राकृतचे व्याकरण हे तर महाराष्ट्री प्राकृतचे व्याकरणिक कोशच आहेत. या सर्व रचना महाराष्ट्री प्राकृत ते महाराष्ट्री अपभ्रंश या काळातील आहेत. या महाराष्ट्री भाषेलाच देशीभाषा असा

म्हणण्याचा प्रधात कवी स्वयंभू, पुष्पदंत यांच्या साहित्यात दिसतो. ज्ञानेश्वरांनी ही आपल्या ज्ञानेश्वरीत देशीभाषा, देशीकारलेणे असेच या भाषेला म्हटले आहे. अगदी एकनाथांच्या काळापर्यंत या भाषेला प्राकृत, देशी भाषा, मराष्ट्री भाषा असेच म्हटले गेले आहे. ज्ञानेश्वरांनी तिला देशीकर लेणे असे म्हटले आहे. (सर्व सुखाचे कारण । समाधान हे एक लेणे । जैसे देशीकर लेणे। मनोहर ।। ) संस्कृत भाषा देवानी केली, मग प्राकृत काय चोरांनी केली? असा प्रश्न एकनाथ यांनी केला आहे. ही महाराष्ट्री प्राकृतची सलगता पुढे संत, पंत, तंत साहित्यातून सलग होत मराठीचा साहित्य इतिहास बनला आहे. वरील विवेचनातून इ.स. पूर्व दुसऱ्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत इंग्रज काळापर्यंत मराठी भाषेची सलगता येते. हाच अभिजात भाषेचा दर्जा भाषिक सलगतेचा, परंपरेचा, मौलिकतेचा पुरावा ठरू शकतो.

सर्व अपभ्रंश भाषा या प्राकृतोद्भव आहेत आणि सर्व प्रादेशिक भाषांचा विकास अपभ्रंश भाषांमधून झाला आहे. भारतीय भाषांच्या अभ्यासासाठी आणि तिचा विकास शोधण्यासाठी अपभ्रंश भाषांचा अभ्यास अत्यंत उपयुक्त आहे, हा एक सलगतेचा पुरावा मराठीच्या अभिजातपणासाठी महत्वाचा ठरतो. भारतातील अपभ्रंश भाषांचा उगम काळ हा ७ व्या शतकापासून मानला जातो. इ.सनाच्या ९ व्या शतकापासून कवी स्वयंभू, पुष्पदंत, धनपाल, वीर, नयनंदी, कलकामर, जोइंन्दू, रामसिंह, हेमचंद्र, रइधू हे सर्व कवी महाराष्ट्री अपभ्रंश भाषेत आपल्या अमर कलाकृती निर्माण करतात. याशिवाय महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातून अभ्यासाअभावी लुप्त झालेले बौध्द वायय, नाथ संप्रदायाचे प्राकृत, अपभ्रंश भाषेतील साहित्य याचा मराठीशी अन्वय कसा लावता येईल यावर संशोधन झाले पाहिजे.

आजपासून मागे आपण मराठीचे वय शोधात मागे गेल्यास मराठीचा उगम १४०० ते १५०० वर्षे मागे जाऊ शकतो.सध्या मराठीचा उगमकाळ १००० वर्षा पूर्वीपासून गृहीत धरला जातो. १३ व्या शतकातील महानुभावीय गद्य आणि महाराष्ट्री अपभ्रंश यांचा निकटचा संबंध दिसतो. पुढे संत साहित्याने हि परंपरा सलग केली आहे.

मराठीचे अभिजातपण शोधताना ती संस्कृतोद्भव आहे हे पहिल्यांदा अभिजात संशोधन समितीला बाजूला सारून मराठीचा शोध अपभ्रंश आणि प्राकृतच्या मर्गाने घेताना जैन साहित्यातीलच ग्रांथिक पुरावे अभ्यासकांना घ्यावे लागले आहेत. उगम काळातील मराठी जिला आपण प्रादेशिक मराठी असे म्हणतो. इ.स. ९८३ चा श्रवण बेळगोळचा शिलालेख, १२ व्या शतकातील 'राजमतीप्रबोध' या संस्कृत ग्रंथातील मराठीचे उल्लेख, हे आद्य पुरावे आहेत. महाराष्ट्री ते मराठी ही भाषिक सलगता शेकडो ग्रंथांमध्ये सापडते याचा शोध म्हणजेच अभिजात मराठीचा शोध आहे.

●

---

# आजचा तरुण

**वैष्णवी चव्हाण**
बी.ए.बी.एड. १

आजचा तरुण कसा असावा, आजचा तरुण
फोनच्या विळख्यात नसून
आई वडिलाच्या सोबत असावा
आजचा तरुण असा असावा
सरकारी नोकरीचा मागे धावता नसून
व्यवसायाच्या संकल्पनेला आकार देणारा असावा,
आजचा तरुण असा असावा
दु:खात हताश होऊन न जाता
दु:खाच्या छातीवर पाय देऊन खंबीर उभा असावा
आजचा तरुण असा असावा
राजकारणाच्या नादामुळे धर्मांधतापूर्ण नसावा तर
सर्वधर्म समभाव असा धर्म निरपेक्ष असावा
आजचा तरुण असा असावा
रुंढी, परंपरा व अंधश्रध्देच्या जंजाळात अडकलेला
नसावा
डॉ. कलाम यांच्या वैज्ञानिक विचारांना मानणारा
असावा
आजचा तरुण असा असावा
प्रेम भंगाच्या दु:खाच्या डोहात बुडलेला नसावा
देशाच्या प्रेमासाठी सीमेवर लढणारा असावा
आजचा तरुण असा असावा
पारंपरिक शेती मध्ये गुरफटलेला नसून
आधुनिक शेतीला वाव देणारा असावा
आजचा तरुण असा असावा
व्यसनेच्या मृगजळात गुंतलेला नसावा
तर बलशाली भारत घडवणारा असावा
आजचा तरुण असा असावा

समीक्षा

# ‘संत्या कुली’:मराठीतील आगळं वेगळं आत्मकथन



**साक्षी संजय पाऊसकर**
बी.ए.बी.एड. २

संतोष मळवीकर यांचं ‘संत्या कुली’ हे आत्मकथन वाचलं. पुस्तक वाचायला सुरुवात केल्यानंतर या पुस्तकामध्ये पुढे काय आहे, याची उत्सुकता मला शेवटपर्यंत लागली होती. मी, पुस्तक वाचायला सुरुवात केल्यानंतर ते संपेपर्यंत पुस्तक हातातून खाली ठेवायची इच्छा नव्हती. हे आत्मकथन वाचताना ओढ लावणारं, वाचकांच्या मनाची पकड ढीली होऊ न देणारं, एक सुंदर आगळं वेगळं आत्मकथन मराठीमध्ये आलं आहे, असं मला वाटतं.

आत्मकथन हा वाङ्मय प्रकार मराठीत समृद्ध असला तरी, अलीकडच्या काळात तो विरळ होत आहे. अशा वळणावर संतोष मळवीकर यांचं हे आत्मकथन विशेष महत्त्वाचं आहे.




वय वर्षे २० पोट भरण्यासाठी गोव्याला गेलेला संतोष, पोटार्थी न राहता भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ बनतो. याचं वास्तव रूप म्हणजे ‘संत्या कुली.’

‘संत्या कुली’ हे आत्मकथन वाचलं आणि एका वेगळ्या क्षेत्राचा परिचय झाला. विमानाबद्दल सर्वसामान्य माणसांना कुतूहल असतं. परंतु या विमानाच्या तळावर काय काय चालतं? पांढरा वेश परिधान केलेले अधिकारी कशाप्रकारे भ्रष्टाचार करतात, हे या आत्मकथनातून कळतं. परदेशी लोक भारतातील सौंदर्य पाहण्यासाठी, भारतीय संस्कृती पाहण्यासाठी, भारतात येतात. जसा पहिल्याच घासाला खडा लागावा तसा विमानतळावर त्यांना आलेला कटू अनुभव; हा आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणारा ठरतो. याचा राग संतोष मळवीकर यांच्या मनात पहिल्या दिवसापासून आलेला दिसतो. अवघे दहा महिने विमानतळावर हमाल, कुली म्हणून संतोष मळवीकर काम करत होते. संतोष माळवीकर यांची संत्या कुली नंबर २३ अशी गोवा विमानतळावर ओळख निर्माण झाली. त्या विमानतळावर अग्रवाल, शर्मा, दीक्षित मॅडम यांचा भ्रष्टाचार संत्या कुलीच्या नजरेतून चुकला नाही. लेडीज टॉयलेटमध्ये दीक्षित मॅडम तासंतास काय करतात? याचा संशय येऊ लागला. तेव्हापासून त्यांच्यावर पाळत ठेवून, त्यांचा भ्रष्टाचार सर्वांसमोर आणण्यासाठी संत्या कुली प्रयत्न करत होता. यामध्ये जीवाभावाचा मित्र अँथोनी संगीता पाटील आणि ठाकूर या सर्व मित्रांनी त्याला तितकेच सहकार्य केलं. परदेशातून विमान आलं, पॅसेंजर येऊ लागले की, एका लेडीज टॉयलेट समोर ‘सॉरी फॉर इनकन्व्हिनिअस’ असा बोर्ड ठेवला जातो. पांढऱ्या पोशाखातील हे कस्टम अधिकारी काळा भ्रष्टाचार करू लागतात. प्रवासी गेल्यानंतर बंद टॉयलेटमध्ये स्वतः दीक्षित मॅडम जातात. आपल्या ब्लाऊजची बटणे खोलतात. ब्रामधून परदेशी नोटा बाहेर काढतात. साडीच्या आत लेगिन्स असते. त्या लेगिन्समधून पन्नास ग्रॅम, शंभर ग्रॅम वजनाची सोन्याची बिस्किटे बाहेर काढते. त्याचे सात हिस्से करते. परंतु तत्पूर्वी त्यातली एक दोन बिस्कीटे आणि एक दोन नोटा ती आपल्या ब्रामध्ये आणि लेगिन्सच्या खिशामध्ये ठेवते. हा सगळा प्रकार शूट करताना संत्या सापडतो आणि अग्रवाल, शर्मा, दीक्षित मॅडम यांच्याकडून त्याला मान हानिकारक मार खावा लागतो. परंतु संत्या कुली आपल्या कर्तव्यापासून जराही हटत नाही. अपमान, मार तो सहन करतो. या सर्वांचा भ्रष्टाचार लोकांसमोर आणण्याचा आणि त्यांना अद्दल घडवण्याचा निर्धार करतो. त्याच्यामध्ये विमानतळावर हमाल पुरविणारा मेहता याचा भ्रष्टाचार वेगळ्याच स्वरूपाचा असतो. या सगळ्यांना एकटा संत्या आपल्या अंगावर घेतो. ही त्याची हिम्मत तरूणांना प्रेरणा देणारी आहे,असे वाटते.

जीवाची अजिबात परवा न करता या सर्वांच्या विरोधात गोव्यासारख्या अनोळखी प्रदेशांमध्ये तो एकट्यानं झुंज देतो. आणि या सर्वांना अद्दल घडवतो. गावाकडचा ‘कुगल्या’ने मेहताला अद्दल घडवतो. दीक्षित मॅडमच्या प्रकरणापासून संत्याला विमानतळावर येण्यास बंदी घातलेली असते. तरीही संत्याच्या टार्गेटवर असलेली शेवटची व्यक्ती अग्रवाल. त्याला शिक्षा देण्यासाठी तो पूर्वनियोजित कोल्हापुरी चप्पल खरेदी करतो. पांढरा पोशाख खरेदी करतो. गोवा ते मुंबई विमान तिकीट खरेदी करतो. आणि प्रवासी म्हणून विमानतळावर येतो. विमानतळावर संत्याला पाहिल्यानंतर अग्रवालला राग येतो. अग्रवाल संत्याला शिव्या देऊ लागतो. संत्या थोड्याशा तोऱ्यात पुढे चालू लागतो. याचा अग्रवालला अधिकच राग येतो. संत्या, लोकांच्यामध्ये गर्दीच्या ठिकाणी येण्यास अग्रवालला भाग पाडतो. संत्याने विमानाचे तिकीट काढून पॅसेंजर म्हणून आलेला आहे, हे अग्रवालला माहीत नसते.मी प्रवासी आहे. प्रवाशाला शिव्या का देतोस? म्हणून संत्या त्याला जाब विचारतो. दोघांत बाचाबाची होते. आणि सर्वांसमक्ष

संत्या अग्रवालला कोल्हापुरी चप्पलने मारतो. त्याच्यावर एफ. आय. आर. करण्याची धमकी देतो. आपली चूक अग्रवालच्या लक्षात आल्यानंतर तो, हतबल होतो. नोकरीचा प्रश्न त्याच्यासमोर उभा राहतो. शेवटी अग्रवाल संत्या कुलीचे पाय धरून माफी मागतो. हा सगळा थरारक प्रवास संतोष माळवीकरने या आत्मकथनामध्ये मांडलेला आहे. हा प्रसंग आवास्तव वाटावा असा आहे. एक सामान्य कुली, वय वर्ष २०, येवढ्या मोठ्या कस्टम अधिकाऱ्याला अशा प्रकारे शिक्षा देऊ शकेल का? असा सहज मनात प्रश्न उभा राहतो. परंतु संत्याकुली मधील सर्व चित्रण वास्तवतेला धरूण केलेले आहे, असे वाटते.

गोव्याच्या विमानतळावर संत्याला बेदम मारलं जातं त्यावेळी भेटलेली एक प्रवासी जास्मिन. ही तरुणी काही काळ प्रेयसी म्हणून संत्या कुलीच्या जीवनात येते. त्याच्या प्रेमात पडते. थोडा वेळ का होईना पण, प्रेमात वाहत जाणं हे दोघांकडूनही घडतं. परंतु वेळीच दोघेही सावरतात.

भांडणं, मारामाऱ्या याच्यामध्ये मागचा पुढचा विचार न करणारा संत्या, प्रेमात मात्र समजूतदारपणे वागताना दिसतो.

'संत्या कुली' या आत्मकथनामध्ये लेखकाच्या नवखेपणाच्या काही खुणा जाणवतात. परंतु या आत्मकथनाची ताकद इतकी मोठी आहे की, ह्या खुणा दुर्लक्षिल्या जातात. महत्त्वाचं म्हणजे, 'संत्या कुलीला म्हणजे संतोष माळवीकर यांना आपल्या देशाबद्दल पराकोटीचा अभिमान आहे.

तितकाच तो श्रद्धाळू आणि माणसाळू आहे. इतरांना लळा लावणारा आहे. देवावर पराकोटीची भक्ती आहे. देवाच्या कृपेने हे सारं घडतं असा त्याचा ठाम विश्वास आहे .

या आत्मकथनामध्ये कुठेही लपवा लपवी दिसत नाही. जे लिहिलेलं आहे ते, सत्य आणि वास्तव आहे. ओढून ताणून एखादा काल्पनिक प्रसंग लिहावा असं कुठेही जाणवत नाही. त्यामुळे संतोष मळवीकर यांचा खरेपणा, सच्चेपणा या आत्मकथनामध्ये जाणवतो. म्हणूनच हे आत्मकथन वाचत असताना आपण हातातून ठेवू नये, असं वाटत होतं. पुढे काय आहे? हे जाणून घेण्याची तीव्र इच्छा होत राहते. वाचक या आत्मकथनामध्ये गुंतत जातो, समरस होतो.

एखादी व्यक्ती आपल्या मित्रांवर किती निरपेक्ष प्रेम करते; याचं एक उत्तम उदाहरण म्हणजे 'संत्या कुली'. आणि त्यामुळेच अंथोनी, जास्मिन, संगीता पाटील, ठाकूर, गोलू ही सगळी मित्र मंडळी संत्या कुलीसाठी वाटेल ते करायला तयार होतात. गरीब परिस्थिती, हमाली आणि विमानतळावरील कस्टम अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराच्या विरूद्ध संघर्ष, ताणतणाव, भीती आणि ईर्षा या सर्वांमध्ये एक 'हवां का झोंका' म्हणावा तसा त्याच्या जीवनातील जास्मिन विषयीचे प्रेम आहे. जास्मिन विषयीचे प्रेम त्याने कोणताही आड पडदा न ठेवता, चित्रीत केले आहे, हे विशेष आहे. कारण बहुतांशी लेखक आत्मचरित्रामध्ये आपल्या पूर्वायुष्यातील प्रेम शक्यतो लपवण्याचा प्रयत्न करतात. आपल्या बायकोला काय वाटेल? आपल्या मुलांना काय वाटेल? असा विचार करून लपवा-लपवी केली जाते. परंतु संतोष मळवीकरनी कोणत्याही प्रसंगात लपवा लपवी न करता घडलेले प्रसंग जसेच्या तसे चित्रित केले आहेत. हीच या आत्मकथनाची ताकद आहे. 'संत्या कुली' हे सत्य वास्तव कथन आहे. संतोष मळवीकर यांचा लाघवी स्वभाव, भ्रष्टाचाराविरोधी प्रचंड चीड, देशाभिमान आणि धडाडी हे यशाचं कारण आहे.

'संत्या कुली' या आत्मकथनामध्ये लेखकाने मराठी भाषेबरोबरच, गोमंतकीय भाषा, हिंदी भाषा, चंदगडी बोली आणि आवश्यकतेनुसार इंग्रजी भाषेचा चपखलपणे वापर केलेला आहे.

संत्या कुली हे आत्मकथन वास्तव आणि रहस्यमय आहे. काल्पनिक रहस्य कथा जशा असाव्यात तशा पद्धतीने संतोषच्या जीवनामध्ये घडामोडी घडलेल्या दिसतात. जशा घडल्या तशा त्यांनी कथन केलेल्या आहेत.

खूप दिवसानंतर एक चांगलं आत्मकथन वाचल्याचं समाधान वाटलं. बी.ए.बी.एड्.च्या चार वर्षात प्रा. डॉ. गोपाळ गावडे सरांनी आमच्याकडून बलुतं, कोल्हाट्याचं पोर, अक्करमाशी ही आत्मकथनं वाचून घेतली. त्यामुळे आत्मकथनांच्या विषयी एक मनात ओढ निर्माण झाली होती. संत्या कुली वाचलं आणि आत्मकथांच्या परंपरेत अजून एक चांगलं आत्मकथन आल्याचं समाधान वाटलं. धन्यवाद.

●

## आक्रोश

**ऋषिकेश सुनिल जांबोणी**
बी.ए.बी.एड्.३

गेल्या रात्री माझं अस्तित्व ओरबाडलं,
अबोल स्वप्नांचं तेज मावळलं...
निर्दय हातांनी चिरलं मन,
माझ्या अस्मितेचं तुडवलं भाग.

आईबापांच्या स्वप्नांची ज्योत,
एका क्षणात विझून गेली,
भिरभिरत्या डोळ्यांत भीती,
आत्म्याला यातना झाल्या भारी.

का रे इतकं क्रूर जग?
का रे माझं शुद्ध हरवलंस?
निर्दोष होते मी तरीही,
का रे मला नरक दाखवलंस?

अजूनही तगतेय मी,
न्यायासाठी लढेन मी,
माझं माणूसपण झाकोळलं तरी,
माझ्या संघर्षाने जगेन मी.

# ब्राह्मी लिपी-भारताचा एक प्राचीन ठेवा



**राणा राजेंद्र पाटील**
बी.ए. भाग ३

लिपी म्हणजे साधारणपणे एखादी भाषा लिहिण्याची पद्धत होय. जगामध्ये अनेक लिपींचा वापर केला जातो. जगभरात जवळपास २९३ लिप्या अस्तित्वात आहेत. त्यापैकी १५६ लिपींचा वापर केला जातो. भारतातही जवळपास किमान २५ लिपी आहेत; परंतु मुख्य १४ लिपी प्रचलित आहेत. त्यापैकीच एक ब्राह्मी लिपी होय. सध्या जगात भारतातील एक अत्यंत महत्त्वाची प्राचीन लिपी म्हणून ब्राह्मी लिपी ओळखली जाते. हिला भारतातील सर्व लिपींची जननी मानली जाते. या ब्राह्मी लिपीच्या उत्पत्तीविषयी विद्वानांत मतभेद आहेत. अलेक्झांडर कनिंगहॅम यांच्या मते, भारतीय चित्रलिपीवरून ब्राह्मी लिपीची उत्पत्ती झाली असावी. ए. वेबर यांच्या मते, ब्राह्मीची उत्पत्ती प्राचीन सेमिटिक लिपीपासून, तर डब्ल्यू. डी.के. आणि आय. टेलर यांच्या मते, ती दक्षिण सेमिटिक लिपीपासून झाली. जोझेफ हालेव्ही यांच्या मताप्रमाणे ब्राह्मी लिपी ही इ. स. पू. चौथ्या शतकातील रेमाइक, खरोष्ठी आणि ग्रीक लिपींची खिचडी आहे. एडवर्ड क्लॉड यांच्या मते, फिनिशियन लिपीपासून सेबिअन लिपी उत्पन्न झाली आणि तिच्यापासून ब्राह्मी निर्माण झाली. गेओर्ख ब्यूलर आणि अहमद हसन दानी यांच्या मते, ब्राह्मी लिपी फिनिशिया ते मेसोपोटेमिया यात अस्तित्वात असलेल्या उत्तर सेमिटिक लिपीपासून उत्पन्न झाली.



राजबली पांडे आणि गौरीशंकर ओझा (१८६३-१९४०) यांच्या मते, ब्राह्मीच्या निर्मितीचे श्रेय सर्वस्वी भारतीय पंडितांकडेच जाते. गौरीशंकर ओझा यांनी उपनिषदे, आरण्यके यांमधील स्वर, व्यंजने, व्यंजनांचे घोष, अघोष, दन्तव्य, तालव्य, मूर्धन्य यांसारखे बारकावे लेखनविद्येशिवाय येणार नाहीत, असे साधार दाखवून दिले. ऐतरेय ब्राह्मणात अकार, उकार आणि मकार प्रकार यांच्या एकत्रीकरणाने 'ओम' या अक्षराची निर्मिती होते असे दाखवून दिले आहे.

वरील मतमतांतरे पाहिली असता सर्वसामान्यपणे ब्राह्मीची उत्पत्ती उत्तर सेमिटिकपासून झाली, हेच मत ग्राह्य धरले जाते. भारतीय पंडितांनी या लिपीमध्ये स्वर, व्यंजने, गुण, वृद्धी, ऱ्हस्व-दीर्घ पद्धती, पाच वर्ग, अक्षरांचे घोष, अघोष इ. भेद; अनुनासिके; य, र, ल, व हे अर्धस्वर; श, ष, स हे उष्म वर्ण; हा हा महाप्राण; कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दन्तव्य आणि ओष्ठव्य हे अक्षरभेद इ. गोष्टींची नंतर घातलेली भर मौलिक आहे.

ब्राह्मी अक्षरांचे वैशिष्ट्य म्हणजे बहुतेक अक्षरांच्या आकारामध्ये उभा दंड आहे. उभ्या दंडाच्या तळाशी अर्धवर्तुळात्मक आकार अक्षराला पदकाप्रमाणे उजवीकडे अगर डावीकडे लावलेले आहेत. या नियमास ग, ज, म, झ इत्यादी अक्षर अपवाद आहेत. ब्राह्मी लिपीमध्ये अ, इ, उ हे तीन स्वर आणि एकोणीस व्यंजने अशी बावीस अक्षरे आहेत. नॉर्थ सेमिटिक लिपीमध्ये तेवढीच अक्षरे आहेत. या बावीस अक्षरांपैकी अकरा अक्षरांचे परस्परांशी साम्य आहे.

नॉर्थ सेमिटिक लिपीपासून ब्राह्मी लिपी उत्पन्न झाली, हा सिद्धांत मांडताना ब्यूलर यांनी अनेक कारणे दिली आहेत. नॉर्थ सेमिटिक लिपी पॅलेस्टाइन आणि सिरिया या प्रदेशांत अस्तित्वात होती. पॅलेस्टाइनमधील लोकांना फिनिशियन असे नाव होते. ऋग्वेदातील पणी म्हणजेच फिनिशियन लोक असावेत. हे लोक हरहुन्नरी म्हणून प्रसिद्ध होते. भारताचा सुमेरियन आणि बॅबिलोनियन संस्कृतींच्या लोकांशी व्यापारी संबंध होता, ही गोष्ट मोहेंजोदडो, हडप्पा, कालिबंगा इ. ठिकाणच्या उत्खननांमध्ये सापडलेल्या मुद्रांवरून सिद्ध झाली आहे. ज्याप्रमाणे व्यापारी वस्तूंची देवाण-घेवाण होते त्याचप्रमाणे सांस्कृतिक संबंधांत लिपींचीही देवाण-घेवाण झाल्यास नवल नाही. नाईल नदीच्या काठी असलेली इजिप्शियन संस्कृती आणि सुमेरियन संस्कृती यांच्यामध्ये व्यापारी दळणवळण होते. या दोन संस्कृतींना जोडणारा पॅलेस्टाइन आणि सिरिया हा एक दुवा होता. इजिप्तमधील चित्रलिपीतून रेखालिपीचा उगम झाला. चित्राकृती संकुचित झाल्या आणि त्या कालांतराने अक्षरखुणा ठरल्या. या अक्षरखुणांच्या निर्मितीचे श्रेय पॅलेस्टाइनमधील लोकांनाच द्यावे लागेल. पॅलेस्टाइनमध्ये गेझर येथे इ. स. पू. आठव्या शतकातील लेख सापडला आहे. या लेखात प्रत्येक महिन्यामध्ये शेतकऱ्याने कोणते काम करावे, याबद्दलची नोंद आहे. हा लेख अक्षरलिपीत लिहिलेला आहे. यावरून अक्षरलिपीचे प्रयत्न पॅलेस्टाइनमध्ये झाले, ही गोष्ट खरी मानली पाहिजे. मोआबचा राजा मेष याचाही लेख अक्षरलिपीत म्हणजेच नॉर्थ सेमिटिक लिपीत असून तोही पॅलेस्टाइनमध्येच सापडला. मौर्य सम्राट अशोकाच्या गिरनार लेखातील ब्राह्मी लिपी (इ. स. पू. ३ रे शतक) पाहावयास मिळते. बावेरू जातकामध्ये भारतीय व्यापाऱ्यांचा बॅबिलनशी व्यापार होता, असा उल्लेख आहे.

इ. स. पू. सहाव्या शतकात इराणचा (पर्शियाचा) राजा क्षयार्ष आणि ग्रीस यांच्यामध्ये युद्ध झाले. या युद्धात भारताने इराणशी

हातमिळवणी केली होती. त्याचवेळी भारताचा ग्रीक संस्कृतीशी परिचय घडला. या कालखंडातच नॉर्थ सेमिटिक लिपीचे भारतात आगमन झाले असावे, असा तर्क ब्यूलर यांनी केला. इ. स. सातव्या शतकात ज्याप्रमाणे संभोटाने मगध देशातून तिबेटमध्ये लेखनकला नेली, त्याप्रमाणे भारतीय व्यापाऱ्यांनी मेसोपोटेमियामधील सेमिटिक लिपी हस्तगत केली. भारतीय पंडितांनी आपल्या बुद्धिकौशल्याने मूळ सेमिटिकवर आधारलेल्या ब्राह्मी लिपीत इतकी भर घातली, की तिचे मूळ स्वरूप बदलून ती संपूर्णपणे भारतीय झाली. सेमिटिक लिपीतील मूळ 'मेम' आणि 'नून' या अनुनासिकांवरून पाच वर्गांतील पाच अनुनासिके ब्राह्मीत तयार केली. सेमिटिकमधील 'सामेख'वरून स, ष भारतीयांनी घेतले. परंतु गुण, वृद्धी, संप्रसारण, ऱ्हस्व-दीर्घ स्वर, हलन्त व्यंजने, जोडाक्षरे इ.संशोधन संपूर्णतः या भारतीय पंडितांचे आहे. ब्राह्मी लिपीमधील अक्षरांची संख्या त्यामुळे सेहेचाळीस झाली.

ब्राह्मी लिपीचा विकास : भारतातील प्राचीन लेखनकलेचा ज्ञात असलेला पुरावा म्हणून अशोकाच्या (इ. स. पू. सु. ३०३-सु. २३२) ब्राह्मी लेखांचा उल्लेख करावा लागेल. अशोकाच्या लेखांचे एकूण मुख्य दोन गट आहेत ते म्हणजे प्रस्तरलेख आणि स्तंभलेख. याचेच लघुप्रस्तरलेख आणि लघुस्तंभलेख असे भेद आहेत. सम्राट अशोकाने ब्राह्मी लिपीमध्ये राजाज्ञा कोरविल्या. नंतरच्या काळात अशोकाचा नातू दशरथ याचे लेख, महास्थान सोहगौरा येथील लेख, पश्चिम घाटातील नाणेघाट-लेख, हाथीगुंफा येथील लेख यांमधील लिपी पुष्कळच भिन्न आहे. अशोकाच्या अक्षरांमध्ये जे उभे दंड होते, त्यांची उंची नंतर कमी झाली; अक्षरांच्या वळणात फरक झाला. तो फरक देशविशेषाप्रमाणे भिन्न स्वरूपाचाही झाला.

(१) पूर्व भागातील लिपिविशेष : बिहारमध्ये नागार्जुन शैलगृहामध्ये सम्राट अशोकाच्या नातवाचे म्हणजेच दशरथाचे तीन लेख आहेत. या लेखांतील अक्षरे अशोकाच्या लिपीतील अक्षरांहून भिन्न आहेत. भारहूत, बोधगया, हाथीगुंफा, अयोध्या, पभोसा येथील लेखांचा काळ इ. स. पू. दुसरे शतक हा आहे. या कालखंडात भारतावर शकांच्या स्वाऱ्या झाल्या. नवीन संस्कृतीशी संपर्क आल्यामुळे लेखपद्धतीतही फरक झालेला दिसून येतो. या काळामध्ये ज्या अक्षरांमध्ये कोन होते, त्या ठिकाणी अक्षरांना गोलाई प्राप्त झाली. ज्या अक्षरांत गोलाई होती, त्या अक्षरांची उंची कमी होऊन त्यांची जागा कोनांनी घेतली. घ, प, म यांसारख्या तळाशी गोलाकार असणाऱ्या अक्षरांमधील गोलाई जाऊन त्यांची जागा कोनाने घेतली. इकार झोकदार वेलांटीने दाखविला गेला.

(२) उत्तर भागातील लिपिविशेष : मथुरेच्या शकांच्या लेखांतून नवीन पद्धती दिसून येते. बोरूने लिहिताना अक्षरांना कमी-अधिक जाडी प्राप्त होते. त्याप्रमाणे मथुरेच्या लेखांतून अ, आ, च, छ, त, भ, य, ल, ह इत्यादी अक्षरांना बोरूने लिहिल्यासारखे वळण प्राप्त झाले. या लेखांचा काळ साधारणपणे इ. स. पू. पहिले शतक आहे. उदाहरणार्थ-सांचीचे शिलालेख.

(३) पश्चिम भागातील लिपिविशेष : पश्चिम भागातील लिपीचा विचार करताना त्यात सातवाहन सम्राज्ञी नागनिका (इ. स. पू. दुसरे शतक) हिचा नाणेघाटातील लेख, पितळखोरे, कोंडाणे, भाजे, कार्ले, नासिक, अजंठ्याच्या सहाव्या शैलगृहातील लेख यांचा विचार करावा लागेल. या लेखांचा काळ इ. स. पू. पहिले शतक ते इ. स. पहिले शतक हा आहे.

(४) दक्षिण भागातील लिपिविशेष : याच कालखंडातील ब्राह्मी लेख आंध्रप्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील भट्टिपोलू येथील स्तुपावर सापडले आहेत. ब्यूलर यांनी या लेखांचा बारकाईने अभ्यास केला आणि उत्तरेकडील लिपीपेक्षा दक्षिणेकडील लिपी भिन्न होती, असे मत प्रतिपादन केले. मदुरा आणि तिरुनेलवेल्ली या ठिकाणी तमिळ लेख सापडले आहेत.

बदलती ब्राह्मी लिपी : परकीय स्वाऱ्या आणि नव्या सांस्कृतिक संबंधांमुळे लेखनशैली देशकालविशेषाप्रमाणे बदलत गेली. तिच्यातील अशोककालीन साचेबंदपणा नष्ट झाला. अक्षरांच्या डोक्यावर बारीक आडवी खूण झाली. हिला ब्यूलर यांनी 'सेरीफ' असे नाव दिले आहे. पुढे पुढे या खुणेचे रूपांतर अक्षराच्या डोक्यावरील पोकळ चौकोनात झाले. माळव्यामधील गुप्तांच्या लेखातील अक्षरांवर भरीव चौकोन आहेत. वाकाटक राजांच्या लेखांमध्ये लिपी पेटिकाशीर्षक झाली. दक्षिणेकडे याच कालखंडातील अमरावती, नागार्जुनकोंडा, जगय्यपेटा, सालिहुंडम् या ठिकाणी बौद्ध शिलालेख सापडले आहेत. नागार्जुनकोंडा येथील लेखांतील अक्षरांच्या डोक्यावर भरीव त्रिकोण दिसून येतात. उभे दंड लांबलेले आढळतात.

गुप्तकालीन (इ. स. सु. ३०० ते ५५०) ब्राह्मी लिपी : गुप्तकाळात जी ब्राह्मी लिपी प्रचलित होती, त्या लिपीला 'गुप्तलिपी' हे नामाभिधान आहे. गुप्तांचे समकालीन परिव्राजक, राजर्षितुल्य, उच्चकल्प या राजवंशातील राजांची दानपत्रे याच लिपीमध्ये लिहिलेली आहेत. गुप्तलिपीचे पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील असे दोन भेद आहेत. गुप्त काळामध्ये काही अक्षरांमध्ये नागरी अक्षरांचे पूर्वस्वरूप पाहावयास मिळते. उदा. 'ल', 'श' आणि 'ह'. उदा. गुप्तसम्राट समुद्रगुप्त याच्या अलाहाबाद-स्तंभलेखावरील ब्राह्मी लिपी व गुप्तसम्राट समुद्रगुप्त याच्या अलाहाबाद-स्तंभलेखावरील ब्राह्मी लिपी.

कुटिल लिपी : इ. स. सहाव्या शतकामध्ये उत्तर भारतात गुप्तलिपीमध्ये अक्षरांच्या डोक्यावर लहानसा त्रिकोण असल्यामुळे या लिपीला 'कुटिल लिपी' असे नाव पडले. यात अक्षरामधील उभा दंड डावीकडे झुकलेला असून स्वरमात्रा वाकडी आणि लांब आहे. या लिपीमध्ये मंदसोर येथील यशोधर्म्याचा लेख, बुद्धगया येथील राजा महानामन याचा लेख, मौखरी राजांचे लेख, राजा मेरुवर्म्याचे लेख यांचा समावेश होतो.

आठव्या शतकामध्ये या लिपीचे उत्तर हिंदुस्थानातील लिपी, गुजरात, राजस्थान आणि मध्य भारतातील लिपी, दक्षिणेकडील लिपी आणि अतिदक्षिणेकडील लिपी असे भेद आढळून येतात. भारताच्या निरनिराळ्या भागांत जसजशी स्वतंत्र राज्ये उदयाला आली, तसतसे त्या त्या भागात स्थानिक लिपीचे वर्चस्व वाढले आणि त्यामधून सध्याच्या प्रादेशिक लिपींचा उदय झाला. आपल्या देवनागरी लिपीचा उदयही याच ब्राह्मी लिपीपासून झाला असे मानले जाते.

●

प्रवासवर्णन

# कवितेच्या गावा



**निर्मला केशव भोसले**
बी.ए.बी.एड्. २

भूगोल विभागाची सहल गेली आणि आमच्यामध्ये कुजबुज चालू झाली, आपणही सहलीला जावं. माझ्याच वर्गमैत्रिणी सहलीला गेल्या होत्या. त्या आपले गोड, छान, अविस्मरणीय अनुभव सांगत होत्या. त्यांचे हे अनुभव ऐकून मनातून वाटत होतं की, आपण हे अनुभव नक्की अनुभवायचे. मग आम्ही सर्वांनी ठरवून याबाबत सरांशी बोललो. सरांनीही आम्हाला पाठिंबा दिला. सर बोलले, ''ठिकाण तुम्ही ठरवा.'' या गोष्टीवर विचार करून आम्ही उभादांडा, वेंर्गुला हे ठिकाण ठरवले. ही शैक्षणिक सहल असल्यामुळे एका साहित्यिकांच्या घरी भेट देण्याचे ठरले. तसेच सहल १५ ऑक्टोबर, २०२४ फी १००० रु. ठरवली. सगळ्यांनी फी जमा केली. प्राचार्यांकडून सहलीची परवानगी घेऊन मुलांकडून लिहून घेतलेली प्रतिज्ञापत्रे देण्यात आली. १५ तारखेला सकाळी ठीक ६ ला सगळ्यांनी कॉलेजच्या आवारात जमा होण्याचे ठरवले. आम्ही मराठी विभागाचे सर्वजण होतो. १७ सीटर गाडी बुक केली होती. सगळी तयारी करून झाली होती. आता फक्त सहलीला जाण्याची ओढ निर्माण झाली होती. सहलीला जायचे. तेथे काय-काय करायचे या विचाराने झोप लागली.

पहाटे सगळ्यांनी आवरून ५.३० ला कॉलेजमध्ये सर्वजण पोहचले. त्यात बारीक बारीक पाऊस येत होता. गोपाळ गावडे सर व जयवंत दळवी सरही पोहचले. सर आमच्या गाडीतून येणार नव्हते. दळवी सर गोपाळ गावडे सरांच्या गाडीतून प्रवास करणार होते. सगळे गाडीत नीट बसले का याची सरांनी खात्री करून घेतली. आम्ही आमची सीट पकडली आणि निवांत बसलो.

कॉलेजमधून ठीक ६.३० ला गाडी निघाली. सर आमच्या गाडीच्या मागूनच येत होते. तेथूनच आम्ही गाणी लावायला चालू केले. खूप छान वाटत होतं. मन अगदी प्रसन्न झाले. सगळेजण खूश होते. गाडीत आम्ही प्रत्येकाच्या आवडीतचे एक गाणे लावायला चालू केले. त्याचबरोबरच सर्वजण गाणी म्हणत होते. मज्जामस्ती करत होते.

कोल्हापूर सोडून पुढे गेल्यावर पंपावर डिझेल भरण्यासाठी गाडी थांबवली. तिथले काम झाल्यावर गाडी परत आपल्या कामाला लागली. मी खिडकीच्या बाजूला बसले होते. खिडकीतून बाहेर नजर फिरवली आणि मी थक्कच झाले. आजूबाजूचा परिसर खूप सुंदर दिसत होता. तो डोंगराळ भाग असल्यामुळे त्या डोंगरावर धुक्यांनी चादर घातली होती. ते पाहून मला वाटत होतं की, डोंगराला थंडी वाजत आहे. म्हणून आभाळाने पांघरुण घातले आहे. त्यात सूर्याची किरणे थोडी थोडी जाणवत होती. जणू ती सकाळ झाली म्हणून डोंगराला उठवत होती. सगळीकडे मस्त हिरवीगार झाडे दिसत होती. जणू सृष्टीने हिरवा शालू घातला आहे. खिडकीतून थंड वाऱ्याची झुळूक मनाला व देहाला स्पर्शून जात होती. हे सर्व बघत बघत आम्ही राधानगरीमध्ये पोहचलो. सकाळी लवकर आल्यामुळे सर्वांना भूक लागली होती. तर कोणाला फ्रेश व्हायचे होते. एका हॉटेलमध्ये गेलो. प्रत्येकाने आपल्याला काय काय हवे हे सांगितले. नाश्तामध्ये वडापाव, डोसा, पोहे, शिरा इ. सर्व होते. तसेच चहाही सर्वांनी घेतला. तेथील बिल देऊन सर्वजण गाडीत बसले की नाही याची खात्री करून गाडी पुन्हा आपल्या मार्गाला लागली.

सगळ्यांचे पोट भरल्यामुळे मुलांना जास्त जोश आला. घाट असल्यामुळे वळणे येत होती. गाडी हेलकावे खात होती. यातच सर्वजण नाचत होते. धमाल करत होते. सगळेजण मिळूनमिसळून वागत होते. तसेच आदित्य व राजेशने स्वतःच्या कविता सादर केल्या. त्या कविता खूप छान होत्या. सगळ्यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. हे सर्व चालूच होतं. आम्ही कधी वेंगुर्ल्याला पोहचलो हे आम्हाला कळलंच नाही. तेथील लोकांना उभादांडा हे गाव विचारत तेथे पोहचलो. तेथे आम्हाला कवी मंगेश पाडगावकर यांच्या घराला तसेच त्यांच्या संग्रहित असणाऱ्या साहित्याला भेट द्यायची होती. पण काही कारणास्तव आम्हाला त्यांच्या घरी जाता आलं नाही. त्यामुळे मन थोडं उदास झालं खरं; पण आम्ही त्यांच्या तिथे असणाऱ्या शाळेला भेट दिली. शाळा स्वच्छ, सुंदर होती. तिथे गेल्यावर आम्ही सर्वजण त्यांच्या ऑफिसमध्ये बसलो. त्यांनी आम्हाला शाळेबद्दल माहिती दिली. तसेच त्यांची अनेक पुस्तके दाखवली. त्या पुस्तकातील कवितांचे वाचन केले. त्या शिक्षकांनी आम्हाला चांगला प्रतिसाद दिला. त्यांच्या सर्वच कविता खूप छान आहेत. पण मी 'श्रेय' ही कविता वाचली. ती मला खूप आवडली.

'कधी कधी सगळंच कसं चुकत जातं
नको ते हातात येतं
हवं ते हुकत जातं!
अशावेळी काय करावं?
सुकलेल्या झाडाला
न बोलता पाणी द्यावं
त्यांच्या चारोळ्याही खूप छान आहेत.
डोळ्यांत जेव्हा आसवं असतात
तेव्हाच माणसं माणसं असतात.'

हे सर्व झाल्यावर आमच्या गावडे सरांनी तेथील मुख्याध्यापक मॅडमला 'उंबळट' हे त्यांचे पुस्तक भेट म्हणून दिले. तेथील सर्व स्टाफबरोबर आम्ही फोटो काढले आणि त्यांचा निरोप घेऊन पुन्हा निघालो.

दुपारचे १२ वाजले होते. सर्वांना खूप भूक लागली होती. मग त्या शाळेपासून थोड्या अंतरावर असणाऱ्या समुद्री हॉटेलवर जायचं ठरवलं. हॉटेलवर जात असतानाच वाटेत लागणाऱ्या वेतोबा मंदिरात आम्ही थांबलो व सरांना विचारून आतमध्ये गेलो. बाहेरूनच ते मंदिर खूप सुंदर दिसते होते. कोकणातील मंदिरे कशा प्रकारची असतात हे

पाहायला मिळाले. त्या मंदिरावर असणारे नक्षीकाम, त्यातील रंग बघून थक्क व्हाल असे होते. हे आतूनही मंदिर खूप छान होते. ते बघून झाल्यावर आम्ही पुन्हा हॉटेलवर निघालो. तेथे पोहचलो आणि धो-धो पाऊस चालू झाला. पावसाने आम्हाला साथ दिली असे म्हणायलाही हरकत नाही. पाऊस एवढा होता की, सगळ्यांच्या मनात काहूर माजलं की, आता पाऊस नाही थांबला तर आपण समुद्रातील पाण्यात कसे जाणार; पण पावसानेही आमच्यावर थोडी दया दाखवली. हॉटेलमध्ये ऑर्डर दिल्यानंतर १०-१५ मिनिटांनी जेवण आले. मला तर सुरमाई खूप आवडली. सगळेच जेवण छान असल्यामुळे सगळ्यांनी जेवणावर ताव मारला. जेवण करून झाल्यानंतर पाऊसही थांबला. पाऊस थांबल्यामुळे सगळ्यांना खूप आनंद झाला. जेवणाचे बिल देऊन आम्ही पुन्हा निघालो.

जवळच बीच असल्यामुळे लगेच आम्ही १० मिनिटांत तेथे पोहचलो. तिथे झाडे खूप आहेत. कोकण भाग असल्यामुळे नारळाची झाडे सगळीकडे दिसत होती. सगळेजण गाडीतून खाली उतरलो. तेथूनच समुद्राकडे एक नजर फिरवली. शिरोडा समुद्र खूप शांत, स्वच्छ दिसत होता. गावडे सर खूप कंटाळलेले होते. त्यांची रात्री झोप न झाल्याने ते दळवी बोलले सरांना, ''मुलांना जास्त पाण्यात जाऊ देऊ नका. कारण हा समुद्र खूप खोल आहे'' आणि सरांना परतीचा प्रवासही करायचा आहे. आम्ही सर्वांनी तेथे फोटो काढले. समुद्राकडे गेलो. या समुद्रामध्ये सफेद वाळू, निळ्या पाण्याचे सुंदर दृश्य आणि आसपासच्या नारळाच्या झाडांचे जंगल हा परिसर खूपच आकर्षक वाटत होता. समुद्रकिनारा म्हणजे हे एक नैसर्गिक सौंदर्य जे आपल्याला शांतता आणि विश्रांती देते. येणाऱ्या लाटांचा आवाज, थंड हवेचा स्पर्श आणि सूर्याची सोनेरी किरणे आपल्याला एक छान अनुभव देतात. समुद्रातील पाणी आणि शांतता पाहून आपले मन शांत होते. किनाऱ्यावरच्या मऊ, बारीक व ओलसर वाळूत अनवाणी चालत फेऱ्या मारायला खूप छान वाटत होतं. तसेच त्या वाळूत आम्ही नावे काढली, नक्षी गिरवत बसलो होतो. लाटांकडे निरखून पाहिले तेव्हा समजले, किनाऱ्यावर आलेली लाट परतताना येणारी दुसरी लाट त्या लाटेला आपल्या पोटात घेत होती आणि मग पुढे सरकत होती. मी समुद्रात पाय बुडवून पाणी सुळसुळत जात आहे आणि पायाखालची वाळू भुळूभुळू निघून जात आहे. प्रत्येक लाटेबरोबर हा अनुभव मी घेत होते. पाण्यात भिजत होते. त्या खाऱ्या पाण्यात मी स्वतःला विसरून गेले होते. सरही आमच्यासोबत पाण्यात भिजण्याचा आनंद घेत होते. लाटा अशा किनाऱ्यावर लोळण घेत असतात तसे आम्ही त्या पाण्यात लोळण घेत होतो. बराच वेळ झाल्यानंतर आम्ही पाण्यातून बाहेर आलो. त्या पाण्यातून बाहेर येण्याची इच्छा होत नव्हती. पण पुढेही अजून प्रवास करायचा होता. तेथे समुद्राच्या पाण्यामध्ये उभे राहून फोटो काढले. बाहेर आल्यानंतर तिथेच जवळ असणाऱ्या हॉटेलमध्ये अंघोळीची सोय कुठे आहे हे बघत होतो. तेथे अंघोळीसाठी ३०रू. देऊन आम्ही सर्वांनी अंघोळ केली. तेथून बाहेर आल्यावर तिथे एक छोटी टपरी होती. त्यात बारीक बारीक पाऊस पडत होता. त्या वातावरणात चहा पिताना खूप छान वाटत होतं. चहा पिऊन झाल्यानंतर आम्ही तिथला निरोप घेऊन निघालो.

केशवसुत हे आधुनिक मराठी काव्यातील आद्य कवी मानले जातात. त्यांच्या मालगुंड येथे असणाऱ्या स्मारकाला भेट द्यायची म्हणून आम्ही प्रवास सुरू केला आणि या स्मारकाच्या माध्यमातून त्यांच्या काव्यांची आणि जीवनाची आठवण जपली होती. तेथे पोहचल्यावर आम्ही त्या स्मारकाचे निरीक्षण केले. त्या स्मारकात केशवसुतांच्या जीवनाशी आणि कार्याशी सबंधित वस्तू आहेत. त्यांचा पुतळा साहित्यिक योगदानाचे प्रतीक मानला जातो. याठिकाणी विविध कार्यक्रम घेतले जातात. हे सगळे पाहून आम्ही पुन्हा आमच्या प्रवासाला निघालो.

संध्याकाळ होऊन गेली होती. आम्ही लाईट हाऊस बघायला गेलो त्याचे दृश्य आकर्षक वाटत होते. लाईट हाऊस हा एक उंच टॉवर असतो, तो समुद्राच्या किनाऱ्यावर उभारलेला असतो. या टॉवरला चमकदार रंग दिलेले होते. त्यामधून समुद्र खूप चांगल्या प्रकारे दिसत होता. त्यामध्ये असणाऱ्या लेंस या समुद्रावर पडल्या जातात. त्यामुळे दूरपर्यंत आपल्याला पाहाता येते.

लाईट हाऊसमधून आम्ही बाहेर आल्यावर पुन्हा आपल्या घरी जायला निघालो. प्रवास लांबचा असल्यामुळे जास्त वेळ रेंगाळत न बसता निघालो. अंधार पडला होता. गाडीमध्ये छान रंगीबेरंगी लाईट लावल्या होत्या आणि आम्ही पुन्हा गाणी लावून डान्स करायला लागलो. थोड्या वेळानंतर आम्ही घाटात पोहचलो. पण नेमका हा घाट आहे की ढग खाली येऊन बसले आहेत असे वाटते. त्या घाटातील झाडे, रस्ता, पुढून येणारी गाडी काहीच दिसत नव्हतं. खूप भीती पण वाटत होती. कारण घाट आहे म्हटल्यावर वळणेही असणारच. पण त्या धुक्यांना पाहून मस्तही वाटत होतं. संपूर्ण परिसर धुक्यांनी व्यापला होता. पण आमच्यासोबत असणारा ड्रायव्हर अजिबात डगमगला नाही. त्याने आपल्या गाडीचा वेग व्यवस्थित ठेवून गाडी चालवली. त्याबद्दल त्याचे सर्वांनी कौतुक केले. या गाडीच्या मागोमाग गावडे सर येत होते. पण सरांनी पण या गाडीची पाठलाग सोडली नाही. ते या गाडीच्याआधारे घाट सोडून वरती आले. तसा सगळ्यांच्या जीवात जीव आला.

एका पेट्रोल पंपावर आम्ही फ्रेश होण्सासाठी थांबलो आणि तिथे असणारी लाईट फ्रेश वातावरण पाहून सर्वांनी सरांसोबत ग्रुप फोटो काढले, हे सगळे आटोपल्यावर पुन्हा निघालो. वेळ झाल्याने सर्वांना भूक तर लागली होती. मग चांगले हॉटेल पाहून सरांनी तेथे गाडी थांबवायला सांगितले. बऱ्याच वेळ गेल्यानंतर गारगोटीजवळ असणाऱ्या एका हॉटेलमध्ये आम्ही थांबलो. तेवढ्यात तिथे सरही आले.

सगळ्यांनी जे जे हवं ते मागवलं मी तर पनीर टिक्का भाजी घेऊन जेवले. सगळ्यांनी जेवून झाल्यावर पुन्हा गाडीत जाऊन बसले. त्याही हॉटेलमधील जेवण छान होतं. पुन्हा आता आम्ही घराच्या ओढीने घरी निघालो. आता कोल्हापूरमध्ये गेल्यावर कोण कसे घरी जाणार याचा विचार सर्वजण करत होते. पालकांना फोन लावायचे चालू होते. सर्वजण आपल्या पाल्याची वाट पाहात कॉलेजमध्ये थांबले होते. मी तृप्तीसोबत त्यांच्या कारमधून गेले. काही जणांना सरांनी आपल्या गाडीतून सोडले. सगळे घरी गेल्यावर सरही गेले.

●

# मी मुलगी बोलते...!



**राजलक्ष्मी रमेश शिंदे**
बी.ए. ३

आई-बाबा सर्वप्रथम मी तुमचे आभार मानते. कारण तुम्ही मला या पृथ्वीतलावर जन्म घेऊ दिला आणि या जन्मामुळे कितीतरी सुंदर क्षणाचा आनंद मला आज या जीवनात घेता आला. तुमच्यामुळे मी आज हे जग पाहत आहे.

आपण आता पाहतोच आहे की, जन्मतःच तिचां मृत्यू म्हणजेच हत्या करण्यात येते. पूर्वी स्त्रियांना, मुलींना फारसे महत्त्व लोक देत नव्हते. आताही देतात असे नाही, पण याचे प्रमाण तर कमी झाले आहे. अनेक घरामध्ये आपल्याला असे पाहायला मिळते की, त्या घरामध्ये मुलगी जन्माला येऊ देत नाहीत आणि ती जन्माला आलीच तरी फारसा आनंद त्या घरात आईशिवाय कोणालाच होत नाही.

इतरांना 'वंशाचा दिवा' मुलगा हवा असतो. कारण का? शेवटी तो तुमचा सांभाळ करणार असतो. मृत्यूनंतर तो खांदाही देणार असतो. ते काम मुली करू शकत नाहीत असे तुम्हाला वाटते. पण हा तुमचा गैरसमज आहे. तुम्ही मुलींना संधीच देत नाहीत.

मुलींनी जर ठरवलं तर ती काहीही करू शकते. वंशाचा दिवा पाहिजे म्हणता, पण त्याची काही गॅरेन्टी नसते की तो तुम्हाला सांभाळेलच. 'तुम्हाला वंशाचा दिवा हवा असतो. मग घरात प्रकाशणारी ज्योत आणि दोन्ही घराला उजळवणारी मुलगी का नको?'

'लाड करायला आई पाहिजे,
भांडण करायला बहीण पाहिजे,
राखी बांधायला आत्या पाहिजे,
मग मुलगीच का नको?'

मी मुलांचा द्वेष नाही करत किंवा मला त्यांचा तिरस्कार मुळीच नाही वाटत. बस्सं! मला फक्त एवढंच म्हणायचं आहे की, मुला-मुलींमध्ये भेदभाव नका करू. स्त्रियांना कमी नका लेखू. एकच सांगेन, 'दिव्याला ज्योत असेल तरच आणि तरच दिवा पेटू शकतो आणि घरात प्रकाशही पाडू शकतो.

कारण आपण आता पाहातोच आहे की, कित्येक स्त्रियांनी स्वतःची ओळख प्रत्येक क्षेत्रात निर्माण केली आहे. स्त्रिया आता खूप पुढे चालल्या आहेत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या प्रगती करत आहेत. तरीही अशा अनेक स्त्रिया अजूनही भारतात आहेत की त्या शिकूनही घरकाम करत आहेत.

'मुलगी हे एक फूल आहे.
जे प्रत्येक बागेत फुलत नाही
तिला खूप प्रेमाने जपा
कारण फूल हे प्रत्येक बागेत उमलत नाही
अगदी तसे मुलगी हे प्रत्येकाच्या घरी
जन्माला येत नाही.'

ज्यांच्या घरी दोन मुले जन्माला येतात. त्याच मुलाला राखी बांधायला बहीण हवी असते आणि घरच्यांना मुलगी नको असते. तसंही आपण आता आता शिकलोच आहे की मुलगा असो, वा मुलगी असो हे एकट्या स्त्रीच्या हाती नसते. सगळे स्त्रीला दोष देत असतात. मुलगी झाली म्हणून तिला टोचून बोलतात, तिचा छळ करतात. स्त्री-पुरुष गुणसूत्रानुसारच ठरते की, तो मुलगा आहे की मुलगी.

समाजाला मी एकच सांगेन की, मुलगा असो किंवा मुलगी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. नाण्याच्या दोन्ही बाजू सारख्या असतात. त्यांच्यात भेदभाव नका करू.

उदा. एका मुलाने प्रेमविवाह केले तर ते समाजला आणि घरच्यांना चालतं. पण मुलीने केलं तर ते मात्र चालत नाही? का? असे का? सांगा ना? कारण मुलीने प्रेमविवाह केला तर तिला लगेच नावे ठेवायला लागतात, लगेच घराची बदनामी होते का? मुलाने प्रेमविवाह केला की त्या मुलीची बदनामी नाही होत? यातूनच मुला आणि मुलींमध्ये केलेला भेदभाव दिसून येतो. अजूनही आपल्या देशात म्हणावे तसे मुलींबद्दलच्या लोकांच्या विचारात फारसा फरक पडलेला नाही.

हां, पण यातून मुलांना नावे ठेवायचे नाहीय मला. सगळी मुले सारखी नसतात किंवा सगळ्या मुली सारख्या नसतात. मला पुरुषांनासुद्धा नावे ठेवायचे नाही. त्यांना दोष द्यायचा नाही. जगात सगळेच पुरुष सारखे नाहीयेत. असे अनेक पुरुष आहेत की, ते स्त्रियांना पाठिंबा देतात. त्यांना प्रत्येक बाबतीत प्राधान्य देत असतात.



पण तरीही अजून असेही पुरुष आहेत की, त्यांना स्त्रियांनी घराबाहेर पडलेलं मुळीच आवडत नाहीत. मी अशा स्त्रियांबद्दलच्या अनेक समस्या पाहिल्या आहेत. ऐकल्या आहेत. आपण असे म्हणतो की, महिला सक्षमीकरण झाले आहे. अर्थातच झाले आहे. पण १००% नाही असे मला वाटतं. आज भारतात अशाही स्त्रिया आहेत की, त्या इतक्या शिकूनही ती घरातच आहेत असे का? कारण... तिच्या घरच्यांना एका स्त्रीने बाहेर पडून काम करणं आवडत नाही. असं अजूनही घडते आहे. मी पाहिलं आहे मग काय उपयोग हो एवढं शिकून एका स्त्रीचा तिला जर घराच्या बाहेरच पडू देत नसतील तर? तिला तिच्या स्वतःच्या पायावर उभारण्याची संधीच देत नसतील तर?

मी हे घडलेलं पाहिलं आहे. ऐकलं आहे, हे खंर आहे की खोटं याचीसुद्धा शहानिशा मी केली आहे. उगाचंच लिहायचं म्हणून मी हे नाही लिहिलं.

जगात अशा पण स्त्रिया आहेत की, ज्या घरच्या समस्यांना तोंड देऊन त्या घराच्याबाहेर पडत आहेत. त्या स्वतःला सिद्ध करत आहेत की ज्या घरच्या समस्यांना तोंड देऊन त्या घराच्या बाहेर पडत आहेत. त्या स्वतःला  सिद्ध करत आहेत. प्रत्येक स्त्रीने तिच्यासाठी तरी झटले पाहिजे. स्त्रिया खूप पुढे जात आहेत. स्त्रिया या कितीतरी समस्यांना तोंड देऊन त्या पुढे येत असतात.

'आधी आहे ती मुलगी
परत आहे स्त्री
घराला घरपण देत ती स्त्री
मुलाला जन्म देते ती आई.
लाड पुरवे ती आजी
घराचं हसू असते ती मुलगी.'
मी यातून एकच संदेश देईन की,
स्त्रियांना कमी लेखू नका. ती चूल आणि मूल एवढंच काम करू शकते असे कोणी समजू नका.
'स्त्री' ही कमजोर असते असे तर मुळीच म्हणू नका, 'स्त्री' ही काहीही करू शकते. 'स्त्री' ही एक मुलगीच आहे.
मुलांमुलींमध्ये भेदभाव करू नका
हाच महत्त्वाचा संदेश मला लोकांपर्यंत पोहोचवायचा आहे. शेवटी मी एकच म्हणेन की,
'बाबांची आहे ती लाडकी,
आईची आहे ती नात,
दिल आहे नादान,
तरीही करते ती सर्वांसाठी.
आपली जान कुर्बान
भावाची मुस्कान
आणि कुटुंबाचा अभिमान
ही आहे आमच्या
मुलींची पहचान.'

•

# भावना मनातल्या...

**रिया शिंदे**
बी.कॉम. १

प्रेम आहे, होते आणि अनंत असणार
पण आस या पणाची कशी तुला सांगणार?
लोक काय म्हणतील, या विचारात
शब्द ओठांवर येऊनही ते मोकळे नाही होऊ शकले स्वरात.
मनातल्या तुझ्याविषयीच्या भावना या राहूनच गेल्या माझ्या अंतःकरणात
लोकांचा विचार करत आयुष्यातील वेळ गेली पुढे
पण तुझे माझ्यावरचे प्रेम हे का राहिले अधुरे?
खूप स्वप्ने पाहिली होती माझ्या नजरेने तुझ्यासवेची.
पण कधी तुला जाणीवच नाही झाली माझ्या-तुझ्याविषयीच्या भावनांची
अधुरे राहिले जरी माझे प्रेम तरी, आपली मैत्री ही राहील अनंत काळापरी
कळूनही भावना एकमेकांच्या मनातली,
गांभीर्याने न पाहिले कधी आपसातल्या प्रेमाला
गृहीत धरून चाललो होतो. हा तर आहेच आपलाच, पण नियतीच्या चक्राच्या नावाने आपणच केली आपली वेगळी वाट.
जेव्हा भेटू पुन्हा नव्याने तेव्हा ओळखशील का रे आपल्या मैत्रीला?
असेल तेव्हा ही प्रेम माझे तुझ्यावर तुझी सखी असूनही आता अधुऱ्या राहिल्या जरी भावना.
पण पहिल्या इतकेच प्रेम असेल तुझ्यावरी.
भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टींची आज मागते मी क्षमा.
त्यासाठी तू करशील का मला क्षमा?
वर्तमानात त्रास नाही होणार आपल्या नात्याचा,
वचन देते तुला आपल्या विश्वासाच्या मैत्रीचा,
भविष्याच्या विचाराने त्रासलेले हे जीवन
तुझ्याशी एकदा मनमोकळे केले की होते सहज-सुलभ
वाट जरी असली आता वेगळी,
पण साथ नाही सोडणार कधी
तरीही उरतो एक प्रश्न माझ्या या मनी,
कधी उमगतील का भावना या माझ्या मनातल्या...

वैचारिक लेख

# विकसित भारत @ २०४७ युवकांची भूमिका




**प्राची सुनील पडवळ**
**गौरी गणपती कदम**
बी.कॉम. ३

'जातिधर्मात वाद नाही. विकसित अर्थव्यवस्थेचा आधार असेल, २०४७ मध्ये सुरक्षित आत्मनिर्भर असा माझा भारत असेल.'

इतिहास प्रत्येक देशाला विकासाच्या प्रवासाला अनेक पटींनी पुढे नेणारा काळ देतो. एकप्रकारे त्या देशाच्या विकासासाठी हा अमृतकाळ आहे. हा भारताच्या इतिहासातील असा काळ आहे जेव्हा देश एक मोठी झेप घेणार आहे. भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण झाल्यानंतर देशाला विकसित राष्ट्र बनवणे असा उद्देश आहे. यामध्ये आर्थिक वृद्धी, सामाजिक प्रगती, पर्यावरणीय शाश्वतता आणि सुशासन यासह विकासाच्या विविध पैलूंचा समावेश आहे. विकसित भारत २०४७ साठी युवकांना त्यांच्या कल्पना आणि सूचना सामायिक करण्यासाठी कार्यरत ठेवण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्याच्या दिशेने ही कार्यशाळा हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.



कोणत्याही देशाची तरुणाई ही मोठी संपत्ती असते, हे सर्वज्ञात सत्य आहे. ते खरोखरच देशाचे भविष्य आहेत आणि प्रत्येक स्तरावर त्यांचे प्रतिनिधित्व करतात. राष्ट्रउभारणीत तरुणांची भूमिका तुमच्या विचारांपेक्षा जास्त महत्त्वाची आहे. दुसऱ्या शब्दांत, तरुणांची बुद्धिमत्ता आणि कार्य देशाला यशाच्या मार्गावर घेऊन जाईल. जसा प्रत्येक नागरिक जबाबदार आहे, तसाच तरुणही जबाबदार आहे. सामाजिक उत्थानाची जबाबदारी असलेल्या या तरुणांपुढे काय आदर्श व आव्हाने आहेत? हा प्रश्न जर एखाद्या वयस्कर माणसाला विचारला तर त्यांचे उत्तर कदाचित असे असेल, ''आजच्या तरुणांना आदर्श बघवत नाहीत आणि आव्हाने पेलत नाहीत '' खरीच अशी परिस्थिती आहे का? आजची तरुण पिढी ही उद्याची मार्गदर्शक पिढी असेल. त्यामुळे आजच्या युवकांनी दूरदृष्टीने विचार करून काही मूलभूत आव्हाने पेलणे आवश्यक आहे. भविष्यात युवकच नवीन कुटुंब व नवीन समाज निर्माण करणार आहेत.

आपले युवक समाजात सामाजिक सुधारणा घडवून आणू शकतात. आपल्याला कोणत्या क्षेत्रात प्रगती करायची आहे, मग ते तांत्रिक क्षेत्र असो की क्रीडा क्षेत्र, यासाठी युवकांची गरज आहे. ही भूमिका योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी तरुणांना कशी मदत करायची हे आपल्यावर अवलंबून आहे. आपण सर्व तरुणांना त्यांच्या शक्तीची आणि राष्ट्रउभारणीत त्यांची भूमिका काय आहे, याची जाणीव करून दिली पाहिजे. देशाला प्रगतशील व विकसित बनवण्यासाठी युवकांची आवश्यकता आहे.

युवकच उद्याचे भविष्य आहेत. आज ते आमचे भागीदार असतील, उद्या ते नेते बनतील. तरुण खूप उत्साही आहेत. त्यांच्याकडे शिकण्याची आणि वातावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता आहे. त्याचप्रमाणे, ते त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी शिकण्यास आणि त्यावर कार्य करण्यास तयार आहेत. राष्ट्र घडवण्यासाठीची ताकद आपल्या तरुणांमध्ये आहे. त्यामुळे आपण त्यांना संधी दिली पाहिजे. ते भविष्य आहेत आणि त्यांच्याकडील दृष्टिकोनाचा जुन्या पिढ्यांमध्ये अभाव आहे. आजकाल तरुणांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तेव्हा आपण त्यांना प्रत्येक क्षेत्रात समान संधी देणे आवश्यक आहे. जेणेकरून युवक पिढी यशस्वी होऊ शकेल.

तरुण वर्गाविषयीची विचार व त्यांना देण्यात येत असलेले महत्त्व वेगळ्या प्रकारचे आहे. समाजाचा विचार करताना वर्गानुसार, जातीनुसार गट पाडून विभाजन केले जाते. वयानुसार समाजाची विभागणी करून युवककांचा वेगळा सामाजिक गट निर्माण करण्याची प्रवृत्ती नवीन आहे. त्याचप्रमाणे तरुण माणसांनाही आपण युवक म्हणून कोणीतरी वेगळे आहोत, वेगळी सामाजिक जबाबदारी आपल्यावर आहे व समाजपरिवर्तनाच्या कामात आपल्याला विशेषस्थान आहे, ही जाणीव तरुण पिढीला करून द्यायला हवी. ही जबाबदारी पार पाडत असताना काही गोष्टींचे भान तरुण वर्गाने ठेवले पाहिजे. यामध्ये प्रमुख म्हणजे नैतिकता, विचारसरणी व आदर्शवाद आपण जसे वागणार आहोत, जी कार्य करणार आहोत ती इतर कोणाला लक्षात ठेवाविशी वाटली नाहीत, तरी काळ व इतिहास यांना मात्र निश्चितच नोंद घ्यावी लागेल. इतिहास हा संदर्भासाठी असतो. जेव्हा नवीन पिढी गतकाळाची पाने उलगडून बघेल, त्यावेळी आत्ताचा इतिहास सामोरा येईल. माणूस अनुकरणप्रिय जरूर आहे. मात्र बऱ्याच वेळेस वाईट गोष्टींचेच अनुकरण जास्त होत आहे. एखाद्या

चुकीच्या प्रथेचा पायंडा पडू नये याची खबरदारी घेणे हे प्रत्येक तरुण पिढीसमोरील प्रथम आव्हान आहे.

आपल्या देशातील तरुणांना त्याची क्षमता साध्य करण्यासाठी आपण अनेक मार्गांनी मदत करू शकतो. त्यासाठी सरकारने असे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत जे बेरोजगारी, गरीब शिक्षण संस्था आणि इतर समस्यांशी लढण्यासाठी मदत करतील आणि युवकांना कोणत्याही अडथळ्याशिवाय समृद्ध होण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे नागरिकांनी तरुणांना प्रत्येक क्षेत्रात चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. जेव्हा आपण आपल्या तरुणांना सतत परावृत्त करतो आणि त्यांच्यावर विश्वास ठेवत नाही, तेव्हा ते आपला आत्मविश्वास स्पार्क गमावतील. पंखांना साखळदंड बांधून खाली आणण्याऐवजी त्यांना उंच उडण्यासाठी त्यांच्या पंखाखाली वारा दिला पाहिजे. याची आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे.

जात, पंथ, लिंग, वंश, धर्म आणि बरेच काही विचारात न घेता सर्वांसाठी समान संधी प्रदान केल्या  गेल्या पाहिजेत. घराणेशाही आणि पक्षपाताचे विविध मुद्दे देशाच्या वास्तविक प्रतिभेला खाऊन टाकत आहेत. हे शक्य तितक्या लवकर दूर केले पाहिजे. आपण हे सुनिश्चित केले पाहिजे की, प्रत्येक तरुणाला स्वत:ला पात्रता सिद्ध करण्याची संधी आहे आणि ती सर्वांना समान रितीने दिली गेली पाहिजे. थोडक्यात, राष्ट्र घडवण्याची ताकद आपल्या तरुणांमध्ये आहे. त्यामुळे आपण त्यांना संधी दिली पाहिजे. ते भविष्य आहेत आणि त्यांच्याकडे असा दृष्टिकोन आहे ज्याचा आधीच्या पिढ्यांमध्ये अभाव आहे. राष्ट्राची भरभराट होण्यासाठी युवकांचा आवेश आणि उत्साह योग्य प्रकारे वापरला गेला पाहिजे.

२०४७ पर्यंत भारतातील बालमजुरी, भ्रष्टाचार, आतंकवाद, बेरोजगारी, गरिबी, महागाई, भाषावाद, प्रांतवाद, निरक्षरता, कुपोषण इत्यादी समस्यांचे निर्मूलन झालेले असेल. आपला भारत विज्ञान - तंत्रज्ञान, आरोग्य, क्रीडा, संरक्षण, कृषी इ. सर्व क्षेत्रांत आघाडीवर असेल, भारत आपल्या शेजारील देशांचा चांगला मित्र बनेल. २०४७ पर्यंत भारत संविधानातील प्रत्येक मूल्यांचे योग्यप्रकारे पालन करेल. माझ्या या २०४७ मधील भारताच्या विकास प्रकल्पा करिता प्रत्येक भारतीयाने झटले, तर नक्कीच आपला भारत देश जगात एक आदर्श देश बनेल. भारत देशामध्ये एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे ते म्हणजे एकता. जगाच्या इतिहासामध्ये भारतीय संस्कृतीला प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झालेले आहे. भारत देश स्वतंत्र झाला तेव्हा आपल्याकडे देशवासियांना पुरवता येईल एवढे अन्नही नव्हते. म्हणून त्यानंतर डॉ. स्वामिनाथन याच्या नेतृत्वाखाली हरितक्रांती घडविण्यात आली. त्यामुळे उत्पादन वाढले आणि भारत अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्ण झाला. आज दुष्काळ पडला तरी उपासमारीने गरीब मरतील अशी स्थिती नाही.

भारत देशाकडे एक तरुण देश म्हणून पाहिले जाते. भारत हा विविध परंपरेने, विविध जातीधर्माने नटलेला देश आहे. भारतामध्ये सर्व जातीचे लोक राहातात. सर्व गटातील लोकांचे लोकसंख्येसाठी भारतामध्ये कार्यशील गट तयार झाले आहेत. भारतातील लोकसंख्येच्या दृष्टीने तरुणाईचे प्रमाण अधिक असल्यामुळे देशाकडे एक तरुण देश म्हणून पाहिलं जातं. ज्या देशात एवढ्या मोठ्या प्रमाणात तरुणांची संख्या असेल तर त्या देशाची प्रगती लक्षणीय आणि वेगवान असायला पाहिजे. आज आपल्या देशाला हुशार, उद्योगी आणि कर्तबगार युवकांची गरज आहे.

२१ व्या शतकात भारताची स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करण्यात येणारी कोणतीही अडचण आता आपल्याला रोखू शकत नाही. आपली शक्ती हीच आपली ताकद आहे. 'राष्ट्र प्रथम-सदैव प्रथम' ही भावनाच आपली प्राणशक्ती आहे. हा काळ एक होऊन संकल्प करण्याचा आहे आणि हाच काळ आहे ज्यावेळी आपण विजयाच्या दिशेने वाटचाल करायची आहे.

'भारतासाठी अमूल्य वेळ आहे
असंख्य बाहुंची शक्ती आहे.
सर्वत्र देशाविषयी भक्ती आहे.
तुम्ही उठा, तिरंगा फडकवा,
भारताचे भविष्य आकाशात उंचवा
ओळखा आपल्या सामर्थ्याला
जाणा आपल्या कर्तव्यांना
हीच योग्य वेळ आहे.'

•

## लेखन.... म्हणजे काय?

**सीमा चौगुले**
बी.ए. भाग ३

लेखन म्हणजे काय?
भावनांना पकडण्यासाठी
केलेली शब्दांची धरपकड
लेखन म्हणजे काय?
शब्दांच्या शिवणीने
शिवलेल्या मनाच्या जखमा
लेखन म्हाजे काय?
शब्दांच्या शिडकाव्याने
शांत झालेली तप्त भावनांची धरा
लेखन म्हणजे काय?
भावनांच्या जमिनीला भेटून
उगवलेले शब्दांचे अंकुर
लेखन म्हणजे काय?
भावनांची दरी पार करण्यासाठी
बांधलेला शब्दांचा पूल
शेवटी लेखन म्हणजे
शब्दांशी जमलेली गट्टी
आपणास सुखा-दु:खात सोबत करणारी

माहितीपर लेख

# महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षण विषयक कार्य




**आदित्य हेमंत धनवडे**
बी.ए.बी.एड. ४


भारताच्या इतिहासात असंख्य राजे होऊन गेले; पण इतिहासाच्या पानांवर मोजक्या राजांची नावे लिहिली गेली. त्या मोजक्या नावांमध्येच एक नाव म्हणजे 'महाराजा सयाजीराव गायकवाड'.

करवीर संस्थानांमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी सर्वांगाने जे कार्य कोल्हापूर संस्थानासाठी केले ते आपल्या संस्थानाच्या प्रजेच्या हिताचे होते. तसेच कार्य महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात केले. सयाजीरावांचा जन्म ११ मार्च १८६३ साली नाशिकमध्ये झाला. त्यांचे बालपण तिथेच गेले. काही वर्षांनी बडोदा संस्थानाने त्यांना दत्तक घेतले. दत्तक घेतल्यानंतर त्यांना लिहिता-वाचतासुद्धा येत नव्हते. मग त्यांना दत्तक घेतलेल्या राणी जमनाबाई यांनी त्यांना सुशिक्षित केले. त्यांचा राज्याभिषेक १८७५ सालीच झाला. त्यांच्या हाती राज्यकारभार दिला गेला. सयाजीरावांनी ६४ वर्षे राज्यकारभार पाहिला. इतका प्रदीर्घ काळ राज्यकारभार करणारे खूपच कमी राजे असतील. सयाजीरावांनी 'बडोद्याला' एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. राज्याचा सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक, शैक्षणिक अशा सर्व बाजूंनी विकास करणारा हा राजा.



कोणत्याही प्रदेशाची प्रगती ही शिक्षणाशिवाय अशक्य आहे, हे महाराजांना माहिती होतं म्हणूनच त्यांनी निरक्षर समाजाला सुशिक्षित करण्याचा ध्यास घेतला.

''शिक्षण म्हणजे नुसती राज्यात शाळा मास्तरांची गर्दी करून सोडणे नव्हे; तर प्रजेतील उत्तम गुणांचा विकास करवून त्यांची शारीरिक, मानसिक व आत्मिक उन्नती घडवून आणणे होय.''

वरील शिक्षणाची व्याख्या ही खुद्द सयाजीराव महाराजांची शिक्षणाची व्यापकता महाराजांनी जवळपास १५० वर्षांपूर्वी मांडली. जी व्यापकता आजच्या २१व्या युगातही सामान्य लोकांना ज्ञात नाही.

महाराजांच्यापूर्वी पूर्ण संस्थानामध्ये देशी व प्रांतीय शाळा शंभरपेक्षा कमी होत्या; पण महाराजांच्या काळात त्या ३००० पेक्षा जास्त झाल्या. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले. तसेच कला महाविद्यालय व तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शाळा, शिक्षक-शिक्षिका यांच्यासाठी ट्रेनिंग स्कूल, संगीत व संस्कृत पाठशाळा या महाराजांच्या कारकिर्दीत झाल्या. एवढेच नव्हे, तर महाराजांनी १९०१ मध्ये तुरुंगातील कैद्यांच्या शिक्षणासाठी तुरुंगात शाळा चालवली व कैद्यांना शेती, बगीच्या, विणकाम, सुतारकाम असे व्यावहारिक शिक्षण दिले. जेणेकरून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

सयाजीराव महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर ६ वर्षांनी म्हणजे १८८१ साली त्यांनी राज्यकारभार हाती घेतला. त्यानंतर सर्वप्रथम ते राज्यभर फिरून राज्याच्या परिस्थितीचा आढावा घेत होते. त्यावेळेला त्यांना एक गोष्ट जाणवली मागास जाती-जमातींची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. त्यांना प्रवाहात आणण्यासाठी केवळ शिक्षण हा एकमेव पर्याय आहे. तेव्हा त्यांनी लगेचच म्हणजे १८८२ ला एक क्रांतिकारी हुकूम काढला. 'बडोद्यातील अस्पृश्य, वंचित, शिक्षण, वसतिगृह, शैक्षणिक साहित्य आणि जेवण याची व्यवस्था केली जाईल. महाराजांनी अस्पृश्य समाजानेही शिकून साक्षर व्हावे, यासाठी खूप प्रयत्न केले. त्याचेच एक उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब एवढं शिकू शकले. बाबासाहेब एके ठिकाणी म्हणतात, ''सयाजीराव गायकवाड महाराजांनी मला उच्च शिक्षण दिल्यामुळे मी उच्च दर्जा प्राप्त करू शकलो.''

१८८३ पासून १९३८ पर्यंत अस्पृश्यांच्या शाळेची संख्या ही ३३५ एवढी होती व त्या शाळांमध्ये ८२,००० विद्यार्थी शिकले होते. समाजात स्त्री वर्गावर अनेक वर्षे अन्याय-अत्याचार होत आलेला आहे. अज्ञान, रुढी-परंपरा, समाजव्यवस्था यामुळे स्त्रीवर्ग पिचलेला होता. या सगळ्यातून स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. तसेच महाराजांनी बडोदा संस्थानातही काम केले.

महाराजांनी आपल्या शैक्षणिक धोरणातील चौथे कलम हे स्वतंत्र स्त्रियांच्या शिक्षणासाठी केले. मुलांप्रमाणेच मुलींनाही शिक्षण मोफत व सक्तीचे केले. ते सुद्धा मुलींनी घराच्याबाहेर पडायचे नाही, अशी सामाजिक परिस्थिती असताना! १९१७ मध्ये 'महाराणी गर्ल्स हायस्कूल' हे मुलींसाठी सुरू झालेले पहिले हायस्कूल. त्यानंतर बडोद्यामध्ये मुलींसाठी अनेक शाळा सुरू करण्यात आल्या. १९४१ पर्यंत २४७७६ एवढ्या विद्यार्थिनी या शाळेत शिकलेल्या होत्या. महाराजांनी काढलेल्या बडोदा कॉलेजमध्ये ४८ विद्यार्थिनी पदवीचे व ३३ विद्यार्थिनी पदव्युत्तर शिक्षण घेत होत्या. १८८२ मध्येच महाराजांना फिमेल ट्रेनिंग कॉलेजची स्थापना केली. त्याचबरोबर सेंट्रल लायब्ररी सुरू केली. त्यामध्ये महिलांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केला. एकूणच

स्त्रीशिक्षणासाठी महाराजांनी अतोनात प्रयत्न केले. त्याचे फळ असे की, भारतात सर्वात जास्त स्त्रीशिक्षणाची टक्केवारी ६१.२% इतकी बडोद्यामध्ये होती. या सगळ्यांमुळेच महाराजांना युगद्रष्टा असे म्हटले जाते. म्हणूनच महर्षी विठ्ठलराव शिंदे म्हणतात, ''मागासवर्गीय व गरीब मुलांच्या शिक्षणाची माझी प्रेरणा सयाजीराव महाराज आहेत.''

सयाजीराव महाराजासारखा राजा होता म्हणून विठ्ठलराव शिंदे, बाबासाहेब आंबेडकर, भाऊराव पाटील ही थोर माणसे घडली ते सुद्धा २० व्या शतकात; पण या उलट आजच्या २१ व्या शतकात शिक्षणाची परिस्थिती मात्र वेगळी आहे. महाराजांनी मुलांना शिक्षण उपलब्ध करून दिले. वंचितांना शिक्षण प्रवाहात घेऊन येण्याचा प्रयत्न केला. सध्या विद्यार्थिनींना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण मागील काही वर्षांत अनेक शाळेला टाळे लागले आहे. भरपूर शाळा विनाअनुदानित आहेत. सध्या महाराजांनी कैद्यांना शिक्षण देऊन रोजगार दिला; परंतु सध्या शिकूनसुद्धा बेरोजगारी आहे. सरकारी शाळांपेक्षा प्रायव्हेट शाळांना महत्त्व आले असून, महाराजांच्या व्यापक शैक्षणिक दृष्टिकोनाचा चकनाचूर झालेला दिसून येतो. सयाजीरावांनी जगातील दुसरे फिरते वाचनालय सुरू केले. जेणेकरून लोकांपर्यंत शिक्षण पोहाचावे, लोक साक्षर व्हावे. सध्याच्या घडीला सगळंच उलट आहे.

जर आपल्याला एक चांगला समाज घडवायचा असेल, तर महाराजांची शैक्षणिक व्यापकता लक्षात घेतली पाहिजे, त्यानुसार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजेच आपण खऱ्या अर्थाने महाराजांचे देणे फेडू शकू.

●

---

# पोरगी पळाली...

**प्रतीक प्रमोद पाटील**
एम. ए. भाग-१

क पोरगी खेड्यामधली
शहरामध्ये पळून गेली
कोणासोबत? कशासाठी?
गावभर चर्चा झाली.

कुणी म्हणालं, 'पोरासोबत पिरमासाठी'
कुणी म्हणलं 'थोड्याशा पैक्यासाठी'
पळाली असंल क्षणिक-सुख मिळवायसाठी!

पोरगी बिघडली
हातातून सुटली
ती पळाली!
आई-बाची प्रत्येकाने
चुकी काढली.

आई रडली, बा भडकला
'चूक झायली माझी म्हणून'
तो ओरडला!
पोरीला शोधाया, शहरी निघाला.

चौकशी झाली
पोरगी सापडली
'स्वइच्छेने पळून गेले'
ती म्हणाली!

गाव-चावडी खबर मिळाली,
'तमुकाची पोर पळाली
कौटुंबाची दैना झाली'

बाप रडला, चिडला अन् आरडला,
'सांगत होतो मी तुला, नको शिकवू
पोरीला
पोरगी शिकली, पळून गेली
समज आता ती मरून गेली'

इकडे पोरगी भटकत होती
कामुक नजरा झटकत होती.
राहायचं कुठं? खायचं काय?
माझं पुढं व्हायचं काय?
प्रश्नांची तिला कटकट होती.

घरी राहिली असती तर
छान झालं असतं
'अच्छे घर की बेटी'
म्हणून जगता आलं असतं

काहीच दिवसात पुढे तिचं
लग्न झालं असतं,
चूल-मूल करता करता
आयुष्य गेलं असतं
पण 'अच्छे घर की बहू' म्हणून
मिरवता आलं असतं.

हेच तर तिला नको होतं!
मग नेमकं काय हवं होतं?

तिला हवं होतं 'वाघिणीचं दूध'
ते पिऊन तिला गुरगुरायचं होतं!

ती आजही संघर्ष करते
पोटाची खळगी भरण्यासाठी
आणि
रात्रभर वेल्डिंग करून
भगभगणाऱ्या, लालबुंद डोळ्यांनी
पाहिलेल्या स्वप्नासाठी!
'वाघिणीच्या दुधासाठी'

# शाश्वत पर्यावरण : काळाची गरज



**वैष्णवी राजेंद्र नांदवडेकर**
बी.ए. २

१९६०-१९७० च्या दरम्यान जगात सगळीकडे प्रगती, उन्नती, विकास, वृद्धी, उत्क्रांती यांना मिळवण्याचे स्वप्न होते. जे राष्ट्र अधिक प्रगतीशील ते राष्ट्र अधिक बलवान अशी समजूत होती. या विकासाचे ध्येय गाठत असतानाच संयुक्त राष्ट्राने शाश्वत विकास या संकल्पनेची ओळख सर्व राष्ट्रांना करून दिली. सर्वांच्याच लक्षात आले की, आपण विकासाची पायरी चढत असताना आपण निसर्गाचा व निसर्गाच्या साधनसंपत्तीचा विनाश करत आहोत. त्यामुळे ब्रॅडलँड रिपोर्टनुसार शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करणारा विकास या शाश्वत विकासाचे तीन पैलू आहेत. पर्यावरण, अर्थव्यवस्था व समाज, कोणत्याही प्रकारचा विकास होत असताना या त्रिमितीतून होत असतो व हे तीनही पैलू समान महत्त्व धारण करतात.

मनुष्य व पर्यावरण यांचे पुरातन व चिरंतन असे नाते आहे. दोन्ही एकमेकांवर अवलंबून असून त्यांचे महत्त्व अनमोल आहे. आपण राहातो ती भौतिक स्थिती म्हणजे पर्यावरण. मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास केला तर आपल्याला हे पटते की मानवाने आपल्या गरजेनुसार आपले पर्यावरण निर्माण केले व त्या पर्यावरणाचा मानवी अस्तित्वासाठी पुरेपूर फायदा घेतला. पूर्वीच्या काळी मानव पर्यावरणाला देव मानत असे. आज प्रत्येकासाठी देवाची व्याख्या वेगळी आहे. पण त्याकाळी देव म्हणजे रक्षक (रक्षण करणारा) अशी समज होती. तेव्हा मानवांची अशी धारणा होती की, पर्यावरण (देव) हे मानव अस्तित्वाचे एकमेव कारण आहे व त्यामुळे आपण पर्यावरण (देव)ला सुरक्षित व आनंदी ठेवले पाहिजे. त्याकारणास्तव मानवाने पर्यावरणाला पूजनीय मानले. नदी व धरतीला माता, लक्ष्मी असे संबोधले जाई, वृक्षांची पूजा केली जाई. प्राण्यांना देवांचे वाहन अथवा सहाय्यक असे समजले जाई. काही धार्मिक कथा-कादंबऱ्यांमध्ये आपल्याला आढळून येते की सूर्य, वायु, वर्षा या नैसर्गिक घटक व प्रक्रियांना सूर्यदेव, वरूणदेव इ. असे संबोधून त्यांची पूजा केली जाई. पुरातनकाळी मानव निसर्गाला देवाचा अर्थात सर्वोच्च दर्जा देत असे. याचा पुरावा म्हणजे जुन्या प्रथा किंवा सण. जेव्हा वर्षाऋतु सुरू होतो तेव्हा नदीचे पात्र भरते व त्यामुळे वर्षभर सभोवतालची मानववस्ती सुजलाम्, सुफलाम् होते. याचे महत्त्व जाणून तेव्हाच्या स्त्रिया नदीला लक्ष्मी समजून तिची खण-नारळाने ओटी भरून पूजा करत असे. वर्षभर आपल्या शेतामध्ये चांगले उत्पन्न येऊ दे म्हणून राबणाऱ्या बैलांसाठी बैलपोळा किंवा बेंदूर हा सण साजरा केला जात होता. वडाचे वृक्ष सदृढ व सबल असते. हवा शुद्धीकरण, प्राण्यांना-पक्ष्यांना आश्रय असे वडाचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे या वृक्षाची वटपौर्णिमा या सणाद्वारे पूजन केले जाते. अजून एक जुनी प्रथा-देवराई मुख्यतः आदिवासी लोक वृक्षांची एका विशिष्ट ठिकाणी लागवड करून त्या जागेला पवित्र मानून तिचे सरंक्षण करीत असे. पण आज आपण या भावनेने पर्यावरणाकडे पाहातो का? पर्यावरणाची इतकी काळजी घेतो का? यासारखे अनेक प्रश्न बेचैन करतात. या प्रश्नांचं शाब्दिक उत्तर मिळवण्याची काहीच गरज नाही. आपल्या घराबाहेर जाऊन चौफेर नजर जरी फिरवली तरी आपल्याला याचं उत्तर मिळून जातं.



सद्यस्थिती अभ्यासल्यास हे निरीक्षणास येते की, आपण विकासाच्या नावाखाली पर्यावरणरूपी अनमोल देणगीचा ऱ्हास करत चाललो आहोत. मनुष्यांच्या गरजा वाढत चालल्या आहेत व या गरजांसोबतच इतर उपभोग घेण्याचा हव्यासही वाढत चालला आहे व यामुळे पर्यावरणाचे शोषण होत आहेत आणि यातूनच शाश्वत पर्यावरण ही संकल्पना उदयास आली. शाश्वत पर्यावरण म्हणजे मानवी गरजांसाठी तडजोड न करता भावी पिढ्यांसाठी नैसर्गिक साधनसंपत्ती टिकवून ठेवणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन, जैवविविधतेचे रक्षण, नूतनीकरणीय ऊर्जा (सौर ऊर्जा, वायु ऊर्जा इ.) कचरा व्यवस्थापन, मानवी आरोग्य ही मुख्य तत्त्वे यामध्ये समाविष्ट आहेत. जर आपले पर्यावरण निरोगी असेल तर आपणही मनो-शारीरिक स्वास्थ राखू शकतो. पर्यावरण संवर्धनाचे यापूर्वीदेखील नक्कीच प्रयत्न झाले. पण त्यामध्ये मानवी गरजा व भावी पिढ्यांसाठी पर्यावरणीय साठा या दोन्ही गोष्टींची तडजोड व्हावी लागली. परंतु शाश्वत पर्यावरण या संकल्पनेनुसार दोन्हींना समान महत्त्व दिले गेले आहे. अनेक तत्त्वज्ञानाचा अभ्यास या सृष्टीवर सगळे कर्मसिद्धांतावर आधारित असते असेच पाहावयास मिळते. जर आपण पर्यावरणाची काळजी घेतली तरच पर्यावरण आपल्याला सुखदायी व निरोगी आयुष्य देईल. पण याउलट जर आपण पर्यावरणाला हानी पोहोचवली तर आजच्या तारखेला आपण

सर्वच जण नैसर्गिक आपत्ती जसे की, महामारी, दुष्काळ, भूकंप, अतिवृष्टी या आणि यासारख्या अनेक समस्यांचे साक्षीदार आहोत व हे असेच सुरू राहिले तर यापुढेही आपल्याला व्हावे लागेल.

पर्यावरणनाशेन नश्यान्ति सर्वजन्तवः।

पवनःदुष्टतां याति प्रकृतिविकृतायते।।

त्यामुळे आज मानवाने एकत्रित येऊन या सुंदर देणगीचे जतन व संवर्धन करण्याचे प्रयत्न केले पाहिजे. शाश्वत पर्यावरण निर्मितीसाठी भारत सरकारने अनेक योजना व नियम लागू केले आहेत. पण ही फक्त सरकारची जबाबदारी नसून विद्यालयातील लहान मुलांपासून घरातील ज्येष्ठ सदस्यांपर्यंत सगळ्यांची आहे. आपण आपल्या घरापासून सुरुवात करू शकतो. आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आपण पर्यावरणाला किंवा पर्यावरणातील साधनसंपत्तीला इजा पोहोचवत असतो. जसे की, कचऱ्याचे कुव्यवस्थापन, प्लास्टिकचा अतिवापर अनावश्यक जल व विद्युत वापर (उदा. गरज नसताना खोलीतील ट्यूब/बल्ब सुरू ठेवणे, मोबाईल चार्जिंग झाल्यानंतर बटण सुरूच ठेवणे, पाण्याचा नळ गरज नसताना सुरू ठेवणे. इ.) या अगदी लहान सवयी बदलून आपण शाश्वत पर्यावरणामध्ये खारीचा वाटा देऊ शकतो. आपल्या गाव/शहरामध्ये वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम किंवा याविषयावर विविध व्याख्यान यांचे आयोजन करू शकतो. आपण जर आपल्या कृतीमध्ये बदल आणला तर आपल्याला बघून बदल घडवणारे आपल्या आजूबाजूच्या परिसरातील अनेक जण असतात. त्यामुळे सुरुवात स्वकडूनच करावी. हे सर्व वगळता अजून एक मार्ग म्हणजे आपण आपल्या घरातील किंवा परिचयातील लहान मुलांना पर्यावरण म्हणजे काय, पर्यावरण संवर्धन का गरजेचे आहे व ते कसे करावे याची माहिती दिली पाहिजे व पर्यावरण संवर्धन ही त्यांचीसुद्धा जबाबदारी आहे. त्याची जाणीव करून दिली पाहिजे. यामुळे त्यांच्यावर लहानवयातच योग्य संस्कार घडतील व आपण ज्या भावी पिढीसाठी ही साधनसंपत्ती जपून ठेवत आहोत, त्यांनाही त्याचे तितकेच महत्त्व कळेल. आज विद्यालय किंवा महाविद्यालयामध्ये पर्यावरण हा विषय जरूर सक्तीचा केला आहे; पण तो फक्त गुण व पेपर यापुरताच मर्यादित ठेवला जातो. या विषयासाठी विद्यार्थ्यांकडून विविध संवर्धनपूरक उपक्रम करून घ्यायला हवेत. उदाहरणार्थ : एखाद्या जलसाठ्याभोवती स्वच्छता मोहीम, वृक्षलागवड किंवा वैयक्तिक पातळीवर प्रदूषण कमी करण्याचे प्रयत्न इ.

ज्ञानाला कृतीची जोड असणे महत्त्वाचे असते. लवचिक व गतिशील धोरणे, उचित तंत्रज्ञानाचा उचित समयी वापर हे राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न तर झालेच पाहिजे; परंतु आपल्या वैयक्तिक स्तरावरसुद्धा पुनर्वापर, सामायिकरण, दुरुस्ती, नूतनीकरण व पुनर्निर्मिती यांचे पालन झाले पाहिजे. वैयक्तिक व सामुदायिक प्रयत्नांतूनच आपले शाश्वत पर्यावरणाचे ध्येय पूर्ण होऊ शकते.

प्रकृति उत विकृति चयनं कुरु।

त्यामुळे उठा, जागे व्हा आणि आपले ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका.

●



# छत्रपती शाहू महाराज : द्रष्टा राजा



**वैष्णवी राजेंद्र नांदवडेकर**
बी.ए. २

'नभी चंद्र, सूर्य, तारे...
सारे मिळूनी जयघोष करती।
त्रिखंडात गाजत राही...
अशी माझ्या शाहू महाराजांची कीर्ती'

प्रत्येक कोल्हापूरवासियांच्या मनामनांमध्ये वसणाऱ्या लोकराजा शाहू महाराज यांना मानाचा मुजरा.

शाहूंची शाहूनगरी व वास्तवचे कोल्हापूर यामध्ये किती तरी पटीने फरक जाणवतो. शाहूनगरी ही तुलनेने अधिक समृद्ध व सजग होती. याचे कारण म्हणजे कोल्हापूरच्या राजगादीवर चाणाक्षांची दूरदृष्टी असणारा छत्रपती विराजमान होता. ही दूरदृष्टी फक्त राजकारणातच नव्हे तर सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रांमध्येसुद्धा तितकीच अचूक व तीक्ष्ण होती.



त्या काळातील हिंदू समाजाला जातीशृंखलांनी पूर्णपणे जखडून टाकून माणसाचे माणूसपण हिरावून घेतले होते. यावेळी राजर्षि शाहूंनी अस्पृश्यतेचा समूह नायनाट करण्यासाठी अस्पृश्यतेवर चौफेर हल्ला चढविला. त्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. सवर्णाच्यापासून वेगळ्या असणाऱ्या अस्पृश्यांच्या शाळा बंद करून सर्वांना एकत्र शिक्षण देण्यास सुरुवात केली. फासेपारधीसारख्या भटक्या व गुन्हेगार म्हणून बदनाम झालेल्या जमातीला महाराजांनी समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी फासेपारध्यांच्या नेमणुका स्वतःच्या खाजगी पहाऱ्यावर, प्रत्यक्ष राजवाड्यात केल्या. महाराजांनी जाणले की अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यास विद्याप्रसाराशिवाय दुसरे बलवान साधन नाही व म्हणून २४ नोव्हेंबर १९११ रोजी सर्वात महत्त्वाचा आदेश काढण्यात आला. त्या आदेशान्वये संस्थानातील अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. मागासवर्गातील लोकांसाठी नोकरीमध्ये ५०% जागा राखून ठेवणारा हा हिंदुस्थानमधील ७०० संस्थानिकांमधील पहिला संस्थानिक होता. याचसाठी आज त्यांना आपण आरक्षाचे जनक असे संबोधतो. हे जरी खरे असले तरी एक गमतीशीर पण तितकेच गंभीर सत्य म्हणजे एकेकाळी महाराज अस्पृश्यांची शिवाशिव जरी झाली नसती तरी ते शिवाशिव झाली असे समजून स्नान करीत होते. इतके कर्मठ संस्कार झालेल्या शाहू महाराजांनी पुढे अस्पृश्यता व जातिभेद या दोन अनिष्ट सामाजिक रुढीविरोधी मोठा संघर्ष केला. हे स्थित्यंतर एक-दोन वर्षात घडून आलेले नव्हते. त्यासाठी पंचगंगेच्या पात्रातून अनेक महापुरांचे पाणी वाहून जावे लागले. विशेषतः हे स्थित्यंतर त्या प्रसंगामुळे झाले ज्यामुळे महाराजांच्या वैयक्तिक व राजकीय जीवनाला कलाटणी मिळाली तो प्रसंग म्हणजे वेदोक्त संघर्ष या प्रकरणानंतरच महाराजांना ब्राह्मणेतर वर्गाच्या लोकांना सर्व बाजूने झालेले शोषण जाणवले व त्यानंतरच त्यांच्यासाठी अनेक कल्याणकारी धोरणे राबवली गेली.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, तीच जग उद्धारी' हे शाहूंनी त्याकाळी जाणले होते व या स्त्रीरूपी अनमोल रत्नांच्या सर्वांगीण विकासासाठी काही फायदे आपल्या संस्थानात लागू केले. या कार्याची सुरुवात त्यांनी आपल्या स्वतःच्या घरापासून केली. त्यांच्या सुनबाई इंदुमती या वयाच्या ११ व्या वर्षी विधवा झाल्या, तरी राजांनी त्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. मुलींनी उच्च शिक्षण घेऊन उज्वल भविष्य घडवावे म्हणून मुलींचे उच्च शिक्षण माफ व्हावे यासाठी अनेक मागण्या होत आहेत. परंतु आजचे सरकार माझ्या राजाइतकं थोर कुठं?

१९१७ साली विधवा पुनर्विवाह कायदा, १९१९ साली स्त्री अत्याचारविरोधी कायदा, १९२० साली देवदासी प्रतिबंध कायदा, याचबरोबर शिक्षणासाठी मुलींची राहाण्याची व खाण्याची राजवाड्यामार्फत मोफत सोय, मुलींसाठी वसतिगृहांची स्थापना अशा अथक कार्यातून महाराजांनी स्त्रीसशक्तीकरणामध्ये बहुमूल्य योगदान दिले.

आपले लक्ष्य फक्त जातीसंस्था मोडून काढण्यात तथा समाजकल्याण इथपर्यंतच केंद्रित केले नसून, त्यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्येही केंद्रित केले नसून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्येही योगदान दिले. हिंदुस्थानात होमिओपॅथिक उपचार पद्धती आणण्याचे श्रेय जसे, पंजाबचा राजा रणजितसिंहाकडे जाते. तसे हिंदुस्थानात होमिओपॅथिकचा पहिला सार्वजनिक दवाखाना स्थापन करण्याचे श्रेय महाराष्ट्रातील एका राजाला, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना जाते. १८९८ साली महाराजांनी डॉ. बोरकरांचे सहाय्य घेऊन कोल्हापुरात होमिओपॅथीचा दवाखाना सुरू केला. हा करवीर राज्यातीलच नव्हे, तर देशातील पहिला होमिओपॅथिक सार्वजनिक दवाखाना होता. यावरून महाराजांची पाश्चात्त्यदृष्टी यावर प्रकाश पडतो.

महाराजांचे आर्थिक कार्य अभ्यासले तर आपल्या निरीक्षणास येते की, समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारे त्यांचे आर्थिक विकासाचे धोरण होते. त्यांनी वस्त्रउद्योग, साखर आणि अभियांत्रिकी यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष्य केंद्रित केले. यामुळे गुंतवणूक आणि उद्योजकता आकर्षित झाली. त्याचबरोबर पूल, रस्ते आणि सार्वजनिक इमारती बांधून शहराच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण केले आणि यामुळे शहराचे व्यापार व वाणिज्य सुलभ होण्यास सहाय्य झाले. शेतीला केंद्रस्थानी मानून त्यांनी नवी अर्थरचना तयार केली. शेती उत्पादन वाढवणे, शेतीसंबंधी आधुनिक साधनांचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी कृषी प्रदर्शन भरवण्यास सुरुवात केली व कोल्हापूरला आर्थिक बाजून सदृढ केले. माझ्या महाराजांचे कार्य कोल्हापूर संस्थानामध्ये झाले. पण त्याचा परिणाम मात्र संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचला. या सगळ्या त्यांच्या कार्यातून एका द्रष्टा राजाचे व्यक्तिमत्त्व नक्कीच प्रकाशझोतामध्ये येते.

मित्रहो, आज आपल्याला हा असा सर्वगुणसंपन्न द्रष्टा राजा लाभला व आपल्याला आज या राजाच्या नगरीमध्ये राहाण्याचे भाग्य लाभले, यासाठी कृतज्ञ असले पाहिजे. पण जर आपण शाहूंचा एखादा आचार किंवा विचार आपल्या जीवनामध्ये अंगीकारला व या पुण्यनगरी कोल्हापूरचे नाव व त्या लोकराजा शाहू महाराज यांचे नाव चिरंतर उज्वल राहील यासाठी प्रयत्न केले तर नक्कीच त्यांच्यापर्यंत आपली खरी कृतज्ञता पोहचेल.

धन्यवाद!

●

---

# जगता आलं पाहिजे...

**सानिया मोहन कांबळे**
बी.ए. भाग १

मरता केव्हाही येतं
पण जगात आलं पाहिजे
सुख भोगता केव्हाही येतं
पण दुःख पचवता आलं पाहिजे...!

रंग सावळा म्हणून काय झालं
कर्तृत्वाने उजळता आलं पाहिजे
रंग गोरा असला म्हणून काय झालं
मनावरील काजळी काढता आली पाहिजे...!

यशानं माणूस उंच जातो
पाय जमिनीवर ठेवता आलं पाहिजे
मिळालेल्या यशात समाधान मानून
आनंदी जीवन जगता आलं पाहिजे...!

पाप काय कसंही करता येतं
पण पुण्य करता आलं पाहिजे
ताठ काय कोठेही राहता येतं
पण जरा झुकून वागता आलं पाहिजे...!

शहाण्याचं सोंग घेऊन
वेडं होता आलं पाहिजे
कशाला बळी न पडता
आनंदी जगता आलं पाहिजे...!

# तू....

**वैष्णवी चव्हाण**
बी.ए.बी.एड. १

तू शब्द तू मी अर्थ रे
तू नाहीस तू मी व्यर्थ रे .....

तू दूर तू मी आस वेडी रे
तू वाक्य तू मी शब्द बेडी रे .....

तू श्वास तू मी गंध रे
तू काव्य तू मी बंध रे .....

तू ताल तू मी लय रे
तू हास्य तू मी भय रे .....

तू रंग तू मी संग रे
तू सांजवात तू मी अभंग रे .....

तू पास तू मी आस रे
तू ध्यास तू मी भास रे.....

एकांकिका

# नारी शक्ती जागी हो !



**प्रतीक्षा तानाजी पाटील**
बी.ए.बी.एड. ४

नारी शक्ती जागी हो,
स्वरक्षणासाठी काली हो.
नारीशक्ती जागी हो,
स्वरक्षणासाठी दुर्गा हो.

रोजच्यासारखीच एक चिमुकली शाळेत जाण्याच्या गडबडीत असते. सगळं काही आवरून आईचं कधी आवरतं याची वाट बघत असते.

**मुलगी :** आई, चल ना लवकर, मला वेळ होत आहे शाळेला जायला.

**आई :** चल. हे घे डबा चल आता, चाल भरभर. (आई व मुलगी चालत जात आहेत.)

**आई :** बाळा, शाळा सुटल्यावर मी तुला घ्यायला येते. अनोळखी व्यक्ती सोबत बोलू नको, कोणी काही खायला दिलं तर काही घेऊ नकोस, समजलं ना ?

**मुलगी :** हो ग आई समजलं.

(आई मुलीला शाळेत सोडून घरी जाते.)

(आईची वाट बघत शाळा सुटल्यानंतर शाळेच्या गेटवर मुलगी उभी असते. तेवढ्यात त्यांच्या शेजारचे काका तेथून जात असतात.)



**काका :** अगं बाळ, तू अजून इथेच का थांबली आहेस? आई आली नाही का घ्यायला ? तुझी शाळा तर अर्ध्या तासापूर्वीच सुटली ना ?

**मुलगी :** नाही आली अजून, येईल आता थोड्या वेळात. ती येते म्हणून सांगून गेली आहे. सकाळी येईल आता.

**काका :** किती वेळ थांबणार इथे. चल मी पण घरीच चाललो आहे. चल माझ्यासोबत.

(मुलगी मनामध्ये .... आई म्हणाली होती, अनोळखी व्यक्ती सोबत नको... बोलू... पण काकांना तर मी ओळखते. अजून किती वेळ थांबू इथे. गप जाते काकांसोबत....)

**मुलगी :** चला काका, मी पण किती वेळ झाला आईची वाट बघत आहे.

(मुलगी त्या काका सोबत नाचत उड्या मारत घरी जायला निघते. दोघेही चालत निघालेले असतात. काका त्या मुलीला चॉकलेट देतो. ती ते घेते.)

(थोड्यावेळाने त्या मुलीच्या चुकीच्या ठिकाणी टच स्पर्श करतो. त्या मुलीला अनकम्फर्टेबल वाटतं. ती रडायला लागते. तितक्यात तिथे तिची आई येते. ती मुलगी रडत असते.)

**काका :** (चेहऱ्यावरचे भाव बदलत.) काय झालं बाळ? पायाला लागलं वाटतं तिच्या. वहिनी आला तुम्ही? ती एकटीच थांबली होती म्हणून घरीच घेऊन येत होतो. (काका गडबडीने तिथून निघून जातात.)

**आई :** अगं, काय झालं रडायला? लागलं आहे का कुठे? पडली आहेस का? सांग तरी काय होत आहे तुला?

(मुलगी रडत रडत आईसोबत घरी येते. मुलगी रडत एका कोपऱ्यामध्ये बसते.)

**आई :** बाळा... शांत हो गं. किती रडत आहेस? शांत होऊन सांग तरी काय झालं आहे? सांग ना बाळा... आई आहे ना तुझ्याजवळ आता... ?

**मुलगी :** (रडत रडत) आई, मला आपल्या शेजारच्या काकांनी (प्रायव्हेट पार्टकडे बोट दाखवत) इथे स्पर्श केलं. मला नाही चांगलं वाटलं. मला भीती वाटत आहे.

**आई :** (स्तब्ध होऊन बसते आणि डोळ्यातून पाणी येते.)

**सूत्रसंचालक :** हे सर्व तुम्ही पाहिलंच. बाहेर आपण सुरक्षित नाहीये. पण घरी तरी आपण सुरक्षित आहोत का? हा प्रश्नच आहे. चला तर पाहूया.... पुढे आणखी एक प्रसंग.

घरामध्ये आई कामावर जायच्या गडबडीत असते. बाबा आवरून कामावर चाललेले असतात. मुलगी म्हणजे चिनू हॉलमध्ये खेळत आहे.

**आई :** अहो, आज चिनूला सुट्टी आहे. ती घरी आहे. एकटीच कशी थांबणार?

**बाबा :** मग मी काय करू..... तू रजा घे आणि घरी थांब. मला वेळ होत आहे. सकाळी सकाळी बडबड चालू करू नको तुझी. तुझं तू कर ना ॲडजस्ट.

**आई :** माझी पण आज मिटींग आहे आणि दरवेळी मीच काय ॲडजेस्ट करू. तुम्ही घ्या रजा. मला नाही जमणार आज सुट्टी घ्यायला.

**बाबा :** बरं बाई.... नको भांडू. थांब, मला काल सुहासचा फोन आला होता. तो येणार आहे आज कामानिमित्त. तो थांबेल तिच्यासोबत दिवसभर. आठ तासांचाच तर प्रश्न आहे.

**आई :** बरं, किती वाजेपर्यंत येतील ते? मला वेळ होत आहे मिटींगला जायला.

**बाबा :** येईल तो आता. हे बघ .... त्याच्याच गाडीचा आवाज आहे हा. आला बघ तो. सुहास अगदी वेळेवर आलास.

**सुहास :** का रे? काय झालं?

**आई :** भाऊजी, आज माझी मिटींग आहे आणि ह्यांना पण कामावर जायचं आहे. आणि त्यात भर म्हणून चिनूला आज सुट्टी आहे. प्लीज, तुम्ही आज दिवसभर थांबाल तिच्यासोबत. ती त्रास नाही देणार तुम्हाला.

**बाबा :** हो. अरे ती खेळत बसते. तू फक्त निवांत घरी बस आणि तिच्याकडे लक्ष दे.

**सुहास :** हो तुम्ही दोघेपण निवांत जा. मी आहे तिच्याजवळ. लक्ष देतो तिच्याकडे.

**आई :** चिनू बाळ... सुहास काका आहे तुझ्यासोबत दिवसभर. त्रास नको देऊ त्यांना. जाते मी कामावरती.

**चिनू :** आई, तू जा कामावर. मी नाही त्रास देणार त्यांना.

(आई-बाबा कामावर जातात आणि सुहास फ्रेश होऊन बाहेर येतो. चिनू परत तिथेच खेळत बसलेली असते.)

**सुहास :** चिनू बाळा, चल ये. टी.व्ही. बघू आपण.

(चिनू येऊन सुहासजवळ बसते. टीव्हीवर चालू असलेल्या पिक्चरच्या सीनमुळे सुहास उत्तेजित होतो. सुहास चिनूच्याजवळ येतो. तिच्या मांडीवर हात ठेवतो व तिला जवळ ओढतो.)

**सूत्रसंचालक :** थांबा..... बघितलं एखाद्यावर विश्वास ठेवणं किती महागात पडतं ते! (चिनूचे आई-बाबा ऑफिसवरून घरी परत येतात. सुहास आधीच घरातून गेला होता.) पाहूया पुढे काय घडतं...

**चिनू :** (रडत आईजवळ येते.) आई, मला इथे मुंग्या चावत आहेत.

**आई :** अहो ..... चिनूला खूप ताप आला आहे... (आई-बाबा चिनूला घेऊन डॉक्टरकडे जातात.)

**आई :** डॉक्टर, चिनूला खूप ताप आला आहे.. आणि ती मगापासून तिच्या प्रायव्हेट पार्टकडे बोट दाखवून तिथे मुंग्या चावत आहेत असं म्हणत आहे.

**डॉक्टर :** मी चेक करते तिला आणि बघू.... काय होत आहे नेमकं तिला.

(थोड्या वेळाने डॉक्टर बाहेर येतात. स्तब्धपणे उभे असतात.)

**आई :** काय झालं आहे तिला डॉक्टर?

**डॉक्टर :** तुम्ही शांतपणे ऐकून घ्या. तुमच्या मुलीवर कोणीतरी अतिप्रसंग केला आहे. म्हणजे ..... मला म्हणायचं आहे की..... तिच्यावर बलात्कार झाला आहे.

**सूत्रसंचालक :** बघताय ना..... विश्वास हा शब्द म्हणायला खूप सोपा आहे. पण निभवायला अवघड आहे.. या घटनेनंतर चिनूच्या आई-बाबांनी काय करावे असे तुम्हाला वाटते? समाजाला घाबरून शांत रहावे की, असा प्रसंग दुसऱ्या मुलीसोबत घडू नये म्हणून त्यांनी गुन्हेगाराला शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करावे. शांतता...

**सूत्रसंचालक :** चला तर मग बघू..... चीनूचे आई-वडील पुढे कोणते पाऊल उचलतात... कोर्ट...

**वकील :** माननीय जज... सुहास यांच्यावर नोंदवलेल्या गुन्ह्यानुसार व तपासातून मिळालेल्या सर्व पुराव्यांवरून असे लक्षात येते की, सुहास यांनी ह्या लहान मुलीवर अतिप्रसंग केला आहे. तरी सर्व पुरावे व साक्षीदार यांचा कोर्टाने विचार करावा व कठोरातील कठोर शिक्षा आरोपीला द्यावी.

**जज :** सादर केलेल्या सर्व पुराव्यानुसार व साक्षीदारांवरून असे लक्षात येते की, आरोपी सुहास यांनी बलात्कारासारखे अमानुष कृत्य केले आहे. तरी आरोपी सुहास यांना कठोर शिक्षा ठोठवण्याच्या आदेश कोर्ट देत आहे. कोर्ट इज ओवर...

**सूत्रसंचालक :** तुम्हाला काय वाटतं, अशा नराधमांना कोणती शिक्षा व्हावी? शांतता...

मुला-मुलींमध्ये हार्मोन्स चेंज, सेक्सुअल एज्युकेशन, गुड टच - बॅड टच, बलात्कार या सगळ्यांबद्दल जाणीवजागृती करणे गरजेचे आहे.... म्हणून आम्ही हे एक छोटंसं सादरीकरण करून तुमच्यात जागृती करण्याचा प्रयत्न करत आहोत.

धन्यवाद!

बिटिया ने कहा पढने जा रही हूँ, मैंने सुना सारी दुनिया से अकेले लढने जा रही हूँ धन्यवाद!

•

# एक दिवस

**प्रतिराज**
बी.व्होक ग्रीकल्चर

फुला सारखा आहे तुझा चेहरा,
कोमेजून जाईल एक दिवस,

नको लाऊस जीव इतका त्याला,
सोडून जाईल एक दिवस,

जो बदलेल माझे आयुष्य सारे,
तो येईल माझा ही एक दिवस,

अपमानाचे घोट गिळत मी ,
अपयशाचे मोजून ठेवलेत प्रत्येक दिवस,

या दु:खाचे ही ओझे मनावर माझ्या,
आपण दोघेही मरणार एक दिवस,

मी बोलणारच नाही हा हट्ट आहे तिचा,
मी हि ऐकायला नसेन एक दिवस,

ते रझीन डोळे किती बोलके आहेत,
माझ्याशी हि बोलतील एक दिवस,

ह्या सूर्याला तो चंद्र आवडतो मान्य मगर,
या हट्टाने ग्रहण लागेल एक दिवस...!

ललित लेख

# प्रेम




**रिया शिंदे**

बी.कॉम. भाग १


प्रेम, प्रेम म्हणजे नक्की काय हो ?

तर प्रेम ही एक अशी भावना आहे की, जे मिळाल्यावर आपले मन आनंदी होते आणि न मिळाल्यावर ते दुःखी किंवा उदास होते. प्रेम म्हणजे एक अशी भावना की जे केले ते त्या व्यक्तीसाठी आपण आपलं संपूर्ण आयुष्य जगतो. आपल्या आयुष्याला खरा अर्थ मिळण्याचे कारण हे प्रेमच तर असते. काही वेळा आपल्या नशिबात नसणाऱ्या, फक्त आपल्याला आवडत असणाऱ्या व्यक्तीसाठी आपण आपलं संपूर्ण आयुष्य पणाला लावतो. काही व्यक्ती तर त्या आठवणींच्या जगातून बाहेर कधी येतच नाहीत. पण याच प्रसंगी आपल्या आयुष्यात आपल्यावर प्रेम करणारी व्यक्ती मात्र नक्की येते.

आपल्या असण्याचे, जगण्याचे एकमेव कारण म्हणजे ती प्रेम करणारी आपली व्यक्तीच असते.

प्रेम तर आपले आई-वडीलही आपल्या मुलांवर करतात. पण आपल्या त्या व्यक्तीच्या प्रेमाची सर मात्र कशातही नसते. प्रेम म्हणजे कोणावरही अधिकार, हक्क गाजविणे किंवा त्या व्यक्तीस प्राप्त करणे असा अर्थ प्रेमाचा नाहीच. तर ती व्यक्ती आपली होणार नाही हे माहीत असूनही त्या व्यक्तीवर जीवापाड, निःस्वार्थी भावनेने केलेलप्रेम म्हणजे प्रेम होय.

आपल्या जीवनात आपण घेत असलेला प्रत्येक श्वास न् श्वास हा त्या व्यक्तीच्याच नावाचाच असतो. आपल्या अस्तित्वाचं खरं कारण हे त्या व्यक्तीच्या सहवासाच्या विश्वासाचे प्रेम असते.

उठता-बसता, ध्यानी-मनी आणि सतत त्याच व्यक्तीचा विचार सुरू असणे ही पण प्रेमाची महत्त्वाची निशाणी आहे. शरीराने कितीही दूर असलो तरी मनाने नेहमीच सोबत व एकरूप असणे म्हणजे प्रेम. प्रेम तर आपण सगळ्याच नात्यावर करतो. पण त्या व्यक्तीच्या प्रेमाची जागा कोणीच घेऊ शकत नाही. विश्वासाचं प्रेम असलं की ते आणखीनच घट्ट होत जाते. म्हणूनच ते एक दोघांचे वेगळे विश्व असते. कारण तिथे फक्त आपल्या विश्वासाच्या नात्याचं प्रेम असते. आयुष्यातील छोटी-मोठी प्रत्येक गोष्ट सांगण्याचे ते एकमेव निःस्वार्थी असे ठिकाण असते.

रुसवे किंवा रागाने मनाची द्वारे बंद होत असतील तर ते पुन्हा पूर्ववत करण्याची प्रेमाची किल्ली ही तीच व्यक्ती असते. आयुष्यातील सगळ्यात महत्त्वाचा अुनभव हे प्रेम असते. कारण त्याच व्यक्तीच्याभोवती आपलं प्रेमाचं विश्व बसलेले असते. सर्व राग, द्वेष, लोभ, स्वार्थ आणि स्पर्धा विसरून जेथे मन साफपणाने मोकळे होते. ते म्हणजे आपलं त्या व्यक्तीशी असलेलं विश्वासाच्या प्रेमाचं ते गोड आणि खट्याळसं हे नाव असते. हेच तर खरं प्रेम असते. जिथे सगळे रुसवे-फुगवे माफ होऊन फक्त प्रेम दरवळत असते. तिथे न काही बोलताही एकमेकांच्या मनातले भाव समजत असतात. कारण इथे अविश्वास नाही, तर फक्त आणि फक्त एकमेकांप्रति असलेले विश्वासाचे प्रेम असते.

एकाला त्रास झाला की दुसऱ्याच्या डोळ्यातून पाणी येतं. एकमेकांवरचा पहिला वार हा नेहमी दोघेही झेलण्यास तयार असतात. प्रेमामध्ये तुझं-माझं असं काही नसतं, म्हणूनच तर हे आयुष्य एकमेकांसाठी बनलं असतं. आपल्यासाठी प्रेम आहे आणि प्रेमासाठी आपण, म्हणूनच या स्वार्थी-फसव्या जगात निःस्वार्थ प्रेमाच्या दुनियेत आहोत. कितीही भांडण झाली तरी दुसऱ्या क्षणी एकत्र नेहमीच असतो आपण आणि यामागचे कारण आपल्या विश्वासाच्या प्रेमाचे नातंच आहे. हाच तर खरा प्रेमाचा आपल्या आयुष्यातील अर्थ आहे. जिथे कोणत्याही साक्ष-पुराव्यांची गरज भासत नसते. कारण तिथे फक्त आणि फक्त एकमेकांप्रति असलेले विश्वासाचे प्रेम असते. म्हणूनच ते आपले एक वेगळे विश्व आहे. जिथे फक्त आपल्या विश्वासाच्या नात्याचे प्रेम आहे. जेव्हा जाऊ आपण प्रेमाच्याही पुढे,

तेव्हा या जगी येईल गोड निशाणी ही  
प्रेमाची आपल्या इथे  
बोल त्याचे बोबडे ऐकत.  
आपणही होऊ त्याची सोबत  
होईल तेव्हा पूर्ण स्वप्न आपले  
येईल जेव्हा आपल्या या जागी  
प्रेमाची निरागस गोड पाऊले दुनियेत  
असले जरी लाखो चेहरे  
पण ही नजर मात्र फक्त तुलाच येऊन मिळे  
जन्मोजन्मीचे नाते आपले  
त्यास प्रेमाची साथ लाभे  
हेच आपले विश्वासाच्या नात्याचे प्रेम आहे,  
आणि हाच तर खरा आपल्या प्रेमाचा अर्थ आहे.

•



# म्या रखमा वसंती धनगर...



साक्षी नामदेव ढोकरे
बी.ए.भाग-१

जितकं माझं नाव विचित्र आहे, तसंच माझ्या आयुष्याचा प्रवासही तितकाच खडतर होता. पण खरं तर आयुष्य किती मजेशीर आहे ना! ताटलीभर दुःख आणि वाटीभरच सुख देतं. पण माझ्या वाट्याला तरी दुःखाचे क्षण इतके कधी आले नाहीत, त्याचं कारण म्हणजे माझे आई-वडील होते. लहानपणापासूनच माझे लाड खूप व्हायचे. पण माझ्या वस्तीतले लोक माझ्या बाबांना रोज सांगायचे, मुलीच्या जातीला इतके लाड करू नये. पण बाबांनी कधीच यांच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही आणि तिथूनच सुरुवात झाली माझ्या खऱ्या प्रवासाला.

माझ्या कुटुंबाला आदिवासी कुटुंब म्हणून ओळखत असत. कारण आम्ही जंगलात राहायचो; तेही पूर्ण घनदाट होतं. मोठ्या तळ्याजवळ आम्ही आणि माझे गावकरी राहात होतो. सात-आठ घरं आणि याला आम्ही धनगरवाडा म्हणत. कारवीच्या काठ्या आणि त्यावर माती अशी आमच्या घराची भिंत, छतावर गवतासारखाच केबंळा होता आणि त्या चार भिंतीत आईने दगड घालून तयार केलेली ती वेडीवाकडी चूल, एक ताटली आणि त्यासोबत एक तांब्या, दोन-तीन भगुणं (पातेल्याचाच एक प्रकार) असा माझ्या आई-वडिलांचा संसार, त्यात त्यांना एक मुलगी ती म्हणजे मीच होते. त्यांनी मला नाव रखमा दिलं होतं. रक्ताचं पाणी करून मला माझ्या आई-वडिलांनी मोठं केलं. मी कधी माझ्या धनगरवाड्यात जास्त वेळ थांबत नव्हते. जंगलातून बाहेर एक गाव होतं. तिथं ऊसतोडणीसाठी लोक बाहेरून येत असत. ते आपल्या मुलांना साखर शाळेत पाठवून आपण ऊस तोडायला जात. मीही त्यांच्यामागे त्या शाळेत जायचे. साखर शाळा म्हणजे कोणालाही ते बसवून घेत असत. मी रोज सकाळी उठून त्या शाळेत बसायला जायचे. असा माझा दिनक्रम चालू झाला. एक दिवस माझं असं वागणं पाहून माझे वडील माझ्यामागे आले. त्यांनी मला शाळेत जाताना पाहिलं. माझी शाळा संपेपर्यंत ते शाळेबाहेर उभाच होते. जशी शाळा सुटली तसे बाबा माझ्याकडे धावत आले. त्यांना पाहून माझ्या पोटात गोळाच आला. मला वाटलं, बाबा आता मला ओरडणार! पण तसं बाबांनी मला घट्ट मिठी मारली आणि म्हणाले. ''गें माय पोट्टी तुले एवढं शिकायचं असां तर मंग बोलून जायचे मले म्या धाडलं असतं की तुले या साखरशाळंत.'' हे ऐकताच मला फार आनंद झाला. मग मी बाबांना म्हणाले, ''आरं बा, म्या तर भ्यालेच बग तुले. मेल वाटलं, तु आता बोलुनच सोडतो कि काय म्या इथं एकली ईऊन रायली म्हणून.'' त्यावेळी बाबा लगेच म्हणाले, ''नाय पोट्टी, तुले लय मोठं झालेल्लं आम्हांला पाहयचंय हाय. मंग त्या करता आम्ही दोघं आमचं असणारं जीवन तुले देऊ.'' बाबांची मला शिकवण्याची इच्छा अफाट होती. त्यानंतर बाबा मला घेऊन आमच्या झोपडीत गेले. संध्याकाळची वेळ झाली होती. आई भाताचं कालवण करून मिरचीचं वाटणं वाटायला बाहेर आली आणि मला बघताच म्हणाली. ''गे पोट्टी, धेडाभर कुठं असा म्हणायचं तु, तुझ्या मागनं असं पळत खायचं व्हय आम्ही दोघांनी.'' मी गालात खुदकन हसले आणि आईला म्हणाले, ''माय, म्या साखरशाळंत गेलती. ते बी बां संगं'', असं म्हणताच आईच्या डोळ्यात पाणी माविनासं झालं. माझ्याजवळ येवून मला जवळ घेत मी म्हणाली, ''माय पोट्टी आन शाळंत!'' तेव्हा बाबा आईला लगेच म्हणाले, ''मंग ति काय शाळंत जाऊ नाय शकत. या भीमाची पोट्टी आता शिकाया लागली बघ वसंते. माय पोट्टी होऊन राहिली. आता आपण आपल्या पोहीले शिकवून लयं मोठी आपिसर करू.'' बाबांचे हे शब्द ऐकताच मी आनंदाने नाचायला लागले. रोज शाळेत जाऊन लिहायला, वाचायला मिळणार म्हणून मी बाबांना म्हणाले, ''बा, म्या शिकुन लंय मोठी व्हईल बघ. आन आता तुले पण वाचाया शिकवल.'' माझा आनंद हा त्यांचा आनंद असायचा. आम्ही तिघंही खूप आनंदात होतो.



काळ पुढे सरत होता. माझं शिक्षणही होत आलं होतं; पण आमच्या या हसत्या कुटुंबावर काळाची सावली पडली. माझी आई अचानक आजारी पडली. नक्की काय होत होतं तिला काहीच समजत नव्हतं. वेगवेगळा औषधीपाला आणून उपचार केला. पण काही त्याचा उपयोगच झाला नाही. मग तिला दवाखान्यात न्यायचं ठरलं. वाड्यातली बैलगाडी आणली, पण आईनं लगेच बाबांना सांगितलं, ''माय पोट्टी आता आपिसर व्हणार हाय. तिचे करता गोळा केल्ला पैकं. मायासाठी नगा घालु. तिले आपिसर झालेलं मले पहायचंय.'' माझे बाबाही आईला दवाखान्यात न्यायला तयार नव्हते. माझी आय.पी.एस. पदाची परीक्षाही जवळच आली होती. बाबांनी मला शहरात सोडून परीक्षेची तयारी करायला मागे धाडलं. आईचा चेहरा सारखा डोळ्यासमोर यायचा. कधी एकदा परीक्षा संपवून तिच्याकडे जाईल झालं होतं. डोंगरी भाग असल्यामुळे ना पत्र जातं होतं, ना मला तिथून येता येत होतं. परीक्षा जवळ आली. मी स्वतःला झोकून देऊन परीक्षा दिली. थोड्याच दिवसांत परीक्षेचा निकाल आला. मला माहीत होतं, मी

परीक्षा उत्तीर्ण होणार. ज्यावेळी पेपरात माझं नाव वाचलं तेव्हा आई-बाबा दोघेही माझ्या डोळ्यांसमोर आले. तोच पेपर घेऊन मी डोंगराकडे जाण्यासाठी निघाले. चेहऱ्यावर आनंद आणि मनात ओढ लागली होती. कधी एकदा आईबाबांना सांगतेय असं झालं होतं. आईचा तो सुरकुतलेला हात कधी गालावर फिरतो आणि बाबांना घट्ट मिठी मारतेय असं वाटतं होतं. मी धनगरवाड्यात पोहाचले. बैलगाडीतून उतरले तर सगळी लोकं मला बघत होती. मला समजेना, नक्की काय झालंय. मी माझ्या झोपडीत गेले. आई शांत झोपली होती. बाबाही शांतच आईच्याशेजारी बसले होते. मी आईला हाक मारली, ''गे मायं म्या आपिसर झाली बघ. तुले पहायचं व्हतं नव्हं. मले बघ की, मंग मायाकडं.'' बाबा लगेच रडायला लागले आणि म्हणाले, ''माय पोट्टी आपिसर झाली. पर तुले बघाय तुयी माय नाय राहिली.'' हे ऐकताच माझं चालतं आयुष्य थांबल्यासारखं वाटलं. मी ऑफिसर झाल्याची जणू आईला माहिती आधीच लागली असावी म्हणून तिने त्याचवेळी डोळे मिटले. माझ्या बाबांनी आईकडे बघत तेव्हाच शपथ घेतली आणि म्हणाले, ''वसंते, आपली पोट्टी आपिसर झाली. पर तिले बघाय तु नाय राहिली. मी माया पोट्टी मागं असाच उभा आसल. पर तुझा बी तितकाच वाटा हाय. आपले पोट्टीचे यशामागं आन म्हणून मी माया छाताडावर घेऊन सांगतो, या दिसापासून आपले पोट्टीचं नाव 'रखमा वसंती धनगर असंल' आणि या दिवसापासूनच मी माझं नाव जगाले सांगते की,

'म्या रखमा वसंती धनगर हाय...'

•

---

# आई !

**तनुजा ढेरे**
बी.ए.बी.एड्. १

जेव्हा अस्तित्वही नव्हते माझे या जगात तेव्हा
निःस्वार्थ प्रेम करणारी तूच ना ग आई....
तुझ्यावरचे प्रेम व्यक्त करायचे राहूनच गेले ते
निव्यक्त शब्द समजून घेशील ना ग आई....
तुझ्या रागातील प्रेम मला उमगलेच नाही पुन्हा त्याच
प्रेमाने मला रागवशील ना ग आई....
तुझ्या हाताच्या चवीपुढे पंचपक्कान्ननही फिके
तुझ्या हातानेच मला
भरवशील ना ग आई ....
स्वप्ने माझी उंच आकाशी भरारीची उडण्याची ती
स्वच्छंदी मला देशील ना ग आई....
जेव्हा चुकेल कधी मी तेव्हा माझी मैत्रीण बनून मला
समजून घेशील ना ग आई....
तुला माहित आहे ना
खूप हट्टी आहे मी
तो हट्ट माझा पूर्ण तू
करशील ना ग आई....

तुझ्या डोळ्यातील अश्रू
मला पहावणार नाही
तेव्हा माझ्या डोळ्यातील आरशात बघून
हसशील ना ग आई....

जेव्हा जग सांगेल
कटुता माझ्याविषयी तेव्हा विश्वासाचा हा गोडवा
असाच ठेवशील ना ग आई....
लोक बघतील गं
आठ आश्चर्य जगातील
पण तुझ्या सौंदर्याची सर त्याला येईल का ग आई....

गेले मी देवळात गेले समुद्रकिनारी
तरी भेटते शांतता मला तुझ्या कुशीतच ग आई....

शब्दातही सामर्थ्य नाही
तुला मांडण्याचे
लिहिताना शब्दांनाही पाझर फुटेल ना ग आई....

हात धरून योग्य दिशा दाखवणाऱ्या त्या ईश्वराचे
रूप
तूच ना ग आई....

तुझ्या प्रेमाचा अनंत सागराला किनाराच नाही अशी
तू माझी प्रेमळ आई..!



माहितीपर लेख

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील क्रांतिकारकांचे योगदान



**श्वेता धोंडिबा गावडे**
बी.एस्सी. ३

भारतीय स्वातंत्र्याबद्दल लिहिताना अंगावर शहारे, विचारांना धार आणि लेखणीला वेग आपोआपच येतो. एके काळी भारताला 'सोने की चिडिया' म्हटले जायचे. भारत देश ध्रुवाच्या ताऱ्याप्रमाणे चमकायचा. एका कवीने एके ठिकाणी म्हटले आहे.

'प्यारा रे प्यारा देश माझा प्यारा
चमके हा ध्रुवाचा तारा
ऋषी मुनी वाणी जन्मली येथे
गंगा गौदा कृष्णा वाहाती येथे
अति पवित्र पावन ही भूमी
पाहाते ममता तुषा रे...'

अशा या पवित्र भारत भूमीला ब्रिटिशांनी बेचिराख करून टाकले होते. सामान्य माणसांचा हक्क हिरावून घेऊन गुलामगिरी लादली होती. इथला माणूस ब्रिटिशांच्या गुलामगिरीत गुदमरून गेला होता. येथील उद्योग डबघाईस आले होते. येथील कच्चा माल कवडीमोल विकला जात होता आणि कामगारांना कामाची सक्ती केली जात होती. यामुळेच भारतीय माणूस कधी आपण या ब्रिटिशांच्या साखळदंडातून मुक्त होऊन याची चातकासारखी वाट पाहात होता आणि यातूनच भारत मातेच्या कुशीतून एकएक रत्न जन्माला येऊ लागले.

ब्रिटिशांच्या विरुद्ध सामान्य माणसाच्या मनात आग धगधगत होती. याचीच प्रचिती म्हणून अधूनमधून ज्वालामुखीचा उद्रेक व्हावा तसा ब्रिटिशाविरूद्ध उद्रेक होत होता. याची पहिली ठिणगी पडली ती बराकपूरच्या छावणीमध्ये. मंगल पांडे यांनी ब्रिटिश अधिकाऱ्याला गोळ्या झाडून ठार केले आणि तेथूनच १८५७ च्या उठावाला सुरुवात झाली. इथून जी स्वातंत्र्यलढ्यासाठी क्रांतिकारकांनी मशाल पेटवली. ती १९४७ पर्यंत कधीच विझली नाही. शेवटी याच मशालीच्या तेजाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून येथील महात्म्यांनी, नेत्यांनी, क्रांतिकारकांनी आपले आयुष्य चंदनाप्रमाणे झिजवले. त्यामध्ये बिपिन चंद्रपाल, लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, गो.ग.आगरकर, रासबिहारी बोस, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरू असे कितीतरी नेते भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ब्रिटिशांविरूद्ध लढले.

कित्येक क्रांतिकारक फासावर चढले... त्यामध्ये शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव असे कितीतरी सांगता येतील ज्या वीरांनी भारतमातेच्या यज्ञकुंडात प्राणांची आहुती दिली आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला. भारताला स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेले नाही. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच असे ठणकावून सांगणारे लोकमान्य टिळक.

'तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा' असे गर्जून सांगणारे सुभाषचंद्र बोस 'करा किंवा मरा' असा टोकाचा संदेश देणारे महात्मा गांधी अशा अनेक महात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. 'इन्कलाब जिंदाबाद' अशा घोषणा देऊन भारतमातेसाठी फासावर जाणारे भगतसिंग, राजगुरू, सुखदेव अशा कितीतरी क्रांतिकारकांचे योगदान स्वातंत्र्यलढ्यात अमूल्य आहे. मित्रांनो, अनेक क्रांतिकारकांनी तुरुंगवास भोगला. कितीतरी क्रांतिकारक ब्रिटिशांच्या बंदुकीच्या गोळीचे बळी ठरले तेव्हा आपली भारतमाता स्वतंत्र झाली.

लोकमान्य टिळक यांनी ब्रिटिशांविरुद्ध अनेक जळजळीत लेख लिहून लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण केली. तेथील तरुणाने राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्रभाव निर्माण करण्याचे कार्य टिळकांनी हाती घेतले. स्वराज्याचे बीज व मराठा वृत्तपत्रे सुरू केली. याच वृत्तपत्रांतून त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध जळजळीत लेख लिहिले. त्यामध्ये 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?', 'सत्ता करणे म्हणजे सूड घेणे नव्हे' 'असे खून का होतात', 'पुनश्च हरि ओम' हे लेख विशेष गाजले. टिळकांनी आपल्या लेखणीला शस्त्र बनवले आणि याच लेखणीने भारतीय तरुणात जाज्वल्य देशभक्ती निर्माण केली.

त्याचप्रमाणे गांधीजींचे देशांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. नव्हे नव्हे तर यांच्याशिवाय भारतीय स्वातंत्र्यलढा पूर्ण होऊच शकत नाही. त्यांनी स्वातंत्र्याचा लढा जनसामान्यापर्यंत नेऊन पोहोचविला आणि जनआंदोलन उभे केले. म्हणून भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील व्यापक अशा जनआंदोलनाचे जनक गांधीजींना म्हणायला हरकत नाही. गांधीजींनी आपल्या वागण्यातून, बोलण्यातून सामान्य माणसात आपली प्रतिमा तयार केली. कायदा मोडून इंग्रजांना विरोध करणे. यासाठी कायदेभंग ही चळवळ सुरू केली. १४ फेब्रुवारी १९३० रोजी राष्ट्रीय सभेने जनतेला सविनय कायदेभंग करण्यासाठी आदेश दिला आणि गांधीजींनी भारतीय जनतेला संदेश दिला की, 'करा किंवा मरा', हा संदेश ऐकून संपूर्ण भारत देश पेटून उठला. अशा अनेक भारतमातेच्या थोर क्रांतिकारकांच्या कार्यामुळेच भारतीय स्वातंत्र्यलढा हा इतिहासामध्ये अविस्मरणीय असे स्वातंत्र्य समर झाला.

'तो सोन्याचा दिन उगवला
शतकांच्या यज्ञातून उगवली
एक केशरी ज्वाला
दहा दिशांच्या उद्यामधुनी
अरूणोदय झाला...'

कित्येक स्वातंत्र्यवीरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले कित्येक जीव समर्पित केले. भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यासारख्या अनेक क्रांतिवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.

'किती आक्रोश तो झाला
किती रक्ताच्या नद्या वाहल्या

सडा पडला मृतदेहांचा,
तेव्हा स्वातंत्र्य दिस उदयास आला'

स्वातंत्र्य दिवस आपल्याला हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी क्रांतिकारकांनी किती त्याग केले याची जाणीव करून देतो. याचे संरक्षण करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही एक दीर्घ आणि कठीण लढाई होय. ज्यात असंख्य लोकांनी अपार त्याग आणि धैर्य दाखवले. महात्मा गांधींसारख्या नेत्यांनी अहिंसक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न केला असला तरी क्रांतिकारकांचे योगदान दुर्लक्षित करता येत नाही. या धाडसी वीरांनी थेट कृतीवर विश्वास ठेवला आणि ब्रिटिश राजवटीचा सामना करण्यासाठी अनेकदा कट्टर मार्गाचा अवलंब केला. त्यांचे आत्मत्याग आणि निर्भयता राष्ट्राच्या स्वातंत्र्याची ज्योत पेटवण्यात महत्त्वाचे ठरले.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांचे योगदान अमूल्य आहे. त्यांचे लक्ष्य, आत्मा आणि सर्वोच्च त्याग आजही पिढ्यांना प्रेरणा देतो. ते राष्ट्रभक्तीचे प्रतीक असून त्यांच्या धैर्याची आणि बलिदानाची आठवण प्रत्येक भारतीयाच्या मनात कायम राहील.

शेवटी एवढ्याच ओळी सुचतात-
'धुमसतात अजूनी विझल्या चितांचे निखारे
अजून रक्त मागत उठती वधस्तंभ सारे
आसवेच स्वातंत्र्याची आम्हाला मिळाली
अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली.'

•

## मी पाहिलेले एक स्वप्न

**तनुजा ढेरे**
बी.ए.बी.एड. १

मी पाहिलेले स्वप्न
विंडो सीट आणि फक्त तू
नाही होतील
आयुष्याच्या गोष्टी बोलून
पण ते क्षण आयुष्यभर जपेल..

खिडकीतून येणारा वारा
आणि ते दृश्य
मनातच बसेल..

तू पाहताच माझ्याकडे
बाहेरील सौंदर्य माझ्यावर रुसेल..

चुकवताच तू नजर
माझी मीही थोडासा हट्ट करेल..

मग तू ही विसरून सारे
मग तुलाही फक्त मीच दिसेल..

अचानक कोणी येताच
दोघेही येऊ भानावर
अजूनही गर्दी असून
आपण या गर्दीत नसेल ..

तू माझ्यात मी तुझ्यात
आपला प्रवास वेगळाच असेल !
आपला प्रवास वेगळाच असेल!
हो!!

मी पाहिलेले एक स्वप्न
आपण दोघे आणि तो
तीन मिनिटांचा प्रवास....!!!



## मी विद्यार्थी

**धैर्यशील नांगरे पाटील**
बी.व्होक

शिक्षणाचा बाजार झाला,
अन विध्यार्थी लाचार झाला,

शिक्षण व्यवस्था फसली,
अन तो बेकार झाला,

लाखोंची फी भरूनही,
हातात फक्त कागद आला,

जग जिंकण्याचे सामर्थ्य गमावले त्याने,
अन व्यसनाच्या अधीन झाला,

डोळ्यातील स्वप्ने त्याची
पाठीवरची ओझी झाली,

किती कमावतोस या प्रश्नाने,
जखम जुनी हि ताजी झाली,

सुशिक्षित बेरोजगार हा ठपका पडला,
सांग मग हार तुझी झाली का माझी झाली?

आत्मकथनात्मक

# महावीर कॉलेज : एक जीवन अनुभव



**सीमा महावीर चौगुले**
बी.ए. ३

कॉलेज संपलेसुट्ट्या पडल्या म्हणून वह्या दप्तरांची आवरावर सुरू केली. सॅक आवरताना कॉलेजचे आय कार्ड हाताला लागले आय कार्ड निहाळताना तीन नव्हे जवळजवळ पाच वर्षाचा महावीर महाविद्यालयातील घालवलेल्या क्षणांचा चित्रपट डोळ्यापुढे ठरला.

सम्यक च्या दहावीनंतर पुढे काय? निदान १२ वी पर्यंत शिक्षण घ्यावी चार चौघां मुलांमध्ये त्याची उठ बस व्हावी यासाठी त्याच्या हायस्कूलच्या सरांच्या तसेच घरातल्या एकमताने अकरावीसाठी महावीर कॉलेजची निवड झाली. इतर मुलांपेक्षा त्याची स्थिती वेगळी होती. दहावीपर्यंत गावातीलच हायस्कूल शिक्षण पूर्ण झाले. नियांची परिस्थिती उद्भवली नाही. परंतु महाविद्यालयीन शिक्षणासाठी कोल्हापूरशिवाय पर्याय नव्हता त्यामुळे गावाबाहेर शिक्षणाला बाहेर पडल्यावर सम्यकला निऑनची जबाबदारी ची कल्पना आली. त्याच्या हितासाठी की स्वीकारली आणि माझा वडिवडे ते महावीर कॉलेज असा प्रवास सुरू झाला.

इतर वेळी नुसते सहज फिरायला बाहेर पडले व एक जबाबदारीने रोज बाहेर पडणे यामध्ये किती तफावत आहे याची जाणीव हळूहळू समजू लागली एका वेगळ्या पण स्वतःच्याच दृष्टिकोनातून बाहेर जगताना लागले. एका मोठ्या आघातानंतर त्यातून बाहेर पडून रोजचा प्रवास कॉलेजच्या आवारातील नवनवीन अनुभवांनी मला नव्याने काही शिकवू पाहत होते तसेच मला सावरत होते सम्यक च्या निमित्ताने त्याच्याबरोबरच्या इतर अपंग मुलांची तसेच सीनियर वर्गातील इतर अपंग मुलांची ओळख होऊ लागली. खरंच महावीर कॉलेजचे एक वैशिष्ट्य आहेत इतर मुलांप्रमाणेच अपंग मुलांनाही प्रवेश देऊन त्यांच्यासाठी शिक्षणाचे दार खुले केले. त्याची कॉलेजची प्रवेश प्रक्रिया अभ्यासक्रम परीक्षेबाबतच्या अडचणी याचीही जबाबदारी त्यांच्या घरातीलच एक सदस्य प्रमाणे स्वीकारतात आणि पारही पाडतात. त्यामुळे मलाही जरा रिलॅक्स वाटले त्या मुलांमध्ये सम्यकला वर्गात पाठवल्यानंतर जाणवणारे एकटेपण त्या मुलांमुळे कमी झाले मर्ग दूर झाली हळूहळू कॉलेजला येण्याचा उत्साह वाढला अशा रीतीने सम्यकचे वर्गात शिक्षण सुरू झाले व वर्गाबाहेर बसून मी त्या इतर अपंग मुलांची होणाऱ्या गप्पातून त्याच्या बोलण्यातून माहिती नव्हे काही शिकू लागले. त्या मुलांच्या बोलण्यातून त्यांच्या अनुभवातून माझे दुःख हळूहळू विसरू लागले खरंच माणूस आपलेच दुःख किती मोठे आहे असे मानून त्याला पुरवायात बसतो. त्याचे लाड करतो लाडावतो पण कॉलेजच्या त्या मुलांशी बोलण्यातून त्यांच्या आत्मविश्वासाशी वावरण्यातून आपण किती संकुचित विचार करतो याची जाणीव झाली. जेव्हा कोणताच मार्ग दिसत नाही असे वाटले तेव्हा आपली विचारसरणी बदलावी त्यातूनच आपल्यालाही नवा मार्ग सापडतो असं वाचले होते पण कॉलेजच्या आवारात ते मी प्रत्यक्ष अनुभवले. खोलीतील अंधार दूर करण्यासाठी फक्त खिडकीचे दार उघडणे आपल्याच हातात असते मनातील मरगळ हळूहळू दूर होऊ लागली अशातरी मी मुलांच्या सानिध्याने खेळीमिरीने सम्यकचे अकरावी व बारावी पार पडली पण बारावीनंतर काय? हा प्रश्न उभा राहिला पण तेथील सीनियर विद्यार्थ्यांची गप्पा मारताना ग्रॅज्युएशनची प्रोसेस अभ्यासक्रम परीक्षा याबद्दल माहिती मिळाली. सम्यक प्रयत्नांनी ग्रॅज्युएशन करू शकेल तसेच सीनियर डिपार्टमेंटचे सर्व प्राध्यापक खूप सपोर्टिव्ह आहेत याचीही खात्री मिळाली. म्हणून सम्यकला पुढे बीए म्हणजेच ग्रॅज्युएशनला प्रवेश घेण्याचे ठरवले पण अकरावी व बारावी प्रमाणेच त्याला निऑन करण्याची गरज आहे याचीही जाणीव होतीच. शेवटी त्याला सोबत पण व शिक्षण पण मिळेल यासाठी मीही बीए ला प्रवेश घेतला. काहींनी हाडे पेढे घेतले कारण माझे शिक्षण बारावी सायन्स



पुढे डी फार्म परंतु सम्यकला सपोर्ट करणे माझ्यासाठी महत्त्वपूर्ण होते अशा तऱ्हेने एका मुलाची आई ती कॉलेजची विद्यार्थिनींनी अशा दोन्ही भूमिका माझ्या सुरू झाल्याच पण आई पेक्षा मी कॉलेजची विद्यार्थिनी म्हणून मी जास्त रमू लागले. बीए च्या निमित्ताने माझी जीवनातील एक नवी वाटचाल जणू सुरू झाली. कॉलेजच्या निमित्ताने लवकर उठून आवरणे सम्यकला सोबत तसे स्वतःही एक विद्यार्थिनी म्हणून नव्या उमेदीने वावरू लागले रुटीन सुरू झाले. विस्कळीत अस्ताव्यस्त झालेल्या मानसिकतेला आता एका नव्या विचाराने बांधून घेऊ लागले. त्यामुळे एक नवी ऊर्जा मिळू लागली वर्गात नवी नवी मित्र मैत्रिणी भेटल्या त्यांच्या व माझ्या वयात दुःखटीचा फरक असूनही त्याची कधीही जाणीव मला झाली नाही. कधी तसा फरकही जाणवला नाही व जाणवू दिलाही नाही. एवढी मी त्यांच्यात मिसळून गेले. त्यांच्याबरोबरच्या गप्पा गोष्टीतून त्यांचे विचार मला रोज नवे काही शिकवून जात होते. तसेच कॉलेजचे प्राध्यापकप्राध्यापक म्हणजे

कॉलेजचा आत्माच. सरांची लेक्चर्स म्हणजे माझ्यासाठी जणू ज्ञानाचा खजिनाच होता. कितीही लुटले तरी कमीच. कॉलेज सर्व प्राध्यापक उच्चशिक्षित पण त्याबद्दल तसू भर ही गर्व कधीच जाणवला नाही ते शिक्षणाने अनुभवाने एवढे मोठे असूनही त्याची कधीच जाणीव आम्हाला जाणवून दिली नाही. हाच त्यांचा मोठेपणा होता. कुठलीही शंका अगदी सिल्याबसच्या निगडित असो वा काही वैयक्तिक जीवनातील अडचणी असो पण अगदी मित्रत्वाच्या नात्याने आपल्यातील एक असल्याप्रमाणे मार्गदर्शन लाभले. शिक्षक विद्यार्थी असा भेद जाणून दिला नाही. त्यामुळे संकुचित पणा जाणवलाच नाही सरांची लेक्चर्स नुसते पुस्तकी ज्ञान नसायचे पुस्तकी अभ्यासातून व्यवहारी ज्ञानाची ही ओळख करून देत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे स्वतःची निर्णय क्षमता विकसित होऊ लागली स्वतःतील कमतरता कुणी स्वतःतील गुणाची ही ओळख लेक्चर्स मुळे होऊ लागली. लेक्चर्स म्हणजे नुसते शिकवणे नसायची तू एक मुक्त संवाद असायचा.

बाहेरून येणाऱ्या मोठमोठी वक्त्यांची भाषणे लेक्चर्स मधूनही खूप काही शिकण्यास मिळाली कुतूहलाची नवनवीन कवाडे घडू लागली. तसेच कॉलेजमध्ये होणारे वेगवेगळ्या विषयांचे वर्कशॉप नवनवे ज्ञान देऊनही जात होते. कुठल्याही विषयाचे वर्कशॉप असले तरी कधीही मज्जाव केला नाही, सर्वांसाठी ज्ञानाचे द्वार खुले असायचे. टीव्ही सिरीयल प्रमोशन, नवनवीन हिंदी मराठी चित्रपट प्रमोशन यांच्या निमित्ताने कॉलेजमध्ये येणारे कलाकार त्यांच्या फक्त टीव्हीवर चित्रपट पडद्यावर पाहत होतो. कॉलेजमध्ये प्रत्यक्ष पाहू लागलो त्याचा आनंद काही वेगळाच होता. त्याचे अनुभव कथनातून नवीन शिकायला मिळत होते. त्यांच्या होणाऱ्या प्रश्न उत्तरांनी आनंद तर मिळायचाच पण आत्मविश्वासही मिळायचा.

तसेच कॉलेजच्या इतर कार्यक्रमाच्या निमित्ताने नवनवीन माहिती ही भरपूर मिळू लागली कधी कधी व्यक्त होण्यासाठी सरांनी स्टेजवर बोलवले तो मिळणारा आदर रिस्पेक्ट त्याबद्दल काहीच बोलू शकत नाही. त्याबद्दल फक्त आभारच मानू शकते थँक्यू

कॉलेज मार्फत होणाऱ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने माझ्यातील काही कली लावाव मिळाला व्यक्त होण्यासाठी मलाही एक हक्काचे व्यासपीठ मिळाले जणू. कॉलेजच्या देशभूषण मासिका मध्ये विद्यार्थी संपादक म्हणून दिलेले स्थान तसेच मासिका मधील दिलेल्या लिखाणामुळे झालेली कौतुक एक नवी उमेद आनंद देऊन गेला. मला माझीच नव्याने ओळख झाली रिस्पेक्ट आदर इतरांच्या नजरेत दिसू लागला. कॉलेजच्या ट्रीप ला जाण्याची ही संधी मिळाली. इतर वेळी फक्त कुटुंबातील नाहीतर गावातील सदस्य पण ट्रीप निमित्ताने काही ओळखीच्या तर काही अगदी अनोळखी बरोबरचा प्रवासही अनुभव त्यांच्याबरोबर सम्यकला सांभाळणे खूप काही शिकवून गेले.

ज्ञानाला वयाचे बंधन नसते ते मुक्त असते आणि कोणत्या कोणत्याही रूपाने कधीही काही ना काही शिकवून जातेच. त्याचप्रमाणे माझे बीए शिक्षण म्हणजे माझ्यासाठी फक्त एक डिग्री नव्हती तर तो एक जीवन शिकण्याची कला होती असेच मी म्हणेन. ती कला मी इथे अवगत केली सम्यकला एक आधार म्हणून त्याच्याबरोबर मी बीएला प्रवेश घेतला हे खरे पण हेच बी ए चे शिक्षण मला माझ्यासाठी जगण्यासाठी नवीन आव्हान साठी आधार बनले हे मात्र शंभर टक्के खात्रीने म्हणेल.

बीए करत करत महावीर कॉलेज माझ्यासाठी एक कुटुंब बनले जिथे माझी मी पूर्ण व्यक्त होत होते. इथून मला जी आत्मविश्वासाची शिदोरी मिळाली ती मला माझ्या पुढील आयुष्याच्या वाटचालीसाठी खूप मार्गदर्शक ठरेल हे नक्की. अशा तऱ्हेने तीन वर्षे कसे सरले कळलेच नाही सकाळी लवकर उठणे घरातील स्वतःचे सम्यक ची काळजी त्रास होता पण कॉलेजमध्ये आल्यावर सर्व थकवा नाहीसा होत व एक नवी ऊर्जा मिळत होती.

शेवटचा पेपर झाला पेपर संपले म्हणून आनंद होता पण त्याला कॉलेज संपले या दुःखाची वेदनाही होती. पेपर झाल्यावर सर्वांना भेटलो फोटो काढले गप्पा मारत खूप वेळ रेंगाळत राहिलो पण शेवटी जायची वेळ आलीच. पाऊले कॉलेजच्या बाहेर पडली होती पण मन मात्र कॉलेज आवारात रेंगाळत होते.. रेंगाळत आहे.

काही वेळा परिस्थितीने आपण एवढे गांगारून गेलेलो असतो की आपण आपल्यातील स्वतःला विसरतो हरवून जातो पण बीए च्या निमित्ताने महावीर कॉलेजच्या आवारात माझी मला मी सापडली.

●

## सोबती रे...


**तनुजा ढेरे**
बी.ए.बी.एड. १


तू चंद्र माझ्या आयुष्यातील मी विचारांचे आकाश रे....
तू फुल माझ्या आयुष्यातील मनी आठवर्णींचा बहार रे....
तू शांत समुद्र किनारा मी अवखळ मोठ्या लाटा रे...
तू शब्द माझ्या ओठांवरचे मी विस्कळीत बंध रे....
या दुःखी थकलेल्या आयुष्यातील तू माझ्या सोबती रे....



प्रवासवर्णन

# सहल ... एक आनंदानुभव



**सीमा महावीर चौगुले**
बी.ए. ३

कॉलेजची ट्रीप निघणार आहे हा विषय जेव्हा निघाला तेव्हा ट्रीपला जायचे निश्चित केले. कारण हे कॉलेजचे शेवटचे वर्ष होते. त्यामुळे कॉलेजच्या मुला-मुलींसोबत जाणं हा एक वेगळा आनंद अनुभवायला मिळतो. इतर वेळी कुटुंबाच्या सहकाऱ्यांसोबत तसे जातो; पण त्यावेळी फिरण्याचा एक्साईटमेंट सोबत एक प्रकारचे दडपणही असते. कॉलेजच्या ट्रीपमधून जाणे म्हणजे एक मुक्त आनंदच!

१८ जानेवारी तारीख ठरली. थोडी धावपळच झाली. कारण १६, १७ तारखेला कॉलेजचा वार्षिक स्नेहसमारंभाचा कार्यक्रम, लगेच दुसऱ्या दिवशी ट्रीपला याचे होते. कॉलेजवरून घरी येण्यास दुपार झाली. थोडावेळ विश्रांती घेऊन उद्या जायची तयारी सुरू केली. पॅकिंग व जेवणाचा डबा हुश्श! सर्व काही आवरले. पण लवकर निघायचे म्हणून झोप लागतच नव्हती. काही राहिले तर नाही ना, याची सारखी मनाची चाचपणी चालू होती. कशीबशी २/३ तासांची विश्रांती घेऊन निघायची तयारी सुरू केली. पहाटे ६.३० पर्यंत कॉलेजवर पोहचणे आवश्यक होते.

६.१५ ला कॉलेजवर पोहचलो, सर्वांची जमवाजमव होईपर्यंत ७ वाजलेच. बससमोर ग्रुप फोटो काढला. शेवटी बस हलली आणि सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद सांडल्याप्रमाणे सर्वांचे चेहरे फुलले. डान्स, गाणीच्या सोबतीने प्रवास सुरू झाला. सरांनी ही मोकळीक दिल्यामुळे मुलांच्या आनंदाला जोरच आला. मुलं-मुली कसलाच भेद न घेता ती जे आनंद लुटत होती, त्याचे खरंच कौतुकही वाटत होते आणि हेवाही.

लांबचा पल्ला असल्यामुळे नाश्तासाठी एका हॉटेलजवळ गाडी थांबली. नाश्ता कॉलेजतर्फे असल्याने त्यांच्यानुसार नाश्ता असणार. त्यामुळे काही मुलांनी तेथून पळ काढून दुसऱ्या ठिकाणी नाश्ताला गेली. आम्हा सर्वांचा नाश्ता झाला होता. पण बाहेर गेलेल्या मुलांचा ग्रुप येण्याची वाट पाहण्यासाठी आम्ही थांबलो. तो ग्रुप आल्यानंतर सरांची त्याच्यावर फायरिंग झाली. समज देऊन गाडी निघाली. मनातून वाटत होते की, ही मुले चुकीची वागली. कारण सहलीनिमित्त आपण एकत्र आहोत आणि असे बाहेर सेपरेट खाणेपिणे करणे चुकीचेच की? पण त्यांच्या डेअरिंगचे थोडे कौतुकही वाटत होते. अर्षींशी रश्रश्र ंिहळी ळी पशु सशपशीरींळेप काही तरी वेगळे करणारच.

'रेडी' येथे पोहचलो. तेथील गणपती मंदिर जाण्यासाठी उतरलो. आमच्यासोबत आलेले काही अपंग मुलामुलींना उतरण्यासाठी, मंदिरापर्यंत नेण्यासाठी केलेली मदत पाहून वाटले, ही नवी पिढी एवढी काही वाईट नाही. फक्त त्यांचे जगण्याचे स्वरूप बदलले आहे आणि हा नावीन्याचा परिणाम. गणपती दर्शन घेऊन फोटो काढून झाल्यानंतर सर्वांनी जेवण केले. तिथल्या मोकाट गाईंमुळे जेवण कसेबसे जेवण उरकाव लागले आम्ही बसकडे वळलो.

पुढे 'शिरोडा' येथे ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाला भेट दिली. वि.स.खांडेकर यांनी तेथील एका शाळेत शिक्षक म्हणून कामाला सुरुवात केली आणि काम करत करत मिळालेल्या वेळात विविध प्रकारचे लेखन करून मराठी साहित्याला मोठे योगदान दिले. संग्रहालयातील फोटोद्वारे त्याचा जीवनपट पाहाण्याचा योग मिळाला, त्यावेळचे त्याचे जीवन अप्रत्यक्ष रूपाने अनुभवायला मिळाले.

तेथून बाहेर पडून गाडीपेक्षा सर्वांचे मन शिरोडा बीचवर पोहण्यासाठी धावत होते. कारण बीच हेच सहलीचे मुख्य आकर्षण होते. कारण बीचवर जाऊन समुद्राला कवेत घ्यावे. असाच सर्वांचा भाव झालेला दिसून येत होता. शेवटी बीचवर पोहचलो. नद्यांनी जशी समुद्राकडे धाव घ्यावी, त्याप्रमाणे सर्व समुद्राकडे धाव घेत होते. समुद्र दिसल्यावर सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाच्या लाटा उसळून आल्या होत्या. सहलीमध्ये आलेले प्रत्येकजण आपला आनंद व्यक्त करण्याचा वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न करत होता. कोण कोण लाटांवर स्वतःला झोकून देत होते, तर काही जण पाण्यात डुबकी मारून आनंद शोधत होते, तर कोणी किनाऱ्यावर येणाऱ्या लाटांबरोबर सरकणाऱ्या वाळूबरोबर सरकत सरकत जाण्यात आनंद घेत होते. तर कोणी किनाऱ्यावर येणाऱ्या लाटांत आपले पाय ओले करून त्या आनंदात चिंब होत होते. प्रत्येक जण आपआपल्या परीने तेथून आनंद लुटत होता. जणू आपल्या मनीचे भावरंग निसर्गात मिसळून त्या चित्राचा आनंदानुभव घेत होते, असे वाटत होते.

सम्यक व श्रेया ही दोघे किनाऱ्यावर येणाऱ्या छोट्या छोट्या लाटात आपला 'छोटा आनंद' लुटत होते, तर श्रेयाची आई लाटांबरोबर वाहत येणाऱ्या शंखशिंपल्यांमध्ये आनंद शोधत होती. शारीरिकदृष्ट्या अपंग असणारी ऋतुजा मात्र मनातील सर्व बंधने तोडून न घाबरता पाण्यात भिजून घेत होती, तर त्याच्यातीलच काहीजण लांब बसून कोण कसे काय करत आहे. हे पाहण्यात आनंद घेत होते. आपण समुद्रकिनाऱ्यापर्यंत तरी आलोय ह्याच समाधानात त्यांचा आनंद होता. लांबूनच फोटो, व्हिडीओ करण्यात ती खूश होती. मीसुद्धा समुद्रापासून लांबूनच हे सर्व न्याहाळत होते. आलेल्या पोक्तपणामुळे तसेच जबाबदारीने आपल्या आनंदाला सावरत होते. आपला आनंद आता समजूतदार झाला आहे, असे वाटत होते.

प्रत्येकाच्या आनंदाचा दृष्टिकोन मी मनात साठवीत होते. हळूहळू सूर्यास्त होऊ लागला. सर्वांना आवरते घेण्याच्या सरांनी सूचना दिल्या. त्याप्रमाणे सर्वांनी पटपट आवरून घेतले. सूर्यास्ताचे सुंदर दृश्य डोळ्यात साठवून व एक छानशी आठवण मनात घेऊन आम्ही परतीच्या प्रवासाला सुरुवात केली.

●




एक दिवसीय बँकिंग क्षेत्रातील नोकर भरती कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील व मार्गदर्शक



मानसशास्त्र विभाग आयोजित
गुणात्मक संशोधन कसे करावे:
अनुभवकथन–मानसोपचारतज्ज्ञ श्रीमती माधुरी थोरात



PSYCHEFUSION–2025



जिज्ञासा विकास मंदिर, कोल्हापूर (विशेष विद्यार्थ्यांसाठीची शाळा) येथे अभ्यास भेट



करिअर संधी प्रदर्शन आणि समुपदेशन




इतिहास विभाग आयोजित 'क्रांती दिन' कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. निलेश वाळकुंजे, डॉ. महादेव शिंदे व मान्यवर



इतिहास विभाग आयोजित 'शिवराज्याभिषेक' कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे व मान्यवर



इतिहास विभागाची दुर्गराज रायगड किल्यास भेट



भूगोल विभाग आयोजित अन्नधान्ये, कडधान्ये, मसाले व तेलबिया पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मा.तानाजी साळुंखे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे व मान्यवर



भूगोल विभागाच्या वतीने आयोजित संदर्भ पुस्तकांचे प्रदर्शन प्रसंगी सौ.डॉ.सुषमा जी. रोटे , मा.प्रमोद खंडागळे व प्राध्यापक



ग्रीन कॅम्पस अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूरच्या परिसरात वृक्षारोपण करताना सामान्य प्रशासनाचे तहसीलदार मा. विजय पवार, प्रा. डॉ.अरुण पाटील व विद्यार्थी




केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय, कोल्हापूर व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मा. मधुकर पाटील, डॉ. सुषमा रोटे, प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील



शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय बेसबॉल पुरुष स्पर्धा २०२४–२५ च्या उद्घाटनाप्रसंगी प्र. प्राचार्य डॉ. उषा पाटील, प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे व मान्यवर खेळाडू



जिमखाना व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय क्रीडादिन कार्यक्रम प्रसंगी उपस्थित प्रा. राजेंद्र हिरकुडे, डॉ. रोहित पाटील व मान्यवर



दिव्यांग क्रीडा दिनानिमित्त शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडू कु. शुक्ला बिडकर यांचे स्वागत करताना प्र. प्राचार्य डॉ. उषा पाटील, डॉ. रोहित पाटील, प्रा. शशिकला सरगर व मान्यवर



जागतिक योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिक करताना विद्यार्थी



वाणिज्य विभागामार्फत आयोजित इन्व्हेस्टमेंट हेल्थ या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉक्टर पूजा जोशी



वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित बीमा सखी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सौ. किर्ती पाटील, प्रा.संध्या जाधव व मान्यवर




शाश्वत विकासामध्ये वाणिज्यची भूमिका या एक दिवसीय कार्यशाळेला उपस्थित वाणिज्य विभागातील विद्यार्थी




शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा. रविंद्र केदार, डॉ. महादेव शिंदे व मान्यवर



बी.ए. बी. एड विभागाच्या वतीने आयोजित योग प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. प्रमोद पाटील व मान्यवर



जागतिक महिला दिना निमित्त आयोजित कार्यक्रमास उपस्थित सौ सविता देसाई, सौ. पद्मा पाटील डॉ. श्रद्धा पाटील व मान्यवर



वि. स. खांडेकर भाषाभवन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर शैक्षणिक भेट



बी.एस्सी.३ Microbiology विभागातील विद्यार्थ्यांची Visheweshwarya industrial and technological museum banglore येथे अभ्यास भेट




t Cognition company kolhapur study visit by
B.Sc-lll computer science students




Career opportunities in medical field
guest lecture delivered by shri Attar principal,
Sibic institute Kolhapur



संगणकशास्त्र विभागामार्फत आयोजित
व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. शंकर पुजारी



महावीर ध्येय करिअर लॅब अंतर्गत पत्रकार दिन निमित्त वर्तमानपत्र क्षेत्रातील
रोजगाराची संधी या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे मा.चटर्जी,
प्र. प्राचार्या डॉ.उषा पाटील, डॉ.संदीप नलवडे व मान्यवर



ऑटोमोबाईल विभागामार्फत ऑटोमेनिया २०२५ या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना
राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष मा.श्री.राजेश क्षीरसागर, मा.मोहन गरगटे,
मा.अभिजीत कापसे, प्र.प्राचार्या डॉ. उषा पाटील व मान्यवर



ऑटोमोबाईल विभागामार्फत ऑटोमेनिया २०२५ या प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी
उपजिल्हाधिकारी मा. संपत खिल्लारीसो, मा.नरेंद्र देसाई,
प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील, समन्वयक डॉ. रविंद्र मिरजकर व मान्यवर



दुधाळ जनावरे संवर्धन वर्ष २०२४ निमित्त वनभाज्या व वनचारा प्रदर्शनाचे
उद्घाटन करताना माजी तांत्रिक अधिकारी, अखिल भारतीय चारा संशोधन केंद्र,
नवी दिल्ली मा.श्री.कृष्णाजी कोकाटे, संस्थेचे संचालक मा.नरेंद्र देसाई व मान्यवर.



जागतिक मृदा दिनानिमित्त आयोजित मार्गदर्शनात्मक व्याख्यान देताना
प्रमुख अतिथी मा. श्री. पृथ्वीराज पाटील, विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी



आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त गिर्यारोहक कु.ख़ुशी कांबोज हिचा सत्कार करताना डॉ. सुषमा रोटे, प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील व मान्यवर



गिर्यारोहणातून जीवनाचा आनंद हा स्वानुभव कथन करताना आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त गिर्यारोहक कु. खुशी कांबोज




देशभूषण नियतकालिक २०२४ च्या प्रकाशन प्रसंगी डॉ. सुषमा रोटे, मा. मोहन गरगटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, डॉ. प्रकाश कांबळे व मान्यवर




प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा अमृत महोत्सवा निमित्त करताना संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे, मा. मोहन गरगटे, प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवान व मान्यवर



पेटंट प्राप्त प्राध्यापक व विद्यार्थी  छात्र सैनिकांचा सत्कार समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे स्वागत करताना चेअरमन ॲड. के. ए. कापसे, मा. मोहन गरगटे व मान्यवर



मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. भरत नाईक यांचा सेवानिवृत्ती निमित्तसत्कार करताना सहकारी प्राध्यापक




मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सपत्नीक सत्कार करताना संस्थेच्या संचालिक डॉ. सुषमा रोटे, प्र.प्राचार्या डॉ.उषा पाटील व मान्यवर



हिंदी विभाग प्रमुख डॉ.राजेंद्र रोटे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सपत्नीक सत्कार करताना प्रा.डॉ.गोपाळ गावडे व सहकारी



महाविद्यालयाच्या उपाहारगृहाचे उद्घाटन करताना संस्थेचे संचालक मा. प्रदिप पाटील व सौ. सुनिता पाटील, डॉ. सुषमा रोटे, प्र.प्राचार्या डॉ. उषा पाटील व मान्यवर



RO (रिव्हर्स ऑस्मोसिस) प्रणालीद्वारे शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधेचे उद्घाटन करताना संस्थेचे संचालक ॲड. अभिजीत कापसे सोबत प्राध्यापक



स्त्रीयांचे आरोग्य या परिसंवादात उपस्थित महिला प्राध्यापक व विद्यार्थीनी



अंतर्गत तक्रार निवारण समिती मार्फत 'स्त्री भ्रूण हत्येविरोधी लघुनाटिका सादर करताना बी. ए. बी. एड. चतुर्थ वर्षाच्या छात्राध्यापिका



इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती देताना मा. श्रीमती सुनिता नेर्लीकर, श्री. अमित घवले, श्री. दत्तात्रय पाटील व मान्यवर



तेजस्विनी युवती मंच च्या वतीने मुलींना मार्गदर्शन करताना प्रिती सरदेसाई, प्रा. डॉ. श्रद्धा पाटील, डॉ. शैलेजा मंडले व मान्यवर



भगवान महावीर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या प्रथम पारितोषिक विजेत्या स्पर्धकाला बक्षीस देताना मा. गुणवंत रोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे व मान्यवर



मैत्रीण व्यासपीठ च्या वतीने मुलींना स्वयंसुरक्षा प्रात्यक्षिकाचे मार्गदर्शन करताना मान्यवर

# हिंदी विभाग

**भारतीय ज्ञानपीठ**



“मुझे बचाना है
एक एक कर
अपनी प्यारी दुनिया को
बुरे लोगों की नज़र है
इसे ख़त्म कर देने को”

– विनोद कुमार शुक्ल

---


विभागीय संपादक

**डॉ. राजेंद्र रोटे**

**प्रा. रविदास पाडवी**


123Freevectors

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शीर्षक | विधा | लेखक |
|---|---|---|---|
| १. | २०२८ के ओलम्पिक में अपने देश के लिए स्वर्ण पदक जीतना है-स्वप्निल कुसाळे | साक्षात्कार | संस्कृति श्रीकृष्ण राऊत |
| २. | जहाँ चाह, वहाँ राह-एक दृष्टिबाधित विद्यार्थी की प्रेरक यात्रा | आत्मकथात्मक | जकरिया अली इफ्तियार अली खान |
| ३. | एनसीसीःअनुशासन, आत्मविश्वास और लक्ष्य प्राप्ति की यात्रा | आत्मकथात्मक | श्वेता धोंडीबा गावडे |
| ४. | विनोद कुमार शुक्ल जी की साहित्यिक यात्रा | समीक्षा | संग्राम सतिश चव्हाण |
| ५. | ओशो और उनका साहित्य | समीक्षा | शुभंकर शशिकांत पाटील |
| ६. | नई दिशा में छः दिन का सफर | यात्रा साहित्य | दिक्षा दत्तात्रय काशिद |
| ७. | मेरी कोंकण की सैर | यात्रा साहित्य | रोहित तानाजी मोहिते |
| ८. | हमें मोबाईल चाहिए... | एकांकी | दीप शंकर कदम |
| ९. | हमारा गुनाह क्या है? | कहानी | अरिहंत सतीश भेंडवड़े |
| १०. | सरू | कहानी | सुजाता दुर्गाप्पा वैदू |
| ११. | अभिजात भाषा मराठी | सूचना लेख | दीप शंकर कदम |
| १२. | गाव या शहर : कहाँ है बेहतर जीवन? | वैचारिक | वर्षा घटग्याप्पा बोरगल्ली |


## पद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १. | मेरी माँ | श्वेता शिवाजी इंजुलकर |
| २. | स्वच्छ भारत अभियान | पूजा रामचंद्र पुंदे |
| ३. | ए दुनिया... | सीमा चौगुले |
| ४. | मेरा भारत देश | पूजा रामचंद्र पुंदे |
| ५. | कैसा कलियुग आया है। | सीमा चौगुले |
| ६. | माँ के अश्क | अयन अहमद मुल्ला |
| ७. | महावीर कॉलेज.... | ऐश्वर्या सुभाष गडगडे |
| ८. | एक तरफा वफादार प्यार | साहिल समीर मुजावर |
| ९. | तुम..... | दीप शंकर कदम |
| १०. | साथ ले जायेंगे | अजय डवरी |
| ११. | प्रेम... | श्रुति माने |
| १२. | तुम्हें याद है? | साहिल समीर मुजावर |
| १३. | कोल्हापुर | साक्षी अरुण साळोखे |
| १४. | क्याँ तुम्हें याद है? | साहिल समीर मुजावर |
| १५. | सिंधुमाई | अयन अहमद मुल्ला |

साक्षात्कार

# २०२८ के ओलम्पिक में अपने देश के लिए स्वर्ण पदक जीतना है-स्वप्निल कुसाळे



**संस्कृति श्रीकृष्ण राऊत**
बी.ए.बी.एड. ४

**(निशानेबाज स्वप्निल कुसाळे ओलम्पिक में ५० मीटर राइफल ३ पोजीशन इवेंट में ४५१.४ स्कोर कर पदक जीतने वाले पहले भारतीय निशानेबाज बने हैं। उन्होंने पेरिस २०२४ ओलम्पिक शूटिंग प्रतियोगिता में पुरुषों की स्पर्धा में कांस्य पदक जीतकर नया कीर्तिमान स्थापित किया। उनका सुश्री संस्कृति राऊत द्वारा लिया गया साक्षात्कार)**

**संस्कृति :** सर, सबसे पहले आपको नमस्कार और बहुत- बहुत बधाई कि आपने ओलम्पिक गेमों में कोल्हापुर के साथ हमारे देश का नाम रोशन किया। आपने विशेष रूप से कोल्हापुर, शाहू महाराजा की नगरी, जो कला और क्रीडा नगरी के रूप में सारी दुनिया में परिचित है, उसको पुन्हा एक बार गौरवान्वित किया। शुरुआत में मैं यह जानना चाहती हूँ कि ओलम्पिक में मेडल जितने के बाद आपकी पहली प्रतिक्रिया क्या थी?

**स्वप्निल कुसाळे :** मुझे लगता है कि मेरा सपना अभी पूरा नहीं हुआ है। अभी बहुत कुछ करना बाकी है। कांस्य पदक मेरे और देश के लिए बहुत मायने रखता है। इससे मुझे जीत का आनंद जरूर मिला है, लेकिन मे लक्ष्य अभी पूरा नहीं हुआ है। मेरा सपना ओलम्पिक खेलों में स्वर्ण पदक जीतना है। इसके लिए मैं कड़ी मेहनत कर रहा हूँ।

**संस्कृति :** आपका पारिवारिक माहोल कैसा रहा है?

**स्वप्निल कुसाळे :** मेरा जन्म राधानगरी तहसील के कांबळवाडी गाँव के एक सामान्य परिवार में हुआ। मेरे पिता अध्यापक हैं। मेरी माँ गाँव की सरपंच हैं। मेरे भाई की अभी पढ़ाई चल रही है। घर में किसी भी प्रकार की खेल परम्परा नहीं है। मेरे दादा, नाना, चाचा सब खेती करते थे। मूलतः हमारा परिवार किसान परिवार है। हमारे गाँव में आज भी पारंपरिक रूप से खेती की जाती है।

**संस्कृति :** आपके परिवार में किसी भी प्रकार की खेल की पृष्ठभूमि न होते हुए भी इस क्रीडा प्रकार की ओर आप कैसे आकर्षित हुए?

**स्वप्निल कुसाळे :** महाराष्ट्र के लगभग सभी जिलों में क्रीडा प्रबोधिनी कार्यरत है। मेरी शुरुआत मिरज क्रीड़ा प्रबोधिनी से हुई। प्रबोधिनी के माध्यम से मैं खेलों में आया। यह सन २००८ की बात है, जब प्रबोधिनी के द्वारा मेरी परीक्षा ली गई थी। मैंने एथलेटिक्स और निशानेबाजी दोनों की परीक्षा दी थी, लेकिन मेरा चयन निशानेबाजी में हुआ। यही से मेरे कैरियर की शुरुआत हुई। सन २०१२ तक मैंने क्रीड़ा प्रबोधिनी में प्रशिक्षण लिया। यहाँ पर कड़ी मेहनत की। उसके बाद मेरा चयन राष्ट्रीय संघ में हुआ।




**संस्कृति :** आपके खेल सफर की शुरुवात कैसी हुई?

**स्वप्निल कुसाळे :** मेरी पाँचवी से सातवीं तक की शिक्षा भोगावती पब्लिक स्कूल भोगावती, कोल्हापुर में हुई। शुरुआत से ही मुझे पढाई के साथ खेलों में रूचि थी। स्कूल के दिनों में मैं लगभग सभी खेलों में हिस्सा लेता था। फिर आठवीं कक्षा में मुझे मिरज में स्थित क्रीड़ा प्रबोधिनी में प्रवेश मिला। वहाँ प्रवेश लेने के बाद मुझे किसी एक गेम को चुनने को कहा गया। तब मैंने रायफल शूटिंग को चुना। फिर नौवीं कक्षा में मुझे भोसले मिलिटरी स्कूल, नासिक में दाखिला मिला। वहाँ से मेरी रायफल शूटिंग की शुरुआत हुई। मैंने वहाँ चार साल तक प्रशिक्षण लिया। प्रशिक्षण में कड़ी मेहनत की। इस दरमियान मेरे कोच और घरवालों का मुझे अच्छा सहयोग मिला। राष्ट्रीय स्तर की कई सारी प्रतियोगिताओं में मैंने हिस्सा लिया। इसके परिणामस्वरूप मुझे राष्ट्रीय खेलों में स्वर्ण पदक मिला। इसी बीच मुझे रेलवे की ओर से जॉब ऑफर आया कि क्या आप टी सी के रूप में काम करना चाहेंगे? मैं सन २०१५ से रेलवे में टिकट कलेक्टर के रूप में कार्यरत हूँ। इसलिए मेरे आदर्श भारतीय क्रिकेट टीम के कप्तान महेंद्रसिंह धोनी रहे हैं। उनकी बायोपिक मैं बहुत पसंद करता हूँ।

**संस्कृति :** हम जानते हैं कि किसी भी खिलाडी के लिए अंतरराष्ट्रीय स्तर तक पहुँचना बड़ी चुनौती रहती है। उसे अलग – अलग समस्याओं का सामना करता पड़ता है। आपको खेल कैरियर में सबसे ज्यादा किन समस्याओं का सामना करना पडा?

**स्वप्निल कुसाळे :** आम तौर पर हर खिलाडी को अपने कैरिअर में अलग – अलग प्रकार की समस्याओं से गुजरना ही पड़ता है। यह क्षेत्र ही चुनौतियों से भरा है, जहाँ आपको हर समय अपने आपको साबित करना पड़ता है। मेरे लिए सबसे बड़ी चुनौती टॉन्सिल की चोट थी। इसका बार-बार इलाज कराना पड़ता था। स्वाभाविक रूप से इसका मेरे खेल पर भी असर पड़ता था। दूसरी बात रायफल शूटिंग थोडा महँगा खेल है। इसके साधन उतने सस्ते नहीं हैं, जिसे मैं सहज खरीद सकता । साथ ही इस खेल में मानसिक रूप से भी मजबूत रहना पड़ता है और दबाव की परिस्थितियों का सामना करना एक चुनौतीपूर्ण कार्य रहता है। मैंने साहस और दृढ़ संकल्प से इन कठिनाइयों का सामना किया। ओलम्पिक जैसी वैश्विक प्रतियोगिताओं का दबाव तो अलग ही होता है। वहाँ आपको सौ प्रतिशत अपनी क्षमता को दिखाना पड़ता है। इसके लिए शारीरिक और मानसिक रूप से तंदुरुस्त रहना महत्त्वपूर्ण होता है।

**संस्कृति :** आपकी तैयारी कैसी रहती है और मनोबल बनाये रखने के लिए आप क्या करते हैं?

**स्वप्निल कुसाळे :** मैं निशानेबाजी की तैयारी के लिए नियमित और अनुशासित अभ्यास करता हूँ। मैं रोज नियमित रूप से प्रॅक्टिस करता हूँ। सुबह जल्दी उठकर ध्यान और योग करता हूँ। मानसिक एकाग्रता पर ध्यान देता हूँ, तकनीकी सुधार पर काम करता हूँ और फिटनेस और डाइट का खास ख्याल रखता हूँ। मनोबल बनाए रखने के लिए मैं सकारात्मक सोच अपनाता हूँ। छोटी-छोटी सफलताओं पर जश्न मनाता हूँ। अपने लक्ष्य पर केंद्रित रहता हूँ और परिवार और कोच का सहयोग लेता हूँ। खेल मेरा पैशन है। इसके लिए किसी भी परिस्थिति में मैं अनुशासन में रहता हूँ।

**संस्कृति :** सर, आपने ओलम्पिक खेलों से पहले राज्य, राष्ट्रीय और अंतरराष्ट्रीय स्तर की कई प्रतियोगिताओं में हिस्सा लिया है। कई सारे मैडल प्राप्त किए हैं। ओलम्पिक में मैडल आपके साथ देश के लिए भी बहुत बड़ी उपलब्धि रही है। आप इस यात्रा के बारे में बताये, जिससे हमारे युवाओं को प्रेरणा मिल सके?

**स्वप्निल कुसाळे :** कक्षा आठवीं में ही मैंने राइफल शूटिंग खेल को अपनाया। वहीं से मैंने इस खेल में देश के लिए ओलम्पिक मैडल जितना अपने जीवन का लक्ष्य बनाया था। इसके लिए मैंने कभी भी अभ्यास में कोई कमी नहीं छोड़ी और निरंतर अभ्यास करता रहा। इसके साथ ही मैंने मेडिटेशन और नियमित प्रशिक्षण जारी रखा। जिन प्रतियोगिताओं में मैं हिस्सा लेता था, उनमें मैंने पूरा ध्यान और एकाग्रता बनाए रखी। मैंने हमेशा यही सोचा कि मुझे अपने देश के लिए पदक जीतना है लेकिन यह सपना हकीकत में लाना कितनी बड़ी चुनौती है, इसका मुझे एहसास था। इसके लिए ओलम्पिक खेलों से पहले राष्ट्रीय और अंतरराष्ट्रीय स्तर की प्रतियोगिताओं में अपनी क्षमताओं को दिखाना आवश्यक था।

मैंने तिरुवनंतपुरम में ६१ वीं राष्ट्रीय चैम्पियनशिप में ५० मीटर राइफल थ्री पोजिशन प्रतियोगिता में स्वर्ण पदक जिता है। साथ ही ५० मीटर राइफल प्रोन प्रतियोगिता में ओलम्पिक पदक विजेता गगन नारंग और चैन सिंह से आगे रहते हुए, तुगलकाबाद में आयोजित ५९ वीं नेशनल शूटिंग चैम्पियनशिप भी जीती थी। अपने हिरो गगन नारंग के खिलाफ प्रतिस्पर्धा करना मेरे शूटिंग करियर के सबसे यादगार पलों में से एक है। इसके बाद कुवैत में सन २०१५ एशियन शूटिंग चैंपियनशिप में ज्युनियर वर्ग में ५० मीटर राइफल प्रोन प्रतियोगिता में स्वर्ण पदक जीता था। सन २०२२ में काहिरा में हुई वर्ल्ड चैम्पियन प्रतियोगिता में चौथे स्थान पर रहने के बाद मुझे ओलम्पिक का कोटा मिल गया। सही मायनो में यही से मेरी ओलम्पिक की यात्रा शुरू होती है।




- However, poorly structured insurance may encourage moral hazard, where banks take excessive risks assuming the government will bail them out.

**Strengths of the Paper**

This article offers a clear and simple exposition of complex financial concepts. It also addresses real-world relevance, connecting theory to historical and modern banking crises. Importantly, it suggests policy implications and provides practical solutions to prevent bank runs.

The author also makes readers aware of the model's limitations. For instance, the model assumes rational behavior, but real-world depositors may act unpredictably. It also does not fully consider external economic shocks that may trigger runs.

A notable feature of the article is its use of historical examples, such as the Great Depression, where bank runs severely disrupted the economy.

Overall, this paper is a must-read for anyone studying banking, financial stability, or monetary policy. It provides a timeless foundation for understanding modern financial crises and banking regulations.

•

# Article Review




**Manjiri Divate**
**Jashan Dhillon**
B.A. II

The article reviewed, titled "Bank Runs, Deposit Insurance, and Liquidity", was published in the Journal of Political Economy in 1983 (Vol. 91, No. 3, pp. 401–419) by the University of Chicago. It was written by Douglas W. Diamond and Philip H. Dybvig, recipients of the Sveriges Riksbank Prize in Economic Sciences in Memory of Alfred Nobel (2022).

This seminal paper presents a theoretical framework to understand the causes and economic consequences of bank runs, and how financial tools like deposit insurance can help prevent such crises. The authors explain that a bank run occurs when mass withdrawals happen due to a loss of depositor confidence, potentially leading to the collapse of banks that are otherwise financially sound.

In this article, Diamond and Dybvig provide a clear explanation of how banks function. More importantly, the article not only analyzes the strengths of their model-such as empirical support, theoretical clarity, and policy relevance-but also addresses its limitations, including assumptions of rational behavior, neglect of moral hazard, and the lack of market-based alternatives.

The model demonstrates that liquidity transformation-converting illiquid assets into liquid demand deposits-introduces fragility into the banking system. Since banks do not hold enough cash to meet all deposit withdrawals at once, they are vulnerable to liquidity crises. The model outlines two equilibria:

- A stable equilibrium, where confidence is maintained and only those who need funds withdraw.
- An unstable equilibrium, where loss of confidence triggers mass withdrawals and eventual bank failure.

The existence of multiple equilibria means that external shocks-such as rumors about a bank's health or abrupt economic policy changes-can shift the system from stability to crisis, making bank runs unpredictable and hard to manage.

**Impact of Deposit Insurance**

The article explores both the positive and negative effects of deposit insurance:

- **Positive:** Properly designed deposit insurance assures depositors that their funds are safe, even if a bank fails, eliminating the incentive for mass withdrawals. This allows banks to continue performing their critical role in liquidity transformation.
- **Negative:** Poorly structured insurance schemes may create moral hazard, where banks take excessive risks, believing they'll be bailed out by the government.

This article forms the core of the Diamond-Dybvig model, which was a major reason behind the awarding of the Nobel Prize. It also provides practical policy implications such as:

- Implementation of deposit insurance,
- The role of the central bank as the lender of last resort, and
- Suspension of convertibility as a temporary measure during crises.

This article offers a theoretical foundation for understanding bank runs and the role of deposit insurance in maintaining financial stability. The insights are highly relevant to contemporary banking regulation and economic policymaking.

While the model emphasizes the need for government intervention to prevent liquidity crises, it also leaves room for further research on the down sides of safety nets and private-sector alternatives. Tools like deposit insurance, suspension of convertibility, and central bank intervention are highlighted as mechanisms to manage the risks of bank runs and ensure economic stability.

Key Concepts

Causes of Bank Runs

Bank runs are not necessarily caused by fundamental weaknesses but by self-fulfilling expectations. If depositors believe others will withdraw, they too will rush to withdraw their funds, triggering a run.

- Panic-driven behavior forces banks to liquidate long-term assets at a loss.
- This reduces economic efficiency and heightens financial instability.
- The panic can spread, threatening the broader financial system.

**Liquidity Transformation**

Banks convert long-term, illiquid assets (like loans) into liquid liabilities (like deposits). This process is essential for economic activity but introduces vulnerability.

Analysis

Strengths

- Theoretical Rigor and Clarity: The model is mathematically sound and provides a logical explanation of bank runs and liquidity risk.
- Policy Relevance: Offers insights crucial to bank regulation and monetary policy. The ongoing debate over deposit insurance continues to inform central banks.
- Empirical Evidence: Events like the Great Depression and the 2008 financial crisis support the model's predictions about confidence loss leading to systemic failures.

**Weaknesses**

- Assumptions: The model assumes riskless investment technologies, not reflecting the real-world complexity of modern banking, where institutions hold risky asset portfolios.
- Neglect of Moral Hazard: It underestimates the risk of banks taking undue risks under the belief that they will be bailed out.
- Lack of Market-Based Alternatives: The article does not consider private insurance, transparency incentives, or other market-based tools that could help prevent bank runs.

**Policy Suggestions**

1. Deposit Insurance Implementation

- Well-designed schemes can eliminate fear-driven withdrawals.
- Must avoid encouraging excessive risk-taking.
- Regulatory oversight is necessary—ensuring banks maintain adequate capital and perform regular stress testing.

**2. Lender of Last Resort Function**

- Central banks must provide emergency funding to solvent yet temporarily illiquid banks.
- This support should be timely but not open-ended, to prevent misuse by risk-prone institutions.

**3. Suspension of Convertibility**

- Temporarily halting withdrawals during crises can prevent panic-induced failures.
- However, this must be carefully managed, as it can reduce public trust if overused or poorly communicated.

**Conclusion**

This foundational study offers critical insights into the dynamics of bank runs and the essential role of deposit insurance in preserving financial stability. It remains relevant in guiding modern financial regulation and crisis management. While emphasizing the value of government intervention, the article also invites further research into the unintended risks of such interventions and explores the need for private-sector innovations.

By addressing both the strengths and limitations of the Diamond-Dybvig model, the article underscores the need for balanced financial regulation, which promotes stability without encouraging recklessness. The continued relevance of this work illustrates its lasting importance in shaping a sound and resilient banking system.

•

# Collected Quotes of Banu Mushtaq Winner of The International Booker Prize 2025

**Ashish Sutar**
B.A.III

## Heart Lamp wins the International Booker

- Banu Mushtaq, an Indian Muslim woman and writer, has won the 2025 International Booker Prize for her Kannada short story collection Akashavani, translated into English as The Heart Lamp by Deepa Bhasthi.
- The stories explore the lives of Muslim women, Dalit women and others at the margins, address-ing caste, gender, religion, violence, and survival.
- Originally published in Kannada in 2005, this is the first Kannada work and the first translation by an Indian Muslim woman to win the prize. The English edition was published by Tilted Axis Press.

## On Feminism

My feminism seeps into the language that I use. An elephant filled with sexual desire is uncontrollable, and is hell-bent on getting what it wants. Men can be like that sometimes.

## Taj Mahal

"If I were an emperor, I would have built a palace to put even the Taj Mahal to shame, and call it Shaista Mahal."

- Heart Lamp: Selected Stories

## About Her

"The nerves in both temples throbbed, her hot head felt like it would burst, and the veins at the back of her neck threatened to snap at any time."

- Heart Lamp: Selected Stories

## On Feminism

My feminism seeps into the language that I use. An elephant filled with sexual desire is uncontrollable, and is hell-bent on getting what it wants. Men can be like that sometimes.

## On Writing

I had to learn to write all over again. I had to practise like a baby in the first standard.

## Fireflies

This moment feels like a thousand fireflies lighting a single sky – brief, brilliant and utterly collective.

# रंगचित्र

हर्षवर्धन बेडेकर
बी.ए. ३

कलादालन









# रेखाचित्र

रजिन आरिफ काझी
बी. ए. बी. एड. भाग १






# फोटोग्राफी





संस्कार सचिन माळी
बी.ए.भाग १



अंकुश आनंद गाडी
बी.ए. १





सृष्टी वेदपाठक
बी.ए. २

# स्केचोग्राफी







**सृष्टी वेदपाठक**
बी.ए. २

# Post Graduate Section



*The good life is a process, not a state of being.*
*It is a direction, not a destination.*
*- **Carl Rogers***

Section Editor
**Dr. Suresh Sankpal**

# Index

**मराठी विभाग**


| | | |
|---|---|---|
| धनिक असावा.... तर असा ! | कथा | प्रतीक पाटील |
| तुमचं, आमचं, आपलं प्रिय मानसशास्त्र | माहितीपर लेख/वैज्ञानिक | प्रतीक पाटील |
| स्मृती सुधार तंत्रे | माहितीपर लेख/वैज्ञानिक | प्रतीक पाटील |


**English Section**


| | | |
|---|---|---|
| The Unsung Warrior: A Mother's Struggles and Sacrifices | Informative | Jui Sadvilkar |
| The effect of mobile screen exposure on the development of virtual autism symptoms among college students | Research Article | Nitin Sambhaji Khade |

# धनिक असावा.... तर असा !



**प्रतीक पाटील**
एम. ए. १

पैसा आल, की माणसाचा माज वाढतो असं म्हणतात, पण हे अनेकांना लागू होत नाही. भारतातल्या धनिष्ठ व्यक्तीपैकी एक, श्रीराज ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज चा मालक, जगातली प्रत्येक गोष्ट विकत घेता येईल, इतकी संपत्ती असून सुद्धा स्वतःच्याच गोष्टी इतरांना देणारा; उदार आभाळाच्या छातीचा, तीस वर्षांचा उत्साही उद्योजक म्हणजे श्रीराज सरंजामे.

सोमवारचा दिवस होता सकाळी दहाच्या सुमारास श्रीराज त्याच्या एका महत्त्वाच्या बिजनेस डील साठी मुंबईला जात होता, इतका मोठा बिझनेस मॅन बाय रोड प्रवास करणार, म्हणजे सुरक्षिततेची व्यवस्था तर असणारच! मागे चार गाड्या पुढे चार गाड्या मधे श्रीराजची गाडी अशी विशिष्ट रचना केलेली होती. सुरक्षेच्या कारणावरून अनेकदा गाड्या मागेपुढेही व्हायच्या, सामान्य माणसाचे डोळे दीपवणारं दृश्य होतं. डायमंड मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल पासून पुढे जात असताना अचानक एक मुलगा गाडी समोर आला, समय सूचकता दाखवत चालकाने ब्रेक मारला, मागोमाग इतरही गाड्या थांबल्या, सुदैवाने अपघात टळला.

पहिल्याच गाडीतला एक गार्ड उतरून त्या मुलाला म्हणाला अरे वेडा झाला आहेस का तू? सायब आमच्या घरी गॅस टाकीचा स्फोट झाला, मायला खूप भाजलंय तिला लगीच दवा-पानी कराय पाहिजे सायब, आमच्याकड पैक नाहीत, म्हणून आम्हाला दारातही उभं करून घेतलं नाही, सेवाभाव तर सोडाच! माझी माय वेदनेनं तडफडत हाय मी काय करू सायब? माझी मदत करा सायब, माझ्या मायचा जीव वाचवा साएब! बाजूला हो, साहेबांची खूप महत्त्वाची बिझनेस डील आहे त्यांच्याकडे वेळ नाही गार्ड उत्तरला. मुलगा गार्ड समोर गयावया करत होता, हे पाहून श्रीराज स्वतः गाडीतून उतरले तुम्ही उतरू नका सर, तुमचं उतरण सुरक्षित नाही. त्या मुलाला आम्ही बघतो, आपल्याकडे वेळही खूप कमी आहे, जर आपण मिटींगला वेळेवर पोहोचलो नाही तर ही डील होणार नाही. श्रीराजचा पीए म्हणाला व त्याने पहिल्या गाडीतील गार्ड ला फोन लावला. गार्डने मुलाची कैफियत सांगितली, हे ऐकून क्षणाचाही विलंब न करता श्रीराज म्हणाला मीटिंगमध्ये येण्यास विलंब होईल असे पुढे कळवा. विलंब झाला तर डील कॅन्सल होईल सर डील कॅन्सल झाली तरी चालेल श्रीराज म्हणाला. सर डील कॅन्सल झाली तर आपले ३००० कोटींचे नुकसान होईल तीन लाख कोटींचं नुकसान झालं तरी चालेल प्रीतम, पण त्या आईचा जीव वाचला पाहिजे!

श्रीराज चालत त्या मुलापाशी गेला, हात धरून त्या मुलाला उठवलं आणि थेट चालत इस्पितळात शिरला. मागो-माग त्याचा सुरक्षारक्षक आणि 'पीए' प्रीतम ही आला.

पायरीवर उपचाराविना वेदनातूर होऊन थरथरत असलेल्या आईची विवंचना श्रीराजला बघवत नव्हती, तो रागात चौकशी कक्षात जाऊन ओरडला तुमच्या इस्पितळाच्या पायरीवर थरथरत पडलेल्या आईचा आवाज तुम्हाला ऐकू येत नाही? तुमचं काळीज जनावराचं आहे, की दगडाचं? ए कोण तू? इथे रोज असले १०० भिकारडे येतात, तुला त्या बाईची इतकी दया येत असेल ना, तर घेऊन जा त्या बाईला सरकारी हॉस्पिटलमध्ये, हे हॉस्पिटल गरिबांसाठी नाही; अशी पाटी वाचली नाहीस का बाहेर? तेथील मॅनेजर म्हणाला. श्रीराज शांतपणे त्याच्या पीए च्या कानात काहीतरी पुटपुटला, आजूबाजूला लोक जमले होते, श्रीराजच्या साध्या वेशभूषेवरून तो इतका श्रीमंत माणूस असेल असं कोणालाही वाटत नव्हतं. प्रीतम (पीए) ने कोणालातरी फोन केला फक्त पाच सेकंद काहीतरी बोलला आणि म्हणाला साहेब काम झालं. समोरच एक मोठा टीव्ही लावलेला होता त्यावर न्यूज चायनल सुरू होतं, अचानक त्यावर एक न्यूज आली आत्ताच मिळालेल्या अपडेट नुसार, डायमंड नेटवर्क ऑफ हेल्थ केअर सर्विसेस ला श्रीराज सरंजामे यांनी साडेतीन हजार कोटींमध्ये विकत घेतलं! श्रीराज चा फोटो टीव्हीत पाहून त्या मॅनेजरला घाम फुटला, तो थरथरू लागला, मला नोकरीवरून काढू नका म्हणून विनंती करू लागला श्रीराज मोठ्या आवाजात म्हणाला आज आणि आत्ता पासून डायमंड नेटवर्कच्या कोणत्याही हॉस्पिटलमध्ये आलेल्या रुग्णाला, त्याच्या आर्थिक समस्येमुळे उपचारांपासून वंचित ठेवल जाणार नाही. जमलेल्या सर्व लोकांनी जोरदार टाळ्या वाजवल्या. श्रीराजने स्वतः त्या पायरीवरील माईंना आत घेतलं आणि डॉक्टरांना सांगितलं या आईवर तातडीने योग्य तो इलाज करा सर्व बिल मी भरेन! हे ऐकून त्या माईच्या डोळ्यात अश्रू आले.

चोहीकडे आनंदी वातावरण होतं, आज आपल्याकडून कोणाचा तरी जीव वाचलेला आहे या भावनेतून श्रीराज कृतकृत्य झाला होता. तितक्यात प्रीतमला एक फोन आला जो व्यक्ती वक्तशीर नाही त्याच्याशी बिजनेस करण्यात आम्हाला तीळ मात्रही रस नाही आम्ही डील कॅन्सल करतोय प्रीतम लहान आवाजात म्हणाला सर डील कॅन्सल झाली होऊ दे प्रीतम, मी जे केलं ते चांगल्यासाठीच होतं श्री राज उत्तरला. त्याने मुंबईला न जाताच घरी परतण्याचं ठरवलं. श्रीराजच त्याच्या आईवर खूप प्रेम होतं, इतकं की तिच्यासाठी तो काहीही करण्यास तयार असायचा. त्याने झालेला सगळ्या प्रकार त्याच्या आईला सांगितला, ते ऐकून तिच्या डोळ्यात अश्रू आले. ती म्हणाली तू आज एक आई वाचवली आहेस, ईश्वर तुझं नुकसान होऊ देणार नाही.

मंगळवारचा दिवस उजाडला, आज जिकडे-तिकडे फक्त श्रीराज दिसत होता. अनेक वृत्तपत्रांनी ही बातमी पहिल्या पानावर ठळक छापली होती. 'गरीब आईचा जीव वाचवण्यासाठी हॉस्पिटलच घेतले विकत!', 'आता आर्थिक अडचणीमुळे उपचारात अडथळे येणार नाहीत, डायमंड नेटवर्क ऑफ हेल्थ केअर सर्विसेस चे नवे मालक श्रीराज सरंजामेंचा निर्धार!' अशा अनेक बातम्या टीव्ही-रेडिओवर येत होत्या. श्रीराज चा हॉस्पिटल मधील व्हिडिओ ही व्हायरल झाला

होता, वेगवेगळ्या न्यूज चॅनल वरती अनेकदा ती क्लिप दाखवून श्रीराजच कौतुक केलं जात होतं. 'श्रीमंत सरंजामेंच्या श्रीमंत हृदयाचं दर्शन आज झालं!' असे हेडिंग सर्वत्र दिसत होते. हा आनंद कमीच होता तितक्यात, आनंद द्विगुणित करणारी एक बातमी आली. प्रीतम म्हणाला काल जी डील कॅन्सल झाली होती सर, त्या पार्टीचा फोन आला होता. काल अचानक डील कॅन्सल केल्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. तुमच्यासारख्या संवेदनशील माणुसकी जपणाऱ्या व्यक्ती सोबत बिजनेस करण्याची संधी मिळण, हे आम्ही आमचं भाग्य समजतो. काल झालेल्या चुकीची भरपाई म्हणून आम्ही तुमच्यासोबत आजीवन पुरवठादार करारावर स्वाक्षरी करत आहोत, सोबतच साडेसात लाख कोटी रुपयांची बिजनेस डील साईन करण्यास उत्सुक आहोत, असे ते म्हणाले.

बघ मी तुला म्हणालो होतो ना, जे होतं ते चांगल्यासाठीच होतं. श्रीराज म्हणाला.

●



माहितीपर लेख/वैज्ञानिक

# तुमचं, आमचं, आपलं प्रिय मानसशास्त्र



**प्रतीक पाटील**
एम. ए. १

मानसशास्त्राच्या संदर्भात जनसामान्यांमध्ये अनेक मतमतांतरे आढळून येतात. कोणी म्हणतं मानसशास्त्राचे विद्यार्थी मनाचा अभ्यास करतात, कोणी म्हणतं अशा व्यक्ती समोरच्याच्या मनातलं ओळखू शकतात, त्या अत्यंत शांत व समजूतदार असतात वगैरे वगैरे... असे अनुभव तुम्हालाही आलेच असतील. अनेक विद्यार्थ्यांना मानसशास्त्र हा विषय अत्यंत कठीण वाटतो, तर अनेकांना तो विषय स्वतःच्या आयुष्याशी जुळताना दिसतो. कोणी आवड म्हणून मानसशास्त्र शिकतो तर कोणी त्यात करिअर करायचे म्हणून.

एखाद्या विषयाला खोलवर समजून घ्यायचं म्हटलं की, तो विषय व्यक्तीवर, समूहावर, समाजावर, देशावर आणि एकूणच जगावर त्याच्या वेगवेगळ्या पैलूंनी काय? कसा? आणि किती प्रमाणात प्रभाव पडू शकतो? हे जाणून घेणं अत्यंत महत्त्वाचं ठरतं. खरंतर मानसशास्त्र अभ्यासण्याचा हा एक दीर्घकालीन दृष्टिकोन म्हणावा लागेल. पण विषयाची व्याप्ती आणि व्यक्तिगत मर्यादा लक्षात घेता मी केवळ व्यक्तिगत प्रभावासंदर्भात चर्चा करणं उचित समजतो.



आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये, बदलत जाणाऱ्या आव्हानात्मक परिस्थितीशी जुळवून घेताना मानसशास्त्र व्यक्तीवर कसा सकारात्मक प्रभाव पाडतं, किंवा मानसशास्त्राच्या अभ्यासातून व्यक्ती कशी अधिकाधिक विवेकी होऊ शकते हे स्पष्ट करणं हा या लेखाचा प्रमुख उद्देश आहे. चला तर मग सुरुवात करूया, व्यक्तीच्या जन्मापासूनच.

**बाल्यावस्था**

**मनोलैंगिक विकासाचे टप्पे** (Psychosexual stages)

तुम्हाला कधी असा प्रश्न पडला की, ० ते १ वर्षाच लहान बाळ प्रत्येक गोष्ट तोंडातच घालण्याचा का प्रयत्न करत असतं? किंबहुना अनेकांना बोटांची नखे खाणे, दात वाजवणे, सतत काहीतरी चावत राहणे, अशा सवयी का जडतात?

शरीरात कॅल्शियमची कमतरता असल्यास, रक्त कमी असल्यास अशा सवयी लागतात असा एक विचारप्रवाह जनसामान्यांमध्ये प्रचलित आहे. परंतु मानसशास्त्रीयदृष्ट्या विचार करता, सुप्रसिद्ध शरीर शास्त्रज्ञ 'सिग्मंड फ्राईड' यांनी मांडलेल्या पाच मनोलैंगिक विकासाच्या अवस्थांमधील (Psychosexual stages) शून्य ते एक वर्ष हा काळ पहिल्या अवस्थेचा म्हणजेच मुख-सुखाचा आहे. या काळात बाळ मुखाद्वारे सुखाचा अनुभव घेत असतं. थोडक्यात, यातून त्याला लैंगिक आनंद मिळत असतो, यामध्ये जर अडथळा आला, तर त्यास मोठे झाल्यावर बोटांची नखे खाणे, दात वाजवणे, सतत काहीतरी खात राहणे यांसारख्या सवयी लागू शकतात असं फ्राईड म्हणतो.

पुढे १ ते ३ वर्ष गुदावस्था, ३ ते ६ वर्ष ईडीपल अवस्था, ६ ते ११ वर्ष letency stage आणि शेवटी पौगंडावस्थेच्या प्रारंभिक काळातील जनन कामुकता हा मनोलैंगिक विकासाच्या अवस्थांमधला शेवटचा टप्पा आहे. वरील प्रत्येक अवस्थेतील समस्या सोडवण्यास किंवा परिस्थितीशी समायोजन साधण्यास अडचण आली असता भविष्यात व्यक्तीमध्ये वर्तन समस्या संभवते असे फ्रॉईड सांगतो. शिवाय ईडीपल अवस्थेत मुलगा बाबांचा द्वेष करू लागतो, तर मुलगी बाबांकडे आकर्षित होते असे तो म्हणतो. परंतु हे आजवर प्रयोगाने सिद्ध करता आलेले नाही. अर्थातच, त्याच्या या सिद्धांतासंदर्भात अनेक टीकात्मक मतमतांतरे आढळतात.

**इदम्, अहम् आणि परमअहम** (I'd, ego, super ego)

तुम्ही एखाद्या ३ ते ५ वर्षाच्या लहान मुलाला, खेळण्याच्या दुकानासमोर हट्टाने पाय आपटत रडताना पाहिलं आहे का? तो असा का वागत असेल बरे? कारण तो लहान आहे. अगदी बरोबर!

पण हाच मुलगा जेव्हा १५ वर्षांचा होतो, तेव्हा त्याला हव्या असणाऱ्या गोष्टींसाठी तो पाय आपटून रडत नाही. हा वर्तन बदल घडण्यामागे काय कारण असावे, शहाणपणा येणे, समजूतदार होणे, अशी अनेक उत्तरे मनात आली असतील तर ती योग्यच आहेत. परंतु आता आपण हे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेऊयात.

फ्राईडच्या मते, इदम्, अहम् आणि परमअहम हे तीन घटक आपल्या व्यक्तिमत्त्वाचे नियंत्रण करतात. या तीन घटकांना समजून घेण्यासाठी आपण एक सोपे उदाहरण घेऊयात.उदा.

१) एका स्मशानामध्ये पिंडीला कावळा शिवण्याचा विधी सुरू आहे..... मेलेल्या व्यक्तीला आवडणारे पदार्थ नैवेद्य म्हणून तिथे ठेवण्यात आलेले आहेत. यावेळी तिथे चिंकी नावाची एक मुलगीसुद्धा उपस्थित आहे. तिला नैवेद्यासाठी समोर ठेवलेले गुलाबजामून दिसतात. तिच्या तोंडाला पाणी सुटतं आणि ती पुढे येऊन, कोणताही विचार न करता, तात्काळ ते गुलाबजामून खाते.

या वर्तनाचे कारण म्हणजे चिंकी इदमच्या प्रभावाखाली आहे. इदम हा सुख तत्त्वावर काम करतो, परिणामांचा विचार न करता तात्काळ सुख मिळवण्याचा प्रयत्न करतो. व्यक्तीच्या भूक, तहान, अशा जैविक इच्छांवर इदमचा प्रभाव जास्त असतो. व्यक्तीच्या बहुतांश प्राणिज्य प्रवृत्तींसाठी इदम जबाबदार असतो. वरील उदाहरणांमध्ये गुलाबजामून खाण्याआधी चिंकीने जर असा विचार केला आणि गुलाबजामून खायचं टाळलं, तर तिच्यातल्या अहमने इदमला नियंत्रित केलं आहे असे म्हणता येईल.

मला भूक जरी लागली असली, तरी स्मशानामध्ये या परिस्थितीत नैवेद्यासाठी ठेवलेले ते गुलाबजामून, मी खाणे बरोबर आहे का? थोड्यावेळाने सगळे गेल्यावर, विधी संपल्यावरसुद्धा मी ते खाऊच शकते की!

तुम्हाला लक्षात आलं असेल अहम हा इदमला वास्तवाची जाणीव करून देऊन वर्तन नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत असतो.

वरील परिस्थितीत जर चिंकीच्या मनात लोक काय म्हणतील, आई-बाबा रागावतील, मी असं केलं तर ते नैतिकदृष्ट्या चुकीचं असेल का? असे विचार आले असते तर परम अहमचा सध्या तिच्या वर्तनावर जास्त प्रभाव आहे, असे म्हणता आले असते. व्यक्तीच्या प्रत्येक वर्तनावर या तीन शक्तींचा कमीअधिक प्रमाणात प्रभाव पडत असतोच.

बाळ जन्माला आल्यापासून ते अवघड अवस्थेच्या सुरुवातीपर्यंत इदम प्रभावी असतो, नंतर अहम त्यावर नियंत्रण मिळवतो. म्हणूनच पौगंड अवस्थेत व्यक्ती स्वतःबद्दल जास्त सजग बनते. पुढे अनुभवांमधून परम अहमचा विकास होत जातो.

वरील दोन संकल्पना समजून घेतल्या असता आपल्याला स्वतःबद्दलच्या किंवा आपल्या निकटवर्ती यांच्या वर्तनाची पार्श्वभूमी समजून घेण्यास मदत होते.

सिग्मंड फ्राईडच्या या दोन्ही संकल्पनांचा प्रत्यक्षात वापर करणं शक्य होत नसलं तरी, व्यक्तीच्या वर्तनाची पार्श्वभूमी समजून घेताना या दोन्ही संकल्पना महत्त्वाच्या ठरतात.

**पौगंडावस्था** (Adolescence)

वय वर्ष १२ पासून ते १८ पर्यंतच्या टप्प्याला पौगंडावस्था असे म्हणतात. याच टप्प्याला वादळाचे वय, धोक्याचे वय, बदलाचा काळ, गोंधळाचा काळ अशा अनेक नावांनी संबोधलं जातं. वेगाने होणारे शारीरिक, बोधनिक आणि जैव रासायनिक बदल हे या टप्प्याचे वैशिष्ट्य आहे.

NIMHANS ने २०१७ मध्ये केलेल्या अभ्यासामध्ये असे दिसून आले की, भारतातील चार पैकी एका पौगंड अवस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये डिप्रेशनची लक्षणे दिसून येतात. म्हणून याच वयात मानसशास्त्र शिकण्याची शिकवण्याची आणि स्वतःचं मानसशास्त्र समजून घेण्याची नितांत आवश्यकता असते.

याच काळात इदमचा प्रभाव कमी होऊन अहंकाराने त्यावर ताबा मिळवायला सुरुवात केलेली असते. परिणामी, व्यक्ती अधिक सजग, स्वतःच्या दिसण्याबद्दल अधिक संवेदनशील व काही वेळा आत्मकेंद्री बनते याची माहिती असणं किशोरांना फायदेशीर ठरू शकते.

भावनिक विवेक निर्माण करण्यास व स्वतःच्या तीव्र नकारात्मक भावनांचा, लोकोपयोगी विवेकी वर्तनाचे इंधन म्हणून वापर करणे मानसशास्त्राच्या अभ्यासातून आत्मसात करता येते.

**तारुण्य**

तारुण्यात व्यक्ती सामाजिक जीवनाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश करते. या टप्प्यावर व्यक्तीची भूमिका ही अचानक बदलताना दिसते. असे असले तरी मानसशास्त्राचा अभ्यास व्यक्तीला ताण मुक्त जगण्यास प्रेरित करू शकतो. अल्बर्ट एलिसने सांगितलेल्या विवेकनिष्ठ जीवनपद्धतीच्या माध्यमातून आयुष्यातील ताण व्यवस्थापित करणे सहज शक्य होते.

व्यक्ती निर्णय कसा घेते? व्यक्तीच्या निर्णयावर कोणत्या सामाजिक घटकांचा प्रभाव असतो? व्यक्ती समूहाचा दबाव कधी जुमानते व कधी जुमानत नाही अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मानसशास्त्राच्या अभ्यासातून मिळतात. विक्री कलेत मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी (फूट इन द डोअर) आणि (डोर इन द फेस) टेक्निक्स मानसशास्त्रावरच आधारित आहेत. प्रधानमंत्री मोदींनी २०१४ च्या निवडणुकीत वापरलेली टॅगलाईन 'अब अच्छे दिन आयेंगे' ही सखोल सामाजिक अभ्यासातून बनवण्यात आली होती, तिचा परिणाम आपण सर्वांनी पाहिलेलाच आहे.

आयुष्यातील नातेसंबंध बळकट करण्यासाठी सुद्धा मानसशास्त्राची मदत होते. मानसशास्त्राच्या अभ्यासातून व्यक्ती सहान भूतीपेक्षा सजगपणे गोष्टी न्याहाळायला व अनुभवायला सुरुवात करते.

व्यक्तीच्या जन्मापासून ते तारुण्यापर्यंत चर्चा केल्यानंतर असा प्रश्न पडतो की, मानसशास्त्र आणि अध्यात्माचा काही संबंध असेल का? मानसशास्त्राचा शास्त्र म्हणून उदय होण्यापूर्वी ग्रीक तत्त्वज्ञांनी 'आत्म्याचे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र' अशी या विषयाची व्याख्या केली होती.

जैन आणि बौद्ध तत्त्वज्ञानामध्ये आत्म शोधाला फार महत्त्व दिले आहे. अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह यांसारख्या तत्त्वांचा पुरस्कार केलेला आहे. जैन मुनिंमध्ये केशलोचन विधी दरम्यान प्रचंड आत्मसंयम पाहायला मिळतो. बुद्धांनी सांगितलेली चार आर्य सत्य व अष्टांग मार्ग अभ्यासला तर समजते की, व्यक्तीच्या मनाचा, भावनांचा व मानवी वर्तनातील असंख्य पैलूंचा त्यांनी किती खोलवर अभ्यास केलेला आहे. कदाचित मानसशास्त्र हीच अध्यात्माची सुरुवात असेल आणि बोधी हा त्याचा शेवट!

जनात मानसशास्त्र
मनात मानसशास्त्र
आयुष्याच्या प्रत्येक
क्षणात मानसशास्त्र
तुमचं आमचं आपलं
प्रिय मानसशास्त्र

•

# स्मृती सुधार तंत्रे



**प्रतीक पाटील**
एम. ए. १

- वाचलेलं लक्षात राहत नाही?
- खूप अभ्यास केलेल्या गोष्टी सुद्धा ऐनपरिक्षेत आठवत नाहीत का?
- तुम्हाला परीक्षेमध्ये चांगले मार्क मिळवायचे आहेत का?

जर या सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असतील तर हे प्रकरण तुमच्यासाठी खूपच उपयुक्त ठरेल. हे प्रकरण सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. टॉपर, मिडीयम, डिफरेंटलीएबल, आणि जे विद्यार्थी काठावर पास होत आहेत त्यांच्यासाठी सुद्धा. या सर्व लक्षात ठेवण्यासाठी किंवा स्मृती सुधारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या क्लुप्त्या तुम्ही इतरांकडून सुद्धा ऐकलेल्या असतील, मीही त्याच गोष्टींचा वापर करून परीक्षेत छान मार्क्स मिळवत असतो. आयुष्यात यशस्वी होण्याचा आणि तुमच्या परीक्षेतील किंवा शाळेतील गुणांचा काही एक संबंध नाही, या ठाम मताचा मी आहे. तशी अनेक उदाहरणे सुद्धा तुम्हाला इंटरनेटवर पाहायला मिळतील. पण समाजाची मानसिकता पाहता चांगल्या मार्गाने पास होणे याचं बर्डन विद्यार्थ्यांवर असतं, पालकांच्या अपेक्षा शिवाय स्वतःच्या अपेक्षा असतात. हे सर्व पार पाडण्यासाठी स्मृति सुधार तंत्रांचा वापर केला जाऊ शकतो. मी सांगितलेली स्मृती सुधार तंत्रे मीही कुणाकडून तरी किंवा स्व अनुभवावरून आत्मसात केलेली आहेत, स्वतःच्या आयुष्यामध्ये वापरलेली आहेत मला मोठ्या प्रमाणावर फायदा देखील झालेला आहे. यापैकी कोणतंही तंत्र मी स्वतः विकसित केलेलं नाही. मी कुणाकडून तरी शिकलो माझ्या अभ्यासामध्ये वापरलं, मला त्यातून फायदा झाला आणि आज मी ते तुमच्यापर्यंत पोहोचवणार आहे. या प्रत्येक पद्धतीला एक शास्त्रीय नाव आहे. पण ते नाव न देता मी गमतीशीर नावे देत आहे. या तंत्रांचा वापर जर तुम्ही दैनंदिन आयुष्यामध्ये करायला शिकलात तर तुम्हाला एखादी गोष्ट एखादी लिस्ट अनुक्रमे लक्षात ठेवण्यासाठी अधिकची मेहनत करावी लागणार नाही, वेळेची बचत होईल.

## १. संख्या आणि चित्र यांचं लग्न लावा पद्धत.

संख्या, जन्मतारीख, इतिहासातील साल अनुक्रमे सोप्या पद्धतीने लक्षात ठेवण्यासाठी उपयुक्त.

कल्पना करा, तुम्हाला दहा मित्र आहेत. त्यांची नावे ०,१,२,३,४,५,६,७,८,९ अशी आहेत. आता तुम्हाला यांच्यासाठी अनुरूप अशी बायको हुडकायला सांगितलं आहे. म्हणून तुम्ही तुमच्या मित्रांसाठी हायफाय मॉडर्न इंग्लिश बायका शोधायला सुरुवात करतात. अशावेळी तुम्ही मुद्दामहून मित्राच्या नावाशी त्याच्या होणाऱ्या पत्नीचं नाव जुळेल असं पाहता.

खाली दिल्याप्रमाणे

| मित्राचे नाव (संख्या) | अनुरूप जोडीदाराचे नाव (Rhyming words) |
|---|---|
| 1. One | Gun |
| 2. Two | Shoe |
| 3. Three | Tree |
| 4. Four | Door |
| 5. Five | Give |
| 6. Six | Chips |
| 7. Seven | Haven |
| 8. Eight | Jet |
| 9. Nine | Wine |
| 10. Ten | Hen |

**समजा आईने तुम्हाला बाजारला जायला सांगितलं आणि सामानाची लिस्ट दिली ती पुढील प्रमाणे.**

| अ.नं. | **भाजीचा प्रकार** | Quantity |
|---|---|---|
| १. | **पोकळा** | ½ kg |
| २. | **मेथी** | १ डझन |
| ३. | **केळी** | १ |
| ४. | **वांगी** | १ |
| ५. | **संत्री** | ½ डझन |
| ६. | **चवळी** | १ kg |
| ७. | **वटाणा** | ½ kg |
| ८. | **टोमॅटो** | १ kg |
| ९. | **कांदा** | २kg |
| १०. | **लसून** | २५०g |

**आता ही जर यादी तुम्हाला पाच मिनिटांच्या आत एकदम सोप्या पद्धतीने लक्षात ठेवायची असल्यास तुम्हाला अशी कल्पना करावी लागेल.**

| **अनुक्रमांक** | **बायकोचं नाव/रायमिंग वर्ड** | **भाजी** | **कल्पना अशी केली जाऊ शकते.** |
|---|---|---|---|
| १. | Gun | वांगी ½ kg | तुमच्या हातात बंदूक आहे, तुमच्यासमोर जिवंत वांग्यांच्या अनेक रांगा आहेत. वांग्यांना पांढरे छोटे छोटे हात पाय आलेले आहेत. आणि मग तुम्ही धाड एक गोळी मारता तेव्हा वळीतले सगळे वांगी अर्धे अर्धे होतात. |
| २. | Shoe | केळी १ डझन | तुम्ही तुमचं नवीन आणलेलं लाल रंगाचं १ नंबरच बूट तुमच्या हातात घेता, तुम्ही त्या बुटाला जवळ घेऊन त्याचा वास बघता, तितक्यात त्या बुटातून पिवळ्या रंगाचे भले मोठे केळी वेगाने बाहेर येतात. |
| ३. | Tree | मेथी | एकच पेंडी तुम्ही पाहता की, एका मोठ्या झाडाला भली मोठी मेथीची एकच लागलेली आहे. ती इतकी मोठी आहे की तिच्या वजनाने झाडही वाकत आहे. |
| ४. | Door | पोकळा | एक दरवाजा आहे त्या दरवाज्याला पोकळयाने सजवलेले आहे. पोकळ्याच्या लाल लाल देठा दरवाजावरून खाली सोडलेल्या आहेत. |

| अनुक्रमांक | बायकोचं नाव/रायमिंग वर्ड | भाजी | कल्पना अशी केली जाऊ शकते. |
|---|---|---|---|
| ५. | Give | **संत्री १ डझन** | तुम्ही बारा रुपयांचे ऑरेंज चॉकलेट विकत घेता. आणि तुमच्या पॅन्टच्या खिशात ठेवता. तितक्यात ते चॉकलेट मोठ्या मोठ्या संत्री फळांमध्ये रूपांतरित होऊन तुमच्या दोन्ही खिशात मधून खाली पडू लागतात. मग तुम्ही ते उचलून एका भिकाऱ्याला देता. |
| ६. | Vix | **चवळी** | तुम्ही डॉक्टर आहात. तुमच्याकडे चालत चालत चवळी येते आणि म्हणते मला सर्दी झालेली आहे, म्हणून तुम्ही तिला विक्स लावता. अगदी चवळीला विक्सच्या डब्यात लोळवतात. त्यात तुमची अर्धी डबी संपली ! |
| ७. | Haven | **वाटाणा** ½ kg | तुम्ही एका निर्जन रस्त्यावर चालत आहात. खूप भूक लागलेली आहे. अशावेळी अचानक वरून एक वटाण्याची शेंग पडते. त्यात एकच वटाणा असतो, त्यातून तुम्ही तो वटाणा बाहेर काढता, तितक्यात अचानक तो वटाणा फुटबॉलच्या आकाराएवढा मोठा होतो. आणि तुम्ही म्हणता हा आता माझं पोट भरेल. |
| ८. | Jet | **टोमॅटो १ किलो** | तुम्ही चालत जात आहात तितक्यात आकाशामध्ये एक एअर जेट तुम्ही पाहता, ज्यातून टोमॅटो खाली टाकले जात अ टाकले जात आहेत. तितक्यात एक टोमॅटो तुमच्या अंगावर पडतो, तो इतका मोठा असतो की तुम्ही खाली दबले जाता. |
| ९. | Wine | **कांदा २ किलो** | तुम्ही टीव्हीवर एक जाहिरात पाहता, धूम्रपान सेहत के लिए, आरोग्यदायी है। कांदा दोन्ही हातात दोन वाईनच्या बॉटल्स घेऊन म्हणत आहे. |
| १०. | Hen | **लसून २५० ग्रॅम** | कल्पना का, तुमच्याकडे एक अशी कोंबडी आहे जी अंडे देण्याऐवजी मोमोज च्या आकाराचे मोठे मोठे पांढरे लसूण देते. त्यावर '२५०स' असा लासा असतो. |

१. एक या अंकासाठी वापरला गेलेला रायसिंग वर्ड कोणता?

२. यादीमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असणारा घटक कोणता?

३. यादीतील टोमॅटो कितव्या क्रमांकावर आहे?.

अगदी बरोबर।

अशा पद्धतीने जर तुम्ही कल्पना केली, तर वाचून पूर्ण होईपर्यंत तुम्हाला ही यादी मुखोद्गत झाली असेल. अशा पद्धतीने कल्पना शक्तीच्या मदतीने कमी वेळेत व कमी कष्टात तुम्ही अनेक गोष्टी लक्षात ठेवू शकता. या तंत्राची काही वैशिष्ट्ये व मर्यादा पुढील प्रमाणे...

- काहीतरी अद्भुत, चमत्कारिक, अनोखी कल्पना करा कारण अशा गोष्टी आपल्याला लगेच लक्षात राहतात.
- कल्पनेमध्ये वस्तूंचा आकार सुद्धा प्रचंड मोठा वास्तविक आकारापेक्षा वेगळा असू द्या.
- एका अंकासाठी एक रायमिंग वर्ड व एक कृती ठरवून टाका ती बदलू नका. उदाहरणार्थ १ = gun- ती ____________ ला गोळी मारेल. डॅश डॅश च्या जागी यादी मधील पहिला घटक येईल.
- प्रत्येक वेळी नवीन कल्पना करण्याची गरज नाही.
- दहापेक्षा जास्त गोष्टींना एकाच वेळी लक्षात ठेवणे कठीण होऊन जाते. तरीही तुम्ही यापुढेही लक्षात ठेवू शकता हे तुमच्या क्रिएटिव्हिटी वर अवलंबून आहे.

याच पद्धतीचा वापर करून तुम्ही अंकही लक्षात ठेवू शकता. यासाठी खाली दिलेल्या स्टोरी मेथड चा वापर करावा. उदाहरणार्थ

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 7 | 1 | 4 | 8 | 6 | 2 | 5 | 3 | 0 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Wine | Haven | Gun | Door | Jet | Vix | Shoe | Give | Tree | Hero |

आता अंकांच्या खाली दिलेल्या शब्दांपासून कथा तयार करावी.. ती तुम्ही तुम्हाला हवी तशी करू शकता. मी केलेली कथा पुढीलप्रमाणे.... एक माणूस Wine पितो त्याला Haven मध्ये गेल्यासारखं वाटतं अचानक तो Gun घेऊन Door वरती गोळी झाडतो. दरवाज्याच्या पाठीमागे Air Jet असतं त्यामध्ये एक मोठा Vix चा डबा बसलेला असतो. त्या डब्याला राग येतो आणि तो त्या माणसाच्या अंगावर धावून जाणार हे पाहून Shoe Give त्याला Tree चा बुंदा देतो, हे सगळं पाहून तिथे क्शी येतो आणि अनर्थ टाळतो! तुम्ही माझ्याही पेक्षा चांगली सर्जनशील कथा बनवू

शकता. इतिहास विषयातील तारखा लक्षात ठेवण्यासाठी सुद्धा या पद्धतीचा वापर केला जाऊ शकतो. १९७५ हे उदाहरण घेतले तर 1 = Gun, 9= Wine, 7= Haven, 5 = give./ वस्तू म्हणून Hive वापरले तरी चालेल. आता Gun-Wine-Haven-Hive यावरून छोटीशी काल्पनिक कथा किंवा वाक्य बनवून ते लक्षात ठेवू शकता.

उदाहरणार्थ : Gun ने Wine ग्लास वर गोळी मारली, तिचा आत्मा Haven मध्ये गेला. ती गोळी पुढे जाऊन Hive ला सुद्धा लागली. मग मधमाशा बंदुकीला (Gun) खूप खूप चावल्या. बंदुकीला चार दिवस हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावं लागलं. अशा काल्पनिक, भावनिक, युनिक छोट्या छोट्या कथा बनवून मोठे नंबर सुद्धा आपण लक्षात ठेवू शकतो.

**२. स्टोरी मेथड**

कथा आपल्या लगेच लक्षात राहतात, लहानपणी आजीने सांगितलेली कथा आजही तुम्हाला आठवत असेल. या पद्धतीचा वापर करून तुम्ही ज्या गोष्टी लक्षात ठेवा त्या तुम्हाला आयुष्यभर लक्षात राहतील अर्थात उजळणी गरजेची आहेच. या पद्धतीचा वापर करून तुम्ही अनेक घटक लक्षात ठेवू शकता. या पद्धतीमध्ये आपण यादी, पुस्तकातील मुद्दे अनुक्रमे गोष्टीच्या स्वरूपात लक्षात ठेवतो. उदाहरणार्थ खडू, नाग, मोक्ष, रिक्षा, सामाजीकरण, लाठी, कोळी, सामाजिक नियंत्रण, वही, बाग, जहाज, मच्छर, प्रेमचंद, गुलाब इत्यादी. आता आपण पाहूया या सर्व घटकांना आपण अनुक्रमे आणि अगदी सहजपणे कथेतून कसं लक्षात ठेवू शकतो.

मी खडू ने लिहीत होतो, अचानक खडूचा नाग झाला, त्याने माझ्या कपाळाला दश केला आणि मी मोक्षात गेलो. देवाने रिक्षाने परत मला पृथ्वीवर सोडले. जाता जाता देव म्हणाला  तुझं सामाजीकरण व्यवस्थित झालेलं दिसत नाही मी सापाला मारण्यासाठी हातात लाठी घेऊन चालू लागलो, मला सापाकडून बदला घ्यायचा होता. समोरच मला तो साप दिसला कोळी किड्याला खात बसला होता. मी त्याला मारण्यासाठी लाठी उचललीच तोवर सामाजिक नियंत्रण करायला तेथे पोलीस आले, त्यांनी वही काढली, त्यात माझी सही घेतली व ते मला बागेत घेऊन गेले. बागेत मी लहान मुलांच्या जहाजामध्ये बसलो तेथे मला खूप मच्छर चावत होते. समोरच एक सुंदर मुलगी प्रेमचंद वाचत होती. मी तिला गुलाब दिला.

अशा पद्धतीने तुम्ही अनेक घटक कथेच्या माध्यमातून लक्षात ठेवू शकता. या पद्धतीची वैशिष्ट्ये व मर्यादा पुढीलप्रमाणे...

- उत्तरातील मुद्दे, यादी, घटनाक्रम, अशा गोष्टींना अनुक्रमे लक्षात ठेवण्यासाठी आपण स्टोरी मेथड चा वापर करू शकतो.
- यामध्ये अमर्याद घटक लक्षात ठेवू शकतो.
- एखादा मधला घटक जर चुकून विसरला तर पुढील घटक आठवत नाही.
- या पद्धतीमध्ये उलट क्रमाने घटक सांगता येत नाहीत.
- जर आपण भरपूर सराव केला तर सूर्जनात्मक कथा तयार करण्यासाठी लागणारा वेळ कमी कमी होत जाईल.

हे करून पहा–माकड, घर, संत्री, गाडी, म्हैस, फळा, अभिसंधित प्रतिक्रिया, गोबर, गॅस, संस्कृती हे शब्द अनुक्रमे लक्षात ठेवण्यासाठी सर्जनशील कथेची निर्मिती करा.

**३. पेग मेथड**

या पद्धती विषयी मी सुद्धा अजून शिकत आहे. ही पद्धत इतर दोन्ही पद्धतींच्या तुलनेत थोडीशी अवघड असली तरी ती जास्त परिणामकारक आहे. या पद्धतीला कोणत्याच मर्यादा नाहीत, म्हणून याला मी मास्टर मेथड म्हणतो. यामध्ये मुद्दे किंवा कोणतेही घटक वेगवेगळ्या कप्प्यांच्या स्वरूपात साठवले जातात. ज्याप्रमाणे स्टोरी मेथड मध्ये आपण संख्यांची जोडी यमकाने जुळणाऱ्या चित्रांसोबत लावत होतो, अशाच जोड्या या पद्धतीमध्ये देखील लावल्या जातात पण यमकाने नाही तर फोनेटिक्स चा वापर करून। यामध्ये काही ठराविक आवाज (sounds) आहेत आणि ते प्रत्येक संख्येसाठी भिन्न आहेत. उदाहरणार्थ १ साठी ट, ड आता ट किंवा ड असा उच्चार ज्या भाषेतील ज्या शब्दात असेल असा कोणताही शब्द तुम्ही एक म्हणून वापरू शकता. (तो शब्द म्हणजे जर एखादी वस्तू किंवा प्रसिद्ध अशी एखादी गोष्ट असेल तर लक्षात

ठेवण्यामध्ये सुविधा होईल) उदाहरणार्थ १= खडू. आता एक साठी या पद्धतीमध्ये ट किंवा ड हा उच्चार वापरला जातो, म्हणून असा खडू हा शब्द मी १ या अंकासाठी 'पेग' म्हणून वापरतो. यामध्ये असं काही नाही की ड चा उपचार पहिला आला पाहिजे किंवा नंतर फक्त इतकं लक्षात ठेवा की ड किंवा ट म्हणजे १, इंग्रजीमध्ये पाहता तुम्ही १ या अंका करिता ांशर हा पर्यायी शब्द वापरू शकता, तसेच हिंदीमध्ये टोंगा. अशा पद्धतीने कोणत्याही भाषेतील शब्द तुम्ही वापरू शकता.

| संख्या | ध्वनी | पेग | कायमस्वरूपी ची कल्पना |
|---|---|---|---|
| ० | स.ज/ S.Z. | जहाज | मी अशी कल्पना करतो की, समुद्रामध्ये मी जहाजा ऐवजी, त्या गोष्टीतून प्रवास करत आहे जी गोष्ट मला लक्षात ठेवायची आहे. उदाहरणार्थ - जर वही हा शब्द मला लक्षात ठेवायचा असेल. तर मी मोठ्या क्लासमेंट च्या वहीवरून समुद्रात एकटाच प्रवास करतोय अशी कल्पना करेन. |
| १ | ट.ड./ T.D. | खडू | मी अशी कल्पना करतो की मी हिरव्या फळ्यावर त्या गोष्टीने लिहीत आहे, जी मला लक्षात ठेवायची आहे. उदाहरणादाखल मला जर वांगी हा शब्द लक्षात ठेवायचा असेल तर, मी वांगी घेऊन हिरव्या फळ्यावर इतक्या गतीने लिहीत आहे की वांगीच्या मागून आग येत आहे. |
| २ | न/N | नाग | मला पेन हा शब्द लक्षात ठेवायचा असल्यास मी अशी कल्पना करतो की, मी सेलो पेन घेतो, त्याचं टोपण काढतो, तितक्यात त्यातून एक नाग येतो आणि माझ्या नाकाला दौश करतो. जर वही हा शब्द लक्षात ठेवायचा असेल तर वही उघडताच त्यातून नाग येईल आणि तो माझ्या नाकाला दौश करेल. |
| ३ | म/M | मोक्ष | मला जो शब्द तिसऱ्या क्रमांकावर लक्षात ठेवायचा आहे त्यासाठी मी अशी कल्पना करतो की, मी मोक्षात गेलोय आणि तेथे देवांनी त्यांच्या अंगावर, दरबारात आणि सर्वत्र त्यात गोष्टी किंवा तीच वस्तू ठेवली आहे, जी मला लक्षात ठेवायची आहे. उदाहरणार्थ -जर 'भूस्खलन' हा शब्द मला लक्षात ठेवायचा असेल तर, मी स्वर्गात जातो आणि तिथे पाहतो की, देवांनी त्यांच्या गळ्यामध्ये भूस्खलन असं लिहिलेली माळ घातलेली आहे. त्यांच्या सिंहासनाच्या मागे देखील भूस्खलनाचा पोस्टर लावलेला आहे, शिवाय त्यांनी कानात सुद्धा जे आभूषण घातलेले आहे त्यामध्ये सुद्धा भूस्खलन लिहिलेलं आहे. |
| ४ | र/R | रिक्षा | मी एका रिक्षात बसतो, तोपर्यंत समोरून मोठं विमान येऊन माझ्या रिक्षाला धडकतं आणि मग माझी रिक्षा त्या गोष्टींमध्ये बदलते जी गोष्ट मला लक्षात ठेवायची आहे. उदाहरण दाखल यासाठी मी अशी कल्पना करतो की, मी एका रिक्षात जाऊन बसतो, तोव्र एक विमान येऊन रिक्षाला धडकतं आणि अचानक मी मोठ्या उंदरावर बसलोय, असं मला जाणवतं कारण मला 'उंदीर' हा शब्द लक्षात ठेवायचा असतो. |
| ५ | ल/L | लाठी | जर मला पाचव्या क्रमांकावर 'रेडिओ' हा शब्द लक्षात ठेवायचा असेल तर, मी अशी कल्पना करतो की, पोलीस मला लाठीने मारत आहे आणि जिथे जिथे मला लाठी लागत आहे तेथे रेडिओ चे चित्र उमटत आहे, शिवाय आई ग आई ग आ असा आवाज लाठीतून येत आहे परिणामी मला किंचितही वेदना होत नाही आहेत. |
| ६ | जे.च.श/ J.Ch.Sh | चंद्र | जर मूला मराठीतील प्रसिद्ध कादंबरी 'ययाती' हे नाव लक्षात ठेवायचे असेल, तर मी अशी कल्पना करेन की, मी सहजच वर चंद्राकडे पाहिलं आणि चक्क चंद्र वरून माझ्या डोक्यावरती आढळून एखाद्या काचेच्या चेंडू सारखा फुटला, आणि त्यातून घोड्याचं चित्र असणारी विष्णू सखाराम खांडेकर योची ययाती ही प्रसिद्ध कादंबरी बाहेर पडली. |
| ७ | क/K | कोळी | मला जर 'साहिल' हा हिंदी शब्द लक्षात ठेवायचा असेल, आणि तेही सातव्या क्रमांकावर तर मी अशी कल्पना करेन की, मी एका निर्जन रस्त्यावरून जात असताना अचानक कोळी किड्यांचा पाऊस पडला लागतो, मोठमोठे कोष्टी किडे माझ्या आजूबाजूला पडू लागतात आणि ते माझ्या दिशेने येऊ लागतात, तितक्यात वरून चार-पाच किडे माझ्या अंगावर पडतात आणि मला खाण्यास सुरुवात करतात, मला प्रचंड त्रास होतो आणि माझ्या जखमांमधून रक्त वाहण्यास सुरुवात होते. मी लक्ष देऊन जवळून पाहतो तर त्या भल्या मोठ्या कोळी किड्याच्या पाठीवर लाल अक्षरांमध्ये 'साहिल' हा शब्द लिहिलेला असतो. |

| संख्या | ध्वनी | पेग | कायमस्वरूपी ची कल्पना |
|---|---|---|---|
| ८ | फ.व./ F.V.W. | वही | मी एक वही उघडतो आणि त्यात मला गोष्टीच रेखाटन दिसतं आणि आवाजही येतो, जी मला लक्षात ठेवायची आहे, लाल शाई मध्ये त्या गोष्टीचं हुबेहूब रेखाटन मला दिसतं. उदाहरणार्थ = मी पुस्तक उघडतो आणि मला लाल शाईने रेखाटलेलं गाढवाचं रेखाटन दिसतं, कारण मला चालते 'गाढव' हा शब्द नव्या क्रमांकावर लक्षात ठेवायचा असतो. |
| ९ | प.ब./ P.B. | बाग | जर मला दहाव्या क्रमांकावर 'मोबाईल' हा शब्द मुद्दा लक्षात ठेवायचा असेल तर मी अशी कल्पना करीन की, मी एका बागेमध्ये गेलो आणि काय आश्चर्य! तेथे प्रत्येक फांदीला पानांऐवजी फोनच लागलेले होते, फुलांच्या झाडाला सुद्धा फुल नाही! तर फोनच दिसत होते. |

मीही १० च्या पुढे अजून पेग तयार केलेले नाहीत. पण वरील उदाहरणर्णावरून तुम्ही तुम्हाला आवडेल तसा पेग आणि त्या संदर्भातली कायमस्वरूपी ची कल्पना निश्चित कराल अशी अपेक्षा आहे. जर १० हा अंक विचारात घेतला तर १० म्हणजेच (टा ड + स/ज) इंग्लिश मध्ये (T/D+SZ) यासाठी मराठी शब्द 'डास' असं होऊ शकतो. तुम्हाला आवडेल त्या पद्धतीने तुम्ही कल्पना करून सृजनात्मक घटनेला डासाशी जोडू शकता.

**हे लक्षात ठेवा.**

१. आता १ ही संख्या तुमच्यासाठी संख्या नसून ते एक चित्र बनले आहे. (जर तुम्ही एक ते दहा पर्यंतचे पेग निर्माण केले असतील तर)

२. तुम्ही जितके पेग निर्माण कराल तितक्या गोष्टी लक्षात ठेवू शकाल.

३. पेंग तयार करण्यासाठी असा कोणताही विशेष नियम नाही तुमच्या सृजनशीलतेनुसार तुम्ही पेग बनवू शकता करू शकता. फक्त जे उच्चार दिले आहेत त्यानुसारच तुम्हाला हे करणं सोईस्कर होईल.

४. उजळणी ही करावीच लागेल पण तुमचा वेळ वाचेल.

आशा करतो हे प्रकरण तुम्हाला समजलं असेल. या प्रकरणांमध्ये सांगितलेल्या क्लुप्त्यांचा जर तुम्ही स्वतःच्या आयुष्या मध्ये वापर केलात, तर तुमचा वेळ वाचेल, कष्ट कमी होईल, सर्जनशीलता वाढेल हे नक्की. प्रकरणाविषयी जर तुमच्या मनात कोणत्या शंका असतील तर तुम्ही मला व्हाट्सअप करू शकता. तुम्हाला जर तुमच्या आयुष्यात या तंत्रांचा फायदा झाला तर ही तंत्रे तुम्हीही इतरांपर्यंत पोहोचवावी ही विनंती.



Informative

# The Unsung Warrior: A Mother's Struggles and Sacrifices



**Jui Sadvilkar**
M.A. II

Behind every successful individual is a story often shaped by love, patience, and sacrifice, and that story begins with a mother. Motherhood is a complex role that encompasses a wide range of responsibilities, emotions, and experiences. While it's often celebrated for its joys and rewards, motherhood also comes with its fair share of struggles and challenges. From the moment a woman becomes a mother, she embarks on a journey of selflessness, sacrifice, and dedication. She is the unsung warrior, the silent force who bears immense burdens with grace, endures sleepless nights with a smile, and putseveryone else's needs before her own.

**The Neglect of a Mother's Health**

One of the most significant struggles mothers face is the neglect of their own health. Many mothers prioritize their family's needs over their own well-being, often putting off medical appointments, ignoring symptoms, or downplaying their own health concerns. This can lead to burnout, chronic stress, and a range of physical and mental health problems. According to studies, mothers are more likely to experience depression, anxiety, and other mental health issues due to the pressure and expectations placed upon them.

**Taken for Granted**

Mothers are often expected to make sacrifices for their families without any recognition or appreciation. Their contributions to the household are frequently taken for granted, and their choices are often dictated by the needs of others. Whether it's cooking meals, managing the household, or caring for their children, mothers are often expected to do it all without complaint. This lack of recognition and appreciation can lead to feelings of resentment, frustration, and unfulfillment, and a lack of belongingness.

**Sacrificing Happiness and Career**

Many mothers sacrifice their own happiness and career goals to prioritize their family's needs. They may put their careers on hold, give up their passions, or compromise their own desires to ensure their family's well-being. While this can be a rewarding experience for some, it can also lead to feelings of regret, disappointment, and unfulfillment. It is seen that mothers who sacrifice their careers often experience a loss of identity and purpose, which can negatively impact their mental health and well-being.

**Choosing Children Over Themselves**

A mother's struggle begins even before her child is born. From the physical and emotional toll of pregnancy to the anxiety of labor, she walks a path riddled with pain and uncertainty. Yet, in her eyes, every challenge is a small price to pay for the life she carries within. As her child grows, so do her responsibilities. She becomes a teacher, a nurse, a counselor, and a friend, all rolled into one. Mothers are often expected to put their children's needs above their own. While this can be a natural and loving response, it can also lead to mothers neglecting their own needs and desires. Whether it's sacrificing their own interests, hobbies, or goals, mothers often prioritize their children's happiness over their own. This selflessness can be both a source of joy and a source of stress, as mothers navigate the complex and often conflicting demands of parenthood.

**Mental and Physical Abuse**

Unfortunately, many mothers face mental and physical abuse in the form of domestic violence, emotional abuse, or neglect. These mothers often suffer in silence, fearing judgment, shame, or consequences. The trauma and stress caused by these experiences can have a long-lasting impact or effects on a mother's physical and mental health, making it even more challenging for her to care for herself and her family.

**Lack of Autonomy**

Despite being independent individuals, many mothers are still expected to ask for permission or

approval from their partners or family members for even the smallest decisions. This lack of autonomy can be frustrating and demoralizing, especially for mothers who are capable and competent. Studies have shown that mothers who have more autonomy and decision-making power tend to have better mental health and well-being.

**The Ignored Exhaustion**

Mothers often work tirelessly behind the scenes, managing the household, caring for their children, and working outside the home. Despite their exhaustion, they continue to push forward, often without recognition or appreciation. Their exhaustion is frequently ignored, and they are expected to keep going without complaint. It is seen that mothers who experience chronic exhaustion are more likely to experience burnout, depression, and anxiety. But mothers are still asked questions like "What do you even do all day?", "Do you even know what struggle is?", "Do you even understand the meaning of the word sacrifice?", "You're just a mother, what do you know about hard work?", "You're not really sacrificing anything, you're just doing what mothers do!".

**The Power of Resilience**

Despite the numerous challenges and struggles they face, mothers are incredibly resilient. They manage to give you a smile when you return exhausted from work, college, or school; laugh heartily at your jokes; and find joy in every small thing that is related to her family in the midst of chaos. They prioritize their family's needs and happiness, often putting their own desires, happiness, and goals on the backburner. Mothers are the glue that holds families together, and their strength and determination are truly inspiring. What makes her truly heroic is not just what she does, but how silently she does it. She rarely complains, rarely demands anything.

**Conclusion**

Mothers are the unsung warriors of our society. They face numerous struggles and challenges, from neglecting their own health to sacrificing their happiness and career goals. Despite these challenges, mothers remain resilient and determined, prioritizing their family's needs above their own. It's time to recognize and appreciate the sacrifices mothers make and to provide them with the support and resources they need to thrive.

We should all at least once put ourselves in her position and see how the tables will turn, how our lives will be chaotic, upside down if we were in her place. Would we be able to manage all this? Would we be able to keep up with such anungrateful life? Maybe the answer will be no. Our lives are great and protected since we were born or since we were in her womb, growing without any stress of the world around us because we knew our warrior, our superhero, our mother, will always be there to protect us from everything.

**A Call to Action**

As a society, we need to recognize the value and contributions of mothers. We need to provide them with the support and resources they need to prioritize their own health and well-being. We need to challenge the stereotypes and expectations that surround motherhood and recognize the diversity and complexity of mothers' experiences. We must learn to see "the role of a mother" with open eyes, consciously and humanely.

By working together, we can create a more supportive and better environment for mothers. We can recognize their struggles and sacrifices and provide them with the appreciation and recognition they deserve. So, let us honor the unsung warrior – the mother. Let us recognize her sacrifices, acknowledge her struggles, and celebrate the love that knows no limits. Because behind every strong person, there is a stronger mother who never gave up.

•

Research Article

# The effect of mobile screen exposure on the development of virtual autism symptoms among college students



**Nitin Sambhaji Khade**
M.A. I

**Abstract**

8. The students of Mahavir Mahavidyalaya visited The New College and enjoyed the language laboratory sessions. Dr. Arundhati Pawar guided the students.
9. The students also visited the library of The New n College Kolhapur.
10. There were film presentation sessions for students.
11. The students presented .posters on innovative topics.
12. Along with this , the faculty members also exhibited their scholarship by presenting and publishing papers in different conferences and workshops.
13. Dr Kalpana Gangatirkar Head, Department of English became Professor. She was selected as a BOS member on the body of Hirachand Nemchnd College Solapur. She also works as a BOS Member of

Shivaji University Kolhapur. She worked as a resource person for various workshops and programs. All the faculty members are taking efforts for development of the department of English.

**Prof.( Dr) Kalpana Gangatirkar**

Head Department of English

# समाजशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये समाजशास्त्र विभागाद्वारे विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यातील प्रमुख पुढीलप्रमाणे

१. समाजाशास्त्र विभागद्वारे ११ जानेवारी २०२५ रोजी जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त 'स्त्रीविषयक सामाजिक समस्या' या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे संचालक मा. दिलीप लडगे साहेब यांच्या हस्ते माँसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी डॉ. शरद गायकवाड यांनी जिजाऊंचे जीवन व कार्य याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. अश्विनी कोटणीस व कॅप्टन डॉ.सुजाता पाटील यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पडली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अंकुश गोंडगे, कॅप्टन उमेश वांगदरे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. उषा पाटील होत्या. यावेळी डॉ. शशिकांत पाटील, प्रा. प्रकाश चव्हाण इत्यादी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्त्रीविषयक सामाजिक समस्या या विषयावर माहितीपूर्ण पोस्टर सदर केली. या स्पर्धेत अनुक्रमे ऋषिकेश सुनील जांबोनी B.B.Ed.3 (बक्षीस रक्कम १०००/ रु.), सोनाली मारुती बारट B.A.1 (बक्षीस रक्कम ७००/- रु.) व राजनंदिनी सोनटक्के B.A.B.Ed. 1 (बक्षीस रक्कम ५००/- रु.) यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला.

२. कोल्हापूर पोलीस दल आणि समाजशास्त्र विभाग महावीर महाविद्यालय कोल्हापूर, याच्या वतीने भारतीय न्यायसंहिता जनजागृती अभियान राबवण्यात आले. त्या अंतर्गत पोलीस निरीक्षक सतीश होडगर व ॲडवोकेट विजय गुजगेश्वर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना बदललेल्या न्याय संहितेची ओळख व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

यावेळी ११ जानेवारी २०२५ रोजी जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त 'स्त्रीविषयक सामाजिक समस्या' या विषयावर घेण्यात आलेल्या पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन प्र.प्राचार्य डॉ. उषा पाटील याच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अंकुश गोंडगे व कॅप्टन उमेश वांगदरे यांनी केले.

३. शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२५ रोजी महावीर महाविद्यालय, कोल्हापूर व रामभाऊ परुळेकर बहुद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सावली केअर सेंटर, कोल्हापूर येथे व्हॅलेंटाईन डे निमित्त संगीत संध्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक कॅप्टन उमेश वांगदरे व मराठी विभागातील प्राध्यापिका श्वेता परोळेकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. सदर कार्यक्रमात प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मराठी-हिंदी चित्रपट गीते, भावगीते, भक्तिगीते गाऊन सावली केअर सेंटरमधील विशेष व्यक्तींचे मनोरंजन केले. तरुण पिढीला सामाजिक जाणीव निर्माण व्हावी व त्यांच्या भावनांना योग्य वळण लागावे या हेतूने सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

४. शनिवार दिनांक १८ जानेवारी२०२५ रोजी समाजशास्त्र विभागाची सहल वि. स. खांडेकर स्मारक, रत्नागिरी व शिरोडा बीच या ठिकाणी आयोजित करण्यात आली. सदर सहलीमध्ये समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक कॅप्टन उमेश वांगदरे व विद्यार्थी सहभागी झाले.

५. गांधी समजून घेताना विशेष व्याख्यान

गुरुवारदिनांक३ ऑक्टोबर २०२४ रोजी महावीर महाविद्यालय कोल्हापूर येथे एन.सी.सी. विभागामार्फत महात्मा गांधी जयंती निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाचे वक्ते मा. डॉ. अवनीश पाटील (विभाग प्रमुख ,इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) त्यांनी महात्मा गांधीजींबद्दल सर्वांना अज्ञात असलेल्या गोष्टींनी जाणीव करून दिली. गांधीजी काय होते त्यांचे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी चे केलेलले प्रयत्न असा संपूर्ण अज्ञात इतिहास मांडला. या कार्यक्रमात सर्व एनसीसी छात्र तसेच एन.सी.सी. अधिकारी कॅप्टन उमेश वांगदरे,लेफ्टनंट डॉ सुजाता पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.डॉ.आर.पी.लोखंडे सर उपस्थित होते.

६. शिवजयंती विशेष व्याख्यान

गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी महावीर महाविद्यालय कोल्हापूर येथे शिवजयंतीच्या आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ प्रकाश पवार ( राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) लाभले छत्रपतीं शिवाजी महाराजाच्या जीवन गाथेचा बराचसा उलगडा त्यांनी करून दिला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमा वेळी प्र. प्राचार्य प्रा डॉ उषा पाटील, B.A.B.Ed. चे समन्वयक व इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. महादेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ शरद गायकवाड, कॅप्टन डॉ सुजाता पाटील, कॅप्टन उमेश वांगदरे, एनसीसी छात्र, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कॅप्टन डॉ सुजाता पाटील व कॅप्टन उमेश वांगदरे यांनी केले.

**प्रा. डॉ. उषा बी. पाटील**

विभाग प्रमुख

# अर्थशास्त्र विभाग

| Sr. No. | Activity | Day Date | Chief Guest | No. of beneficiaries |
|---|---|---|---|---|
| 1 | निबंधस्पर्धा-विकसितभारत-२०४७ | गुरुवार दि.२६/९/२०२४ | प्रा. श्वेता परूळेकर | 17 |
| 2 | अभ्यास मंडळ उद्घाटन | शुक्रवार दि.२७/९/२०२४ | प्रा.चंद्रकांत आधव | 50 |
| 3 | कंपनीमूल्य पद्धती याविषयावर पोस्टर प्रदर्शन | शुक्रवार दि.२७/९/२०२४ | डॉ. संतोष कुमार यादव (देवचंद कॉलेज, अर्जुननगर, निपाणी) | 55 |
| 4 | अग्रणी महा.कार्यशाळा : विकसित भारत-२०४७ युवकांपुढील आव्हाने | शुक्रवार दि.२७/९/२०२४ | प्राचार्य.द न्यू कॉलेज, कोल्हापूर | 110 |
| 5 | नोबेल पारितोषिक विजेते २०२४ पोस्टर प्रदर्शन व सेमिनार | मंगळवार दि.२४/१०/२०२४ | श्री. अमित पाटील (वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द) | 68 |
| 6 | स्टार्ट-अपडे स्टार्ट-अप पोस्टर प्रदर्शन | गुरुवार दि.१६/०१/२०२५ | रिषभ हितेश ओसवाल | 35 |
| 7 | केंद्रीय अंदाजपत्रक-२०२५ पोस्टर प्रदर्शन | सोमवार दि. ५/०२/२०२५ | डॉ. श्रीकांत बच्चे | 85 |
| 8 | केंद्रीय अर्थसंकल्प प्रश्नमंजुषा आणि विद्यार्थी शिक्षक प्रतिक्रिया | शनिवार दि. ३/२/२०२५ | RJ मनीष व RJ पल्लवी | 61 |

**कार्यशाळेचे आयोजन**

**१.अग्रणीकार्यशाळा**

शुक्रवार दि. २७/९/२०२५ रोजी अर्थशास्त्र विभागामार्फत विकसित भारत २०४७ युवकांपुढील आव्हाने याविषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. व्ही. एम. पाटील (प्राचार्य, न्यूकॉलेज) यांच्या हस्ते करण्यात आले होते. याकार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष कुमार यादव (देवचंद कॉलेज, अर्जुननगर, निपाणी), प्रा. चंद्रकांत जाधव (वारणा महाविद्यालय, वारणा), डॉ. प्रा. अनिलसत्रे (पतंगराव मोहनराव पाटील महाविद्यालय, बोरगाव) हे उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना वरील विषयावर उपस्थित पाहुण्यांनी 'विकसित भारत २०४७' युवकापुढील आव्हाने याविषयावर मार्गदर्शन केले.

**२. एक दिवसीय बँकिंग क्षेत्रातील नोकरभरती कार्यशाळा**

मंगळवार दि. ०७/०१/२०२५ रोजी अर्थशास्त्र विभागामार्फत एकदिवशीय बैंकिंग क्षेत्रातील नोकर भरती संदर्भात कार्यशाळा आयोजित केलेली होती. या कार्यशाळेत बैंकिंग क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या संधी व रोजगाराबाबत मार्गदर्शन डॉ. विनायक पटवर्धन (बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ) यांनी केले. श्री. किरण पोवार (विद्याप्रबोधनी ॲकॅडमी, कोल्हापूर) यांनी बँकिंग परीक्षा विषयातील घटकांवर मार्गदर्शन केले. श्री. प्रा. अमर पाटील (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर) यांनी बँकिंग परीक्षेमधील इंग्लिश विषयाचे मार्गदर्शन केले.

**कार्यशाळेत सहभाग -**

**१. कोल्हापूर जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रात सहकार क्षेत्राची भूमिका**

शनिवार दि. १५ मार्च २०२५ रोजी द न्यू कॉलेज कोल्हापूर यांच्या अर्थशास्त्र विभागामार्फत आयोजित कोल्हापूर जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रात सहकार क्षेत्राची भूमिका याविषयावर एकदिवशीय कार्यशाळेत अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. सुजाता जितेंद्र पाटील, प्रा. सखाराम दगडूहुंबे, प्रा.मानसिंग आनंदा पाटील व सात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**२. आर्थिक साक्षरतेद्वारे नागरिकांचे सशक्तीकरण**

शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या कॉमर्स विभागामार्फत आयोजित आर्थिक साक्षरतेद्वारे नागरिकांचे सशक्तीकरण याविषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत अर्थशास्त्र विभागातील प्रा.अवधूत कांबळे, प्रा.मानसिंग पाटील व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**३. कृषी प्रक्रिया उद्योगाचे ग्रामीण अर्थव्यवस्थे वरील योगदान**

रविवार दि.५ जानेवारी २०२५ रोजी आजरा महाविद्यालय, आजरा यांच्या अर्थशास्त्र विभागामार्फत व डणएघ यांच्या मार्फत कृषी प्रक्रिया उद्योगाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील योगदान या विषयावरील एक दिवशीय कार्यशाळेत अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सुजाता जितेंद्र पाटील यांनी सहभाग नोंदवला.

४. Business Models For Volatility and Sustainability

शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापण विभागाद्वारे आयोजित Business Models For Volatility and Sustainability याविषयावर एक दिवशीय राष्ट्रीय कार्यशाळेत अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सुजाता जितेंद्र पाटील यांनी सहभाग नोंदवला.

**५. यूट्यूब :रोजगार के संभावनाओ का खुलाद्वार**

शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी शिवाजी विद्यापीठ व द न्यू कॉलेज कोल्हापूर (अग्रणी) यांच्या संयुक्त विद्यमानाने महावीर महाविद्यालय कोल्हापूर आयोजित 'यूट्यूब :रोजगार के संभावना ओ का खुलाद्वार' याविषया वरील एक दिवशीय कार्यशाळेत अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सुजाता जितेंद्र पाटील यांनी सहभाग नोंदवला.

६. Gender wareness in Modern Society

शनिवार दि. ४ जानेवारी २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ व द न्यू कॉलेज कोल्हापूर (अग्रणी) यांच्या संयुक्त विद्यमानाने डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर आयोजित Gender wareness in Modern Society या विषयावरील एक दिवशीय कार्यशाळेत अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सुजाता जितेंद्र पाटील यांनी सहभाग नोंदवला.

**प्राध्यापक संशोधन**

१. आजरा महाविद्यालय, आजरा यांच्या रविवार दि. ५ जानेवारी २०२५ रोजीच्या ३५ व्या वार्षिक अधिवेशासाठी प्रकाशित शिवार्थ स्मरणीका २०२५ च्या २३ व्या अंकात प्रा.डॉ. सुजाता जितेंद्र पाटील व प्रा. डॉ. संजय शिवाजी ओमसे यांचा 'कृषी प्रक्रिया उद्योगाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील योगदान' हा पेपर प्रकाशित झाला.

२. जानेवारी – मार्च २०२५ मध्ये प्रकाशीत JNT n International Multidisciplinary Quarterly Research Journal या जर्नलमध्ये प्रा. डॉ. सुजाता जितेंद्र पाटील व प्रा. उमेश वांगदरे यांचा The Influence of Microfinance on Women's Empowerment and Leadership Development हा रिसर्च पेपर प्रकाशीत झाला.

३. इंटरनॅशनल जर्नल ऑफ नॉव्हेल रिसर्च अँड डेव्हलपमेंट: एक इंटरनॅशनल ओपन ॲक्सेस, पीअर – रिव्ह्यूड, रेफर्ड जर्नल:मध्ये प्रा.डॉ. सुजाता जितेंद्र पाटील यांचा विद्यार्थ्यांसाठी समग्र विकासाची गरज आणि महत्त्व हा संशोधन पेपर ऑक्टोबर मध्ये २०२४ प्रकाशित (Vol-9, Issue -10d-83 to d-86, ISSN - 2456-4184)

४. International Journal for Multidisciplinary Research: Widely Indexed Open ccess Peer Reviewed Multidisciplinary Bi-monthly Scholarly International Journal मध्ये प्रा.डॉ. सुजाता जितेंद्र पाटील यांचा Mastering Money: n Introduction to Financial Literacy Mastering Money: n Introduction to Financial Literacy हा संशोधन पेपर नोव्हेंबर मध्ये २०२४ प्रकाशित (Volume -6, Issue - 6 ISSN-2582-2160)

५. Dr. Sujata Patil, Dr. Sanjay Omase and Dr Mansing Patil Presented a research paper entitled छत्रपती शिवाजी महाराजांची आर्थिक विचार एक संक्षिप्त आढावा at the Multidisciplinary International Conference on IKS Teaching and Curriculum Designing: Challenges for Teachers and Future Pathways held on 28th 29th March, 2025 at Bharati Vidyapeeth (Deemed to be University) Yashwantrao Mohite College of Arts, Science and Commerce, Pune.

६. Dr. Sanjay Omase : Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638x Special Issue No.141 Jan.२०२५ मध्ये पेपर प्रकाशित https://www.aiirjournal.com/uploads/-rticles/1741679752Special%20Issue%20141šcompressed.pdf

**डॉ. सुजाता पाटील**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

# इतिहास विभाग

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इतिहास विभागामार्फत विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने विविध उपक्रमांचे आयोजन करणेत आले होते. ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त डॉ. निलेश वाळकुंजे यांचे महात्मा गांधी आणि चलेजाव चळवळ विषयावर व्याख्यान आयोजित करणेत आले. विद्यार्थ्यांना जुनी ऐतिहासिक कागदपत्रांची माहिती व्हावी यादृष्टीकोनातून 'मोडी लिपी' कोर्सचे आयोजन करणेत आले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त याविषयाच्या अनुषंगाने पोस्टर प्रदर्शन व प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण यांचे 'छत्रपती शिवाजी महाराज यांची राजनीती' याविषयावर व्याख्यानाचे आयोजन केले गेले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा.डॉ. प्रकाश पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. गडकोट व जलदुर्ग यांची रचना व शिवकालीन महत्त्व यांची माहिती होण्याचे दृष्टीकोनातून सिंधुदुर्ग, रायगड, प्रतापगड व जंजिरा याठिकाणी अभ्यासभेट देण्यात आली. रणरागिणी ताराराणी यांच्या ३५० व्या जयंती निमित्त पन्हाळगड याठिकाणी झालेल्या दोन दिवसीय चर्चा सत्रामध्ये इतिहास विभागाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विविध संस्थेमार्फत आयोजित करणेत आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्र, अग्रणी अंतर्गत कार्यशाळा, प्रश्नमंजुषा यामध्ये प्राध्यापक व विद्यार्थ्यानी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

**डॉ. महादेव शिंदे**

इतिहास विभाग प्रमुख

# शारीरिक शिक्षण विभाग

१) दि.२१ जून, २०२४ रोजी 'अंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्यात आला आहे. महाविद्यालयात प्रारंगणात विविध योग प्रात्यक्षिके घेण्यात आली. विदयार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी सहभाग घेतला.

२) दि. २९ ऑगस्ट, २०२४ रोजी मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. सदरच्या दिवशी मुलीच्या थ्रो बॉल या खेळाविषयी माहिती देऊन मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या.

३) दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी शारीरिक शिक्षण विभागामार्फत अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले सदर भेटीमध्ये जलतरण तलावबाबत तांत्रिक बाबी मुलांना स्पष्ट करून सांगण्यात आल्या.

४) दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी महाराष्ट्र क्रीडा दिनाचे औचित्य साधून दिव्यांग क्रीडा दिन साजरा करण्यात आला. सदर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त दिव्यांग खेळाडू कुमारी शुक्ला बीडकर व प्रभारी प्राचार्या डॉ. उषा पाटील उपस्थित होत्या. सदर स्पर्धेमध्ये पंन्नास दिव्यांग खेळाडूंनी विविध खेळात आपला सहभाग नोंदवला.

५) शारीरिक शिक्षण व जिमखाना विभागाच्या वतीने कोल्हापूर विभागीय बेसबॉल, सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बेसबॉल (पुरुष) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**- डॉ. रोहित पाटील**

# अग्रणी कार्यशाळा विभाग

- दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी 'यूट्यूब':रोजगार की संभावनाओं का खुला द्वार विषयावर हिंदी विभागाच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेचे उद्घाटन प्र.प्राचार्या डॉ. उषा पाटील व डॉ. शिरीष शितोळे यांच्या उपस्थितीत झाले. या कार्यशाळेस विविध महाविद्यालयातून १०० विद्यार्थी उपस्थित होते.
- दि. ३ मार्च २०२५ रोजी वाणिज्य विभागाच्या वतीने 'शाश्वत विकासातील वाणिज्याची भूमिका' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रा.डॉ.ए.एम.गुरव यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव मा.मोहन गरगटे, प्र.प्राचार्या डॉ. उषा पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख श्री. श्रीकांत बच्चे व प्राध्यापक उपस्थित होते.
- दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'विकसित भारत:२०४७ युवकांपुढील आव्हाने' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेचे उद्‌घाटन न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. कार्यशाळेस विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
- भूगोल व एन.एस.एस. विभागाच्या वतीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थ्यांच्यासाठी आपत्ती व्यवस्थापन : कार्य व प्रात्यक्षिक कार्यशाळा संपन्न झाली.

**डॉ. अंकुश गोंडगे**

समन्वयक

# भूगोल विभाग

१. दि. ३१.ऑगस्ट२०२४ रोजी महावीर ग्रीन क्लबच्या वतीने आयोजित पाणी बचतीबाबत माझी भूमिका या विषयावर विद्यार्थ्यांनी आपली मनोगते मांडली.

२. दि. ०३.सप्टेंबर.२०२४ रोजी अन्नधान्ये ,कडधान्ये ,मसाले व तेलबिया यांचे पोस्टर प्रदर्शन मांडण्यात आले.या पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन मा.तानाजी साळुंखे संचालक,जानकी अग्रो.टुरीझम बोरगाव सातारा यांच्या हस्ते करण्यात आले.

३. ०३ सप्टेंबर २०२४ रोजी भूगोल अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना आर्ट्स कॉमर्स कॉलेज चे भूगोल विभागप्रमुख मा. प्रा. डॉ. ज्योतिराम मोरे , जानकी अग्रो टूरीझम चे संचालक मा. तानाजी साळुंखे

४. दि. ०५.०९.२०२४ रोजी भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाचे मा.कुलगुरू प्रो.डॉ. डी.टी. शिर्के यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर, जिल्हाधिकारी कार्यालय ,तहसील कार्यालय यांना भेटी देऊन मान्यवरांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

५. दि. ०७ डिसेंबर २०२४ रोजी भूगोल विभाग व बी.व्होक. (अग्रीकल्चर) यांच्या संयुक्त विद्यमाने मृदा दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

६. ग्रीन कॅम्पस अंतर्गत भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर च्या परिसर हिरवागार व्हावा या उद्देशाने परिसरातील स्वच्छता करून ५००० पेक्षा अधिक रोपे लावली आहेत. याप्रसंगी सामान्य प्रशासनाचे तहसीलदार मा. विजय पवार, भूगोल विभाग प्रमुख डॉ.अरूण पाटील व विद्यार्थी

७. दि. १४ जानेवारी २०२५ रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत, भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांना आपल्या विषयाची संदर्भ पुस्तकांची ओळख व्हावी या उद्देशाने संदर्भ पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. यावेळी श्री.आ.दे.शि.प्र.मंडळाच्या संचालिका सौ.डॉ.सुषमा जी. रोटे , मा.प्रमोद खंडागळे केंद्रीय ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, कोल्हापूर, विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

८. दि. १४ .०१ .२०२५ रोजी केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय, कोल्हापूर व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने वक्तृत्व व निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या.

९. दि. १४ .०१ .२०२५ रोजी केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय, कोल्हापूर व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने मा. मधुकर पाटील यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

१०. १८ जानेवारी २०२५ रोजी बी.ए.भाग १,२,३ या वर्गाच्या विद्यार्थ्यांची एकदिवसीय सहल वेंगुर्ला, सावंतवाडी याठिकाणी आयोजित केली होती. सदर सहलीत विद्यार्थी, दिव्यांग विद्यार्थी, प्राध्यापक सहलीत सहभागी झाले होते.

११. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कोल्हापूर व भूगोल विभाग महावीर महाविद्यालय, कोल्हापूर याच्या संयुक्त विद्यमाने दि. २६,२७ व २८ डिसेंबर या कालावधीत तीन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. यावेळी शहरातील विविध महाविद्यालयातील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले.

१२. दि. २४ .०१ .२०२५ रोजी विवेकानंद महाविद्यालयात आयोजित QGIS Basics या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत ०५ विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला.

१३. ०५ फेब्रुवारी२०२५ रोजी रोजी कृषी पर्यटन केंद्र, बोरगाव, सज्जनगड, ठोसेघर धबधबा याठिकाणी एकदिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

१४. २८ मार्च २०२५ रोजी बी.ए.भाग-३ व बी.ए.बी.एड भाग -४ मधील विद्यार्थ्यांनी ग्रामसर्वेक्षणासाठी भुदरगड तालुक्यातील टिक्केवाडी या गावाची निवड करून गावातील भौगोलिक सामाजिक व आर्थिक घटकांची माहिती घेतली.

१५. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व कामाला कॉलेज कोल्हपुर आयोजित आवाजाची कार्यशाळेत ०२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .

१६. २९ मार्च २०२५ रोजी बी.ए.भाग-३ व बी.ए.बी.एड भाग -४ मधील विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक

**प्रा. डॉ. अरुण पाटील**
भूगोल विभाग प्रमुख

# मानसशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर (समुपदेशन मानसशास्त्र) विभाग

विभाग प्रमुख : **डॉ. शिरीष शितोळे**, सहयोगी प्राध्यापक (पूर्णवेळ)
शिवाजी विद्यापीठ NEP २.० साठीच्या अभ्यासक्रम निर्मितीची प्रमाणित प्रक्रिया समिती सदस्य
शिवाजी विद्यापीठ NEP २.० समिती सदस्य (२०२४-२०२७)
शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र अभ्यासमंडळ सदस्य (२०२४-२०२७)
आबेदा इनामदार कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, पुणे (स्वायत्त) शैक्षणिक अधिसभा सदस्य (२०२४-२७)
ऑक्सफोर्ड पब्लिक हेल्थ डिवीजनच्या संशोधन पेपरचे मूल्यमापन तज्ज्ञ (२०२४)
शिवाजी विद्यापीठ NEP २.० साठीच्या प्रथम वर्षाच्या मानसशास्त्र अभ्यासक्रमाच्या पुस्तकाचे सहलेखक (२०२४-२५)

**डॉ. सुरेश संकपाळ**, सहयोगी प्राध्यापक (पूर्णवेळ)
सहयोगी प्राध्यापक म्हणून निवड (२०२४)
शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र विषयातील पी. ह. डी. मार्गदर्शक म्हणून नियुक्ती (२०२४)
शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र अभ्यासमंडळ सदस्य (२०२४-२०२७)
शिवाजी विद्यापीठ NEP २.० साठीच्या प्रथम वर्षाच्या मानसशास्त्र अभ्यासक्रमाच्या पुस्तकाचे सहलेखक

**इतर मानद प्राध्यापक आणि व्यावसायिक तज्ज्ञ:**
प्रा. डॉ. भरत नाईक (माजी विभागप्रमुख)
प्रा. डॉ. अनिल घस्ते
प्रा. डॉ. चैत्रा राजाज्ञा
प्रा. डॉ. राहुल कश्यप
प्रा. उर्मिला शुभंकर
प्रा. डॉ. अनिल बलुगडे
प्रा. शाश्वती कुलकर्णी
प्रा. पर्वत कांबळे
श्रीमती निधी आलासे
श्रीमती साक्षी खासनीस
श्री. प्रथमेश लोहार

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये मानसशास्त्र विभागांमध्ये १०० पेक्षा जास्त केस स्टडीज व समुपदेशन, ३०० पेक्षा जास्त लोकांचे चाचणी आधारे अभिक्षमता, अभिवृत्ती, आवड, व्यक्तिमत्त्व, नेतृत्वशैली इ. चे मापन आणि समुपदेशन, मानसिक आरोग्या संदर्भातील २१ विषयांवरील प्रशिक्षण कार्यक्रमांची निर्मिती व २०० पेक्षा जास्त लोकांसाठी प्रशिक्षण, समुपदेशक म्हणून व्यावसायिक ज्ञान आणि कौशल्ये विकसित करण्यासाठी एकांकिका, पथनाट्य, भूमिका वठवणे, सेमिनार, चित्रफिती, गटचर्चा, परिसंवाद, चर्चासत्र, संशोधन प्रस्ताव निर्मिती आदी अनेक उपक्रम राबवले गेले.

**त्यातील काहींची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे:**

**सप्टेंबर, २०२४:'मानसिक आरोग्याचा स्त्रीवादी दृष्टिकोन' व्याख्यानमाला**

'मानसिक आरोग्याचा स्त्रीवादी दृष्टिकोन' (Feminist Approach to Mental Health) या बीजविषयावर प्रा. डॉ. शिरीष शितोळे यांची व्याख्यानमाला संपन्न झाली. त्यातील मूलभूत गृहितके (Basic Assumptions) व उपचारतंत्रे (Therapeutic Interventions) या अनुषंगाने चर्चा व प्रश्नोत्तरे झाली.

**नोव्हेंबर, २०२४: गुणात्मक संशोधन कसे करावे: अनुभवकथन**

आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या ऑक्सफोर्ड जर्नल मध्ये प्रसिद्ध झालेले मानसोपचारतज्ज्ञ श्रीमती माधुरी थोरात यांचे आत्महत्येचे अयशस्वी प्रयत्न केलेल्या आणि जीवनात पुन्हा सावरलेल्या व्यक्तींवरचे गुणात्मक संशोधन त्यांनी कसे केले याचे अनुभव या ऑनलाइन सत्रात मुलांनी ऐकले. सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तरे झाली.

**फेब्रुवारी, २०२५: 'पेटंट प्राप्त प्राध्यापक आणि संशोधन पुरस्कार प्राप्त विद्यार्थी अनुभवकथन'**

प्रा. डॉ. रोहित पाटील, प्रा. डॉ. स्वप्नील पाटील, प्रा. स्वप्नाली जगदाळे आणि श्री. विनायक यादव या चार पेटंट मिळवलेल्या मान्यवरांनी त्यांच्या संशोधन प्रक्रियेचा प्रवास उलगडला. तसेच श्रीमती श्रुती माने आणि श्रीमती शेहबाज बागवान या तृतीय वर्षातील विद्यार्थिनींनी शिवाजी विद्यापीठातील आविष्कार संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेले आपले ' ब्रेन रॉट ' या सदयकालीन समस्येवरील संशोधन सादर केले. या प्रकल्पासाठी प्रा. डॉ. सुरेश संकपाळ यांनी मार्गदर्शन केले होते.

**फेब्रुवारी, २०२५: दहावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे ई-साहित्य (व्हिडिओज) निर्मिती**

विभागातील प्रा. डॉ शिरीष शितोळे (ताण, आहार आणि निद्रा व्यवस्थापन) आणि प्रा डॉ सुरेश संकपाळ (परीक्षेसाठीची अभ्यासतंत्रे) यांनी ही ई-साहित्य (व्हिडिओज) निर्मिती करून रोटे ज्युनिअर कॉलेज यांच्याबरोबर संयुक्त प्रकल्प करून कोल्हापूर शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी हे मार्गदर्शन आयोजित केले. तसेच कु. जुई साडविलकर, कु. प्रतीक पाटील, कु. विनायक यादव, कु. सारा नाईकवडी, कु. श्रीनिधी पाटील आणि कु. वैष्णवी नादवडेकर यांनी दहावीच्या परीक्षेदरम्यान स्वतःच्या अभ्यासाचे व ताणाचे नियोजन कसे **केले होते याचे कथन केले.**

**फेब्रुवारी, २०२५: जिज्ञासा विकास मंदिर, कोल्हापूर (विशेष विद्यार्थ्यांसाठीची शाळा) येथे अभ्यास भेट**

प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी कोल्हापूर येथील विशेष मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या या शाळेस भेट देऊन तेथील विविध उपक्रम आणि त्यामागची प्रेरणा व कष्ट समजावून घेतले. त्याचबरोबर प्रत्येकाने आपल्या स्वानुभवावर आधारित अहवाल सादर केले.

**फेब्रुवारी, २०२५:** PSYCHEFUSION- २०२५

मानसशास्त्रातील सर्व पदवी आणि पदव्युत्तर मुले स्वयंस्फूर्तीने दरवर्षी हा उपक्रम राबवतात. यावर्षी एकांकिका, भूमिका वठवणे, नृत्य, गायन, काव्यवाचन, मिमिक्री, फॅशन शो, शेला पागोटे, गेम्स यातून मुलामुलींनी विविध गुणदर्शन घडवले.

**मार्च, २०२५: करिअर संधी प्रदर्शन आणि समुपदेशन:**

मानसशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी भाई माधवरावजी बागल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर येथे प्रमाणित चाचण्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे कल आणि आवडीनिवडी शोधून त्यांना व्यावसायिक मार्गदर्शन केले. त्याबरोबरच विविध करिअर संधीचे प्रदर्शन पण भरवले होते. सुमारे १५० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**डॉ. शिरीष शितोळे**
मानसशास्त्र विभाग

# शिक्षणशास्त्र विभाग

१. बी.ए.बी.एड. प्रथम वर्षामध्ये शैक्षणिक साधन निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. महिला दिनानिमित्त स्त्री भूणहत्या या विषयावर नाट्यीकरण सादर करण्यात आले तसेच शाळा व नाविन्यपूर्ण अध्ययन, अध्यापन या अंतर्गत जरगनगर येथील शाळेस भेट दिली. सर्व समावेशक शाळा भेटी अंतर्गत हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड या शाळेस भेट देण्यात आली.

२. द्वितीय वर्ष बी.ए.बी.एड. मध्येही या शैक्षणिक वर्षामध्ये Language across curiculum हे प्रात्यक्षिक घेण्यात आले तसेच विविध शाळांमध्ये छात्रसेवा/उमेदवारी.

३. तृतीय वर्षामध्येही उमेदवारी योजना तसेच शैक्षणिक भेटांचे आयोजन करण्यात आले.

४. चतुर्थ वर्षामध्ये E Conteul development तसेच विद्यार्थ्यांनी स्वतःच्या Portfolio तयार करणे इ. प्रात्यक्षिकाबरोबर वि.स.खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ इ. ठिकाणी शैक्षणिक भेटीचे आयोजन केले गेले.

**प्राध्यापक गुणवक्ता**

१. डॉ. श्रद्धा पाटील, प्रोफेसर (शिक्षणशास्त्र) निवड

२. डॉ. शशीकान्त अन्नदाते (शिक्षणशास्त्र) असोसिएट प्रोफेसरपदी निवड

३. डॉ. अंकुश बनसोडे (शिक्षणशास्त्र) आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त (सोलापूर, माळी समाज यांचे वतीने)

४. डॉ. रोहीणी भोसले संशोधन सहाय्य-अनुदान-भारतीय शिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत प्राप्त

**प्रा. डॉ. श्रद्धा पाटील**
शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख

# कॉमर्स विभाग

२५-०६-२०२४ - प्रथम वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ महावीर महाविद्यालयामध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नवागत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. कॉलेजच्या इतिहासाची ओळख, विविध उपक्रमांची माहिती, शिक्षकवर्गाची ओळख आणि प्रेरणादायी भाषणांनी कार्यक्रम भरगच्च झाला. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध सांस्कृतिक सादरीकरणे सादर करण्यात आली आणि नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस आनंददायी सुरुवात झाली.

०३-०७-२०२४ - महावीर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागामार्फत प्रथम Board of Studies (B.O.S.) चशशींळपस (अॅकॅडमिक इयर २०२४-२५ साठी) आयोजित करण्यात आली. या बैठकीत प्रमुखांसह सर्व नामनिर्दिष्ट सदस्य उपस्थित होते. बैठकीदरम्यान विविध शैक्षणिक विषय, अभ्यासक्रमाचे स्वरूप, सुधारणा, कालबाह्य घटकांचे पुनरावलोकन इत्यादी मुद्द्यांवर चर्चा होऊन अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल करण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात आला. अभ्यासक्रमाच्या पूर्वतयारी प्रक्रियेला अधिकृत मान्यता देण्यात आली.

२०-०९-२०२४ - Commerce विभागाची दुसरी Board of Studies Meeting नियोजित प्रमाणे पार पडली. या बैठकीत पूर्वतयार अभ्यासक्रम (Draft Syllabus) सादर करण्यात आला. उपस्थित सदस्यांनी सर्व विषयांचे सादर केलेले अभ्यासक्रम सविस्तरपणे तपासून, चर्चा करून एकमताने मंजुरी दिली. या निर्णयानुसार अभ्यासक्रमास अंतिम स्वरूप देऊन विद्यापीठ निर्देशांनुसार कार्यवाहीस पाठवण्यात आले.

दोन्ही B.O.S. बैठकीदरम्यान सदस्यांनी दिलेल्या सूचना, अभिप्राय व शिफारशींची विद्युत व लेखी नोंद घेऊन त्या अंमलात आणण्यात आल्या. अभ्यासक्रमाचे अंतिम प्रारूप विभागीय बैठकीत सादर करून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून कार्यान्वित करण्यात आले.

०५-१०-२०२४ - महावीर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विवेकानंद महाविद्यालयात आयोजित विमा क्षेत्रातील करिअरच्या संधी या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

१५-१०-२०२४ - महावीर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील काही विद्यार्थ्यांनी विविध कंपन्यांमधील करिअर संधींवर आधारित चर्चासत्रात सक्रीय सहभाग घेतला.

०७-१२-२०२४ - आरोग्यावर गुंतवणूक या विषयावर महावीर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. पूजा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आयोजन वाणिज्य विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

१५-१२-२०२४ - डी. आर. के. कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर येथे लेखाशास्त्र विषयावरील अग्रणी महाविद्यालयांतर्गत कार्यशाळेत महावीर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील पाच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

३०-१२-२०२४ - महावीर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागामार्फत इयत्ता ११ वी व १२ वी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शनाचे सत्र घेण्यात आले.

०८-०१-२०२५ - वारणा महाविद्यालयाच्या आणि महावीर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने एम.बी.ए. करिअर या विषयावर अतिथी व्याख्यान व माहितीपर सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात वारणा महाविद्यालयाच्या एम.बी.ए. विभागातील टीमने विद्यार्थ्यांना एम.बी.ए. अभ्यासक्रमाची रचना, विविध प्रवेश परीक्षांचे स्वरूप (जसे की CET, CT, MT), पात्रता अटी, अर्जाची प्रक्रिया व शेवटच्या तारखा याविषयी सविस्तर माहिती दिली. या उपक्रमात १०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते, आणि त्यांनी एम.बी.ए. च्या शैक्षणिक व व्यावसायिक संधींबद्दल उत्सुकतेने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेच्या महत्त्वाच्या तारखा, योग्य तयारीचे मार्गदर्शन व करिअर संधींविषयी स्पष्टता मिळवली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी महत्वपूर्ण व माहितीपूर्ण ठरला, ज्यामुळे त्यांना उच्च शिक्षणाच्या दिशा निश्चित करण्यात ठोस मदत झाली.

०९-०१-२०२५ - कोल्हापूर जिल्ह्यातील कोडोली येथील नवीन LLB कॉलेजतर्फे LLB अभ्यासक्रम व कायदा क्षेत्रातील करिअर संधी या विषयावर महावीर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी माहितीपर सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात कॉलेजच्या प्रतिनिधींनी LLB (Bachelor of Laws) अभ्यासक्रमाची रचना, कालावधी, विषयक्रम, इंटर्नशिप संधी, तसेच पदव्युत्तर शिक्षण व न्यायक्षेत्रातील संधी यासंबंधी सविस्तर माहिती दिली. तसेच CLT आणि MH-CET Law यांसारख्या प्रवेश परीक्षांचे स्वरूप, पात्रता अटी, अर्ज प्रक्रियेची अंतिम तारीख, अभ्यास कसा करावा याबद्दल सखोल मार्गदर्शन करण्यात आले. ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी कायदा शिक्षण व प्रवेश प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न उपस्थित करून सत्रात सहभागी होत स्पष्टता मिळवली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि माहितीपूर्ण ठरला, तसेच त्यांनी कायदा क्षेत्रातील करिअरबद्दल अधिक आत्मविश्वासाने विचार करण्यास सुरुवात केली.

०३-०२-२०२५ - पुरवठा साखळी व्यवस्थापन व वाहतूक व्यवस्था या विषयावर आयोजित व्याख्यानाद्वारे विद्यार्थ्यांना व्यावसायिक

प्रक्रिया समजून घेण्याची संधी मिळाली.

०४-०२-२०२५ - अंदाजपत्रकावर पोस्टर सादरीकरण या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या २०२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर आधारित सर्जनशील व माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केली. रेडिओ जॉकी मनीष यांच्या उपस्थितीत, सादरीकरण कौशल्याचे कौतुक करून तीन विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. एक विद्यार्थिनीने केंद्रीय अर्थमंत्रीची भूमिका साकारत स्वतःचे बजेट सादर केले. उपक्रमाने सर्जनशीलता, अर्थसंकल्प समज, आणि सादरीकरण कौशल्य वृद्धिंगत केले.

१०-०२-२०२५ - शैक्षणिक सहलीद्वारे विद्यार्थ्यांनी रत्नागिरी व कशेळी येथे औद्योगिक व व्यापारी अनुभव मिळवला. स्थानिक व्यवसाय, विपणन व ग्राहक संबंध याबद्दल ज्ञान मिळाले. कशेळीतील मासेमारी उद्योगाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व निर्यात प्रक्रियेचे मार्गदर्शन झाले. ही सहल विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि अनुभवसमृद्ध ठरली.

०३-०३-२०२५ - शाश्वत विकासातील वाणिज्याची भूमिका या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा महावीर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागामार्फत आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर्समध्ये पर्यावरण स्नेही व्यवसाय, सामाजिक जबाबदारी, आर्थिक समावेश आदी विषयांवर सादरीकरण केले. डॉ. ए. एम. गुरव (प्रमुख - वाणिज्य विभाग, शिवाजी विद्यापीठ), डॉ. गोमटेश्वर पाटील आणि डॉ. ओमासे सर यांनी मार्गदर्शन केले. ११० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात अभ्यास मंडळाची स्थापना झाली व विद्यार्थ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

२८-०३-२०२५ - महावीर महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाचा निरोप समारंभ अतिशय उत्साहात व स्नेहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या समारंभाला १५० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील आपल्या आठवणी, शिक्षकांचे मार्गदर्शन, सांघिक उपक्रम, मैत्रीचे बंध आणि शिकवण याविषयी हृदयस्पर्शी भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमात सांस्कृतिक सादरीकरण, कवितावाचन आणि भावनिक निरोप गीत सादर करण्यात आले. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण ठरला.

२८-०३-२०२५ - सायबर येथील समाजकार्य विभागाचे प्रमुख श्री. वळवी सर यांनी विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात प्रभावी मार्गदर्शन केले.

२-०४-२०२५ - महावीर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागात स्मार्ट क्लासरूमचा नवीन सेटअप यशस्वीरित्या बसवण्यात आला. या तंत्रस्नेही शिक्षण सुविधेच्या उद्घाटनासाठी संस्थेचे संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान, डिजिटल शिक्षणाचे महत्त्व, विद्यार्थ्यांच्या समज आणि संवादक्षमतेतील वाढ यावर चर्चा करण्यात आली.

स्मार्ट क्लासरूममुळे विभाग मल्टीमीडिया प्रेझेंटेशन, ई-कंटेंट, इंटरेक्टिव्ह बोर्ड्स आणि ऑनलाइन लर्निंग टूल्स ने सज्ज झाला आहे. हा नवीन सेटअप विभागाच्या अध्यापन क्षमतेत गुणात्मक वाढ घडवून आणणारा असून, विद्यार्थ्यांना प्रगत व आकर्षक शिक्षण पद्धतीचा अनुभव देणारा ठरला आहे.

**डॉ. श्रीकांत बच्चे**
वाणिज्य विभाग प्रमुख

# सर्टिफिकेट कोर्स इन इव्हेंट मॅनेजमेंट

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण केंद्रामार्फत सर्टिफिकेट कोर्स इन इव्हेंट मॅनेजमेंट हा तीन महिन्याचा कोर्स चालवला जातो गेली दहा वर्षे सातत्याने सदर कोर्स महाविद्यालयामध्ये सुरू आहे.

१. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये सप्टेंबर महिन्यामध्ये हा कोर्स सुरू झालेला आहे.
   विभाग विभागाच्या रानभाज्या महोत्सवा मध्ये इव्हेंट मॅनेजमेंट शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी भेट दिली व अभ्यास केला.
२. महावीर महाविद्यालयामध्ये आयोजित शेले पागोटे व सांस्कृतिक कार्यक्रमात इव्हेंट मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.
३. दि. ८/१०/२०२४ रोजी सीनियर व ज्युनियर च्या विद्यार्थ्यांसाठी ध्येय करिअर अकॅडमी मार्फत इव्हेंट मॅनेजमेंट या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये इव्हेंट मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. श्री अवधूत भोसले यांनी विद्यार्थ्यांना व्हिडिओ ऑडिओ च्या मदतीने इव्हेंट मॅनेजमेंट या विषयावर प्रबोधन पर माहिती दिली.
४. इव्हेंट मॅनेजमेंट हा कोर्स शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी कोल्हापुरा मध्ये मार्केट सर्वे केला आहे.
५. दिनांक १८-२-२०२५ व २०-२-२०२५
   मध्ये इव्हेंट मॅनेजमेंट या विषयाची परीक्षा शिवाजी विद्यापीठा मार्फत आयोजित करण्यात आली.

**डॉ. अश्विनी कोटणीस**
समन्वयक

# वरिष्ठ विज्ञान विभाग

- प्रा. स्वप्नील पाटील आणि प्रा. स्वप्नाली जगदाळे यांना Method for Generating Vermi Compost from Bio-Medical Waste यासाठी ऑक्टोबर, २०२४ मध्ये भारतीय पेटंट तसेच फेब्रुवारी, २०२५ मध्ये जर्मन पेटंट मिळाले.
- दि.२४/०९/२०२४ रोजी न्यू पॅलेस, कोल्हापूर येथे बी.एस्सी भाग-१ व २ वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी भेट दिली.
- Career Opportunities after B.Sc. Computer Science या विषयांवर दि.२६/०९/२०२४ रोजी प्रा. रिमा मेस्त्री यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- दि.११/१२/२०२४ रोजी आंबेश्वर मंदिर व गणपतीपुळे येथे बी.एस्सी भाग-२ व ३ वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अभ्याससहल आयोजित करण्यात आलेली होती.
- Career Opportunities after Graduation in Medical Field या विषयावर अभ्यागत व्याख्यान श्री. आरिफ मोहम्मद अत्तार, प्राचार्य, SIBIC, कोल्हापूर यांचे व्याख्यान दि.०३/०२/२०२५ रोजी आयोजित करण्यात आले.
- भौतिकशास्त्र व संगणशास्त्र विभागाने दि.०५/०२/२०२५ रोजी पोस्टर सादरीकरण आयोजित केले.
- दि.०६/०२/२०२५ रोजी सायबर सेक्युरिटी व करिअर गायडन्स या विषयावर डॉ. एन.ए. पाटील आणि डॉ. शंकर पुजारी डी.वाय. पाटील टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी, तळसंदे यांचे व्याख्यान आयोजित केले.
- दि.०७/०२/२०२५ रोजी संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अभ्यासभेट T Cognition Company, IT Park, Kolhapur येथे आयोजित केली.
- दि.०९/०२/२०२५ रोजी बी.एस्सी भाग-३ सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अभ्यासभेट विश्वेशवरैय्या बायोटेक्नॉलॉजीकल म्युझीयम, बेंगलोर येथे आयोजित केली.
- दि.२१/१०/२०२४ रोजी एम.एस्सी भाग-१ सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अभ्यासभेट राजर्षी शाहू ब्लड बँक, कोल्हापूर येथे आयोजित केली होती.
- दि.२०/०२/२०२५ रोजी सजीव नर्सरी, कोल्हापूर येथे बी.एस्सी भाग-३ वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी भेट दिली.
- दि.०४/०३/२०२५ रोजी राजाराम कॉलेज आयोजित एकदिवसीय Entrepreneurial Botany: Botany Landscaping and Architecture Workshop मध्ये बी.एस्सी भाग-२ मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
- दि.०५/०३/२०२५ रोजी नॅशनल सायन्स डे आणि International Women's Day साजरा केला गेला. सदर दिवशी पोस्टर प्रदर्शन व मॉडेल प्रदर्शन आयोजित केले.
- दि.०५/०३/२०२५ रोजी डॉ. एन.एस. चव्हाण आणि डॉ. एम.एस. निंबाळकर, वनस्पतीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे व्याख्यान आयोजित केले.
- दि.०९/०३/२०२५ रोजी एस.जी. फायटोफार्मा लि. या कंपनीमध्ये बी.एस्सी भाग-३ मधील विद्यार्थ्यांनी भेट दिली.
- दि.१०/०३/२०२५ रोजी श्रीमती तेजस्वी उल्हाळकर, फाऊंडर मेडिव्हाईज इन्स्टिटयुट, कोल्हापूर यांचे मेडिकल कोडिंग व क्लिनीकल रिसर्चमधील संधी या विषयावर व्याख्यान आयोजित केले.
- दि.०२/०४/२०२५ रोजी श्री. अमिन फरास, QC Microbiologist, Lupin Pharma ltd, Pune यांचे Interview Preparation Process in Pharmaceutical Industry या विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले.
- Sci-Star-2025 Inspiring Innovations, Sanjay Ghodawat Am`mo{OV Poster Presentation, Model Presentation, Science Quiz स्पर्धेत सुक्ष्मजीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.
- देवचंद कॉलेज, अर्जूननगर आयोजित Second National Conference on Sustainable Agriculture या विषयावर दि.२८/०९/२०२४ रोजी कार्यशाळेत Poster Presentation मध्ये सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
- Krishna Institute of allied Sciences, Krishna Deemed to be University, Karad आयोजित International Conference-Biomake India-II या कार्यशाळेत Poster and Model Presentation सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.
- Krishna Institute of allied Sciences, Krishna Deemed to be University, Karad आयोजित International Conference-Biomake India-II या कार्यशाळेत Culture Activity मध्ये सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त केले.
- एम.एस्सी भाग-१ सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी Yashwant Milk gro Production, Soil Testing Lab Govt. of

Maharashtra, Shahu Blood Bank, pple Saraswati Hospital, Swaraj Pathology Lab, ster adhar Hospital, Micropath Lab, Gokul Milk Dairy येथे ६० तासांचे ऑनजॉब ट्रेनिंग पूर्ण केले.

**प्रा. स्वप्नील पाटील**

समन्वयक, वरिष्ठ विज्ञान विभाग

# बी.व्होक विभाग

- श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महावीर महाविद्यालय,कोल्हापूर(स्वायत्त).बी व्होक विभाग.
- बी. व्होक विभागामार्फत ,शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनेक मार्गदर्शानात्मक व्याख्याने, अनेक स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा तसेच शैक्षणिक सहल, अभ्यासक्रम अंतर्गत भेटी व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या अनेक नामवंत कंपनीमध्ये नोकरीसाठी निवड झाल्या, अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन या विभागामार्फत करण्यात आले.

**त्याचा आढावा पुढीलप्रमाणे :**

- प्रथम बी.व्होक विभागातील, प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होत. २८ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता, महाविद्यालयातील अम्पिथिएटर या ठिकाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे, बी.व्होक विभागाचे सामन्यावक डॉ.एस.ए. नलवडे , बी.व्होक विभागातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी व प्रथम वर्षातील विद्यार्थी उपस्थित होते.
- दि. ०५ जानेवारी २०२५ ते ०७ जानेवारी २०२५ रोजी बी. व्होक विभागामार्फत क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. उषा पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, कॅरम, व बुद्धिबळ अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, तसेच शिक्षक व कर्मचारी यांनी देखील या स्पर्धेला उस्फुर्त प्रतिसाद दिला.
- दि. २१ व २२ जानेवारी रोजी बी. व्होक विभागामार्फत तापोळा, महाबळेश्वर, मॅप्रो गार्डन, वाई, प्रतापगड भिलार (पुस्तकाचे गाव) अशा विविध ठिकाणी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.
- दि. ५ एप्रिल २०२५ रोजी बी. व्होक विभागातील नोकरी लागलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी बी. व्होक प्रिंटिंग अँड पब्लिशिंग, ऑटोमोबाईल व अँग्रीकल्चर या तीनही विभागातील एकूण ८२ विद्यार्थ्यांची अनेक नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली. तरी सदर सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले यावेळी संस्थेची संचालक मा. श्री. नरेंद्र देसाई, संस्थेचे सचिव मोहन गरगटे, संस्थेचे खजिनदार गुणवंत रोटे प्रभारी प्राचार्य डॉ. उषा पाटील, मा. श्री. आशुतोष कापसे साहेब बी. व्होक विभागाचे समन्वयक डॉ. रवींद्र मिरजकर सर, डॉ. संदीप नलवडे सर विभागातील सर्व शिक्षक व कर्मचारी तसेच विद्यार्थी पालक उपस्थित होते यावेळी उपस्थित मान्यवरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.
- दि. ६ एप्रिल २०२५ रोजी बी. व्होक विभागातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ आयोजित करण्यात आला यावेळी डॉ. संदीप नलावडे विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित तसेच यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांमार्फत महाविद्यालयाला प्रत्येक विद्यार्थी मार्फत एका वृक्षाची भेट म्हणून देण्यात आली.

**डॉ. संदीप नलवडे**

विशेष प्रशासकीय अधिकारी (बी.व्होक)

**बी. व्होक (प्रिंटिंग अँड पब्लिशिंग विभाग)**

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ सालामध्ये बी. व्होक विभागातील प्रिंटिंग अँड पब्लिशिंग या अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे....

प्रथम वर्ष -७० द्वितीय वर्ष - ५० तृतीय वर्ष - ४३

- प्रिंटिंग अँड पब्लिशिंग विभागातील प्रथम, द्वितीय, आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या १६३ इतकी आहे.
- दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी प्रिंटर्स असोसिएशन इचलकरंजी यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या FUTURE PI या कार्यशाळेत बी. व्होक प्रिंटिंगचे ४० विद्यार्थी व तिन्ही शिक्षक उपस्थित होते यामध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात

आली तसेच विशेष आधुनिक तंत्रज्ञान ख याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

- दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी बी. व्होक प्रिंटिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी ऊशीळसप क्षेत्रातील मार्गदर्शन व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे मा. श्री. प्रितेश फुले सर उपस्थित होते तसेच डॉ. संदीप नलवडे, विभागातील सर्व प्राध्यापक कर्मचारी तसेच ११० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मुद्रणासोबतच डिझाईनिंग क्षेत्रातल्या करिअर विषयी मार्गदर्शन करण्यात आले व आधुनिक सॉफ्टवेअर विषयी माहिती देण्यात आली.
- दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी पुढारी प्रिंटिंग प्रेस या ठिकाणी भेट देण्यात आली यावेळी प्रिंटिंग चे ५५ विद्यार्थी व ३ शिक्षक उपस्थित होते सदर भेटीमध्ये विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञानाबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.
- दि. ६ जानेवारी २०२५ रोजी महावीर ध्येय करिअर लॅब अंतर्गत पत्रकार दिन निमित्त वर्तमानपत्र क्षेत्रातील रोजगाराची संधी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. चटर्जी सर प्रभारी प्राचार्य डॉ. उषा पाटील, डॉ. संदीप नलवडे विभागातील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते यावेळी मा. श्री. चटर्जी यांनी विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात मार्गदर्शन केले.
- दि.१९ जानेवारी २०२५ रोजी प्रिंटर्स असोसिएशन मार्फत घेण्यात आलेल्या मुद्रण क्षेत्रातील करिअरच्या वाटा या कार्यक्रमांमध्ये बी. व्होक प्रिंटिंग अँड पब्लिशिंग विभागाचे ३ प्राध्यापक व द्वितीय वर्षातील ५ विद्यार्थी उपस्थित होते.
- दि.२४ फेब्रुवारी २०२५ रोजी बी. व्होक प्रिंटिंग अँड पब्लिशिंग विभागामार्फत जागतिक मुद्रण दिन व कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता यामध्ये प्रमुख उपस्थिती माननीय श्री किशोर सुरती व प्रमुख अतिथी माननीय श्री. सुनील राजमाने बी. व्होक विभागाचे समन्वयक डॉक्टर संदीप नलवडे सर विभागातील सर्व शिक्षक व १२० विद्यार्थी उपस्थित होते यावेळी मा. श्री. सुनील राजमाने सर यांनी बी. व्होक प्रिंटिंग अँड पब्लिशिंग विभागातील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात आधुनिक तंत्रज्ञानाची भर पडावी म्हणून ठखडज चरींशी झीळपींशी हे आधुनिक मशीन विद्यार्थ्यांना भेट म्हणून दिले.
- दि. १७ मार्च २०२५ रोजी बी. व्होक प्रिंटिंग आणि पब्लिशिंग विभागातील विद्यार्थ्यांचा Placement Drive घेण्यात आला. यावेळी बी. व्होक प्रिंटिंग विभागातील विद्यार्थ्यांच्या इंटरव्यूसाठी JK Printpack गोकुळ शिरगाव ही कंपनी महाविद्यालयात आली होती.आणि यामार्फत विभागातील १४ विद्यार्थ्यांची निवड झाली.

**बी. व्होक विभाग - ॲग्रीकल्चर**

**विद्यार्थी संख्या : प्रथम वर्ष - ४० द्वितीय वर्ष - ५० तृतीय वर्ष - १५**

**सण उत्सवातील वनभाज्या आणि वनचारा संवर्धनप्रदर्शन**

महावीर महाविदयालय, कोल्हापूर बी. व्होक ॲग्रीकल्चरविभाग व निसर्ग मित्रपरिवार यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय दुधाळ जनावरे संवर्धन वर्ष २०२४ निमित्त सण उत्सवातील वनभाज्या आणि वनचारा संवर्धन प्रदर्शन अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**दि. २८ सप्टेंबर २०२४**

सण उत्सवातील वनभाज्या आणि वनचारा प्रदर्शनाचे उद्घाटन मा. श्री कृष्णाजी कोकाटे (माजी तांत्रिक अधिकारी, आखिल भारतीय चारा संशोधन केंद्र, नवी दिल्ली) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अॅड. के. ए. कापसेसो (चेअरमन, श्री. आ. दे. शि. प्र. मंडळ, कोल्हापूर) होते. यामध्ये ७५ पेक्षा जास्त दुर्मिळ रानभाज्या आणि ५० पेक्षा जास्त वनचारा प्रदर्शनामध्ये ठेवण्यात आला होता. तसेच बी.व्होक ॲग्रीकल्चर विभागामार्फत ‘वनभाज्या आणि वनचारा’ यापुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

दुपारी १२.०० ते १.०० या वेळेत उद्घाटक मा. श्री. कृष्णाजी कोकाटे यांनी रानचारा वृक्षपिके व गवत, या विषयावर मार्गदर्शन केले.

दुपारी २.०० ते ४.०० या वेळेतबेल, कोहळा, गारंबी, रानभाज्यांचे महत्व, बेलाची चटणी, कोहळ्याचा पेठा, सूप, गारंबीच्या बियांची फ्राय भाजी या पाककृतीची प्रात्यक्षिके सौ. राणिता अनिल चौगुले यांनी सादरकेली.

**दि. २१ सप्टेंबर २०२४**

सकाळी ११.०० वाजता सण-उत्सवातील वन व पारंपारिक भाज्यांची पाककृती स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन डॉ. सौ. सुषमा जी रोटे (संचालिका, श्री. आ.दे. शि.प्र. मंडळ, कोल्हापूर आणि सौ. स्नेहलता कापसे (अध्यक्षा, आखिल भारतवर्षीय दिगंबर जैन युवा परिषद, कोल्हापूर) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ३० स्पर्धकांनी यामध्ये सहभाग नोंदविला, विजेत्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. तसेच सण उत्सवात वापरण्यात येणाऱ्या वनस्पतींचे महत्त्व व उपयोग, पशुधनासाठी वृक्ष वर्गीय चारा निर्मितीचे

प्रात्याक्षिके श्री. अनिल चौगुले (कार्यवाह निसर्ग मित्र परिवार कोल्हापूर) यांनी सादर केले.

**दि. ३० सप्टेंबर २०२४**

सकाळी ११.०० वाजता श्री. रोहिदास मातकर (क्षेत्र अधिकारी, कोल्हापूर) यांचे 'प्लॅस्टिक शाप की वरदान' या विषयांवर आधारित व्याख्यान व चचर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. ५० ते ६० विदयार्थी यावेळी उपस्थित होते.

तीन दिवसीय आयोजित या प्रदर्शनास ३५०० पेक्षा जास्त लोकांनी भेट दिली.

**७ डिसेंबर २०२४**

५ डिसेंबर जागतिक मृदा दिनानिमित्त मार्गदर्शनात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख आतिथी मा. श्री पृथ्वीराज पाटील (ऑनर फाउंडर इकोइला ग्रो, कोल्हापूर) उपस्थित होते.

**दि. २३ डिसेंबर २०२४**

शिक्षण विभाग पंचायत समिती, करवीर व सांगरुळ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सांगरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करवीर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये बी. व्होक ग्रीकल्चर विभागाचे ६ विदयार्थी स्वयंसेवक म्हणून सहभागी झाले.

**दि. २८ डिसेंबर २०२४**

महावीर महाविदयालय बी. व्होक ग्रीकल्चर विभाग, निसर्ग मित्र परिवार यांच्या वतीने नवीन वर्षात घर तेथे परसबाग, गाव तेथे देवराई हा उपक्रम शाकंभरी देवी मंदीर शिंगणापूर या ठिकाणी राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत विदयार्थ्यांनी बेल, अंजन, तुती, हादगा, शमी, पिंपळ, शिसव, अर्जुन, बेहडा, आवळा इ.रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.

डेन्मार्क अँग्रो केमिकल, झेनिथ बायोटेक, वाकरे ,कोल्हापूर या खत कंपनीमध्ये अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले . अभ्यास दौऱ्यामध्ये ५० विदयार्थी व ०७ शिक्षक सहभागी होते.

**सतेज कृषि प्रदर्शन , कळंबा येथे विदयार्थ्यांनी भेट दिली.**

**२१ जानेवारी २०२५**

मॅप्रो गार्डन, महाबळेश्वर येथे बी व्होक ग्रीकल्चर विभागाच्या ४० विदयार्थ्यांनी भेट दिली.

**१३ मार्च २०२५**

बी व्होक ग्रीकल्चर विभागातील विद्यार्थ्यांनी दिड एकर क्षेत्रामध्ये कलिंगड पिकाची लागवड केली.

**५ मार्च २०२५**

बी. व्होक ग्रीकल्चर विभागामार्फत, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांचे कोल्हापूर आयोजित विभागीय कार्यालय, कोल्हापूर आयोजित तृणधान्य व फळ महोत्सव २०२५ या प्रदर्शनास भेट दिली. यामध्ये ०३ शिक्षक व ३० विद्यार्थी सहभागी झाले.

**२३ मार्च २०२५**

महावीर महाविदयालय, कोल्हापूर बी. व्होक ग्रीकल्चर विभागास देशभूषण हायस्कूल, कोल्हापूर येथील इयत्ता ९ वी च्या ३० विद्याार्थ्यांनी भेट दिली. यावेळी विदयार्थ्यांना ऊस शेती लागवड, कालिंगड शेती लागवड व्हर्मीकंपोस्ट, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

**दि. २५ व २६ मार्च २०२५**

कृषि विज्ञान केंद्र, कणेरी ता. करवीर जिल्हा कोल्हापूर आयोजित दोन दिवसीय सेंद्रिय (नैसर्गिक शेती) कार्यशाळेमध्ये ०१ शिक्षकव ५ विदयार्थ्यांनी सहभाग घेतला.

३. स्वछता ही सेवा मोहीम अंतर्गत एक तारीख एक घंटा स्वच्छता उपक्रम: स्वछता ही सेवा मोहीम अंतर्गत एक तारीख एक घंटा स्वच्छता उपक्रम दिनांक १५ सप्टेंबर २०२४ पासून सुरु झालेल्या स्वछता पंधरवडा कार्यक्रमाचा भाग म्हणून राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला दिनांक १ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत आपल्या महाविद्यालय परिसरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना (छडड) व राष्ट्रीय कॅडेट्स कॉर्प (NCC) यांच्यावतीने एक तारीख एक घंटा स्वछता मोहीम आयोजित करण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

४. IDS Rally CPR: दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक एड्स दिन २०२४ निमित्त सी पी आर जिल्हारुग्णालय कोल्हापूर यांच्या साह्याने आयोजित जनजागृती रॅलीमध्ये महावीर महाविद्यालय कोल्हापूर, येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सहभाग घेतला. रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे कार्यक्रम आधिकारी डॉ. प्रदीप गायकवाड यांनी केले. रॅलीचे संयोजन कार्यक्रमाधिकारी प्रा. सचिन बराटे आणि डॉ. अंकुश बनसोडे यांनी केले. या रॅलीमध्ये महाविदयालयातील एन.एस.एस विभागातील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

५. Vijay Divas Rally : १२ डिसेंबर २०२४ विजय दिवस दौड अल्ट्रा मॅरेथॉन मध्ये महाविद्यालयातील स्वयंसेवक मुख्य इमारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी सहभागी झाले. सदाचा कार्यक्रम हा १०९ मिलिटरी बटालियन यांच्या द्वारे आयोजित केलेला होता तसेच जिल्हा प्रशासनाने यासाठी सहभागाचे आवाहन केले होते.

६. ग्रंथ दिंडी: १६ जानेवारी रोजी होणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभा प्रसंगी ग्रंथ दिंडी पालखी मिरवणूक मध्ये महाविद्यालाचे स्वयंसेवक सहभागी झाले.

७. पोलंड युथ डीलीगेशन विझिट: पोलंड मधील काही तरुणांनी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागास भेट दिली. या मध्ये आपल्या महाविद्यालयातील कु. साक्षी पाटील हिने नृत्य सादर केले.

८. विकसित भारत २०४७: महाविद्यालयातील स्वयंसेवकानी एक मिनिटाचे वीडओ बनवून केंद्र शासनच्या माय भारत पोर्टल च्या वेबसाईट वर उपलोड केले. व त्यांची District Level Youth Parliament साठी निवड झाली.

९. लोकमत महामॅरेथॉन: २३ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलीस ग्राउंड कोल्हापूर येथे आयोजित केलेल्या महामॅरेथॉन मध्ये स्वयंसेवक सहभाग घेतला.

१०. वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रम: ११ जानेवारी २०२५ रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमावेळी दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

११. परिसर व साहित्य स्वच्छता: निवासी शिबिराच्या पूर्व संध्येला परिसर व शिबिरासाठी लागणारे साहित्य स्वच्छता करून घेण्यात आली.

**इ. विविध शिबिरातील सहभाग :**

**१. विद्यापीठ स्तरावरील शिबिरे:**

I) निवड शिबिर: शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना द्वारा आयोजित निवड शिबिराकरिता महाविद्यातील एकूण सात स्वयंसेवकानी सहभाग घेतला.

II) विशेष श्रम संस्कार शिबिर: शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना द्वारा आयोजित विद्यापीठ स्तरीय विशेष श्रम संस्कार शिबिराकरिता

भेंडवडे अरिहंत सतीश, शिंदे राजलक्ष्मी रमेश, मुळ्गे प्रिया लक्ष्मण, कांबळे अजय सचिन, कुठाळे तनुजा अशोक, कांबळे सिद्धार्थ दयानंद या सहा स्वयंसेवकानी सहभाग घेतला.

III) विशेष श्रम संस्कार शिबिर: शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व विवेकानंद कोलेज कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष श्रम संस्कार शिबिर मु.पो. वारूळ ता. सिंधुदुर्ग या ठिकाणी दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ ते २ मार्च २०२५ या कालावधीत पार पडले. या मध्ये महाविद्यालयातून कु राजलक्ष्मी शिंदे, दीप कदम, कु. भक्ती तोरलकर, सिद्धार्थ कांबळे, राज पाटील व कु साक्षी पाटील हे सहा स्वयंसेवक सहभागी झाले होते. बी.ए.बी.एड. विभागाकडून सुरज हाडूळे हा स्वयंसेवक सहभागी झाला.

**२. राज्य स्तरावरील शिबिरे:**

I) महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्ती व्यवस्थापन पूर्व प्रशिक्षण शिबीर: राष्ट्रीय सेवा योजना विभाग उच्च तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आव्हान-२०२४ Chancellor's Brigade महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्ती व्यवस्थापन पूर्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि. ०५/११/२०२४ ते दि. १८/११/२०२४ या कालावधीत करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातून कार्यक्रम अधिकारी डॉ प्रदीप गायकवाड चमू व्यवस्थापक म्हणून सहभागी झाले तर कु. राजलक्ष्मी शिंदे हि स्वयंसेविका सहभागी झाली.

II) उत्कर्ष कॅम्प: सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथे दिनांक २३ ते २५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पार पडलेल्या उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक शिबिरामध्ये महाविद्यालयाची कु प्रिया लक्ष्मण मुळगे सहभागी झाली.

III) Leadership Development Camp: विध्यार्थी विकास कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि भाई अकेडमी, पाचगणी यांच्या संयुक्त विध्यमाने आयोजित दिनांक ५ ते ७ फेब्रुवारी २०२५ दरम्यान पाचगणी येथे संपन्न झालेल्या नेतृत्व कौशल्य विकास शिबिरात कु राजलक्ष्मी शिंदे ही सहभागी झाली.

**३. राष्ट्रीय स्तरावरील शिबिरे:**

I) PreRDC कॅम्प: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आयोजित दि. १९ ते २५ सप्टेंबर २०२४ या दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय/ राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी सराव शिबीरास महाविद्यालयातील दीप शंकर कदम हा स्वयंसेवक सहभागी झाला.

II)राष्ट्रीय एकात्मता शिबीर (NIC) कॅम्प: १६ ते २२ फेब्रुवारी २०२५ दरम्यान शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय एकत्मता शिबीरामध्ये महाविद्यालयाची कु साक्षी पाटील सहभागी झाली.

**४. विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर:**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर मु.पो. चोकाक, ता. हाताकानंगले, जि. कोल्हापूर या ठिकाणी दिनांक २४ ते ३० जानेवारी, २०२५ या कालावधीत आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्य या विषयावर आयोजित करण्यात आले.

**ई. कार्यशाळा:**

I) आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा: जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कोल्हापूर आणि श्री. आ. दे. शि. प्र. मंडळ संचलित महावीर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भूगोलशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन दिनांक २६ ते २८ डिसेंबर २०२४ या कालावधीत करणेत आले. यामध्ये शहरातील विविध महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. यामध्ये NDRF च्या चमूने विविध प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले.

II)माय भारत पोर्टल नोंदणी कार्यशाळा: २७ फेब्रुवारी २०२५ रोजी माय भारत पोर्टल नोंदणी प्रशिक्षण तसेच ओउटरिच प्रोग्रॅम संदर्भत एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. याविषयी नेहरू युवा केंद्र, दिल्ली चे उपसंचालक मा. देवेंद्र व्यास यांनी स्वयंसेवकाना मार्गदर्शन केले तसेच नेहरू युवा केंद्र, कोल्हापूर चे पर्यवेक्षक मा. भानुदास यादव यांनी नोंदणी संदर्भत प्रशिक्षण दिले.

**फ. पुरस्कार:**

१. उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार: शिवाजी विद्यापीठाचा सन २०२३-२४ चा विद्यापीठ स्तरीय (कोल्हापूर जिल्हा) उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार कु. अनुराधा सुरेश देसाई हिला प्राप्त झाला.

२. महाराष्ट्र भूषण पुरस्कार: जागतिक महिलादिना निमित्त कु अनुराधा सुरेश देसाई हिला महाराष्ट्र भूषण पुरस्कार-२०२५ देवून गौरवण्यात आले.

३. जीवन गौरव पुरस्कार: स्वराज्य ग्रुप महाराष्ट्र राज्य यांचे वतीने कु राजलक्ष्मी शिंदे हिला समाजामध्ये उल्लेखनीय काम केल्या बद्दल जीवन गौरव पुरस्कार देवून गौरवण्यात आले.

४. महात्मा ज्योतीराव फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार: कार्यक्रम अधिकारी डॉ अंकुश बनसोडे यांना त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याबद्दल सकल माळी समाजसेवा संस्था सोलापूर यांच्यावतीने महात्मा ज्योतीराव फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरवण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **सचिन बराटे** | **डॉ. अंकुश बनसोडे** | **डॉ. प्रदीप गायकवाड** |
| कार्यक्रम अधिकारी | कार्यक्रम अधिकारी | कार्यक्रम अधिकारी |
| (कनिष्ठ विभाग) | (बी.ए.बी.एड. विभाग) | (वरिष्ठ विभाग) |

# सांस्कृतिक समिती कार्य अहवाल

राजर्षी छ.शाहू महाराज यांची १५० वी जयंती महाविद्याच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने मा.प्राचार्य डॉ.आर.पी.लोखंडे यांचे हस्ते प्रतिमापूजन करून साजरी करण्यात आली.

'तू भेटशी नव्याने' या दूरदर्शनवरील मालिकेचे कलाकार ज्येष्ठ सिनेअभिनेते मा.सुबोध भावे आणि सिनेअभिनेत्री शिवानी सुतार यांनी आचार्य विद्यानंद संस्कृती भवनच्या सभागृहामध्ये महावीरच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राजर्षी छ.शाहू महाराज यांच्या जयंतिनिमित्त 'सामाजिक न्याय दिन संमेलन सप्ताह समारोप कार्यक्रम' ॲम्फी थिएटर येथे आयोजित करण्यात आला. सदरचा कार्यक्रम दि.२ जुलै रोजी संपन्न झाला.

महाराष्ट्र शासनाच्या माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी मा.डॉ.एकनाथ आंबेकर, सामाजिक न्याय विभागाचे उपविभागीय आयुक्त मा.संजय साळी साहेबांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह साजरा करण्यात आला. मा.गीता साठे, कार्यालयीन सहाय्यक वसंतराव नाईक विकास महामंडळ, कोल्हापूर, प्रशांत सावंत, कार्यालयीन सहाय्यक, इतर मागास बहुजन कल्याण विकास महामंडळ, कोल्हापूर शासनाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शासनाच्या माहितीपुस्तिका व टोप्या भेट देण्यात आल्या.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर जिल्हा युवा महोत्सव जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर महाविद्यालय येथे दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झाला. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी-कलाकारांनी चैतन्य पवार, ज्ञानेश्वरी कुरळे इ. विद्यार्थी - कलाकारांनी सहभाग घेतला. भारत जीवन, प्रभू खोत यांना एकपात्री - ३ रा क्रमांक.

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची महाविद्यालयातील संबंधित पात्र विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजनांची माहिती देणेसाठी महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी श्रीमती सुनिता नेर्लीकर (सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर, अमित घवले, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, दत्तात्रय पाटील (निरीक्षक) तसेच बी.एन.कांबळे (गृहपाल) हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले व विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले.

भारतीय संविधानाला दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे वेगवेगळ्या १६ भारतीय भाषांमध्ये गीतगायन असा कार्यक्रम पुणे येथे दि.२६ जाने. २०२५ रोजी संपन्न झाला. सदर कार्यक्रमाने विश्वविक्रम प्रस्तापित करून 'बुक ऑफ वर्ल्ड' मध्ये या कार्यक्रमाची ऐतिहासिक नोंद झाली. या कार्यक्रमामध्ये सांस्कृतिक विभागातील सलोनी श्रॉप, यश शास्त्रे, जीवन दांडगे, वैभव सुतार (बी.ए.भाग १) या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस संपूर्ण भारतभर 'शिक्षक दिन' म्हणून दि.५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. महाविद्यालयातील एकदिवसीय विद्यार्थी-शिक्षकांनी महाविद्यालयात बी.ए.१,२,३ या वर्गांना अध्यापन केले. एकदिवसीय विद्यार्थी-प्राचार्य यांच्यासह सर्वांचा मा.प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिक्षणशास्त्र विभागाच्या डॉ. श्रद्धा पाटील यांचे ॲम्फी थिएटर येथे 'डॉ.राधाकृष्णन् व आजचे शिक्षण' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

मंगळवार, दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी ॲम्फी थिएटर येथे बी.ए.भाग १ च्या नूतन विद्यार्थ्यांचा स्वागतसमारंभ मा.प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. डॉ.गोमटेश्वर पाटील, डॉ.अंकुश गोंडगे, डॉ.शरद गायकवाड, कॅप्टन उमेश वांगदरे, डॉ.प्रदीप गायकवाड, डॉ. प्रकाश कांबळे यांनी आपआपल्या विभागाची व महाविद्यालयाच्या शिस्त आणि नियमांची माहिती सांगितली.

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव दि.२८ नोव्हेंबर २०२४ रोजी आजरा महाविद्यालय, आजरा येथे संपन्न झाला. 'तालवाद्य' या कलाप्रकारात चैतन्य पवार या विद्यार्थी-कलाकाराला तीन पारितोषिके प्राप्त झाली. शिवाजी विद्यापीठातून चैतन्य पवारची राज्यस्तरीय युवा महोत्सवासाठी निवड झाली. सांघिक फोक ऑक्रस्ट्रा यामध्ये त्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. पखवाज वादन सोलोसाठी प्रथम

क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. अकोला येथे ६, ७, ८, ९ नोव्हें. २०२४ रोजी हा राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवा महोत्सव पार पडला.

पश्चिम विभागीय विद्यापीठ युवा महोत्सव मेहसाणा, गुजरात येथे दि. १ ते ९ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेला होता. यामध्ये महावीरचा विद्यार्थी-कलाकार चैतन्य पवार याने विद्यापीठ संघाचे नेतृत्व करून लोककला या कलाप्रकारामध्ये सलग पाच पारितोषिके मिळविली व पखवाज वादनसाठी चार पारितोषिके विद्यापीठ संघाने मिळविली.

प्रथम सत्रातील अत्यंत महत्त्वाचा गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम श्री.आचार्य विद्यानंद संस्कृती भवन येथे दि.१६ जाने. २०२५ शिक्षण सहसंचालक मा.कटरेसाहेब, मा.उपकुलसचिव सोयम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन ॲड. के.ए.कापसेसो यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. प्रत्येक वर्गात गुणानुक्रमे तसेच विद्यापीठ गुणवत्ता यादीतील??????

शुक्रवार, दि.१७ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचा विविध कलागुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. फीशपाँड, फनीगेम्स, शेलापागोटे, शिवकालीन युद्धकला, प्रात्यक्षिकेचे सादरीकरण अशा कार्यक्रमाला 'मिशन अयोध्या' या चित्रपटाचे कलाकार उपस्थित होते.

विद्यार्थी कलाकारांनी भावगीत, भक्तीगीत, चित्रपटगीत, पोवाडा, रिमिक्स, कराओके, नृत्य, गायन, वादन, एकपात्री, एकांकिका अशा अनेकविध कलाप्रकारांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेऊन कार्यक्रम अत्यंत दर्जेदार आणि आनंदी, उत्साही वातावरणात संपन्न झाला.

छ.शिवाजी महाराज, छ.संभाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, राजमाता अहिल्यादेवी होळकर, म.फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी छ.शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, भगवान बुद्ध, तीर्थंकर भगवान महावीर, अण्णा भाऊ साठे इ. या महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिन सांस्कृतिक विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला.

गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५ रोजी क्रीडा विभागाचा तसेच सांस्कृतिक विभागाचा स्वातंत्र्यसैनिक कै.भूपाल सुखदेव पांगीरे-पुरस्कृत देशभूषण पुरस्कार वितरण सोहळा मा.सौ. निवेदिता पवार -धर्मादाय, सहआयुक्त, कोल्हापूर विभाग यांच्या हस्ते व मा.ॲड.के.ए.कापसेसो-चेअरमन, श्री.आ.दे.शि.प्र.मंडळ, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

**डॉ. शरद गायकवाड**
सांस्कृतिक विभाग प्रमुख

# महावीर स्पर्धा परीक्षा केंद्र

**वर्ष २०२४-२०२५ अहवाल**

१. TET व CTET परीक्षेच्या तयारीसाठी बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र विषयावर मोफत मार्गदर्शन कार्यशाळा १९ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत डॉ. शशिकांत अन्नदाते, डॉ.अंकुश बनसोडे आणि CTET उत्तीर्ण माजी विद्यार्थी अनिकेत कुंभार यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत ८० विद्यार्थी उपस्थित होते.

२. महावीर करिअर लॅब व महावीर स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या वतीने ९ ऑक्टोबर २०२४ रोजी TET परीक्षेची मोफत मार्गदर्शन कार्यशाळा ९ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत डॉ. संगीता महाजन व प्रा. सूरज चौगुले यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत ५० विद्यार्थी उपस्थित होते.

३. बी.जी.खराडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय आयोजित भविष्यातील शिक्षकांसाठी नेतृत्व कौशल्ये या विषयावरील अग्रणी कार्यशाळेत स्पर्धा परीक्षा केंद्राचे मार्गदर्शक डॉ.शशिकांत अन्नदाते, डॉ. अंकुश बनसोडे, प्रा. सूरज चौगुले, तनुश्री पुरेकर, मृणाली मस्कर, करुणा शिंदे, सबिया नालबंद, प्रज्ञा लोहार, राजवर्धन गुरव आदी विद्यार्थी सहभागी झाले होते.

४. राजर्षी शाहू महाविद्यालय आयोजित स्पर्धा परीक्षा कार्यशाळा या विषयावरील अग्रणी कार्यशाळेत स्पर्धा परीक्षा केंद्राचे मार्गदर्शक डॉ. शशिकांत अन्नदाते, डॉ. अंकुश बनसोडे, तनुश्री पुरेकर, नजनिन नदाफ, सबिया नालबंद, प्रज्ञा लोहार, प्रतीक मगदूम आदी विद्यार्थी सहभागी झाले होते.

५. एकात्मिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम अंतर्गत आयोजित NCET प्रवेश परीक्षेसाठी मार्गदर्शन कार्यशाळा १९ एप्रिल २०२५ रोजी आयोजित कार्यशाळेत डॉ. शशिकांत अन्नदाते, डॉ. अंकुश बनसोडे, डॉ. रोहिणी भोसले, प्रा.सविता यादव, डॉ. सरिता मोरे, प्रा. अजितकुमार चौगुले, डॉ .बी. डी.पाटील, प्रा.हेमंत पाटील, डॉ.संगीता महाजन यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

समन्वयक
**डॉ. शशिकांत अन्नदाते**

# स्वायत्त कक्ष अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून स्वायत्ता
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ तृतीय वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.ए.बी.एड, विज्ञान, व बी.व्होक स्वायत्त
एम.ए. मानसशास्त्र व एम.ए. इंग्रजी पूर्ण स्वायत्ता शैक्षणिक वर्ष २०२२-२३ स्वायत्त

१) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ शैक्षणिक स्वायत्ततेच्या अंमलबजावणीचा UGC ला अहवाल सादर केला .
२) वैधानिक संस्थांची रचना म्हणजे नियामक मंडळ, शैक्षणिक परिषद, वित्त समिती आणि विविध अभ्यास मंडळची स्थापना केलेली आहे.
३) गैर-वैधानिक समिती म्हणजे नियोजन आणि मूल्यमापन समिती, प्रवेश समिती, ग्रंथालय समिती, विद्यार्थी कल्याण समिती, लैंगिक छळ समिती (ICC: अंतर्गत तक्रारी समिती). अभ्यासक्रमेतर समिती आणि शैक्षणिक लेखापरीक्षण समिती स्थापन केली आहे.
४) स्वायत्त महाविद्यालयासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वांनुसार खटउ ची स्थापना करण्यात आली आहे.
५) वैधानिक संस्थांच्या बैठका
  १) नियामक मंडळ - २५ एप्रिल २०२५
  २) शैक्षणिक परिषद - ११ फेब्रुवारी २०२५
  ३) वित्त समिती - १२ शनिवार २०२५
  ४) अभ्यास मंडळ - सरासरी (०२) आणि (४) उपसमितीसाठी
६) नवीन महाराष्ट्र राज्य सरकारी सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार चार (०४) सुविधा अंतर्गत.
  १) मानव्य विद्याशाखा :-B.A./M.A.
  २) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा :- बी.कॉम.
  ३) विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा:- B.Sc.
  ४) आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा:- B.Voc. आणि B.A.B.Ed.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. इंग्रजी | २. हिंदी | ३. मराठी | ४. इतिहास | ५. भूगोल |
| ६. समाजशास्त्र | ७. अर्थशास्त्र | ८. मानसशास्त्र | ९. शारीरिक शिक्षण | १०. वाणिज्य |
| ११.शिक्षणशास्त्र | १२.भौतिकशास्त्र आणि इलेक्ट्रोनिकस | | १३.रसायनशास्त्र | १४.वनस्पतीशास्त्र |
| १५.संगणक विज्ञान | १६.प्राणीशास्त्र | १७.गणित | १८.सूक्ष्मजीवशास्त्र | १९. बी.व्होक |

एकूण: १९ BOS स्थापन करण्यात आले आहेत त्यांचे सेमिस्टर ५ व ६ चे अभ्यासक्रम मंजूर होऊन अंमलबजवणी झाली आहे.
सन २०२४-२५ करिता NEP नुसार अभ्यासक्रम रचना व त्याची अंमलबजवणी झाली आहे.
७) वित्त समिती:
  १) बजेट तयार करून मान्यता घेण्यात आली.
  २) फी संरचना अंतिम करण्यात आली आहे.
१२) शैक्षणिक वर्षाचे विवरणपत्र (२०२४-२५)
१३) स्वायत्त महाविद्यालयाच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षासाठी प्रॉस्पेक्टस अंतिम करण्यात आले आहे.
१४) (BC) शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट्स साठी महाविद्यालयाची नोदणी करण्यात आली तसेच विद्यार्थी नोदणी करण्यात आली.
१५) विद्यार्थी च्या क्रेडिट्स २०२१ पासून (ABC) शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट्स खात्यावर ट्रान्स्फर करण्यात आली.
१६) नवे शैक्षणिक धोरणच्या अंमलबजवानीसाठी समिती स्थापन करण्यात येऊन अंमलबजवणी करण्यात आली.
१७)NEP-२०२० मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे, नवीन एकाधिक प्रवेश आणि निर्गमन कार्यक्रम लागू आहेत म्हणजे B.Voc. अनेक स्तर असलेले अ) डिप्लोमा ब) ॲडव्हान्स डिप्लोमा आणि क) पदवीपूर्व पदवी.
१८)सर्व UG आणि PG कार्यक्रम नवे शैक्षणिक धोरणानुसार (२०२४-२५) च्या अखत्यारीत आहेत म्हणजेच UGC नियमांनुसार निवड आधारित क्रेडिट सिस्टम नुसार आहेत.

**प्रा. डॉ. रविंद्र मिरजकर**
समन्वयक

# कौशल्य व उद्योजकता विकास समिती

**१. दि. १८ ऑगस्ट २०२४ ते २२ ऑगस्ट २०२४**

रोजी कौशल्य व उद्योजकता विकास समिती व ध्येय करिअर अॅकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांची सायको मॅट्रिक टेस्ट घेण्यात आली. यामध्ये २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला

**२. दि. १५ जुलै २०२४**

जागतिक युवा कौशल्य दिनाच्या औचित्याने दिनांक १६ जुलै २०२४ रोजी स्किलिंग युथ फॉर आंतरपीनर्शिप डेव्हलपमेंट या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. सचिन कुंभोजे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**३. दि. १८ सप्टेंबर २०२४**

कौशल्य व उद्योजकता विकास समितीमार्फत बीकॉम भाग तीनच्या विद्यार्थ्यांकडून विविध बिजनेस मॉडेल्स तयार करून घेण्यात आली व त्याबद्दल विद्यार्थ्यांनी वर्गामध्ये इतर विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**४. दि. १८ डिसेंबर २०२४**

कौशल्य व उद्योजकता विकास समितीमार्फत अपॉर्च्युनिटी इन इन्शुरन्स सेक्टर या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले यामध्ये एलआयसीच्या डिपार्टमेंट हेड यांनी विद्यार्थ्यांना बीमा सखी या सरकारी योजनेबद्दल माहिती सांगितली तसेच बीमा सखी होण्यासाठी कोण कोणती कौशल्य आवश्यक आहेत याबद्दलही त्यांनी मार्गदर्शन केले यामध्येही शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**५. दि. ५ फेब्रुवारी २०२५**

कौशल्य व उद्योजकता विकास समिती व वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमान भोगावती महाविद्यालयातील श्री सुनील गोटे यांच्यामार्फत विद्यार्थ्यांसाठी आवश्यक कौशल्य या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले गेले.

**६. दि. ३ फेब्रुवारी २०२५**

कौशल्य व उद्योजकता विकास समिती व ध्येय अॅकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर इन सप्लाय चेन मॅनेजमेंट अँड लॉजिस्टिक मॅनेजमेंट या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले गेले कुमारी ऋतुजा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**७. दि. १० ऑक्टोबर २०२४**

कौशल्य व उद्योजकता विकास समितीमार्फत डिजिटल स्किल फॉर स्टुडंट्स या विषयावर कुमारी वसुंधरा पवार यांचे मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित करण्यात आले यामध्ये शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**८. दि. ३ मार्च २०२५**

रोजी कौशल्य व उद्योजकता विकास समिती व वाणिज्य विभागीय यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत विकासामध्ये वाणिज्य ची भूमिका या विषयावर पोस्टर प्रेसेंटेशनचे आयोजन करण्यात आले शिवाजी विद्यापीठातील कॉमर्स विभागाचे एचडी डॉक्टर ए एम गुरव व आचार्य देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी श्री मोहनराव गरगटे साहेब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**९. दि. २३ डिसेंबर २०२४**

कौशल्य व उद्योजकता विकास समिती व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने इन्शुरन्स स्किल्स या विषयावर श्रीमती संध्या जाधव मॅडम यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

समन्वयक

**डॉ. अश्विनी कोटणीस**
समन्वयक,
कौशल्य व उद्योजकता विकास समिती

# ग्रंथालय विभाग

१९७० मध्ये स्थापित झालेले ग्रंथालय आज महाविद्यालयाचे ज्ञानाचे केंद्रस्थान बनलेले आहे. ग्रंथालय परिसरातील शैक्षणिक संसाधनांचा अधिक व्यापकपणे उपयोग व्हावा यासाठी जवळपासच्या महाविद्यालयांच्याल सहकार्याची आंतर-ग्रंथालय कर्ज (Inter-Library Loan-ILL) सेवा पुरवली जाते. महाविद्यालयाचे ग्रंथालय अध्यापन, अध्ययन आणि संशोधनाला सहाय्यक असे उत्साही शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहे. ग्रंथालयाचे ध्येय विद्यार्थ्यांना आयुष्यभर शिकत राहण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि त्यांच्यामध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता आणि चिकित्सक विचार करण्याची क्षमता वाढवणे हे आहे. ग्रंथालयामध्ये सध्याण कथा, कादंबरी, संदर्भ ग्रंथ, धार्मिक ग्रंथ, हस्तयलिखित, दुर्मिळ ग्रंथ अशी विविध ग्रंथसंपदा उपलब्धा आहे.

कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त माहिती मिळावी या हेतूने प्रेरित होवून ग्रंथालयाचा वापर अधिक होणेकरीता ग्रंथालयातील सर्व सभासदांकरीता ग्रंथालयाचे मोबाईल ॲप तयार करण्यात आलेले आहे. याद्वारे विद्यार्थी तसेच प्राध्यापकांना एका क्लीकवर ग्रंथालयातील सर्व माहिती मिळणार आहे. या ॲपद्वारे आपण आपल्यास महाविद्यालयाच्या ग्रंथालयाबरोबरच इतर महाराष्ट्रातील १०२ ग्रंथालयांबरोबर देखील जोडले जाणार आहोत.

**ग्रंथालय वेळापत्रक**

- ग्रंथालय सोमवार ते शनिवार सकाळी ९:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत खुले असते.
- रविवार आणि सूचित सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी ग्रंथालय बंद असते.
- पुस्तक देणे व परत घेणे: सकाळी ९:०० ते सायंकाळी ५:०० दरम्यान.

**ग्रंथालयाची वैशिष्ट्ये :**

- एकूण ग्रंथसंपदा:/ ७,१४६ खंड
- अंदाजित एकूण किंमत:/ ७८,३४,७२७.१९
- वृत्तिपत्रक, साप्ताहिके व मासिके:/१६ दैनिक (मराठी, हिंदीव इंग्रजी भाषांमध्ये) ६३ विविध मासिके

**ग्रंथालयातील उत्कृष्ट उपक्रम** (Library Best Practices)

१. ग्रंथालयाचे संगणकीकरण आणि बारकोंडीग (Computerization of Library with Barcoading)
२. डिजिटल उपस्थिती प्रणाली (Digital ttendance System)
३. विकलांग विद्यार्थ्यांसाठी मूल्यवर्धित सेवा (Value-dded Services for Differently bled Students)
४. करिअर / रोजगार माहिती कोपरा (Career/Employment Information Corner)
५. सूचना पेटी व वेळेवर प्रतिसाद (Suggestion Box with Timely Response)
६. नवीन पुस्तकांची यादी प्रदर्शित करणे (Displaying List of New rrivals)
७. पुस्तक प्रदर्शनांचे आयोजन (Organization of Book Exhibitions)
८. पुस्तक बँक योजना (Book Bank Scheme)
९. अभिप्राय व पुनरावलोकन प्रणाली (Feedback  Review System)

**स्पर्धा परीक्षा विभाग**

ग्रंथालयाचा स्पर्धा परीक्षा विभाग हा विशेषत: राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी विकसित करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना खालील परीक्षांसाठी केंद्रित स्रोत व अभ्यास साहित्य उपलब्ध करून देणे:

- एमपीएससी (MPSC), यूपीएससी (UPSC)
- बँकिंग परीक्षा (IBPS, SBI)
- कर्मचारी निवड आयोग (SSC)
- रेल्वे भरती मंडळ (RRB)
- NET/SET परीक्षा
- पोलीस / सैन्य भरती

- इतर शासकीय / नागरी सेवा परीक्षा

**ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांकरीता पुरविल्या जाणाऱ्या सेवा व सुविधा**

१. गरीब व होतकरुन विद्यार्थ्यांना पुस्तक बँक योजना (Book Bank Scheme)
२. पुस्तक उधार सेवा (Book Lending Service)
३. ऑनलाइन सार्वजनिक प्रवेश सूची (ओपॅक) (Online Public ccess Catalogue - OPC)
४. संदर्भ व मार्गदर्शन सेवा (Reference and Referral Service)
५. वाचन कक्ष सुविधा (Reading Room Facility)
६. डिजिटल ग्रंथालय सेवा (Digital Library Services)
७. चालू जागरूकता सेवा (CS) (Current wareness Service - CS)
८. पुस्तक बँक सुविधा (Book Bank Facility)
९. प्रतिकृतीकरण / प्रिंटिंग सुविधा (Reprography / Printing Facility)
१०.वापरकर्ता परिचय व माहिती साक्षरता कार्यक्रम (User Orientation Information Literacy Programs)
११.ग्रंथालयांमधील परस्पर कर्ज (Inter-Library Loan - ILL)
१२.वृत्तपत्र वाचन कोपरा (Newspaper Reading Corner)
१३.संशोधनासाठी सहाय्य (Support for Research)
१४.संस्थात्मक संग्रह (Institutional Repository)
१५.ग्रंथालय अभिप्राय प्रणाली (Library Feedback System)
१६. ग्रंथालय स्वयंचलन (Automation) (Library Automation)
१७. डिजिटल उपक्रम (Digital Initiatives)

**ग्रंथालय विभाग**

१. संदर्भ विभाग (Reference Section)
२. पाठ्यपुस्तक विभाग (Textbook Section)
३. सामान्य ग्रंथ विभाग (संग्रह कक्ष) (General Book Section - Stack Room)
४. पुस्तक बँक विभाग (Book Bank Section)
५. वाचन कक्ष (Reading Room)
६. साप्ताहिके व मासिके विभाग (Periodicals Section)
७. वृत्तपत्र विभाग (Newspaper Section)
८. डिजिटल ग्रंथालय / ई-संसाधन विभाग (Digital Library / E-Resources Section)
९. प्रतिकृतीकरण विभाग (झेरॉक्स विभाग) (Reprography Section)
१०. संग्रहालय / संस्थात्मक संग्रह विभाग (rchives / Institutional Repository)
११. प्रक्रिया विभाग (Processing Section)
१२. ग्रंथपाल कक्ष/प्रशासन विभाग (Librarian's Cabin / dmin Section)

**सामंजस्य करार**

१. छत्रपती शहाजी महाविद्यालय, कोल्हापूर यांच्यामार्फत अधिकाअधिक वाचनसाहित्य उपलब्ध व्हावे व वाचकांना जास्तीत जास्तके पुस्तक देवघेव व्हावी या उद्देशाने सामंजस्य करार करणेत आलेला आहे.

२. वाचन संस्कृती वाढावी या उद्देशाने महावीर महाविद्यालयाचा पुढाकार महावीर महाविद्यालय, कोल्हापूर आणि जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर (अंतर्गत विविध कार्यालये) यांच्यामध्ये वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सामंजस्य करार (चेण) करण्यात आला आहे. या कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, विविध शासकीय कार्यालयांमध्ये वाचनसुविधा उपलब्ध करून देणे, तसेच समाजात वाचनसंस्कृती वृद्धिंगत करणे हे उद्दिष्ट आहे. विशेष म्हणजे, अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे महावीर महाविद्यालय हे

जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय ठरले आहे, ही बाब महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे. या उपक्रमामुळे शैक्षणिक आणि सामाजिक पातळीवर वाचनाचे महत्व अधोरेखित होणार असून, भविष्यात इतर संस्थांसाठीही हा एक आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**श्री. राजीव पाटील**
सहा.ग्रंथपाल

# महावीर-ध्येय करिअर लॅब कोअर समिती

विद्यार्थ्यांनी करिअरच्या दृष्टीने जाणीव जागृती व्हावी आणि विद्यार्थ्यांचे करिअर उत्तम व्हावे याकरिता विद्यार्थ्यांना शास्त्रीय पद्धतीने समुपदेशन, मार्गदर्शनपर सहाय्य करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये महावीर-ध्येय करिअर लॅब समितीकडून खालील उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

१. ३५+ अधिक शिक्षकानी या उपक्रमांतर्गत करिअर गुरु म्हणून विद्यार्थ्यांना वेळोवेळी करिअर विषयक मार्गदर्शन केले

२. ६२५ +विद्यार्थ्यांच्या कल चाचणी घेऊन त्या विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन करण्यात आले

३. २०+ Career Guest Lectures Under Monday Career Hours Guest lecture Series आजच्या काळातील ट्रेंडी करिअर याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी Monday Career Hourshr संकल्पना राबवली जाते या अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध विषयातील प्रशासकीय सेवेतील अधिकारी बनण्याचे स्वप्न आणि आव्हाने, Career In Marketing and Skill Requirement, Career after इ. Sc The art of Event Management: Unlocking Professional Opportunities भाषांमधील करीयर संधी...Carrer in Banking Carrer in Supply Chain Management and Logistic MSW and Career opportunities Career opportunities in the Medical field Design Your Future : Careers in Creative Industries' Career Opportunities in Agriculture Clinic Agriculture business 'Emerging Automobile Trends In Artificial Intelligence यासारख्या २०+ करिअर विषयक मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

४. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी करिअर डे हा उपक्रम साजरा करण्यात आला. विद्यार्थी पालक शिक्षक यांच्यामध्ये करियर संवाद , चर्चा करण्यात आली . पुणे येथील ध्येय करिअर मेंटोर्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद देसाई यांनी विद्यार्थी पालक शिक्षक त्यांच्याशी सुसंवाद साधून मार्गदर्शन केले.

५. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना करिअर माहिती देणारे Dheya Varsity या Mobile App ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**डॉ. संजय ओमासे**
समन्वयक

# अंतर्गत तक्रार निवारण समिती

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमांचा तपशील | दिनांक |
|---|---|---|---|
| १) | स्त्री भ्रुणहत्याविरोधी लघुनाटिका | दादासो मगदूम हायस्कूल मध्ये विद्यार्थ्यांसमोर सादर सादरकर्ते बी.ए.बी.एड. चतुर्थ वर्ष छात्राध्यापिका | १ ऑक्टोबर २०२४ दुपारी ४ ते ५ |
| २) | ८ मार्च महिला दिन | गिर्यारोहन - कु. खुशी कांबोज यांचे अनुभव कथन अध्यक्ष, डॉ. सौ. सुषमा रोटे संचालक, आ.दे.शि.प्र.मंडळ प्रमुख उपस्थिती, मा.सौ.स्नेहल कापसे मा.प्र. प्राचार्य डॉ. उषा पाटील | १३ मार्च २०२५ आचार्य विद्यानंद संस्कृती भवन |

समन्वयक
**डॉ. शैलजा मंडले**

# महावीर महाविद्यालय बी.ए. बी.एड. विभाग
# माजी विद्यार्थी संघ

बी.ए. बी.एड. माजी विद्यार्थी संघाचा मेळावा ५ जानेवारी, २०२५ रोजी संपन्न झाला. मेळाव्याला कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, मुंबई, पुणे, रत्नागिरी, महाड, खेड, बेळगाव, इत्यादी भागातून साधारण ३०० विद्यार्थी उपस्थित होते. मेळाव्यामध्ये दरवर्षीप्रमाणे जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत माजी विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

वर्षभरामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली. ज्या विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी नोकरी लागली. ज्यांची मुख्याध्यापक, प्राचार्यपदी निवड झाली, नेट –सेट परीक्षा उत्तीर्ण झाले, वर्षभरामध्ये विद्यार्थ्याच्या कार्याचा गौरव म्हणून ज्यांना पुरस्कार मिळाले, शेती, व्यापार यामध्ये प्रगती केली, नोकरीमध्ये उल्लेखनीय कार्य केले अशा वीस विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

मेळाव्यामध्ये आपला सोलापूर जिल्ह्यातील नरखेड गावचा माजी विद्यार्थी अशोक धोत्रे दरवर्षी आजी विद्यार्थ्यांचा सत्कार करत असतो. बी.ए. बी.एड. प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षामध्ये वर्गात गुणानुक्रमे पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचा व विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचा धोत्रे यांच्याकडून सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे या मेळाव्यामध्ये अशोक धोत्रे यांच्याकडून महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचा आणि माजी विद्यार्थी संघाच्या कार्यकारणीतील सदस्यांचा फेटा बांधून शाल, श्रीफळ, व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

माजी विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा मिळावा, त्या आठवणी कायमस्वरूपी स्मरणात राहाव्यात म्हणून 'दरवळ' ही स्मरणिका प्रकाशित करण्यात आली. स्मरणिकेसाठी ६६ विद्यार्थ्यांचे आत्मपर लेख प्राप्त झाले. बीएबीएडच्या स्थापनेपासूनचे प्राचार्य, समन्वयक, विद्यमान व सेवानिवृत्त प्राध्यापक, विद्यमान व सेवानिवृत्त प्रशासकीय सेवकवर्ग,संस्था प्रतिनिधी या सर्वांची आठवण या स्मरणिकेमध्ये कायम राहील. बी.ए बी.एड विभागासाठी मैलाचे दगड ठरलेले ॲड. के.ए.कापसे साहेब, कै. तात्यासाहेब पाटणे, कै. गणपतराव रोटे या सर्वांचा छायाचित्र स्वरूपात परिचय देण्यात आलेला आहे. महाविद्यालयाच्या जीवनामध्ये दस्तऐवज ठरावा अशी 'दरवळ' स्मरणिका आहे.

माजी विद्यार्थी संघ स्वावलंबी व्हावा. माजी विद्यार्थी संघाच्याकडून आजी विद्यार्थ्यांसाठी काही शैक्षणिक उपक्रम राबवावेत यासाठी २०२४ सालापासून काही उपक्रम राबवण्यात आले. २०२४ साली विद्यार्थ्यांकडे मदतीचे आव्हान करण्यात आले. त्यानुसार एक लाख रुपयाचा निधी उपलब्ध झाला होता.

विद्यमान प्राध्यापक आणि सेवानिवृत्त प्राध्यापक यांनीही माजी विद्यार्थी संघाला देणगी दिलेली आहे. त्यामध्ये डॉ. अरुण पाटील, डॉ. गोपाळ गावडे, प्रा. जयवंत दळवी, डॉ. महादेव शिंदे, डॉ. रवींद्र मिरजकर, डॉ. शंकर धनवडे, प्रा. अजित चौगुले, डॉ. अंकुश बनसोडे, डॉ.शशिकांत अन्नदाते, डॉ संगीता महाजन. सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. मलगोंडा मायगोंडा, डॉ. उत्तरा कुलकर्णी, प्रा. नलिनी पाटील, डॉ. सुजाता पंडित, डॉ. माणिक विजापुरे, डॉ. सुरैय्या मकुभाई आणि सुरेखा पत्रावळी त्याचबरोबर काही माजी विद्यार्थ्यांनीही देणगी स्वरूपामध्ये रक्कम माजी विद्यार्थी संघाकडे सुपूर्त केलेली आहे.विद्यार्थ्यांनी जाहिरात स्वरूपात देणगी दिलेली आहे. तीन लाख ९ हजार रुपये देणगी संकलित झाली. खर्च वजा जाता तीन लाख रुपयांची अनामत ठेव (एफडी) करण्यात आलेली आहे. या रकमेतून येत्या शैक्षणिकवर्षापासून गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना दत्तक योजना राबविण्यात येणार आहे.

मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य डी. आर. कोण्णूर उपस्थित होते. माजी प्राचार्य डॉ. संभाजीराव कणसे, डॉ. आर.पी. लोखंडे, प्र-प्राचार्या डॉ. उषा पाटीलही उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे खजिनदार श्री. गुणवंत रोटे उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रियंका पाटील, उपाध्यक्ष मनोज जाधव, सचिव बसवराज वस्त्रद, कार्यकारिणीतील सर्व सदस्य, माजी अध्यक्ष प्रकाश सुतार, ताज मुल्लाणी, डॉ. विनोद कांबळे उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत 'दरवळ' स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

**प्रा. (डॉ.) गोपाळ ओमाणा गावडे**

माजी विद्यार्थी समिती प्रमुख

# मैत्रीण व्यासपीठ

**१. वित्तीय साक्षरता:**

शनिवार, दिनांक ३१-८-२०२४ रोजी मैत्रीण व्यासपीठ मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्यासाठी वित्तीय साक्षरता या विषयी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. संध्या जाधव व डॉ. अश्विनी कोटणीस (वाणिज्य विभाग) यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. सदर कार्य व्याख्यानास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

**२. झिम्मा- फुगडी:**

बुधवार, दिनांक १९-९-२०२४ रोजी महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागाकडील सर्व विद्यार्थीनींसाठी मैत्रीणमंच व्यासपीठ मार्फत गणपतराव रोटे रूम नंबर २६ येथे झिम्मा-फुगडी या कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील ५७ विद्यार्थीनींनी सहभागी झाल्या.

**३. नवरात्र उत्सव:**

शुक्रवार, दिनांक ११-१०-२०२४ रोजी महाविद्यालयातील सर्व शाखेकडील विद्यार्थीनींच्यासाठी नवरात्र उत्सव निमित्त मैत्रीण व्यासपीठ आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शाखेकडील विद्यार्थीनींनी सहभाग घेतला.

**४. जागतिक महिला दिन:**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मैत्रीण व्यासपीठ मार्फत शुक्रवार, दिनांक -७ मार्च २०२४ रोजी विद्यार्थीनींच्यासाठी 'स्व-संरक्षण' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डॉ.संदीप कृष्णा पाटील (जनरल सेक्रेटरी, आय बिलिव्ह स्पोर्टस फाउंडेशन कोल्हापूर) यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

**डॉ. सुजाता पाटील**
समन्वयक

---

# बी.एम.रोटे कनिष्ठ महाविद्यालय, कोल्हापूर
# वार्षिक अहवाल

## विद्यार्थी संख्या अहवाल २०२४-२५

| अ.क्र. | वर्ग | संख्या |
|---|---|---|
| १) | ११ वी कला (अ + ब) | २१० |
| २) | १२ वी कला (अ + ब) | १८५ |
| ३) | ११ वी वाणिज्य (अ + ब) | २१० |
| ४) | १२ वी वाणिज्य (अ + ब) | १५८ |
| ५) | ११ वी विज्ञान (अ + ब) | २५३ |
| ६) | १२ वी विज्ञान (अ + ब) | २३४ |
| | **एकूण विद्यार्थी संख्या** | १२५० |

**बी.एम. रोटे कनिष्ठ विभागामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले उपक्रम खालीलप्रमाणे आहेत**

| अ.क्र. | दिनांक | उपक्रम तपशील |
|---|---|---|
| १ | २१/०६/२४ | योग दिनाचे महाविद्यालयामार्फत आयोजन करण्यात आले |
| २ | ०१/०७/२४ | मा. एस.एम. नेर्ली यांचे व्याख्यान<br>विषय - पर्यावरण संरक्षण |
| ३ | १५/०७/२४ | ज्युनिअर एन.एस.एस. विभागामार्फत हरित सेवा योजने अंतर्गत न्यू पॉलिटेक्निक कॉलेज, उचगांव येथे एक दिवसीय सामाजिक वनीकरण कार्यक्रम. |
| ४ | २०/०७/२४ | ज्युनिअर विभागातील १२ वी च्या विद्यार्थ्यांकरिता १२th Fail या चित्रपटाचे प्रदर्शनण |
| ५ | ०२/०८/२४ | मा. ॲड. प्रसाद देशपांडे यांचे ॲटी रॅगिंग व बालगुन्हेगारी संदर्भात बदलत्या कायदयांचा परिचय या विषयावर मार्गदर्शन. |
| ६ | ०३/०८/२४ | मतदान नोंदणी शिबीर<br>मार्गदर्शक - मा. एम. एस. पाटील (नोडल ऑफीसर) |
| ७ | १२/०८/२४ | ज्युनिअर विभागामार्फत नशा मुक्ती दिन साजरा<br>विद्यार्थ्यांकडून नशा मुक्तीसाठी शपथ वाचन. |
| ८ | ३१/०८/२४ | विज्ञान ज्युनिअर विभागामध्ये मा. आर. एस. पाटील सर यांचे विज्ञान शाखेतील नोकरीच्या संधी या विषयावर मार्गदर्शन. |
| ९ | २३/०९/२४ | कर्मवीर भाऊराव पाटील जयंती निमित्त माजी प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील सर यांचे व्याख्यान. |
| १० | २४/०९/२४ | मा. डॉ. वकील पाराज यांचे उपाध्ये व्याख्यानमाले अंतर्गत अनेकांतवाद या विषयावर व्याख्यान. |
| ११ | ३०/०९/२४ | ध्येय करिअर ॲकॅडमी ज्युनिअर विभागामार्फत भाषेव्दारे करिअर संधी या विषयावर प्रा. डॉ. अरुण पाटील सर यांचे व्याख्यान. |
| १२ | ०१/१०/२४ | एन.एस.एस. विभाग व एन.सी.सी. विभागामार्फत एक तारीख - एक घंटा या अंतर्गत सकाळी ८ ते ९ या वेळेत परिसर स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात आला. |
| १३ | ०८/१०/२४ | ध्येय करिअर ॲकॅडमी मार्फत ज्युनिअर विभागामध्ये इव्हेंट मॅनेजमेंट -भविष्यकालीन संधी या विपवर मा. अवधूत भोसले यांचे मार्गदर्शन. |
| १४ | ११/१०/२४ | विद्यार्थिनींसाठी दांडिया कार्यक्रम आयोजित करण्यात आला. |
| १५ | १५/१०/२४ | वाचन प्ररणा दिना निमित्त डॉ. प्रकाश कांबळे यांचे वाचन काळाची गरज या विषयावर व्याख्यान. |
| १६ | ३०/११/२४ | विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे आयोजन. |
| १७ | ०४/१२/२४ | ज्युनिअर विभाग पालक सभा आयोजन. |
| १८ | ०८/१२/२४ | विज्ञान ज्युनिअर विभागामध्ये ध्येय करिअर मार्फत मा. श्री. विशाल पुनदीकर यांचे कृत्रिम बुध्दिमत्ता या विषयावर व्याख्यान. |
| १९ | १०/१२/२४ | ज्युनिअर विभागातील विद्यार्थ्यांकरिता आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. |
| २० | १२/१२/२४ | ज्युनिअर विभागामार्फत विजयी दौड रॅली चे स्वागत. |

| अ.क्र. | दिनांक | उपक्रम तपशील |
|---|---|---|
| २१ | १४/१२/२४ | इ. १० वी व इ. ११ वी च्या विद्यार्थी व पालक. यांच्यासाठी ध्येय करिअर मेंटॉर मार्फत मा. आनंद देसाई, पुणे यांचे भविष्यातील करिअर संधी या विषयावर मार्गदर्शन. |
| २२ | १८/१२/२४ | रसायनशास्त्र या विषयासाठी गेस्ट लेक्चर |
| २३ | २०/१२/२४ | जीवशास्त्र या विषयासाठी गेस्ट लेक्चर |
| २४ | २१/१२/२४ | भौतिकशास्त्र या विषयासाठी गेस्ट लेक्चर |
| २५ | २३/१२/२४ | गणित या विषयासाठी गेस्ट लेक्चर |
| २६ | १३/०१/२५ | कनिष्ठ विभागांतर्गत कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेची तपासणी मा. श्री. आर.व्ही. कांबळे, प्रशासन अधिकारी, महानगरपालिका कोल्हापूर यांचे कडून पथक तपासणी समिती यांचे मार्फत तपासणी करण्यात आली. |

**प्रा. राजेंद्र हिरकुडे**
पर्यवेक्षक

---

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक**
**संचलित**
**महावीर महाविद्यालय, कोल्हापूर**
**अभ्यास केंद्र सांकेतांक -७११२१**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पदविका विभाग ३९ , पदवी विभागामध्ये एकूण ४२० तर पदव्युत्तर पदवी विभागात २३७ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले.

यामध्ये या शैक्षणिक वर्षात एम. ए. मानसशास्त्र व एम. ए. इंग्रजी या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी मिळाली.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आयोजित उपक्रम खालील प्रमाणे

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या विद्यार्थी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. 'संशोधन पद्धती' या विषयावर व्याख्याते म्हणून डॉ. बी. बी. माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२. महामहिम राज्यपाल , महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ आविष्कार संशोधन स्पर्धा-२०२५ मध्ये दिनांक ११ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ अखेर डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोनेरे येथे आयोजन करण्यात आले होते . यामध्ये महावीर महाविद्यालयाच्या अभ्यासकेंद्रातील खालील विद्यार्थांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , नाशिक अंतर्गत स्पर्धेकरिता विद्यापीठाकडून निवड करण्यात आली.

| अ.क्र. | विद्यार्थी नाव | वर्ग |
|---|---|---|
| १. | साक्षी रघुनाथ कलकुटकी | बी. ए. भाग २ |
| २. | दिक्षा सदानंद जाधव | बी. ए. भाग २ |
| ३. | मेघा कुंडलिक चव्हाण | बी. ए. भाग १ |

३. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक विभागीय केंद्र, कोल्हापूर यांच्या वतीने रविवार दिनांक १८/०८/२०२४ रोजी महावीर महाविद्यालय येथे अँटी रॅगिंग जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहात प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमात श्री. विजयकुमार मुत्नाळे यांनी रॅगिंग म्हणजे काय? रॅगिंग होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी? तसेच अँटी रॅगिंग संबंधी विद्यापीठ अनुदान आयोग यांची भूमिका व कायदे याची माहिती तसेच अँटी रॅगिंग संबंधित डॉक्युमेंटरी सुद्धा दाखवण्यात आली.

४. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आयोजित शालेय संपर्क अभियान २.० (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP-२०२०) आणि वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमासाठी कोल्हापूर जिल्हा समन्वयक म्हणून केंद्र सहाय्यक बसवराज वस्त्रद यांची नियुक्ती करण्यात आली.

५. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी यांना 'संशोधन पद्धती' या विषयावर व्याख्याते म्हणून डॉ. शिवाजी पाटील माजी प्राचार्य, वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कळंबा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

५. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या नागरी सेवा २०२४ परीक्षेत हेमराज हिंदुराव पानोरेकर हा आपल्या अभ्यासकेंद्राचा माजी विद्यार्थी रँक ९९२ प्राप्त करून यश प्राप्त केले.

**प्रा. जयवंत दळवी**
केंद्रप्रमुख

---

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**
**आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभाग**
**व**
**महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.**
**यांच्या संयुक्तपणे**
**ग्रामीण पत्रकारिता व जनसंवाद माध्यमे प्रमाणपत्र अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४ २५**

ग्रामीण पत्रकारिता व जनसंवाद माध्यमे प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परिक्षेचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी विविध संस्था, कार्यालये, निर्मलगांव यांना भेटी दिली.

**१. छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पीटल कोल्हापूर :**

कोल्हापूर जिल्हातील एक शाहू कालीन सांस्कृतिक वारसा म्हणून छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पीटल, कोल्हापूर कडे पाहिले जाते.सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसुविधा पुरविण्यासाठी हॉस्पीटल स्थापन करण्यात आले. या हॉस्पीटलची विविध विभागाची व त्याच्या कामांच्या कार्यपदध्तीची विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर :**

कोल्हापूरातील जिल्हाधिकारी कार्यालयाचे विविध विभागाची व त्याच्या कामांच्या कार्यपदध्तीची माहिती प्रत्यक्ष ठिकाणी भेट दिली. या विभागाची व त्याच्या कामांच्या कार्यपदध्तीची माहिती दिली.

**प्रा. जयवंत दळवी**
समन्वयक



# जल्लोष तरुणाईचा



MAHAVIR MAHAVIDYALAYA, KOLHAPUR (AUTONOMOUS)
तू भेटशी नव्याने
ओठांवरी जरी रे...

।। शीलं परं भूषणम् ।।

श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर संचलित

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

७ ई, वैशाली परिसर, नागाळा पार्क, भाऊसिंगजी मार्ग, कोल्हापूर ४१६ ००३

शिवाजी विद्यापीठ संलग्न, नॅक 'अ' मानांकित जैन धार्मिक अल्पसंख्यांक मान्यताप्राप्त संस्था

www.mmk.ac.in I mahavircollege@yahoo.com I +91 231 2651830

मानव्यविद्या, वाणिज्य आणि व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञान व आंतरविद्याशाखा

## बी. एम. रोटे ज्युनिअर कॉलेज

११वी व १२वी (कला, वाणिज्य आणि विज्ञान)

## शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त अभ्यासक्रम

**पदवी अभ्यासक्रम** : बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.ए.बी.एड.

**पदव्युत्तर अभ्यासक्रम** : मानसशास्त्र, इंग्रजी

**एम.एस्सी.**: मायक्रोबायोलॉजी, केमिस्ट्री

**व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम** : बी. व्होक. प्रिन्टिंग ॲण्ड पब्लिशिंग, ॲग्रीकल्चर, ॲटोमोबाईल ग्रामीण पत्रकारीता, संवाद व जनसंपर्क माध्यमे

**करिअर ओरिएंटेड प्रोग्रॅम**

१. माहिती व संगणकाची मूलतत्वे

२. Certificate Course in Accountancy & Taxation

३. English Communication & Personality Development

४. कौशल्य व उद्योजकता विकास ५. इव्हेंट मॅनेजमेंट

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- एकाच वेळी अनेक अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सुविधा.
- प्रत्येक विद्याशाखेसाठी स्वतंत्र व सर्व सोयींनी युक्त इमारत.
- उत्कृष्ठ निकालाची परंपरा.
- संगणकीकृत ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय), वायफाय कॅम्पस (wi-fi Campus)
- विद्यार्थिनींसाठी सुसज्ज वसतिगृह.
- इंटरनेट ब्रॉड बॅन्ड सुविधेसह स्वतंत्र संगणक कक्ष व नेटवर्क रिसोर्स सेंटर.
- एल.सी.डी., डी.एल.पी., प्रोजेक्टर्स, लॅपटॉप, उपग्रह नकाशे, तक्ते इत्यादी दृकश्राव्य साधनांद्वारे आनंददायी व प्रभावी अध्यापन.
- सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांसाठी ऑडिटोरियम व ॲम्फी थिएटरची सोय.
- मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व रेमेडिअल कोचिंग सेंटर.
- गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, विद्यार्थी साहाय्य निधी योजना, कमवा व शिका योजना इ. सोयी.
- करिअर ओरिएंटेड प्रोग्रॅम अंतर्गत विविध प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रमांची सोय.
- राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, देशभूषण नियतकालिक, भित्तिपत्रिका, महावीर टाईम्स.
- विद्यार्थी / विद्यार्थिनी मंच, वाचनकट्टा, कलामंच इत्यादी उपक्रमांद्वारे व्यक्तिमत्त्व विकासासाठी व्यक्तिगत लक्ष व प्रोत्साहन.
- माजी विद्यार्थी व पालक यांच्याशी नित्य संपर्क.
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी खास सुविधा व विशेष लक्ष.
- एम. ए. (समुपदेशन मानसशास्त्र) अभ्यासक्रमाची सोय असलेले शिवाजी विद्यापीठातील पहिले व शहरातील एकमेव केंद्र.

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.